**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी.**: **/मु.शी.**: सन 2008-09 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना हे माहीतच असेल की, मंगळवार दिनांक 22 जुलै रोजीच्या कामकाज पत्रिकेवर चर्चेसाठी दर्शविण्यात आल्या होत्या. परंतु त्या दिवशी चर्चा होऊ शकली नाही म्हणून या पूरक मागण्यांवरील चर्चा आज या विशेष बैठकीत घ्यावयाची आहे. आज कार्यक्रम पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा हाईल. पुरवणी मागण्या आणि त्याखालील बाबी सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आल्या आहेत. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा मंत्रीनिहाय होत असल्याने संबंधित मंत्र्यांच्या सर्व विभागांबाबत सदस्य बोलू शकतात. जेणेकरुन मंत्रिमहोदयांना सन्माननीय सदस्यांच्या मुद्यांना उत्तर देणे सुलभ होईल. चर्चा संबंधित बाबीपुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही, हे सदस्यांना सांगावयास नकोच.

कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाचे आहे, हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

**शीर्षक** : विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या

खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील.

1. मुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या म्हणजे मागणी क्रमांक ए-1,ए-2,ए-4,ए-7,बी-3, बी-9,एफ-5, जे-1,जे-2,जे-4,एन-3,एन-,क्यू-3,झेडई-1ए,झेडई-2ए

2. ग्रामविकास व पर्यटन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या मागणी क्रमांक एल-2,एल-3

3. वस्त्रोद्योग, माजी सैनिकांचे कल्याण व रोजगार व स्वयंरोजगार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या म्हणजे मागणी क्रमांक-व्ही-2,झेडए-1,झेडए-3

4.पशुसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय व औकाफ मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या म्हणजे मागणी क्रमांक, डी-6, डी-10,

5.कृषी, जलसंधारण व खार जमीन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या म्हणजे मागणी क्रमांक, डी-3, एल-3,एल-7,एल-8

6.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक, आर-1



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** .....

7. सामाजिक न्याय व व्यसन मुक्ती कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक-एन-2ए, एन-3,एन-

8. आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक-टी-2,टी-5,टी-6,टी-8

9. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक-एम-2, एम-3

10. वन मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक-सी-7, सी-10

आता सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सुरुवात करीत असताना मी प्रथम माननीय मुख्यमंत्र्यांकडे असलेल्या सामान्य प्रशासन विभागावर माझे विचार व्यक्त करणार आहे.

महोदय, बाब क्र.4, पृ.क्र.5 - द्वैवार्षिक निवडणुकीसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्यासाठी ही पुरवणी मागणी सभागृहासमोर आलेली आहे. शिक्षक मतदारसंघ आणि पदवीधर मतदारसंघाच्या याद्या तयार करण्यासाठी ही तरतूद आहे. या अनुषंगाने मला असे सुचवावयाचे आहे की, संभाजीनगर-औरंगाबाद व इतर ठिकाणी अशा प्रकारच्या निवडणुका झाल्या. पदवीधर मतदारसंघाची गेल्या वर्षीची यादी देखील यामध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. म्हणजे गेल्या 6 वर्षापूर्वीच्या निवडणुकीच्या याद्या देखील यात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. याला सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशाचे कारण दिलेले आहे. त्यासाठी राज्यशासनाची काही जबाबदारी होती परंतु शासनाने याबाबत कोणतीही हालचाल केली नाही. वास्तविक नियम असा आहे की, पदवीधर मतदारसंघ आणि शिक्षक मतदारसंघाबाबत एक फॉर्म भरावा लागतो. गेल्या निवडणुकीत ज्यांनी मतदान केले त्यांना पुन्हा या मतदानासाठी याद्या प्राप्त करण्यात येतात. परंतु तसे न करता मागील निवडणुकीत होत्या तशाच्या तशाच याद्या प्राप्त झालेल्या आहेत, हे माननीय मंत्री महोदयांनी लक्षात घ्यायला पाहिजे होते आणि त्याबाबत ॲफिडेव्हीट करुन घेणे आवश्यक होते, तशा हालचाली झालेल्या दिसत नाहीत, ही दुर्देवाची गोष्ट आहे. कारण पदवीधर आणि शिक्षक मतदार संघाबाबतच्या नियमावलीत असे म्हटले आहे की, यासाठी फॉर्म भरावा लागतो त्यामुळे या मतदारसंघात मतदारांची संख्या अचानक वाढली आणि निवडणुकीचा कौल दुसरीकडे गेला. त्याचप्रमाणे मुंबई शहरात जे निवडणुक ओळखपत्रे दिली जात आहेत त्यांचे काम अजुनही अपूर्णच आहे. अनेक ठिकाणी दुसऱ्या राऊंडकरिता ओळखपत्रे देण्यासाठी छायाचित्रे काढून घ्यायला बोलाविले जात नाही आणि हा प्रश्न मी यापूर्वी देखील उपस्थित केला होता. त्याचबरोबर माजी खासदार माननीयश्री. राम नाईक यांनी देखील या मतदारसंघात अनेक नावे डबल आलेली असल्याचे निदर्शनास आणून दिले. ज्याप्रमाणे संभाजीनगर पदवीधर मतदारसंघात नावे रिपीट झ ालेली आहेत तशीच नावे मुंबई मतदारसंघातही रिपीट झाली असून ही संख्याजवळपास 3.5 लाख एवढी आहे.यामध्ये सुधारणा करणार काय ? विशेषत: पश्चिम उपनगरात दुसरा राऊंड अजुनही कंडक्ट करण्यात आला नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

सभापती महोदय, बाब क्रमांक 5, पृष्ठ क्रमांक 5 वर मी माझे विचार मांडणार आहे. शासन छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक अरबी समुद्रात उभारणार आहे त्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करतो. उशिराका होईना छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारले जात आहे ही आनदांची आणि अभिमानाची गोष्ट आहे. परंतु पावन खिंडीत बाजीप्रभू देशपांडे यांचे स्मारक व्हावे अशी लोकांची मागणी होती, त्यासंदर्भात लोकांनी शासनाकडे पत्रव्यवहार देखील केला होता. पावन खिंडीत बाजीप्रभू देशपांडे यांचे स्मारक बांधण्याची पूर्वी शासनाची मानसिकता होती परंतु ही योजना नंतर का बारगळली हे समजू शकले नाही. त्यामुळे पावन खिंडीत बाजीप्रभू देशपांडे यांचे स्मारक कधी बांधले जाणार आहे यासंदर्भातील माहिती सभागृहाला मिळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 243, पृष्ठ क्रमांक 245 वर मी माझे विचार मांडणार आहे. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी 68 शासकीय वसतिगृहे सुरु करण्यासाठी 15,50,00,0000/- तरतूद करण्यात आलेली आहे परंतु आदिवासी विद्यार्थ्यांची आज काय स्थिती आहे याची आपल्याला कल्पना आहे. आदिवासी मुलांना शासनातर्फे गणवेष तसेच पोषण आहार पुरवला जात असतो. मुलांना पोषण आहारामध्ये खिचडी दिली जाते. तांदुळ वाटपाची चौकशी सध्या सुरु आहे. ही चौकशी किती दिवसात पूर्ण होणार आहे याची माहिती मिळणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना गेल्यावर्षी गणवेष का पुरवण्यात आले नाहीत याची माहिती मिळण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागावरील बाब क्रमांक 232, पृष्ठ क्रमांक 229 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. "राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान" या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत विविध योजनांसाठी राज्याचा हिस्सा म्हणून तरतूद करण्याचे ठरवण्यात आलेले आहे. या योजनेअंतर्गत पॅरामेडीकल स्टाफ, नर्सेससाठी ट्रेनिंग देण्याचे काम आपण करणार होता त्याचे नेमके काय झालेले आहे. ब-याच प्राथमिक आरोग्य केंद्रात इक्वीपमेंट नाहीत, त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्राचे, उपकेंद्राचे बळकटीकरण करण्याच्या संदर्भात काय प्रयत्न करण्यात आलेले आहेत याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावी एवढी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------------------------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर विचार मांडण्याची आपण मला संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो. सामान्य प्रशासन विभागातील बाब क्रमांक 1, पृष्ठ क्रमांक 4 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. दोन जुन्या निकामी झ ाालेल्या गाडयांच्या ऐवजी राजभवन, मुंबई यांच्या कार्यालयाकरिता 2 नवीन वाहनांची खरेदी करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. त्याच बरोबर रायगड जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रात वाहनांची आवश्यकता आहे. रायगड विभाग हा 50 टक्के महसुली आहे, रायगडमध्ये बराच भाग डोंगराळ आहे. त्यामुळे येथील जनतेच्या आरोग्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राला वाहने मिळण्याची नितांत आवश्यकता आहे त्यामुळे रायगड जिल्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी वाहनांची खास तरतूद करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागातील बाब क्रमांक 4, पृष्ठ क्रमांक 5 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. द्वैवार्षिक निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली आहे. शिक्षक मतदार संघाच्या तसेच पदवीधर मतदार संघाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी विचार मांडलेले आहेत. या विषयाच्या संदर्भात माझी मागणी अशी आहे की, शिक्षक मतदार संघाच्या याद्या आणि पदवीधर मतदार संघाच्या याद्या कायमस्वरुपी असल्या पाहिजेत. जे पदवीधर होतात त्यांची नावे दरवर्षी पदवीधर मतदार यादीत नोंदली गेली पाहिजेत तसेच शिक्षक मतदार यादीत सुध्दा दरवर्षी नाव नोंदणी झाली पाहिजे. ज्या प्रमाणे विधानसभा मतदार संघाच्या याद्या तयार केल्या जातात त्याच पध्दतीने दरवर्षी शिक्षक मतदार सघांच्या तसेच पदवीधर मतदार संघाच्या याद्या तयार केल्या जाव्यात अशी माझी मागणी आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 9.40

श्री.जयंत प्र.पाटील...

जे पदवीधर आहेत ते मतदानापासून वंचित राहणार नाहीत या दृष्टीने शासनाने माझ्या विनंतीचा विचार करावा अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाची बाब क्रमांक 5 पान नंबर 5 संबंधी मला बोलावयाचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आली आहे त्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, कान्होजी आंग्रे यांचे स्मारक अलिबाग येथे असून तेथील नगरपरिषदेच्या वतीने या स्मारकाचे सुशोभिकरण करण्यात आले आहे . अलिबाग हे पर्यटनस्थळ असून प्रत्येक आठवडयाला सात ते आठ हजार पर्यटक अलिबागला येत असतात छत्रपती शिवाजी महाराजांचा आणि कान्होजी आंग्रे यांचा इतिहास तरुण पिढीला समजावा या दृष्टीने "लाईट ॲन्ड साऊन्डवर आधारित कार्यक्रम "दाखविण्यासाठी शासनाने एक कोटी रुपयांची तरतूद करावी अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, यानंतर मी महसूल आणि वन विभागाची बाब क्रमांक 42 पान नंबर 29 संबंधी बोलणार आहे. किनवट, जिल्हा नांदेड येथील वनातील मार्गाचे बांधकाम करण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे. या मागण्यांवरील चर्चेत भाग घेत असतांना मला असे सांगावयाचे आहे की, वन्य प्राण्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारलेली आहे. अलिबाग तालुक्यातील कार्लेखिंड येथे वाघाची शिकार केल्याबद्दल तेथील जागरुक नागरिक श्री.रमेश कदम यांनी तक्रार केली होती त्याचबरोबर शिकार करणा-यांची नावे देखील डी.एफ.ओ. यांना दिली होती परंतु अजूनही या संदर्भात चौकशी केली नाही आणि संबंधितावर कारवाई केली गेली नाही. दिवसेंदिवस वाघांची संख्या कमी कमी होत चालली आहे तेव्हा आपल्याकडील वाघांची संख्या कमी होता कामा नये या दृष्टीकोनातून या प्रकरणाची चौकशी त्वरित करण्यात यावी आणि संबंधिताविरुध्द कारवाई करण्यात यावी अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो. त्याचबरोबर या पनवेल मधून कार्लेखिडीकडे जाणारा प्रस्तावित रस्ता हा फॉरेस्ट एरियामधून जात आहे तेव्हा या रस्त्याचे काम देखील लवकरात लवकर कसे पूर्ण होईल या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावा अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, यानंतर मला नगरविकास विभागाची बाब क्रमांक 68 पान नंबर 55 संबंधी बोलावयाचे आहे. महानगरपालिकांना प्राथमिक पायाभूत सोयी सुविधा देण्यासाठी तरतूद





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

करण्यात आली आहे. या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, नागरी सोयी सुविधा उपलब्ध करण्यासाठी राज्यातील ब आणि क वर्गीय नगरपालिकांना शासनाने जास्तीत जास्त मदत करावी अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे. कोकणातील नगरपालिकांचे उत्पन्न अतिशय अल्प असते तेव्हा पायाभूत सुविधा देण्यासाठी ब आणि क वर्गीय नगरपालिकांना जास्तीत जास्त मदत करण्यात यावी अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय,यानंतर मला ग्राम विकास आणि जलसंधारण विभागाची बाब क्रमांक 129 पान नंबर 137 संबंधी बोलावयाचे आहे. ग्रामीण विकास कार्यक्रमाअंतर्गत ग्राम विकास अधिका-यांची नवीन पदे निर्माण करण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे.जिल्हा परिादेमध्ये या कर्मचा-यांच्या भरतीच्या ोळी मुलाखत घेण्यासाठी एक पॅनल तयार करण्यात आलेले आहे...

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी एक बॅग येथे आणलेली आहे. त्या बॅगेमध्ये नेमके काय आहे ?

**उपसभापती** : त्यामध्ये जर पैसे असतील तर ते येथे आणून द्यावेत ते पैसे या बॅगेत ठेवू नयेत.

श्री.मधुकर चव्हाण (बसून) : माझ्या सारख्या माणसाला पैसे कोण देणार.? मी काही खासदार नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, जिल्हा परिषदेमध्ये नोकर भरतीच्या वेळी मुलाखती घेण्याकरता एक पॅनल तयार करण्यात आलेले आहे. गेल्या महिन्यात आमच्या जिल्हापरिषदेमध्ये नोकर भरती करण्यासाठी मुलाखती घेण्यात आल्या होत्या. त्या पॅनलवर डेप्युटी सी.ई.ओ.,ॲडिशनल सी.ई.ओ. हे अधिकारी असून मुलाखती नंतर त्यांच्या नातेवाईकांची निवड करण्यात आली आहे. या अधिका-याचे सख्खे भाऊ, त्यांचा मुलगा आणि इतर नातेवाईकाची निवड करण्यात आली आहे. या सर्व व्यक्ती जिल्हाच्या बाहेरील आहेत तरी देखील त्यांची निवड करण्यात आलेली आहे. ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे. या मुलाखतीसाठी जे पॅनल तयार करण्यात आलेले आहे त्यामध्ये सी.ई.ओ., डेप्युटी सी.ई.ओ., ॲडिशनल सी.ई.ओ.,जिल्हाधिकारी इत्यादी अधिकारी नेमण्यात आलेले आहेत. तेव्हा त्या निवड समितीमध्ये लोकप्रतिनिधी ,

3...



VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 9.40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

पदाधिकारी यांचा देखील समावेश करण्यात यावा आणि यापूर्वी ज्या मुलाखती झालेल्या आहेत त्या संबंधीची चौकशी उच्च पातळीवरुन करण्यात यावी अशी मी या चर्चेच्या निमित्ताने शासनाकडे मागणी करतो.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

सभापती महोदय, बाब क्रमांक 104, पृष्ठ क्र.146 - अन्न व नागरी पुरवठा विभागाची ही पूरक मागणी आहे. त्या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, जी आपली अन्नधान्य साठविण्याची गोदामे आहेत त्यांची एकूण परिस्थिती पाहिली तर ती अत्यंत दयनीय अशीच आहे. अनेक गोदामे आज नादुरूस्त अवस्थेमध्ये आहेत. तेथे अन्नधान्य ठेवण्यासारखी परिस्थिती राहिलेली नाही. त्या गोदामांमध्ये उंदरांचा सुळसुळाट आहे. त्यामुळे ती गोदामे दुरूस्त करण्यासाठी खास तरतूद करणे आवश्यक आहे. तरी त्यासाठी खास तरतूद करून या गोदामांची योग्य अशी देखभाल दुरूस्ती करून मगच त्यात अन्नधान्य ठेवावे अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 132, बाब क्रमांक 147 - सामाजिक न्याय विभागाची ही पूरक मागणी आहे. सभापती महोदय, अलिबाग तालुक्यातील सागाव नदीच्या किनारी जी अनुसूचित जमातीच्या लोकांची वस्ती आहे त्यांना पुराचा नेहमीच त्रास होतो त्यामुळे त्या दृष्टीकोनातून त्या लोकांचे तेथून पुनर्वसन करावे आणि त्यासाठी खास तरतूद केली जावी, तसेच नदी किनारी पुराचे पाणी वस्त्यांमध्ये येऊ नये यादृष्टीने बांधबंदिस्तीसाठी या विभागाकडून खास तरतूद करावी अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्र.243, बाब क्र.240 - आदिवासी विकास विभागाची ही पूरक मागणी आहे. रायगडजिल्ह्यातील ज्या आश्रमशाळा आहेत त्यांच्या इमारतींची अत्यंत वाईट अवस्था झालेली आहे. तेथील अंतर्गत रस्ते, त्या ठिकाणी असलेली गोडाऊन्स, स्वयंपाकघर यांचा दर्जाही खालावलेला आहे. तेव्हा त्या दृष्टीकोनातून त्यांची योग्य अशी द1रूस्ती करून त्यांचे मजबुतीकरण करण्याची मागणी मी या पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने करतो आणि माझे भाषण संपवितो.

**उपसभापती** : आता यानंतर सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली हे भाषण करतील.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझी आपल्याला एक विनंती आहे. माझ्या एका स्नेह्याचे आज सकाळीच निधन झाले आणि त्याच्या अंत्यविधीसाठी मला 10.30 वाजता जायचे असल्याने आपण मला या चर्चेत भाग घेण्यासाठी प्रथम संधी दिली तर बरे होईल.

**उपसभापती** : ठीक आहे. मी आपणास प्रथम भाषणाची संधी देतो.

.... डी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, आपण माझी विनंती मान्य करून मला प्राथम्याने बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. सभापती महोदय, मी प्रथमत: सामान्य प्रशासन विभागाची बाब क्रमांक 8 च्या संदर्भात बोलणार आहे. राज्य माहिती आयोगाचे कार्यालयासाठी अतिरिक्त तरतूद, कोकण विभाग, मुंबई यासाठी ही बाब येथे आली आहे. माझी आपल्याकडे या निमित्ताने अशी मागणी आहे की, माहितीचा अधिकार हा कायदा एका चांगल्या हेतूने केला गेला आहे यात शंका नाही. परंतु गेल्या 5-6 महिन्यांमध्ये असे लक्षात येत आहे की, या अधिकाराचा उपयोग ब्लकमेलिंगसाठी देखील करण्यात येऊ लागला आहे. अशा तक्रारी मध्यंतरी अनेक प्रशासकीय अधिकाऱ्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांकडे तसेच केंद्रातील अधिकाऱ्यांकडे केलेल्या आहेत. या माहितीचा अधिकार कायद्याखाली 20-25-30 वर्षा पूर्वीचे रेकॉर्ड मागितले जाते आणि अर्थातच इतके जुने रेकॉर्ड काढून देण्यासाठी काही अवधी लागतो. पण त्याचा विचार न करता कायद्यातील तरतुदींचा आधार घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना 25-30 हजार रूपयांचा दंड देखील केला गेला आहे. सभापती महोदय, कोठलेही शस्त्र हे दुधारी असेल तर त्याचा वापर हा चांगल्यासाठी होताना वाईटासाठी देखील होऊ शकतो. आणि येथे काही लोक या कायद्याचा वापर वाईट हेतूने करीत असल्याचे दिसून येत आहे. कित्येकदा व्यक्तिगत जीवनातील वैयक्तिक गोष्टी देखील या कायद्याच्या माध्यमातून विचारल्या जातात इतकेच नाही तर प्रशासनातील अधिकाऱ्यांची प्रतिमा मलिन करण्यासाठी देखील याचा उपयोग केला जातो आहे. त्यामुळे हा केंद्राचा कायदा असल्याने आपण केंद्र सरकारकडे याबाबत विनंती करावी जेणे करून या कायद्याचा अशा प्रकारे कोणी दुरूपयोग करू शकणार नाही, केला जाणार नाही.

सभापती महोदय, पृ.49, बाब क्र.58, शालेय शिक्षण विभागाची ही पूरक मागणी आहे. सभापती महोदय, गेल्या तीन वर्षापूर्वी कोकण विभागासाठी 10 वी व 12 वीच्या परीक्षा घेण्यासाठी वेगळे मंडळ स्थापन करण्यात यावे अशी मागणी केली गेली होती. मध्यंतरी रत्नागिरी येथे जेव्हा मंत्रिमंडळाची बैठक झाली होती त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते की, सिंधुदुर्ग, रायगड आणि रत्नागिरी साठी 10 वी व 12 वी करिता शिक्षण मंडळ स्थापन करण्यात येईल. आता या बाबत सांगितले जाते की, शासनाला यासाठी कोठल्याही भागात जागा मिळत नाही. खरे तर याबाबत असेही शासनाकडून 2003 मध्ये सांगण्यात आले होते की, हे परीक्षा मंडळ स्थापन

..... डी 3 ...



KBS/KGS/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 09:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करूनच त्याच्यामार्फत 2004 च्या मार्चच्या परीक्षा घेतल्या जातील. त्यानंतर 2004, 2005, 2006 व 2007 या वर्षामध्येही हेच उत्तर दिले जात आहे. तेव्हा कोकण विभागासाठी 10 वी व 12 वी करिता शिक्षण मंडळ लवकरात लवकर स्थापन करण्यात यावे अशी मागणी मी या पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने करीत आहे.

( यानंतर श्री. सरफरे ....इ 1 ..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 119 वरील बाब क्र. 117 मध्ये उच्च न्यायालयाच्या माननीय न्यायाधीशांसाठी 11 होंडा सिटी गाडया खरेदी करण्यासाठी मागणी करण्यात आली आहे. या मागणीच्या निमित्ताने मी नम्रपणे एक गोष्ट या सभागृहाच्या माध्यमातून आपल्या निदर्शनास आणून देत आहे. दि. 22 जुलै रोजी लोकमान्य टिळकांना उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी सहा वर्षाची काळया पाण्याची शिक्षा दिली. त्यावेळचे न्यायमूर्ती दिनशॉ दावर यांनी ती शिक्षा दिली.. त्यावेळी लोकमान्य टिळकांनी बंगालमध्ये जे बॉम्बस्फोट होत आहेत त्याचे समर्थन करणारा अग्रलेख लिहिला होता. त्यात म्हटले होते की, "हे बॉम्बस्फोट अशासाठी होत आहेत की, भरपूर पाऊस पडल्यानंतर पाणी साचता कामा नये, पूर येता कामा नये असे चालणार नाही. तुम्ही भारतीय जनतेवर इतका अन्याय केला आहे. त्यामुळे अशाप्रकारे वेगवेगळया माध्यमातून असंतोषाचा स्फोट होऊन त्याचा उद्रेक जनतेमध्ये निर्माण होईल." त्यावेळी न्यायमूर्ती दिनशॉ दावर यांनी त्यांच्या अग्रलेखासाठी राजद्रोहाचा खटला भरला. तो खटला भरीत असतांना त्यांनी असे उद्‌गार काढले की, "तुम्हाला जन्मभर काळया पाण्याची शिक्षा झाली पाहिजे. परंतु तुमचे वय बघून मी सहा वर्षाची शिक्षा देत आहे." यानिमित्ताने माझी अशी मागणी आहे की, आपण थोडे संकेत बाजूला ठेवावेत. सभापमती महोदय, त्याच कोर्ट रुममध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नॉर्मड मेकलॉर्ड यांनी महात्मा गांधी यांची सनद रद्द केली होती. म्हणून माझी शासनाला विनंती व मागणी आहे की, दोन्ही न्यायमूर्तींची तैलचित्रे त्या सभागृहातून काढून टाकावीत. आपल्याला जर ती तैलचित्रे हेरिटेज म्हणून किंवा ऐतिहासिक चित्र म्हणून जतन करावयाची असतील तर ती अन्य ठिकाणी ठेवावीत. ज्या न्यायमूर्तींनी महात्मा गांधी यांची सनद रद्द केली, आणि लोकमान्य टिळकांनी केवळ भारतीय स्वातंत्र्यासाठी अग्रलेख लिहून बॉम्बस्फोटाचे समर्थन करणारे उद्‌गार काढले म्हणून त्यांच्यावर ज्या न्यायमूर्तींनी राजद्रोहाचा खटला भरला त्या न्यायमूर्तींचे तैलचित्र उच्च न्यायालयाच्या त्या कोर्ट रुममध्ये ठेवण्याची आवश्यकता नाही. आणि म्हणून माझी मागणी आहे की, त्या ठिकाणाहून तैलचित्र बाजूला करण्यात यावे.

सभापती महोदय, पृष्ठ क्र. 229 आणि बाब क्र. 234 वर राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत विविध योजनांसाठी आपण तरतूद केली आहे. मी याठिकाणी मुद्दाम सांगत नाही. केंद्र सरकारकडून आलेल्या निधीपैकी 60 टक्के निधी आरोग्य खात्याने खर्च केला नाही असे अंदाज समितीच्या अहवालामध्ये म्हटले आहे. त्यासंबंधी चौकशी होणे आवश्यक आहे. दुसरी बाब अशी



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. मधुकर चव्हाण....

की, काल माननीय आरोग्यमंत्री डॉ. विमल मुंदडा यांनी हाफकिनबद्दल सांगितले. माझे मित्र माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत व माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी यासंबंधी आपले विचार याठिकाणी व्यक्त केले होते. हाफकिनने 100 कोटी रुपयांचा प्रस्ताव दिला आहे. त्यापैकी 50 कोटी रुपये शासनाने द्यावेत आणि 50 कोटी रुपये हाफकिन कर्ज रुपाने बाहेरुन उभे करणार आहे. परंतु त्यांची अशी अट होती की, पिंपरी-चिंचवडची जमीन 7/12 च्या उताऱ्यावर हाफकिन संस्थेच्या नावावर आहे. ती जमीन हस्तांतरीत करावी त्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातून कर्ज उपलब्ध करता येईल. गेल्या वर्षी अर्थसंकल्पामध्ये फक्त 10 कोटींची तरतूद करण्यात आली होती. त्यानंतर अजूनपर्यंत हाफकिनला पैसे देण्यात आले नाहीत

श्री. रणजित कांबळे (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री) (बसून बोलतात) : ही बाब वैद्यकीय शिक्षण विभागाकडे आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, पान क्र.295 वरील अल्पसंख्यांक विकास विभागाच्या संदर्भात सांगावयाचे तर अल्पसंख्यांक समुदायातील लोकांचा आर्थिक, सर्वांगिण विकास करण्यासाठी कोणाचीही हरकत नाही. त्यांचा सामाजिक, आर्थिक विकास केला पाहिजे. परंतु घटनेमध्ये असे कुठेही लिहिलेले नाही. या देशाची फाळणी धर्माच्या आधारावर झाली. जी मुस्लिम राष्ट्रे आहेत, त्यांनी सांगितले की, आम्ही पाकिस्तान निर्माण करु. परमपूजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेमध्ये एस.सी., एस.टी.च्या लोकांसाठी, ज्यांना वर्षानुवर्षे अमानुष वागणूक दिली जात होती, त्यांना इतर समाजाच्या बरोबर आणण्यासाठी सवलती दिल्या आणि ही गोष्ट अत्यंत आवश्यक होती. कारण त्या काळामध्ये शिक्षण घेण्याचा अधिकार, चांगले जीवन जगण्याचा अधिकार उच्चभ्रू आणि तत्सम लोकांकडेच होता आणि दुर्दैवाने अनेक वर्षापासून या लोकांना अमानुष वागणूक दिली जात होती. परंतु एकमेव डॉ.बाबासाहेब आंबेडकर असे महापुरुष होते की ज्यांनी रक्ताचा एकही थेंब न सांडता क्रांती घडवून आणली. अशा प्रकारे एक अद्‌भूत चमत्कार घडवून आणणारे ते महापुरुष होते. त्यांनी ज्या सवलतींची मागणी केली, त्यामागे न्याय्य आणि सामाजिक अशी एक भूमिका होती. त्यांनी कधीही अतिरेक केला नाही. नाशिक येथे "काळा रामाच्या" मंदिरामध्ये प्रवेश मिळावा म्हणून चळवळ केली. त्यावेळी त्यांनी लोकांना सांगितले की, मी देखील एक माणूस आहे आणि मला देखील तुमच्या प्रमाणे देवळामध्ये जाऊन देवाचे दर्शन घेण्याचा अधिकार आहे. यासाठी सत्याग्रह केला. त्यावेळी नाशिक येथे लाखो लोक जमले होते. पण या काळया रामाच्या मंदिरावर शेण टाका असा त्यांनी आदेश दिला नाही. चवदार तळयाचा सत्याग्रह देखील अतिशय संयमाने केला आणि त्यावेळी देखील त्यांनी असे सांगितले की, मी देखील एक माणूस आहे आणि मला या तळयातील पाणी पिण्याचा अधिकार आहे. त्या तळयामध्ये घाण टाका असे सांगितले नाही. अशा प्रकारे या महापुरुषाने अतिशय संयमाने समाजातील लोकांना सवलती मिळवून दिल्या आहेत.

सभापती महोदय, याठिकाणी बाब क्र.324 मध्ये मौलाना आझाद अल्पसंख्यांक वित्तीय विकास महामंडळला भाग भांडवली अंशदान देण्यासाठी मागणी करण्यात आलेली आहे. मुळामध्ये भारतीय जनता पार्टी आणि आमचा मित्र पक्ष यांचा सच्चर आयोगाला विरोध आहे. कधीही कोणत्याही मुस्लिम समाजाने वेगळे अधिकार मागितलेले नाहीत.

श्री.भास्कर जाधव (खाली बसून) : सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांचे काय म्हणणे आहे ?

23-07-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) F-2

APR/ KGS/ MMP/ 09:55

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांचे काय म्हणणे आहे याची आम्हाला चिंता नाही. त्यांचे व्यक्तीगत काही मत असेल. पण मी भारतीय जनता पक्षाची अधिकृत भूमिका सांगत असेल.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माझे मित्र माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण हे असे सांगत आहेत की, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पाटेल यांचे काय म्हणणे आहे हे मला माहिती नाही. पण मी भारतीय जनता पक्षाचा अधिकृत सदस्य म्हणून बोलत आहे. मग सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल हे भारतीय जनता पक्षाचे आमदार आहेत की नाहीत याचा सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी खुलासा करावा.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी मी काय बोललो आहे, त्याचे मिनिटस् पहावे. मी असे म्हटलेले आहे की, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल काय बोलत आहेत याची चिंता नाही. मी भारतीय जनता पक्षाची अधिकृत भूमिका मांडत आहे. पण सन्माननीय सदस्यांनी अल्पसंख्यांकांवर काँग्रेसने कसा अन्याय केला याबाबतीत मंच काढलेला आहे. याबाबतीत सदनामध्ये खूप चर्चा झालेली आहे. आपण ही चर्चा आता न केलेली बरी. आज अल्पसंख्यांक विभाग हाताला काम मागत आहे, पोटासाठी अन्न मागत आहे, चालण्यासाठी रस्ताची मागणी करीत आहे, पिण्यासाठी पाणी मागत आहे, चांगल्या आरोग्यासाठी औषधाची मागणी करीत आहे. म्हणून माझी विनंती आहे की, याठिकाणी विशेष सवलत म्हणून त्यांना जे पैसे दिलेले आहेत, ते कोणत्याही प्रकारचे देऊ नयेत. इतर नागरिकांना त्यांच्या अधिकाराप्रमाणे जो काही आर्थिक फायदा मिळत असेल तो त्यांना देण्यात यावा. सभापती महोदय, याठिकाणी मला अगोदर भाषण करण्यासाठी संधी दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो. धन्यवाद.

-----

. . . .एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, आज सकाळी 10 वाजून 30 मिनिटांनी लोकमान्य श्री.बाळ गंगाधर टिळक यांच्या स्मृतीला अभिवादन करावयाचे असल्याने सभागृहाची बैठक सकाळी 10 वाजून 25 मिनिटांनी 15 मिनिटांसाठी म्हणजे 10.25 ते 10.40 पर्यंत तहकूब करावी लागेल.

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, बाब क्र.6, पान क्र.5 यामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांच्या विमानासाठी 57 कोटी 68 लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. काही हरकत नाही. चांगली गोष्ट आहे.

सभापती महोदय, बाब क्र.10, पान क्र.7 बाबत सांगावयाचे तर 1998 मध्ये सिंधुदूर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झाला आहे. तेव्हा पासून सातत्याने तेथे विमानतळाच्या बाबतीत मागणी करण्यात येत आहे. त्याठिकाणी काम देखील सुरु झाले होते. परंतु याबाबतीत निविदा काढण्यात आली आहे असे जाहीर केले जाते. पण तेथील लोकांना काय सांगावयाचे हा आमच्यापुढे प्रश्न आहे. त्यामुळे तेथे विमानतळ होणार आहे की नाही याबाबतीत शासनाने एकदाच काय तो निर्णय घ्यावा आणि याबाबतीत माहिती द्यावी. कारण सतत 8-10 वर्षापासून प्रश्न उपस्थित होत आहे. जळगाव, सोलापूर, शिर्डी या तीनही ठिकाणी विमानतळासाठी भूमी संपादनाकरता 2008-2009 आणि 2009-2010 या वर्षाकरता 37.50 कोटी रुपये, 76.50 कोटी रुपये आणि 40.00 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे सिंधुदूर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झाल्यामुळे त्याठिकाणी विमानतळ सुरु करण्यासाठी दोन वेळा टेंडर काढण्यात आले होते. त्यामुळे यासाठी देखील तरतूद करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, बाब क्र. 51,पान क्र.36 यामधील विषय मच्छिमारांच्यादृष्टीने महत्वाचा आहे. याठिकाणी कोकण प्रदेशातील मच्छिमारांना विशेष पॅकेजव्दारे आर्थिक सहाय्य देण्यासाठी 31 कोटी 56 लाख रुपयांची तदतूद केलेली आहे. त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देऊ इच्छितो.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली .....

मच्छिमारांच्या दृष्टीकोनातून हा विषय फार महत्वाचा आहे. यासंदर्भात सातत्याने आपण सभागृहात चर्चा करतो. हे मच्छिमार गेली तीन-चार वर्षे संकटात आहेत. त्यांना जगविण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. शासन यासंबंधी उपाययोजना करणार आहे की नाही ? आज जे पॅकेज दिले ते पुरेसे नाही. फिशरीजच्या संदर्भात सांगावयाचे तर रँडम पध्दतीने मासे मोजण्याची पध्दत ही जुनी पध्दत आहे. एका बोटीच्या संदर्भात मोजणी केली जाते आणि त्यावरुन कोकण बेल्टमधील जेवढ्या बोटी आहेत त्यांचा हिशेब केला जातो. त्यामुळे मच्छिमारांना न्याय मिळण्यासाठी जे 50 टक्के पेक्षा कमी उत्पादन लागते ते येत नाही. त्यामुळे मच्छिमारांना न्याय देता येत नाही. कोकण पॅकेजमध्ये ज्या फायबर बोटी आहेत, ज्या आऊट बोर्ड बोटी आहेत, ज्या बोटींवर यामाहा इंजिन बसविलेले आहे त्यांचा अंतर्भाव केलेला नाही. ज्या शितपेट्या आहेत त्या मच्छिमारांनी नाकारलेल्या आहेत. त्यासंदर्भात त्यांनी पैसे मागितलेले आहेत. ते देणे आवश्यक आहे. जुन्या काळातील परंपरागत पध्दतीच्या, ज्या छोट्या बोटी आहेत, ज्या छोट्या नौका आहेत, ज्या बोटी इंजिनवर चालतात त्यांनी सातत्याने रॉकेलची मागणी केलेली आहे. त्या ठिकाणी 1065 छोटी मच्छिमार कुटुंबे आहेत. संपूर्ण कोकणपट्टीत बरीच मच्छिमार कुटुंबे आहेत पण मी फक्त सिधुदुर्ग जिल्ह्याच्या संदर्भात सांगत आहे. त्यांनी दर दिवशी 25 लीटर प्रमाणे रॉकेलचा पुरवठा करावा अशी शासनाकडे मागणी केलेली आहे. त्याचा शासनाने विचार करावा. कर्नाटकमध्ये बाह्य इंजिनधारकांना 9 रुपये 10 पैसे लीटर प्रमाणे रॉकेलचा पुरवठा केला जातो. त्याच धर्तीवर कर्नाटक सरकार प्रमाणे राज्य सरकारने आपल्या मच्छिमारांना रॉकेलचा पुरवठा करावा. मच्छिमार सातत्याने यामाहा इंजिनला गॅस किट बसवावे अशी मागणी करीत आहेत. गुजरात सरकारने त्या राज्यामध्ये तसे गॅस किट बसविलेले आहे. हा विषय मी सातत्याने सभागृहात मांडतो. हा विषय सभागृहात मांडावयाचा की नाही हा प्रश्न आहे. कारण त्याचा कधीच विचार केला जात नाही. याबाबतीत विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, यानंतर मला वन विभागाच्या बाब क्रमांक 42 बाबत सांगू इच्छितो. आमच्याकडे गेल्या पाच वर्षापासून सातत्याने हत्तीचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर आहे. आजपर्यंत त्या ठिकाणी किमान 8 ते 10 लोकांचे बळी गेलेले आहेत. अनेक लोक जखमी झालेले आहेत. त्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS

श्री. राजन तेली ......

ठिकाणी शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झालेले आहे. परंतु या हत्तींच्या बाबतीत नेमका काय निर्णय घ्यावयाचा याबाबत वन विभागाला अद्याप यश आलेले नाही. केवळ सिंधुदुर्ग जिल्हाच नव्हे तर कोल्हापूर जिल्ह्याच्या बॉर्डरवर सुध्दा हा प्रश्न आहे. तेथील शेतकरी हवालदिल झालेले आहेत. शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. वन विभागाचे अधिकारी छोट्या छोट्या गोष्टींकडे लक्ष देतात आणि शेतकऱ्यांना त्रास देतात. त्या ठिकाणी बुके तयार करणारे जे लोक आहेत ते बुके तयार करण्यासाठी बेडला माड या झाडाची पाने तोडतात. त्यांच्यावर गुन्हे नोंदविले जातात. सर्वसामान्य युवक या बेडला माडची पाने तोडून मुंबईला पाठवतात किंवा त्याच ठिकाणी वापरतात. बेडला माड हे एक जंगली झाड आहे. त्याची पाने बुकेसाठी वापरतात. त्यांच्यावर पोलीस केसेस केल्या जातात. त्यांच्या गाड्या, मोटारसायकली, रिक्षा जप्त केल्या जातात परंतु ज्या मुख्य गोष्टीकडे पाहावयास पाहिजे ते होत नाही.

सभापती महोदय, यानंतर मी पृष्ठ क्रमांक 137 वरील ग्रामविकास विभागाच्या बाब क्रमांक 129 बाबत सांगू इच्छितो. सर्वसामान्यपणे राज्यातील सर्वच जिल्हा परिषदांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर रिक्त पदे आहेत. ती रिक्त पदे भरणे आवश्यक आहे. ग्रामसेवकांच्या संदर्भात आता भरती झाली. ग्रामसेवक असतील किंवा अंगणवाडी सेविका असतील त्यासंदर्भामध्ये सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील साहेबांनी खंत व्यक्त केली. रायगड जिल्ह्यात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नातेवाईकांना 192-193 असे गुण मिळाले. आपण असे म्हणतो की, ही परीक्षा पध्दत चांगल्या प्रकारची आहे, त्या ठिकाणी बोर्ड निर्माण केले आहे, त्यामध्ये कोणताही भ्रष्टाचार होत नाही. त्या ठिकाणी जे अतिरिक्क्त मुख्य कार्यकारी अधिकारी आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी आहेत त्यामध्ये एकाच्या मुलीला आणि एकाच्या सुनेला 192-193 असे गुण पडलेले आहेत आणि तिसऱ्या क्रमांकावरील उमेदवाराला 132 किंवा 140 गुण पडलेले आहेत. त्यामुळे संपूर्ण राज्यामध्ये जी भरती झाली त्याची चौकशी करावी. सर्वसामान्य गरीब विद्यार्थ्यांना त्या ठिकाणी न्याय मिळत नाही. याची सखोल चौकशी करावी.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली...

जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करावी आणि जिल्हा परिषदेमध्ये जी रिक्त पदे आहेत ती भरण्यात यावीत अशी मागणी यानिमित्ताने करतो.

बाब क्रमांक 135, पृष्ठ क्रमांक 139, मृदसंधारण, जलसंधारण याकरिता ही मागणी करण्यात आली आहे. मी हा विषय मागीलवेळी सुध्दा मांडला होता. त्याचे कारण असे की, कोकणातील भौगोलिक परिस्थिती पश्चिम महाराष्ट्र वा मराठवाडयापेक्षा वेगळी आहे. त्यामुळे कोकणातील कामांचे मापदंड बदलण्याची आवश्यकता आहे. इतर भागातील निकष कोकणातील शेतीच्या कामांसाठी लावल्यामुळे कोकणामध्ये ही कामे करु शकत नाही. या कामासाठी निधीही अपुरा मिळतो. सध्या बरीच अपूर्ण कामे आहेत त्यांच्या देखभालीसाठी निधी देण्याची आवश्यकता आहे. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये अनेक कामे 7-8 वर्षापूर्वी सुरु झालेली आहेत. तेथील शेतक-यांना जमिनीचे पैसे अद्याप मिळालेले नाहीत. शेतातील माती वाहून गेल्यामुळे शेतीचे नुकसान होत आहे. त्यामुळे नवीन प्रकल्पांना सुरुवात करण्याऐवजी जुने प्रकल्प पूर्ण करण्यासाठी भरीव तरतूद केली तर शेतक-यांना दिलासा मिळेल. यासंदर्भात मी काही गावांचे उदाहरण देईन. आवंडे, शिरवल, जानवली या गावांमध्ये गेल्या 6 वर्षापासून कामे सुरु आहेत. या गावातील ही कामे पूर्ण करावीत अशी विनंती करतो.

यानंतर मी रोजगार, स्वयंरोजगार या विभागाच्या बाब क्रमांक 306, मागणी क्रमांक 285 संदर्भात माझे विचार मांडणार आहे. राज्यातील बेरोजगार उमेदवारांना प्रशिक्षण देण्याचा शासनाचा कार्यक्रम चांगला आहे. परंतु या बेरोजगार युवकांची शासनाकडून चेष्टा केली जात आहे. या कार्यक्रमासाठी संपूर्ण राज्यासाठी 2 कोटींची तरतूद केली आहे, सिंधुदुर्ग जिल्हयातील 280 बेरोजगारांना प्रशिक्षित केल्याचे सांगितले जाते. सन 2007-08 मध्ये 3 लाख 75 हजार रुपये खर्च करण्यात आले. परंतु शासनाने या कार्यक्रमाच्या माध्यमातून बेरोजगारांची चेष्टा करु नये. कोकणामध्ये पर्यटन हा महत्वाचा विषय आहे. सिंधुदुर्ग जिल्हातील बेरोजगार युवकांना पर्यटनाच्या दृष्टीने प्रशिक्षित केले आहे. पण त्यांना योग्य मार्गदर्शन करणे, त्यांच्यासाठी वेगवेगळे अभ्यासक्रम

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.राजन तेली...

राबविता येतील काय याचाही विचार केला पाहिजे. शासनाने सरसकट राज्यासाठी एकच कार्यक्रम न राबविता सिंधुदुर्ग जिल्हयासाठी विशेष कार्यक्रम राबवून त्या बेरोजगारांना प्रशिक्षित करावे आणि राज्यासाठी सुधारित कार्यक्रम राबविला तर बेरोजगारांना पर्यटनाच्या माध्यमातून चांगली संधी मिळेल. शासनाने माझ्या सूचनेबाबत जरुर विचार करावा अशी विनंती करतो.

यानंतर बाब क्रमांक 320, पृष्ठ क्रमांक 293 राज्यातील गड, किल्ले आणि ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळांची देखभाल करणे यासाठी ही मागणी केलेली आहे. यावर मी माझे विचार मांडतो. राज्यातील गड व किल्ले आता चेष्टेचा विषय झालेला आहे. मागीलवेळी या विषयावर चर्चा झाली आहे. काही दिवसांपूर्वी सिंधुदुर्ग किल्ल्यावरील भगवा झेंडा पडला होता. त्या तटावरील वा-यामुळे तो झेंडा उभा राहू शकत नाही. त्यामुळे सन्माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे यांच्या माध्यमातून आम्ही झेंडा लावण्याची तयारी केली होती. त्या तटाचे मजबुतीकरण करण्याची परवानगी मिळवून देतो असे मंत्रिमहोदयांनी आम्हाला आश्वासन दिले होते. पण आजही तेथे झेंडा लावण्याची परवानगी मिळालेली नाही. त्यामुळे लोकांनी नाराजी व्यक्त केलेली आहे. सिंधुदुर्ग किल्ल्यामध्ये आता पाणी घुसण्यास सुरुवात झालेली आहे. त्याकडे पुरातत्व विभागाचे लक्ष नाही. त्यामुळे शासन या राज्यातील गड व किल्ल्यांचे संगोपन करणार की नाही हा प्रश्न पडला आहे. आपण येथे केवळ चर्चा करतो, पण तेथील लोकांना आपण उत्तर काय देणार ? विजयदुर्ग किल्ला सुध्दा पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा आहे. हा किल्ला 800 वर्षापूर्वीचा आहे. त्या किल्ल्याला सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांनी भेट दिलेली आहे. या राज्यामध्ये एकूण 107 किल्ले आहेत. या किल्ल्यांमध्ये लोक राहतात, तेथे मराठी माध्यमाच्या शाळा आहेत, जुन्या लोकवस्त्या आहेत. त्यामुळे या किल्ल्यांचे जतन करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर बाब क्रमांक 322, पान क्रमांक 293 पर्यटनासाठी पायाभूत सुविधा यावर मी माझे विचार मांडतो. 1988 मध्ये केंद्र सरकारने पर्यटनाचे धोरण जाहीर केले आहे. त्या धोरणाला अनुसरुन राज्य सरकारने कोकणातील पर्यटनासाठी आतापर्यंत काही केले नाही. मराठवाडयासाठी 22 कोटी रुपयांचे पॅकेज दिल्याची माहिती आहे. राज्यातील कोणत्याही भागासाठी शासनाने पॅकेज द्यावे.

नंतर श्री.शिगम

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राजन तेली...)

सिंधुदुर्ग किल्ला हा पर्यटन किल्ला म्हणून घोषित झालेला असून त्यामुळे राज्याच्या आणि देशाच्या तिजोरीमध्ये भर पडणार आहे. शेजारचे गोवा राज्य हे पर्यटनाच्या माध्यमातूनच विकसित झालेले आहे. तेव्हा पर्यटनाला अधिकाधिक चालना देण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी भरीव तरतूद करावी आणि मी या पुरवणी मागण्याच्या निमित्ताने ज्या ज्या सूचना केलेल्या आहेत त्याचा गांभीर्याने विचार करुन शासनाने कोकणाला न्याय द्यावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था): उपसभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी बेडलामाडच्या पानांचा उल्लेख करुन वन खात्याचे अधिकारी तेथील लोकांना कसा त्रास देतात हे सांगितले. या निमित्ताने मी माननीय वनमंत्र्यांचे या गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो की, पूर्वी कोकणातील लोक हरडा, बेहडा, निवडुंग, कढीपत्ता, त्रिफळ आणि बिब्बा या झांडाची पाने आणि फळांची मोठया प्रमाणात विक्री करीत होते. परंतु वनखात्याच्या अधिका-यांकडून त्यासाठी पासेस घेण्याची सक्ती केल्यामुळे आणि त्याबाबतीत लोकांना हॅरॅसमेण्ट केल्यामुळे या झाडांचे संवर्धन करण्याऐवजी कोकणातील लोक या झाडांची जळणासाठी तोड करु लागलेले आहेत. तेव्हा बेडलामाड तसेच हरडा, बेहडा, निवडुंग, कढीपत्ता, त्रिफळ अशा झाडांना पासातून मुक्त करावे जणेकरुन या झाडांचे संवर्धन होईल एवढीच मला माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे. उपसभापती महोदय, मला माझी सूचना मांडण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : उपसभापती महोदय सन 2008-2009च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या पृ.क्र.5 वरील बाब क्रमांक 5 मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यासाठी 1 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. काही दिवसांपासून हा विषय प्रसार माध्यमांद्वारे पुढे आल्यानंतर ही केलेली तरतूद ह्या वर्षात वापरता येणार आहे किंवा नाही हे स्पष्ट होण्याची आवश्यकता आहे. एकूणच या प्रकल्पासंबंधीची प्रगती समोर आल्या शिवाय आणि एकूण रकमेचा अंदाज आल्या शिवाय ही केलेली तरतूद नैमित्तिक आहे किंवा कसे यासंबंधीचा खुलासा होणे गरजेचे आहे. ही केलेली तरतूद कमी असेल तर ती शासनाने वाढवावी अशी माझी विनंती आहे.

शालेय शिक्षण विभागाच्या पृ.क्र. 43 वरील वर्गवारीच्या अनुसूचीमधील "2235, सामाजिक सुरक्षा व कल्याण" या शीर्षाखाली, वृध्द, अपंग व निराधाराचे कल्याण, अपंगाकरिता एकत्रीकृत शिक्षण यासाठी तरतूद केलेली आहे. राज्यातील विविध अपंगांची एकूण संख्या बघितली तर ही तरतूद प्रथमदर्शनी थोडीशी कमी वाटते. याबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून तसेच अपंग आयुक्तालयाकडून माहिती घेऊन अंदाजाने ही तरतूद न करता प्रत्यक्षात येणारा खर्च विचारात घेऊन या तरतुदीमध्ये बदल करावा अशी माझी विनंती आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या पृ.क्र. 52 वरील बाब क्रमांक 67मध्ये राष्ट्रकुल युवक क्रिडा स्पर्धा 2008 साठी विकास कामावरील खर्चाकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. पुण्यामध्ये होणा-या या राष्ट्रकुल युवक क्रीडा स्पर्धासाठी विकास कामाद्वारे ज्या विविध सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत त्या लवकरात लवकर कशा उपलब्ध करुन देता येतील यादृष्टीने कार्यवाही व्हावी. मी केलेल्या तीनही सूचनांचा शासनाने विचार करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया ( अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकरण संस्थाव्दारा निर्वाचित ) : सभापती महोदय, सन 2008-2009 या वर्षाच्या पूरक मागण्या मंजुरीसाठी सभागृहासमोर मांडण्यात आलेल्या आहेत,त्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. मी गेल्या चार वर्षापासून पूरक मागण्यांवरील चर्चेत सहभाग घेत आहे. परंतु आजच्या चर्चेच्या वेळी मागणी पूर्ण करणारे जास्त उपस्थित आहेत आणि मागणी करणारे कमी सदस्य उपस्थित आहेत. त्यामुळे आम्ही आज ज्या मागण्या करणार आहोत त्या निश्चितपणे पूर्ण होतील अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 5, बाब क्रमांक 10 मध्ये विमानतळांच्या विकासाकरिता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस सहाय्यक अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी 30 कोटी रुपयांचे शासनाने प्रावधान केलेले आहे. त्याचप्रमाणे 57.68 कोटी रुपये विमान खरेदी करण्यासाठी प्रावधान करण्यात केले आहे. या मागणीच्या निमित्ताने मी एवढेच सांगू इच्छितो की, अकोला येथे मागील 10 वर्षाच्या कालावधीत विमानतळाच्या कामासाठी केंद्र शासनाने 16 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. या सभागृहात माननीय कृषी मंत्री बसलेले आहेत. अकोला विमानतळाच्या बाबतीत अडचण अशी आहे की, त्या ठिकाणी 1.32 किलोमीटरची एकच धावपट्टी असल्यामुळे त्या धावपट्टीवर बोईग, 707,ए.टी.आर. ही विमाने उतरण्यास तयार नाहीत. या विमानतळाच्या जवळ नॅशनल हायवे आहे. या नॅशनल हायवेच्या मागील बाजून माननीय कृषी मंत्र्यांनी विमानतळाची धावपट्टी मोठी करण्यासाठी थोडीसी जागा उपलब्ध करुन द्यावी व या विमानतळाचा विकास करण्यासाठी शासनाने 2 कोटी रुपयांचे प्रावधान उपलब्ध करुन द्यावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 55, बाब क्रमांक 68, महानगरपालिकांना प्राथमिक पायाभूत सोयीसुविधा देण्यासाठी तरतूद करणे यासाठी 19.53 कोटी रुपयांचे प्रावधान शासनाने केलेले आहे. अकोला महानगरपालिकेस देखील प्राथमिक पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी नगरविकास मंत्र्यांनी 1 कोटी रुपयांचे प्रावधान उपलब्ध करुन द्यावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पृ.क्र.35, बाब क्रमांक 46 पीक स्पर्धा योजनेअंतर्गत विजेत्यांना कृषिविषयक पारितोषिके देण्यासाठी अतिरिक्त तरतूद उपलब्ध करुन देण्यासाठी 50 कोटी रुपयांचे प्रावधान करण्यात आले आहे. मी सभागृहाचे लक्ष एका गोष्टीकडे वेधू इच्छितो की, मागील दोन

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया....

वर्षापासून शेतक-यांना पीक स्पर्धा पारितोषिके देण्यात आलेली नाहीत. मागील अधिवेशनात या विषयाच्या अनुषंगाने लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित झाली होती, त्या सूचनेवरील चर्चेच्या वेळी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले होते की, या वर्षापासून आम्ही पीक स्पर्धा पारितोषिके शेतक-यांना नियमितपणे देऊ. परंतु गेल्या दोन वर्षात एकाही शेतक-याला पीका स्पर्धा पारितोषिक देण्यात आलेले नाही. राज्यातील शेतक-यांना पीक स्पर्धा पारितोषिके अंतर्गत सुवर्ण पदके वितरीत करण्यात आली आहेत. परंतु ती सुवर्ण पदके सोन्याची नसून वेगळयाच धातुची बनवून ती शेतक-यांना देण्यात आली आहेत. सुवर्ण पदके बनविण्यामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झालेला आहे, त्याबाबतीत संबंधितांची चौकशी करण्यात यावी. विदर्भातील सहा जिल्हे आत्महत्याग्रस्त असून त्या ठिकाणी या वर्षी मोठया प्रमाणात दुष्काळ पडलेला आहे. त्यामुळे या जिल्हयासाठी पीक स्पर्धा पारितोषिके देण्यासाठी आणखी 50 लाख रुपयांचे प्रावधान शासनाने करावे. शासनाने 50 लाख रुपयांचे प्रावधान या योजनेसाठी उपलब्ध करुन दिले तर तेथील शेतकरी या पीक स्पर्धेत मोठया प्रमाणात सहभागी होतील तसेच तेथील शेतक-यांचे आत्मबळ वाढण्यास निश्चितपणे मदत होईल. म्हणून या सहा जिल्हयात या योजनेचा लाभ देण्यासाठी आणखी 50 लाख रुपयांचे प्रावधान शासनाने उपलब्ध करुन द्यावे अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 293, बाब क्रमांक 320 या अनुषंगाने ऐतिहासिक वारसा असलेले किल्ले आणि ऐतिहासिक स्मारकांचे बांधकाम जतन करणे व पूर्ववत करण्यासाठी 2 कोटी रुपयांचे प्रावधान करण्यात आले आहे. अकोला येथे 100 वर्षापूर्वीचा असरगड हा फार जुना आणि चांगला किल्ला आहे. तो किल्ला आता ढासळत आहे. त्या किल्ल्याचे जतन करण्यासाठी आणि विकास करण्यासाठी 1 कोटी रुपयांचे प्रावधान शासनाने उपलब्ध करुन द्यावी अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, पृ.क्र. 229, बाब क्रमांक 234 या अनुषंगाने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान योजनेअंतर्गत विविध योजनांसाठी 1.05 कोटी रुपयांचे अतिरिक्त प्रावधान करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालयांमध्ये एक्सप्रेस फिडर बसविण्यात यावे अशा प्रकारची मागणी मी गेल्या तीन वर्षापासून या सभागृहात करीत आहे. आज ग्रामीण

3...



ABG/ KGS/ MMP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 10:15

श्री. गोपीकिसन बाजोरिया.....

भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ग्रामीण रुग्णालयांमध्ये भारनियमनामुळे वीज प्रवाह नेहमी खंडीत होतो. वीज प्रवाह नेहमी खंडीत होत असल्यामुळे रुग्णांचे तातडीने ऑपरेशन्स करणे् वैद्यकीय अधिका-यांना शक्य होत नाही. प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आणि ग्रामीण रुग्णांलयांमध्ये एक्सप्रेस फिडर व इनव्हर्टर्स बसविण्यासाठी शासनाने 2 कोटी रुपयांचे प्रावधान उपलब्ध करुन द्यावे अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

----------

यानंतर श्री. कानडे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. पृष्ठ क्रमांक 5, बाब क्रमांक 4 बाबत मी बोलणार आहे. पदवीधर मतदारसंघातील मतदारांच्या याद्या तयार करण्यात आल्या त्यासाठी 90 लाखांची अतिरिक्त तरतूद मागितली आहे. या कामासाठी जो खर्च झाला आणि त्यातून ज्या मतदारांच्या याद्या तयार झाल्या त्या सदोष आहेत. प्रायव्हेट एजन्सीला सीडी तयार करण्याचे काम दिले होते. यासंदर्भात मी शाहूवाडी तालुक्याचे उदाहरण देणार आहे. या तालुक्यामध्ये 2700 मतदारांची यादी तयार करण्यात आली. 300 नांवे मतदार यादीमध्ये असताना नोंदणी फॉर्म तहसीलदारांकडे उपलब्ध झाला नाही. प्रायव्हेट एजन्सीने 300 मतदारांची नांवे नोंदविली. नावांची नोंदणी दुबार झाली आहे. 1 लाख मतदारांमध्ये 44000 मतदारांची यादी दुबार झाली आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, मतदारांनी स्वत: येऊन कोणते नांव खरे आहे ते ठरवावे. 44000 मतदारांना मतदान करण्याचा अधिकार मिळाला नाही. या व्यतिरिक्त 1 लाख मतदारांची नांवे दुबार झालेली आहेत. या मतदार याद्या तयार करताना अनेक प्रकारचे घोटाळे झालेले आहेत. नंतर निवडणुका झाल्या परंतु अनेक मतदारांना मतदानाचा अधिकार मिळाला नाही. यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी शासनाने एखादी समिती नेमावी. किमान 6 वर्षानंतर होणाऱ्या पुढील निवडणुकांच्या दृष्टीने यादीमध्ये घोटाळे होऊन नयेत म्हणून शासनाने काळजी घ्यावी अशी विनंती करतो. एवढा मोठा खर्च करुन प्रायव्हेट एजन्सीला काम दिले. परंतु नोंदणीचे फॉर्म नसताना यादीमध्ये नांवे आलेली आहेत. म्हणून हा मतदार यादीमधील घोटाळा दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने उपाययोजना करावी अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांना लोकमान्य टिळक जयंतीनिमित्त विधानभवनात होणाऱ्या कार्यक्रमासाठी उपस्थित रहाता यावे म्हणून मी सदनाचे कामकाज आता स्थगित करीत आहे. 10.40 वाजता सदनाचे कामकाज पुन्हा सुरु होईल.

( सभागृहाची बैठक सकाळी 10.22 वाजता स्थगित झाली. )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: सन 2008-09 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

(चर्चा पुढे सुरु......

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2008-09 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी व त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक-148 अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने कर्मचाऱ्यांना मानधन प्रदान करण्यासाठी व वसतिगृहाच्या परिरक्षणासाठी स्वयंसेवी संस्थांना अतिरिक्त निधी देण्यासाठी पुरवणी मागणी सादर केली आहे. आपल्या राज्यामध्ये सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहाची परिस्थिती अत्यंत दयनीय आहे. शिळे जेवण, थंड झालेले जेवण, जेवणामध्ये अळ्या, किडे असणे, अस्वच्छ भाज्या, वसतिगृहात अंधाराचे साम्राज्य इत्यादी बाबींवर अनेकदा सभागृहात चर्चा झालेली आहे. अनेक वसतिगृहांमध्ये शौचालयांची अवस्था कचराकुंडी सारखी झालेली आहे. विशेषत: चिपळूण येथील वसतिगृहामध्ये पुरेसा वीज पुरवठा नसल्यामुळे अंधूक प्रकाशात विद्यार्थ्यांना अभ्यास करावा लागतो. खोल्यांमध्ये अंधाराचे साम्राज्य पसरलेले असते. पाण्याची टाकी नाही. वापरण्यात येणाऱ्या पाण्यामुळे विद्यार्थ्यांच्या अंगाला खाज सुटते. दरमहा 50 रुपये साबणासाठी दिले जातात. परंतु मागील तीन-चार महिन्यात ही रक्कम दिली गेली नाही. मंत्रीमहोदयांनी बरीच आश्वासने दिली. परंतु वसतिगृहाच्या कारभाराबाबत, तेथील गैरसोयी, भोजन इत्यादी बाबत अनेकदा बैठका घेण्यात आल्या. वसतिगृहाच्या कारभाराबाबत मानवाधिकार आयोगाने देखील अहवाल मागविला आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी एप्रिल महिन्यामध्ये वसतिगृहाच्या 100 इमारती बांधणार असल्याचे घोषित केले. एकूण 271 पैकी 82 वसतिगृहाच्या इमारती या शासन मालकीच्या आहेत. या संदर्भात देखील मानवाधिकार आयोगाने चर्चा केली आहे. सामाजिक न्याय विभागासाठी जो निधी उपलब्ध होतो त्या निधीवर इतर विभागांचे लक्ष असते. त्यातील रक्कम आपल्या विभागाला कशी मिळेल याकडे इतर विभागांचे लक्ष असते. सामाजिक न्याय विभागाने जी तरतूद केली आहे ती अल्पशी आहे. मंत्रीमहोदयांनी याबाबत गांभीर्याने विचार करावा.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण........

सभापती महोदय, पर्यटन विभागाच्या पृ.क्र.29, बाब क्र.31 बाबत मी बोलू इच्छितो. ज्या विभागाचा नेता प्रभावी, मोठा आहे त्या विभागाला जास्तीत जास्त रक्कम दिली जाते. मराठवाड्यासाठी 22 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. आपल्याला कल्पना आहे की, संपूर्ण देशामध्ये सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून केंद्र शासनाने घोषित केला आहे. त्यासाठी अनेक योजना आखल्या आहेत. 5 कोटी रुपयांची विशेष तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये अनेक किल्ले आहेत. 120 कि.मी.च्या टापूमध्ये किल्ल्यांचा शोध घेण्यासाठी रक्कम उपलब्ध करुन देण्यात आली. सिंधुदुर्ग किल्ला पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे ठिकाण आहे.

सभापती महोदय, धामापूर हे माझे गाव आहे. तेथे एमटीडीसीने सुंदर बंगले बांधले आहेत. तीन वर्षापूर्वी त्या बंगल्यांचे उद्घाटन करण्यात आले. परंतु पर्यटकांच्या दृष्टीने आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. पर्यटकांसाठी ते बंगले खुले केलेले नाहीत. पालकमंत्री उद्घाटन करतात, परंतु पुढे आवश्यक ती खबरदारी घेतली जात नाही.

(नंतर श्री.भारवि..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

23-07-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) M 1

BGO/तालेवार श्री.भोगले.... 10:45

श्री.सुभाष चव्हाण....

धामापूर येथे सुंदर तलाव आहे. या तलावाचा तळ अजून देखील सापडत नाही. धामापूरपासून 85 कि.मी.वर गोवा आहे. त्यामुळे या तलावाचे सुशोभिकरण केले पाहिजे. या तलावाच्या सुशोभिकरणासाठी जास्तीतजास्त फंड उपलब्ध करून दिला पाहिजे. गेल्या वर्षी मी या सदनाचा सदस्य नसताना देखील आपल्या सदनाचे माननीय सभापती श्री.शिवाजीराव देशमुख, सन्माननीय सदस्य सर्वश्री राजन तेली, संजय दत्त, शरद रणपिसे यांना त्यांचा स्थानिक विकास निधी धामापूर तलावाच्या सुशोभिकरणासाठी उपलब्ध करून द्यावा अशी विनंती केली. माझी विनंती त्यांनी मान्य केली व निधी उपलब्ध करून दिला. मी या सदनाचा सदस्य झाल्यानंतर पहिल्याच वर्षी धामापूर तलावाच्या सुशोभिकरणासाठी रूपये 25.00 लाख इतका निधी उपलब्ध करून दिला आहे. या तलावाच्या सुशोभिकरणासाठी केंद्र सरकारकडून पाच ते सहा कोटी रूपये कसे मिळविता येतील याचा विचार मी करीत आहे. मराठवाड्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी भरघोस निधी देत असताना सिंधुदुर्ग या दबलेल्या जिल्ह्याला देखील जास्त निधी उपलब्ध करून द्यावा अशी मी विनंती करीत आहे. यासंबंधी मी माननीय मंत्रिमहोदयांशी देखील बोललो आहे. धामापूर येथे पर्यटन विभागाने सुंदर बंगले बांधले आहेत. पण ते पर्यटकांसाठी खुले करण्यात आलेले नाहीत. पर्यटकांसाठी सदर बंगले का खुले करण्यात येत नाहीत ? असा माझा या निमित्ताने सवाल आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये चिपी येथे विमानतळ होणार आहे. धामापूर पासून चिपी दहा कि.मी.वर आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये वेंगुर्ला, मालवण, रेडी येथे सुंदर समुद्र किनारा आहे. येथे रमणीय वातावरण आहे. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटनासाठी जास्तीत जास्त निधीची तरतूद करावी अशी मी विनंती करतो. तसेच आपण येथे बोलण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानतो व माझे भाषण पूर्ण करतो.

......

यानंतर श्री.तालेवार यांच्याकडे हिंदी भाषण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ 10:50

श्रीमती फौजिया खान (नामनियुक्त ) : सभापति महोदय, इस उच्च सदन में पूरक मांगों पर चर्चा के समय अपने मुद्दे रखते समय मेरे मन में यह शंका है कि यहां पर हम अपने सुझाव बड़ी तड़प के साथ रखते हैं, लेकिन उन पर कितना अमल किया जाता है, हम सच में विश्वास में लिये जाते है या हमारा सिर्फ सपोर्ट लिया जाता है, यह प्रश्न मेरे मन में है. इसलिए Are we taken into confidence, in the real sense. यह प्रश्न करते हुए मैं सभी माननीय मंत्रियों से अनुरोध करना चाहूंगी कि हमारे मांगों और सुझावों को गंभीरता से लिया जाए.

सभापति महोदय, बाब क्रमांक 5 के अन्तर्गत मैं यह कहना चाहूंगी कि अरब सागर में छत्रपति शिवाजी महाराज स्मारक के लिए 1 करोड़ रुपये का प्रावधान किया गया है. मुझे लगता है कि इस स्मारक की भव्यता को देखते हुए यह प्रावधान कम है इसलिए यह निधि बढ़ाया जाना चाहिए, ऐसी मेरी मांग है. सरकार मेरी इस मांग पर विचार करें.

सभापति महोदय, बाब क्रमांक 129-130, ग्राम विकास विभाग के अन्तर्गत मैं यह कहना चाहूंगी कि ग्राम विकास अधिकारी के 500 पद और ग्राम सेवक के 2 हजार नये पद भरने के संबंध में तरतूद की गई है. पिछले कुछ दिनों में पदों पर जो भरती हुई है, यह देखा गया है कि वह वादग्रस्त बन गई है. इसे देखते हुए पद भरती की प्रक्रिया ट्रांसपरेंट कैसे हो सकती है, इस पर विशेष ध्यान दिया जाना चाहिए, ऐसा मैं समझती हूं.

बाब क्रमांक 306, रोजगार एवम् स्वयं रोजगार विभाग के अन्तर्गत मैं यह कहना चाहूंगी कि जहां तक बेरोजगारी की समस्या है, यह बहुत गंभीर हो चुकी है. उसमें भी अंशकालीन पदवीधर उम्मीदवारों को दुर्लक्ष किया जा रहा है, ऐसा मेरा मत है. नये पद भरते समय अंशकालीन पदवीधर उम्मीदवारों को प्राधान्य देने की तरतूद होने के बावजूद उन्हें प्राधान्य नहीं दिया जा रहा है. इसलिए मेरी मांग है कि इस दिशा में पहल की जाए.

बाब क्रमांक 45, कृषि विभाग के अन्तर्गत रासायनिक खाद की वाहतूक के लिए 10 करोड़ रुपये की पूरक मांग रखी गई है. इसमें से 5 करोड़ रुपये आकस्मिक निधि में खर्च हो चुके हैं लेकिन खाद के लिए किसानों को बहुत परेशानी का सामना करना पड़ रहा है, यह बहुत गंभीर बात है. इसलिए रबी हंगाम में खाद मिलने में किसानों को परेशानी का सामना न करना पड़े इसलिए विशेष ध्यान देने की जरुरत है

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान...

सभापति महोदय, मैं माननीय कृषि मंत्री का ध्यान विशेष रुप से इस बात की ओर खींचना चाहूंगी कि कृषि कॉलेज के लिए यहां पर सीट्स कम कर दी गई है. जो सीट्स कम कर दी गई है, उसके बारे में ऐसी घोषणा की गई है कि A और B केटेगरी ऐसा ग्रेडेशन किया गया है, उसको दूसरा सेक्शन दिया जाएगा. मैं इस संबंध में यह कहना चाहूंगी कि एकदम 96 से 40 सीट्स पर आ जाने से कॉलेजेस और खास तौर से नये कॉलेज फिजीबल नहीं हो सकते हैं इसलिए इस विषय में फौरन निर्णय लेने की आवश्यकता है क्योंकि प्रवेश प्रक्रिया शुरु हो चुकी है. मैं यह ग्रेडेशन की प्रक्रिया के बारे में यह बताना चाहती हूं और माननीय कृषि मंत्री से फिर से विनती करना चाहती हूं कि, वे मेरी बात की ओर ध्यान दें. ग्रेडेशन का जहां तक संबंध है, इस संबंध में मेरी माननीय कृषि मंत्री से बात भी हुई है. फुड टॅक्नॉलॉजी जैसे कोर्स के लिए ग्रेडेशन में बैल होना चाहिए, 50 एकड़ जमीन होनी चाहिए और वह जमीन सिंचाई योग्य होनी चाहिए, ट्रेक्टर होना चाहिए इत्यादि निकष लगाए गए हैं जो कि कोर्स से रिलेटेड नहीं है, इसलिए ग्रेडेशन करने से अन्याय हो सकता है. खास तौर से पहले साल का जो कॉजेज हो उसे चार साल के निकष लगाए जाते हैं, यह अन्यायकारक है. कृषि मंत्री जी ने कहा कि उसमें फर्स्ट ईयर के रिलेटेड कोर्स है. मैं यह कहना चाहती हूं कि 50 मार्क्स का हर्टीकल्चर कोर्स है, उसमें भी हल खरीदकर पोस्ट हार्वेस्ट टॅक्नॉलॉजी का कोर्स पढ़ाया जा सकता है. यह प्रक्रिया ट्रांसपरेंट होनी चाहिए, किसको कितने मार्क्स दिए गए हैं, कैसे दिए गए हैं, उसमें ट्रांसपरेंसी की आवश्यकता है, ऐसा मैं कृषि मंत्री जी से अनुरोध करना चाहती हूं, वे इस ओर ध्यान देंगे, ऐसा मुझे विश्वास है.

बाब क्रमांक 233, मुंबई में फरवरी, 2009 में " तंबाकू और आरोग्य " के संबंध में विश्व परिषद का आयोजन किया जा रहा है. इस कार्य के लिए 4 करोड़ 20 लाख रुपये का प्रावधान किया गया है. यह केवल जाग्रति के लिए है लेकिन जो मरीज कैंसर से पीड़ित है और ऐसे कैंसर पीड़ित मरीजों के उपचार के लिए राज्य में आज तक ठोस कदम उठाए नहीं गए हैं. मुंबई में टाटा अस्पताल में जनरल केटेगरी में गरीबों का इलाज होता है लेकिन मरीजों की संख्या इतनी ज्यादा है कि अलग अलग टेस्ट करने में ही 6 महीने चले जाते हैं तब कहीं इलाज शुरु हो जाता है और तब तक मरीज पूरी तरह से बीमारी की गिरफ्त में आ जाता है और बाद में इलाज सिर्फ

...3





श्रीमती फौजिया खान...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

फॉर्मेलिटी बन कर रह जाता है. इसलिए इस संदर्भ क्या किया जा सकता है, गरीबों को कैसे आरोग्य सेवा प्रदान की जा सकती है, कैंसर जैसा मर्ज जिसमें तुरन्त इलाज की आवश्यकता होती है, इस बात को ध्यान में रखते हुए कैंसर पीड़ितों का इलाज तुरन्त हो सके, इसकी व्यवस्था की जानी चाहिए. औरंगाबाद में कैंसर अस्पताल का प्रस्ताव है, ऐसा मैंने सुना है. यह अस्पताल जल्दी से जल्दी शुरु किया जाए और गरीबों को ज्यादा सुविधा दी जाए, ऐसी मेरी मांग है.इसके अलावा परभणी में सामान्य अस्पताल में 10 क्लास वन अधिकारी के पद रिक्त है.अनुशेष अन्तर्गत पाथरी, पूर्णा और पालमें के ग्रामीण अस्पताल की इमारत के लिए निधि मिला है, प्रशासकीय मंजूरी मिल चुकी है और प्लान ईस्टीमेट मंजूर हो चुका है, इसके बावजूद भी अब तक काम शुरु नहीं हुआ है. अगर इस बारे में अक्तूबर तक प्रक्रिया शुरु नहीं हुई तो फंड लेप्स हो सकता है इसलिए फंड का इस्तेमाल किया जा सके इस हेतु जल्द से जल्द इस ओर ध्यान दिया जाए. परभणी जिले में जो ग्रामीण अस्पताल हैं,उनमें से केवल पूर्णा और सेलू में अधीक्षक, क्लास वन के पद भरे गए हैं लकिन बाकी 6 जगहों पर ये पद नहीं भरे गए हैं. इनमें से कम से कम जिंतुर, गंगाखेड और मानवत के अस्पताल में रिक्त पदों को तुरन्त भरा जाना चाहिए, ऐसी मेरी मांग है. उसी प्रकार से मैं परभणी के अस्पताल में डायलीसिस यूनिट स्थापित करने की मांग 6 महीनों से कर रही हूं, उसकी व्यवस्था करने के बारे में भी विशेष ध्यान दिया जाए.

बाब क्रमांक 150 व 151, शासकीय एवम् अनुदानित आश्रम शालाओं में भटक्या जमाति, एस.सी.,एस.टी. के विद्यार्थियों के लिए तरतूद भारी मात्रा में तरतूद की जाती है और की गई है . दबे-कुचले घटको को न्याय देने के लिए, यह उचित कदम है लेकिन मेरी जानकारी के अनुसार इन होस्टलों में मुस्लिम एस.सी.,एस.टी. और एन.टी. विद्यार्थियों का प्रमाण बिल्कुल नहीं है. जब इसका कारण पूछा गया तो कहा गया कि मुस्लिम विद्यार्थियों की ओर से आवेदन ही नहीं आए है. इसलिए इस विषय में भी गंभीरता से विचार किया जाना चाहिए. क्या सांपवाला, बंदरवाला, भालू वाला ऐसे लोगों में इतनी अवेअरनेस है कि होस्टल में प्रवेश लें. इसलिए इस बात पर भी गंभीरता से विचार किया जाना चाहिए.

भाषण अपूर्ण इसके बाद श्री शर्मा.

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्रीमती फौजिया खान का भाषण जारी (पूर्वी तालेवार)

सच्चर कमेटी के अहवाल में बताया है कि मुस्लिम समाज आर्थिक रुप से बहुत पिछड़ा हुआ है. मैं सरकार से पूछना चाहती हूँ कि क्या मुस्लिम समाज के लिए होस्टल्स की जरुरत नहीं है. मेरे विचार से कौमी एकता का विचार केवल पेपर पर ही रह जाता है, मेंटल इंटीग्रेशन अभी तक नहीं हुआ है. सूचना के अधिकार के अन्तर्गत मेरे पास इन होस्टल्स के बारे में पूरे प्रदेश की जानकारी है. मैं यह जानकारी सभागृह के सामने रख सकती हूँ. इस जानकारी के अनुसार मुस्लिम समाज के लोग इन होस्टल्स में नहीं के बराबर हैं.

सभापति महोदय, बाब क्रमांक 149 के अन्तर्गत नागपुर जिले के कामठी में डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन के लिए 50 लाख रुपए की पूरक मांगणी की गई है. मैं सभागृह को बताना चाहती हूँ कि डॉ. बाबासाहेब आंबेडकर के नाम से दलित मित्र पुरस्कार दिया जाता है, लेकिन यह पुरस्कार पिछले 3 साल से वितरित नहीं किया गया है. दलितों के लिए कल्याणकारी कार्य करने वाले व्यक्ति को उसके योगदान के लिए यह पुरस्कार दिया जाता है. मुझे ऐसा लगता है कि शासन के सामाजिक न्याय विभाग के पास इस पुरस्कार को देने के लिए समय और पैसा नहीं है. इसके लिए शासन की तरफ से प्रावधान किया जाए, ऐसी मेरी मांग है. इसी के साथ मैं अपना भाषण पूर्ण करती हूँ.

.............

भाषण पूर्ण, नंतर ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, पुरवणी मागण्यांवरील चर्चा आपल्याला वेळेत पूर्ण करावयाची असल्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांनी मला सहकार्य करावे.

डॉ. नीलम गो-हे ( विधानसभेने निवडलेले ) : सन्माननीय सभापती महोदय, बाब क्रमांक 5, पृष्ठ क्रमांक 5 वर मी माझे विचार सुरुवातीला व्यक्त करणार आहे. महाराष्ट्र शासनाने छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अरबी समुद्रात उभारण्याच्या संदर्भात जो निर्णय घेतला आहे तो निर्णय घेणे आवश्यकच होता. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याचा निर्णय घेण्यासाठी 4 वर्षे का लागली ? आता लवकरच निवडणुका होणार असल्यामुळे आता आपण त्याचे उद्घाटन करु शकणार नाही, नवीन सरकारला स्मारकाचे उद्घाटन करावे लागेल त्यामुळे या गोष्टीचा आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

( अडथळा )

**उपसभापती** : अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारल्यानंतर त्यांना आनंद प्राप्त होईल असे सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताईंनी सांगितले आहे. उद्घाटन करण्याचा आनंद त्यांना प्राप्त होईल, याचा अर्थ असा नव्हे की, या स्मारकाचे उद्घाटन त्यांच्याच हस्ते होईल? उद्घाटनाच्या कार्यक्रमाला त्या जरूर हजर असतील असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, आपण खुर्ची जाण्याच्या भितीने अस्वस्थ होता परंतु मला असे म्हणावयाचे नव्हते.

सभापती महोदय, बाब क्रमांक 10 , पृष्ठ क्रमांक 7 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. शासनाने महाराष्ट्रातील विमानतळाचा विकास करण्यासाठी तरतूद केलेली आहे. परंतु या नव्या रक्कमा घोषित करीत असतांना कोल्हापूर-कराड-सोलापूर या विमानतळाची परिस्थिती आपण जर पाहिली तर या ठिकाणच्या विमानतळाची अतिशय दुर्दशा झालेली आहे. त्यामुळे माझी अशी सूचना आहे की, छोटया छोटया विमान कंपन्या महाराष्ट्रातील सर्व जिल्हे जोडण्याच्या संदर्भात परवानगी मागत आहेत त्यामुळे यासंदर्भात शासनाने लक्ष घालावे अशी माझी सूचना आहे.

......O-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाच्या संदर्भात विचार व्यक्त करणार आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी दीड वर्षापूर्वी या सभागृहात महाराष्ट्रातील 22 जिल्हयात कौटुंबिक न्यायालय सुरु केले जाईल असे सभागृहाला आश्वासन दिले होते. कौटुंबिक न्यायालयाच्या इमारंतीसाठी केंद्रशासनाकडून 10 लक्ष रुपये व आवर्ती खर्चासाठी 5 लक्ष रुपये दिले जाईल असेही सांगण्यात आले होते. केंद्रसरकारची महिला बाल कल्याण समितीच्या शिफारशीनुसार केंद्राकडून हा निधी राज्याला मिळालेला आहे असे माननीय मंत्रीमहोदयांनी आम्हाला सांगितले होते. गेल्या 3 पुरवणी मागण्या आणि गेल्या वेळच्या अर्थसंकल्पात यासंदर्भातील तरतूद दिसत नाही. त्यामुळे याबाबीत शासनाने लक्ष घालावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाची बाब क्रमांक 142, पृष्ठ क्रमांक 145 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. या ठिकाणी तुटींसाठी अर्थसहाय्यासाठी निधिीची तरतूद केलेली आहे. गोदामांची व्यवस्था, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या खर्चासाठी जी जी आवश्यकता लागेल ती केलीच पाहिजे या मताची मी आहे. परंतु मला या ठिकाणी मला मुद्दा असा उपस्थित करावयाचा आहे की, आपण शहानिशा न करता, आपल्या बेभरवशाच्या कारभारासंदर्भात सीएजीच्या अहवालात 4.3.4 मध्ये नमूद केले आहे की, धानाच्या वाहतुकीवर अनियमित प्रदान या शिर्षाखाली रायगड येथील धानावर प्रक्रिया करुन उकडा तांदुळ करावा व त्यावर वाहतुक खर्च न करता आपण त्यासाठी 1.47 कोटी रुपये प्रदान केलेले आहेत. ही बाब सीएजीने 2007 सालामध्ये कळवली होती परंतु त्यावर उत्तर प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी पुढे म्हटले आहे की, सीएजीने सूचना करुनही आपण असे कोटयावधी रुपये वाया घालवणार असाल तर ते योग्य नाही. एका बाजूने ठिगळे तयार करावयाची आणि दुस-या बाजुने 200-300 कोटी रुपयांची व्यवस्था करावयाची म्हणजे जनतेने प्रत्येक वेळेला आपल्या चौकशीची सीआयडी कडे जाऊन मागणी करावयाची का?

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ प्रथम श्री.जुन्नरे 11.00

डॉ.नीलम गो-हे....

एका बाजूला ठिगळे तयार करावयाची आणि दुस-या बाजूला 200 ते 300 कोटी रुपयांची तरतूद करावयाची ही गोष्ट बरोबर नाही. तेव्हा अशा प्रकारच्या प्रत्येक प्रकरणाची चौकशी सीआयडी मार्फत करावी अशी लोकांनी मागणी करावी असे शासनाला वाटते काय ? प्रत्येक विभागाची पुरवणी मागणी करीत असतांना सी.ए.जी.नी जे ताशेरे मारलेले आहेत त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे. यासंबंधीचे उत्तर देण्याची जबाबदारी तांत्रिक दृष्टया वित्त आणि नियोजन विभागाची असली तरीसुध्दा लोकशाहीमध्ये शासनाची सुध्दा ती जबाबदारी आहे. प्रत्येक विभागाच्या संदर्भात सी.ए.जी.ने जे ताशेरे मारलेले आहेत त्या प्रत्येक ताशेराचा या ठिकाणी उल्लेख करण्यासाठी पुरेसा वेळ नाही. परंतु अन्न आणि नागरी पुरवठा विभागाच्या संदर्भात सी.ए.जी.ने असे म्हटलेले आहेकी, "महासंघाच्या वाहतूक दाव्याच्या सत्यतेची पडताळणी न करता प्रतिपूर्ती करण्यात आली आहे. विभागाने म्हटले आहे की, महासंघाच्या जबाबदार अधिका-याने दाखला दिला होता म्हणून वाहतुकीचा दावा पारित करण्यात आला .परंतु हे उत्तर समर्थनीय नाही कारण महासंघाच्या वाहतूक दाव्याच्या सत्यतेच्ची पर्याप्त तपासणी न केल्यामुळे धानाच्या वाहतुकीवर रु. 1.27 कोटीचा अनियमित खर्च करण्यात आला . ही बाब शासनच्या सचिवांना ऑगस्ट 2007 मण्ध्ये कळविण्यात आली होती परंतु त्याचे उत्तर प्राप्त झालेले नाही. भारत सरकारने धानाच्या विक्रीची परवानगी नाकारली होती आणि विभागाला सूचना दिल्या होत्या की धानावर प्रक्रिया करुन उकडा तांदूळ करावा आणि नोव्हेंबर 2003 पूर्वी तो तांदूळ पोहोचवावा . धानाचे उकडा तांदुळात रुपांतर करण्यासाठी रायगड जिल्हयातून गोदिया चंद्रपूर या जिल्हयात उकडा तांदूळ करण्यासाठी पाठवावयाचा होता परंतु वाहतूक करण्यासाठी हा खर्च दिला गेला होता प्रत्यक्षात वाहतूकच करण्यात आली नाही." अशा प्रकारे सी.ए.जी.च्या अहवालात म्हटलेले आहे तेव्हा 200- 300 कोटी रुपयांची तरतूद करीत केली जात असतांना मात्र हा अनियमितपणे खर्च केला जातो . तेव्हा अशा प्रकारे अनियमितपणे खर्च होऊ नये या दृष्टीने कोणती काळजी घेण्यात येणार आहे असा प्रश्न मला या निमित्ताने माननीय मंत्रीमहोदयांना विचारावासा वाटतो.

श्री.जयंत प्र.पाटील : रायगड जिल्हयातून गोदिंया व चंद्रपूर जिल्हयात उकडा तांदूळ करण्यासाठी धान पाठविले होते आणि त्या वाहतुकीसाठी 1.27 कोटी रुपयांचा अनियमितपणे खर्च झ ाला आहे काय ?

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : होय. बोलण्यासाठी अधिक वेळ उपलब्ध नसल्यामुळे मी थोडक्यात तो मुद्दा मांडला होता. सी.ए.जी.चा अहवाल माझ्याकडे आहे त्यातील परिच्छेद मी मघाशी वाचून दाखवला होता.

सभापती महोदय यानंतर मला वन विभागाच्या पूरक मागण्यासंबंधी बोलावयाचे आहे माननीय राज्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांना मी सांगू इच्छिते की, वन विभागातील साडे नऊ हजार वन कामगारांचा एक प्रश्न अनिर्णित आहे. याबाबतीत असे सांगण्यात आले आहे की, ॲडव्होकेट जनरलचे मत प्राप्त झालेले आहे.तेव्हा या कामगारांचा प्रश्न लवकर निकाली काढण्यात यावा.

( वेळ संपत आल्याची बेल वाजविण्यात आली )

सभापती महोदय, मला बोलण्याकरिता पाच मिनिटांचा वेळ देण्यात यावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.वेळ कमी असल्यामुळे त्यातील सगळाच तपशील या ठिकाणी वाचून दाखविता येत नाही तरी सुध्दा मला एक उदाहरण द्यावयाचे आहे . मघाशी सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी बोलत असतांना असे सांगितले होते की, एका कर्मचा-याने आपल्या आईच्या आजारपणावर संपूर्ण खर्च केलेला आहे. परंतु वन विभागातील एका वन संरक्षकाने आईच्या आणि पत्नीच्या आजारपणासाठी जो खर्च केला होता त्याची रककम वाढवून वन विभागाकडून ती रक्कम घेतलेली आहे. सी.ए.जी.च्या अहवालातील पान नंबर 127 वर परिच्छेद क्रमांक 4.1.1 मध्ये असे म्हटलेले आहे की, " मुख् वन संरक्षक प्रादेशिक, पुणे याच्या अभिलेख्याची छाननी केली असता असे लक्षात आले की, मुख्य वन संरक्षकांनी एका वन संरक्षकाकडून त्याच्या पत्नीवर आणि आईवर केलेल्या वैद्यकीय उपचाराच्या संदर्भात लबाडीने सादर केलेले देयक मान्य केले होते. दावा करणा-याने त्याची मागणी देयकात खाडाखोड करुन देयकाची रक्कम 18.673 रुपयांनी वाढवली होती त्या देयकाची अदायगी मुख्य वन संरक्षक यांच्याकडून करण्यात आली होती.". या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, वन्य प्राण्यांचे संरक्षण राज्य शासनाने करावयास पाहिजे परंतु वन्य प्राणांचे संरक्षण न करता राज्यमंत्री श्री. धर्मरावबाबा आत्राम यांनी बारामतीला जाऊन हरणाची शिकार केली होती. त्यांना हरीण मारण्यासाठी दुसरा कोणताही जिल्हा न दिसल्यामुळे बारामती मध्ये जाऊन त्यानी ही शिकार केली होती. मंत्री महोदय किती उद्दाम झालेले आहेत याचे हे एक उदाहरण आहे. आम्हाला असे वाटले होते की, वन्य प्राण्याची शिकार करण्याच्या बाबतीत

3..



VTG/ प्रथम श्री.जुन्नरे

त्यांना काही लोकांची  तरी दहशत वाटत असेल परंतु त्यांना कोणाचीही दहशत न वाटता खाजगी बंदुकीने त्यांनी हरणाची शिकार केलेली होती. या संदर्भात 15 जून ते 5 जुलै 2008 पर्यत वर्तमानपत्रातून   दररोज सारख्या बातम्या येत असतांनासुध्दा अधिका-यानी त्याबाबतीत काहीही वक्तव्य केलेले नाही. माननीय वने मंत्रीसुध्दा वारीला निघून गेले होते. ते सुध्दा तेथून रंगसफेदी करीत होते.

एक सन्माननीय सदस्य : सभापती महोदय,सन्माननीय सदस्या वारीची चेष्टा करीत आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, मी वारीची चेष्टा करणार नाही.माझा जन्म पंढरपूर येथे झाला असून मला सोलापूर जिल्हा आणि पंढरपूरच्या वारीची संपूर्ण कल्पना आहे. सभापती महोदय, या मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने मला शासनाला असे सांगावयाचे आहे की, वीज चोरीला आळा घालण्याच्या दृष्टीने गृह विभागाने लक्ष घातले असून वीज चोरी पकडण्याची जबाबदारी एका विभागावर टाकली आहे त्याचप्रमाणे वन विभागात  वन्य प्राण्याची हत्या होत असेल वा शिकार करुन प्राण्यांना मारण्याचा प्रकार होत असेल तर  त्याही बाबतीत या प्रकांराना आळा घालण्याच्या दृष्टीने सीआयडी विभागातील   ज्या अधिका-यांना यासंबंधीची माहिती आहे अशा एखाद्या खास अधिका-यांना  बेकायदेशीर शिकार करणा-या व्यक्तीला पकडण्यासाठी   नेमण्यात आले पाहिजे. प्रत्येक वेळी एखादी घटना घडल्यानंतर आपण  त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करीत असतो  परंतु आता तसे न करता अगोदर पासूनच सीआयडी विभागातील एक अधिका-याची नेमणूंक केली पाहिजे.  त्याचबरोबर अत्यंत खेदाची आणि दुर्देवाची गोष्ट अशी आहे की,  वन संरक्षण करण्या ऐवजी  श्री.आत्राम यांनी जी  शिकार केली होती त्या बाबतीत शेवट पर्यत माननीय वन मंत्री मौन पाळून होते ज्यावेळी श्री.आत्राम यांनी राजीनामा दिला होता त्यानंतर  वने मंत्र्यांनी त्याबाबतीत आपला  खुलासा केला होता.

श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे ...

मी काही या संदर्भात उदाहरण देत नाही. म्हणून वनमंत्र्यांनी देखील स्वत:च्या विभागामध्ये चोख आर्थिक व्यवहार झाल्यावरच या सगळ्या मागण्या कराव्यात.

सभापती महोदय, माझा तिसरा मुद्दा हा कृषी विभागासंबंधात आहे. पृष्ठ 34, बाब क्रमांक 48 या पुरवणी मागणीमध्ये आपण इतर खर्चांची तरतूद केलेली आहे. या विधान परिषदेमध्ये आपण घोषणा केली की, आयसीआयसीआय-लोंबार्डने ज्या पद्धतीचे विमे केलेले आहेत ते सारे चुकीचे आहेत. त्याच दिवशी विधान सभेमध्ये घोषणा झाली की, मत्स्य व्यवसाय विकास विभाग देखील मच्छिमारांचा अशाच प्रकारे विमा काढणार आहे. पण यातून त्या मच्छिमाराला कोठलाही फायदा होणार नाही. त्यामुळे या आयसीआयसीआय-लोम्बार्डची नाव मोठं आणि लक्षण खोटं अशी जी विमा योजना आहे तिचा आपण फेरविचार केला पाहिजे. तेव्हा आपल्या इतर खर्चामध्ये या विम्यासाठीची तरतूद आहे किंवा काय ? यासंदर्भात आम्हाला स्पष्ट खुलासा व्हायला पाहिजे. तसेच शासनाकडून या संदर्भात ठोस घोषणा व्हायला पाहिजे की, वायफळ, वाया जाणाऱ्या गोष्टींसाठी जी तुम्ही तरतूद करीत आहात तर ती तरतूद कशासाठी वापरत आहात ?

सभापती महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग या विभागाच्या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात मला विचारावयाचे आहे की, आपण प्रत्येक जिल्ह्यात एक सामाजिक न्याय भवन बांधणार होता आणि त्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देणार होता असे आम्ही गेली दोन वर्षे ऐकत आहोत. तसेच हे भवन महिला बचत गटाला वापरण्यासाठी दिले जाईल असेही आपण सांगितल्याचे आम्ही ऐकले होते. म्हणून ज्या जिल्ह्याचा दौरा मी करीत असते तेथे जेथे जेथे असा बोर्ड दिसला की मी तेथे मी जाऊन पाहते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नावाने सामाजिक न्याय विभागाने काही सुरूवात केली आहे की नाही ? मी आता पर्यंत तरी मला असे कोठेही काही या विभागाने सुरूवात केल्याचे दिसून आलेले नाही. आता मंत्री महोदय म्हणत आहेत की, अशा केलेल्या कामांची यादी ते मला देणार आहेत. जरूर त्यांनी ती यादी द्यावी. मात्र जुन्याच इमारतींना नव्याने नावे देऊन आपण काम केल्याचे दाखवित आहात काय हेही मग मला तपासावे लागेल. तेव्हा तेथे नेमके विभागाने काय केलेले आहे हे तरी मला पाहता येईल. तसेच सामाजिक न्याय विभागाची 'स्वाभिमान योजना' नावाची नवीन एक योजना होती. महापालिका आणि जिल्हा परिषदांकडे आपल्या ज्या योजना गेल्या आहेत त्यांचे संनियंत्रण करण्यासाठी तुम्ही जोपर्यंत

..... क्यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे ....

व्यवस्थित यंत्रणा राबवित नाही तोपर्यंत लोकांना सामाजिक न्याय मिळणे अवघड होईल याकडे मला आपले लक्ष वेधावेसे वाटते.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा हा नगरविकास विभागासंबंधातील आहे. महानगर पालिकांनी मुलभूत सेवा देण्यासाठी यामध्ये तरतूद केलेली आहे, ही चांगली गोष्ट आहे. परंतु महिलांचे हक्क व कल्याण नावाची महिला आमदारांची जी वैधानिक समिती आहे, या समितीने एक सूचना केली आहे की, प्रत्येक महापालिकांनी त्यांच्या अर्थसंकल्पातील 10 टक्के निधी हा महिला व बाल कल्याण विकासासाठी दिला पाहिजे. परंतु सोलापूर महापालिकांमध्ये महिला बाल कल्याण समितीच अजून देखील अस्तित्त्वात नाही असे आम्हाला दिसून आलेले आहे. शिवसेनेचे तेथील नगरसेवक तेथे उपोषणाला बसले होते की, या महानगरपालिकेमध्ये महिला व बाल कल्याण समिती स्थापन केली जावी. त्यासाठी तेथील महापौरांना सांगून देखील त्यादृष्टीने कार्यवाही होत नाही. तर मग अशा महानगरपालिकांवर आम्ही हक्कभंग आणावयाचा काय ? याबाबत आम्ही काय करावे ? स्वत: नगरविकास विभाग याबाबतीत लक्ष घालणार नसेल तर या ज्या तरतुदी आहेत त्या जे गरजू आहेत त्यांच्यापर्यंत पोहोचतच नाहीत. एवढेच सांगून मी माझे भाषण संपविते. जय महाराष्ट्र.

***

..... क्यू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, पृष्ठ 242, बाब क्र.238 यावर मी प्रथमत: बोलणार आहे. सभापती महोदय, आदिवासी भागातील उच्च माध्यमिक शाळासाठी 14 तुकड्यांसाठी 37.80 लाखए रूपये आपण मंजूर केलेले आहेत. आदिवासी विभागाने हा चांगला निर्णय घेतल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु याच आदिवासी विभागामध्ये अनेक शाळांमध्ये 5 वर्षांपेक्षा अधिक कालावधीसाठी ज्या विना अनुदानित तुकड्या सुरू आहेत त्यांच्यासाठी देखील आपण अनुदान केव्हा देणार आहात याचाही खुलासा मंत्री महोदयांनी करणे आवश्यक आहे असे मला वाटते. तसेच आदिवासी भागातील 5 वी चा वर्ग 100 टक्के अनुदानावर आला तर नैसर्गिक वाढीनुसार 6 वी चा वर्ग आणि हा 6 वी चा वर्ग पुढील वर्षी 7 वी च्या वर्गात गेल्यावर त्या 7 वी च्या वर्गाला देखील 100 टक्के अनुदान मिळणे आवश्यक आहे. राज्य शासनाने या पात्र तुकड्यांची यादी घोषित केलेली आहे पण अद्याप पर्यंत आदिवासी विभागाने या तुकड्यांना अनुदान दिलेले नाही. तेव्हा तातडीने या तुकड्यांनाही अनुदान देण्याची व्यवस्था होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पृ. 242, बाब क्र.237 - सर्व विद्यार्थ्यांना 500 रूपयांऐवजी 630 रूपये निर्वाह भत्ता देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, आणि या भत्त्यात वाढ केलेली आहे. परंतु या आश्रमशाळांत राहणारे जे विद्यार्थी आहेत त्यांच्या बाबतीत विचार केल्यास, विशेषत: आमच्या ठाणे जिल्ह्याचा विचार करता अत्यंत वाईट परिस्थिती या विद्यार्थ्यांची आहे. पुरेसे अन्न मिळत नाही तसेच या वर्षी तर त्यांना गणवेष देखील मिळालेला नाही. तेव्हा याची तातडीने दखल घेण्याची गरज आहे. सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील आंबेसरी, धामणगाव, रणकोळ इत्यादी ठिकाणच्या आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना सडके अन्न खायला मिळते आहे. विद्यार्थ्यांना गणवेष मिळालेला नाही. तेथील इमारतींचे बांधकाम देखील अपूर्ण आहे, आपण खरे तर त्यासाठी निधी देखील दिलेला आहे. पण तरीही वर्षानुवर्षे बांधकाम पूर्ण होऊ शकत नाही. या बाबतही दखल घेण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, याच भागामध्ये चांगले क्वालिफाय शिक्षक आहेत. आपल्याकडे पदे रिक्त आहेत पण आपण प्रोसिजरने ही पदे भरत नाही. ....

( यानंतर श्री.सरफरे ..... आर 1 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

या आदिवासी विभागामध्ये शिक्षकांना 12 रुपये घडयाळी तासावर काम करण्याचा कोणता नियम शासनाने निर्माण केला आहे? आणि हे शासन कोणत्या पध्दतीने शिक्षकांना 12 रुपये घडयाळी तासावर राबवीत आहे. आज त्याठिकाणी शिक्षकांची अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे जे क्वॉलिफाईड शिक्षक आहेत त्यांच्या मानधनामध्ये वाढ करण्यात यावी. अन्यथा प्रोसिजर फॉलो करुन रिक्त पदे तातडीने भरण्याची व्यवस्था करण्यात यावी. परंतु शासनाने त्यांचे शोषण करु नये अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्र. 240 व पृष्ठ क्रमांक 243 मध्ये जलस्वराज्य योजनांतर्गत, स्वच्छता व आरोग्य संवर्धन केंद्र म्हणून शासकीय आश्रमशाळेचा विकास करण्यासाठी 4 कोटी 32 लाख 69 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. जवळ जवळ 408 शासकीय आश्रमशाळांसाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. मला या निमित्ताने मंत्रिमहोदयांना प्रश्न विचारावयाचा आहे की, ही योजना राज्य सरकारने सन 2003 मध्ये मंजूर केली असतांना सन 2008 च्या पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद कां करण्यात आली आहे? पाणीपुरवठयाचा विषय अत्यंत महत्वाचा असतांना पाच वर्षापूर्वी ही योजना राज्य सरकारने मंजूर केल्यानंतर आणि आदिवासी विकास विभागाकडे निधीची कमतरता नसतांना गेली पाच वर्षे हा प्रश्न आपण प्रलंबित कां ठेवला? याचा खुलासा केला पाहिजे.

सभापती महोदय, पृष्ठ क्र. 245 व बाब क्र. 243 मध्ये आदिवासी विद्यार्थ्यांसाठी 68 शासकीय वसतिगृहे सुरु करण्यासाठी 15 कोटी 50 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. दिनांक 6 डिसेंबर 2007 रोजी आदिवासी विद्यार्थ्यांसाठी 68 नवीन शासकीय वसतिगृहे सुरु करण्याची योजना मंजूर करण्यात आली. ही एवढी मोठी योजना मूळ अर्थसंकल्पामध्ये येण्यास कोणत्याही प्रकारची अडचण नव्हती. तेव्हा ही योजना आपण मूळ अर्थसंकल्पामध्ये न आणता ती पुरवणी मागण्यांव्दारे कां आणली? आता शाळा सुरु झालेल्या आहेत. तेव्हा आपण ही योजना कधी राबविणार आहात? ही वसतिगृहे कधी तयार होणार आहेत? त्यामधून विद्यार्थ्यांची रहाण्याची व्यवस्था करणार आहात की नाही? माननीय मंत्रिमहोदयांकडून मला अशी माहिती पाहिजे की, ही 68 शासकीय वसतिगृहांचे कामे केव्हा सुरु करण्यात येणार आहेत? ती केव्हा पूर्ण करण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

येणार आहेत? त्या वसतिगृहांची क्षमता किती रहाणार आहे? ती कोणत्या ठिकाणी सुरु करण्यात येणार आहेत? या मुद्दयासंबंधीची माहिती आपण सभागृहामध्ये द्यावी अशी विनंती करतो. सभापती महोदय, आपण मला दिलेल्या वेळेमध्ये मी माझे मनोगत पूर्ण करतो. धन्यवाद.

-------

(यानंतर श्री. जामा यांचे हिंदी भाषण...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जामा (महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, पूरक मांगणी क्रमांक 1 से लेकर 7 तक दी गई मांगणी में सामान्य प्रशासन विभाग की पूरक मांगों का विवरण दिया गया है. हमारे देश के माननीय प्रधान मंत्री की ओर से स्पेशल मॉयनॉरिटी प्रोग्राम जाहिर किया गया है और उसके बारे में महाराष्ट्र शासन के सामान्य प्रशासन विभाग ने दिनांक 10.10.2006 को सरकुलर निकाला है. इसमें आदेश दिया है कि हर डिपार्टमेंट का 15 प्रतिशत बजट मॉयनॉरिटी के लिए होना चाहिए और यह अलग अलग विभाग के हिसाब से होना चाहिए. लेकिन सामान्य प्रशासन विभाग की पूरक मांगणी क्रमांक 1 से लेकर 7 तक में इस बात का कोई जिक्र नहीं किया गया है. इसके लिए प्रदेश स्तर पर और जिला स्तर कोर्डिनेशन कमेटी नहीं बनाई गई हैं. हॅड वाइज एलोकेशन का विवरण इस पूरक मांगणी में नहीं है, इसलिए इसका समावेश होना चाहिए. जहां पर मॉयनॉनिटीज रहते हैं, वहां पर शिक्षण के लिए, रोड्स के लिए, ग्रामीण विकास के लिए, जवाहर विहिर योजना के लिए 15 प्रतिशत बजट एलोकेशन जाना चाहिए. लेकिन यहां पर इस बारे में कोई विवरण नहीं दिया गया है. इसलिए मैं मांग करता हूँ कि मॉयनॉरिटीज के स्कूल, उर्दू माध्यम के स्कूल जो कि "नो ग्रान्ट बेसिस" पर दिए गए हैं, उनको ग्रान्ट देने के बारे में विचार किया जाए. जब हमने शासन के अधिकारियों को सामान्य प्रशासन विभाग का यह सरकुलर दिखाया कि जहां पर मॉयनॉरिटीज रहते हैं, वहां पर 15 प्रतिशत बजट एलोकेशन शिक्षण के लिए, रोड्स के लिए, जवाहर विहिर योजना के लिए होना चाहिए तो उन्होंने कहा कि सरकुलर तो है, लेकिन सरकार की तरफ से इस प्रकार का बजट एलोकेशन नहीं है. इसलिए इस प्रकार से कोई खर्च नहीं हो सकता है.

सभापति महोदय, महाराष्ट्र शासन ने मॉयनॉरिटीज के लिए अलग डिपार्टमेंट बनाकर एक अच्छा काम किया है और इस पूरक मांगणी में 1 लाख 62 हजार रुपए की मांग की है. मैं इसका स्वागत करता हूँ. आपने मौलाना आजाद आर्थिक विकास महामंडल के लिए 50 करोड़ रुपए का प्रावधान किया है, लेकिन इस महामंडल के शेयर केपीटल के लिए यह प्रावधान 2006-07 के बजट में भी किया गया था. इसलिए दुबारा से यह प्रावधान करने का लॉजिक समझ में नहीं आया है.

. . . R 4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सय्यद जामा जारी

सभापति महोदय, मैं एक और बात कहना चाहता हूॅं. टेक्सटाइल विभाग से संबंधित पूरक मांगणी क्रमांक 263 से 277 तक का विवरण यहां पर दिया गया है. मैं माननीय मंत्री महोदय के ध्यान में यह बात लाना चाहता हूॅ कि महाराष्ट्र स्टेट हैंडलूम कारपोरेशन के एक हजार से लेकर डेढ़ हजार तक ऐसे बुनकर हैं, जिनका रिकॉर्ड महामंडल के पास उपलब्ध है और उनको पैसा नहीं दिया गया है. उनका व्यवहार खत्म हो गया है, लेकिन उनकी पासबुक महामंडल के पास है. पिछले अधिवेशन के दौरान मैंने यह प्रश्न उठाया था, लेकिन इस पूरक मांगणी में इस बात का कोई उल्लेख नहीं है. मैं माननीय मंत्री महोदय से विनंती करुंगा कि वे इस समस्या के बारे में ध्यान दें. धन्यवाद.

.................

भाषण पूर्ण, नंतर एपीआर.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सर्वप्रथम आज सभागृहामध्ये ज्या विविध विभागांच्या संदर्भात पुरवणी मागण्या सादर करण्यात आलेल्या आहेत, त्यांना मी पाठिंबा देऊ इच्छिते.

सभापती महोदय, पान क्र.5, बाब क्र.5 मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. यासंदर्भात सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी सांगितले की, ही तरतूद वाढवावयास पाहिजे. पण याबाबतीत माझी सूचना आहे की, तेथे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक म्हणजे स्मारकच असावयास पाहिजे. त्याच्या भोवती जर टॉवर्स् उभे राहिले, पंचतारांकित हॉटेल्स् उभी राहिली तर त्या स्मारकाचे महत्व कमी होईल. त्या दृष्टीने . . . .

श्री.अरविंद सावंत (खाली बसून) : सदरहू स्मारक मुंबईतील अरबी समुद्रामध्ये उभे करावयाचे आहे.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, आपण पाणी हटवू शकतो. काहीही करु शकतो.

श्री.अरविंद सावंत (खाली बसून) : तुम्ही काहीही करु शकता.

श्रीमती उषा दराडे : आपण, आम्ही नाही. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या भोवती टॉवर्स् किंवा पंचतारांकित हॉटेल्स् वगैरे होऊ नयेत असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, बाब क्र.41, पान क्र.28 बाबत मला माननीय वन मंत्र्यांना सांगावयाचे आहे की, नायगाव अभयारण्यासाठी वन क्षेत्रातील पर्यटन या योजनेअंतर्गत 1 कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी अशी माझी विनंती आहे. तसेच माननीय वनमंत्र्यांनी बजेट अधिवेशनाच्या वेळेस असे आश्वासन दिले होते की, बीड जिल्हयातील 99 वन कामगारांना कायम करण्याच्या संबंधातील विषय मंत्रिमंडळासमोर ताबडतोब ठेवण्यात येईल. माझी माननीय वन मंत्र्यांना विनंती आहे की, या आश्वासनाची ताबडतोब परिपूर्ती करण्यात यावी.

सभापती महोदय, बाब क्र.43, पान क्र.29 बाबत सांगावयाचे आहे की, बीड जिल्हयामध्ये बालाघाट पर्वतांच्या रांगेमध्ये वनतळयांच्या बाबतीत सर्वेक्षण करुन तेथे वनतळयांचे बांधकाम करण्यात यावे अशी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्र.68, पान क्र.55 मध्ये महानगरपालिकांना प्राथमिक पायाभूत सोयी

. . . .एस-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सुविधा देण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. याठिकाणी नगरविकास विभागाचे माननीय मंत्री महोदय उपस्थित आहेत. मला त्यांना विनंती करावयाची आहे की, बीड मध्ये स्टेडिअम आहे. परंतु संपूर्ण महाराष्ट्रामध्ये कुठेही घडले नसेल अशी परिस्थिती तेथे निर्माण झालेली आहे. त्याठिकाणी खाली गाळे उभे करण्यात आले असून, आता दुसऱ्या मजल्यावर स्विमिंग पूल तयार करण्यात येत आहे. सध्या तेथे अशी स्थिती आहे की, गुत्तेदाराने गाळयांचे बांधकाम केलेले असून स्विमिंग पूलाचे काम तसेच सोडून तो पळून गेलेला आहे. तेव्हा एकतर त्याठिकाणी स्विमिंग पूलाचे काम पूर्ण करावे नाहीतर दुसऱ्या ठिकाणी करावयाचा असेल तर तेथे करावा. परंतु बीडवासियांसाठी स्विमिंग पूल उपलब्ध होणे हा त्यांचा अधिकार आहे. त्यामुळे तो तेथे कसा उपलब्ध करुन देता येईल या दृष्टीने विचार करावा. तसेच वीज बिले न भरल्यामुळे नगरपालिकेची पाणी पुरवठयाची कनेक्शन तोडण्यात येतात. त्यामुळे बीडवासियांना त्रास सहन करावा लागतो. तेव्हा पाणीपुरवठयाची कनेक्शन तोडण्याचे प्रकार वारंवार का घडतात ? याबाबतीत चौकशी होणे गरजेचे आहे. त्याच प्रमाणे बीड शहरामध्ये बी.पी.एल.धारकांची संख्या का कमी झालेली आहे ? याबाबतीत नगरपालिकेची चौकशी करुन यातून काहीतरी मार्ग काढण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग विभाग हा माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहे. यातील बाब क्र.150, पान क्र.153 बाबत सांगावयाचे आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी फक्त दोनच शाळा चालतात. या दोन्ही शाळा माननीय मुख्यमंत्र्यांच्या अधिपत्याखाली आहेत. परंतु त्या फक्त सातवीपर्यंतच आहेत. या शाळांची श्रेणीवाढ करण्यात यावी अशा प्रकारचा प्रस्ताव संबंधित विभागाच्या सचिवांकडे आहे. मूळातच या ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी माध्यमिक शाळा देण्याच्या बाबतीत जी.आर. काढलेला नव्हता. परंतु आता तर ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी आता तर शाळा न देण्याच्या बाबतीतच शासनाने जी.आर.काढलेला आहे. परंतु या जी.आर.मधून ऊस कामगारांच्या मुलांसाठी असलेल्या शाळा वगळण्यात याव्यात अशी मागणी करण्यात येत आहे. ती मान्य करण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्र.153, पान क्र.154 बाबत सांगावयाचे तर शासनाकडे ओ. बी. सी. महामंडळाची काही देणी शिल्लक आहेत, ती ताबडतोब सदरहू महामंडळांना देण्यात

. . . .एस-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यावीत. तसेच इतर जी अल्पसंख्यांक व मागासवर्गीय महामंडळे आहेत, त्यांना देण्यात येणारा निधी वाढविण्यात यावा आणि तो त्यांना उपलब्ध होईल यादृष्टीने व्यवस्था करण्यात यावी.

सभापती महोदय, बाब क्र.149, पान क्र.153 बाबत सांगावयाचे आहे. सातारा याठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभे करावयाचे आहे. माननीय राज्यमंत्री श्री.राणा जगजितसिंह पाटील यांच्या विभागाशीही हा विषय संबंधित आहे. या स्मारकाच्या घरमालकाबरोबर तडजोड करुन, या कामासाठी जेवढा लागेल तेवढा निधी वित्त विभागाने उपलब्ध करुन द्यावा जेणेकरुन त्याठिकाणी सदरहू स्मारक कोणत्याही परिस्थितीमध्ये उभे राहू शकेल. कारण तेथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लहानपण गेलेले आहे. त्यामुळे तेथे स्मारक होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मला सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्र.232, पान क्र.229 बाबत सांगावयाचे आहे की, महाराष्ट्र राज्य अंशकालीन स्त्री परिचर संघटनेने दि.24-8-2007 रोजी जे निवेदन दिलेले आहे. त्यातील अंशकालीन स्त्री परिचर यांच्या मागण्यांबाबतचा प्रस्ताव संबंधित विभागाच्या सचिवांपर्यंत आलेले आहे. आता त्याबाबतीत फक्त निर्णय घ्यावयाचा आहे. माझी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, या स्त्री परिचारांचे प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत ताबडतोब प्रयत्न करण्यात यावेत.

यानंतर श्री.बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे...

सभापती महोदय, यानंतर मला विधी व न्याय विभागाच्या बाब क्रमांक 116 बाबत बोलावयाचे आहे. माजलगाव येथे ॲडिशनल कोर्ट झाले परंतु त्या ठिकाणी एकही गव्हर्नमेंट प्लिडर नाही. बीड येथून 60 किलोमीटरवरुन गव्हर्नमेंट प्लिडरला त्या ठिकाणी जावे लागते. जे ॲडिशनल कोर्ट आणि नवीन कोर्ट झालेले आहेत त्यांच्या इमारतींचा प्रश्न आहे. तो प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने ताबडतोबीने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला कृषी विभागाच्या बाब क्रमांक 46 बाबत बोलावयाचे आहे. माननीय कृषी मत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. सेंद्रीय शेती हा विषय अभ्यासक्रमात घेण्याची विनंती वारंवार करुनही त्या विषयाचा समावेश होत नाही. त्याबाबत विचार करावा. राष्ट्रीय फलोद्यान अभियान योजनेअंतर्गत सन 2008-09 मध्ये सामुहिक तळ्यांचा लक्षांक बीड जिल्ह्याला देण्यात आलेला नाही. तो देण्याच्या शासनाने प्रयत्न करावा.

सभापती महोदय, यानंतर मला मत्स्यव्यवसाय विभागाच्या बाब क्रमांक 46 बाबत बोलावयाचे आहे. मच्छिमार सोसायट्यांच्या बाबतीत घरबांधणीची जी योजना होती ती महाराष्ट्र शासनाने बंद केलेली आहे. ती योजना पूर्ववत सुरु करण्यात यावी, अशा प्रकारीची विनंती करुन मी माझे भाषण संपविते.

---

**उपसभापती** : मला सन्माननीय सदस्यांना एक सूचना करावयाची आहे. पुरवणी मागण्यांवर सन्माननीय सदस्यांनी बोलण्याबाबत माझी हरकत नाही, परंतु सन्माननीय सदस्यांनी आपली नावे आपल्या पक्षाच्या प्रतोदामार्फत पाठवावीत. एकदा या ठिकाणी नावे आल्यानंतर सभागृहात सन्माननीय सदस्यांनी बोलण्यासाठी हात वर केला तर त्यांना नाही म्हणणे अवघड होते. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी माझी अशी अवघड परिस्थिती करु नये. माझ्याकडे ज्या सन्माननीय सदस्यांची नावे आलेली आहेत त्या व्यतिरिक्त इतर कोणाही सदस्याला बोलण्याची संधी मिळणार नाही. यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत बोलतील.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या सूचनेचे स्वागत करतो आणि थोडक्यात बोलण्याचा प्रयत्न करतो. आपण मला अधिकची एक दोन मिनिटे लागतील.

सभापती महोदय, मला प्रथम सामान्य प्रशासन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 5 वरील बाब क्रमांक 4 बाबत बोलावयाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी याबाबत सांगितले. या याद्या तयार करीत असताना जी दक्षता घेणे आवश्यक आहे ती घेतली जात नाही. अनेक ठिकाणी शासकीय अधिकाऱ्याने किंवा कोणत्याही बँकेच्या अधिकाऱ्याने शिक्का मारला तर त्यांना पदवीधर समजले जाते. प्रत्यक्षात त्या बँकेकडे 12 कर्मचारी असताना 25 नावे रजिस्टर होतात ही बाब अत्यंत गैर आहे. पदवीधर मतदारसंघात आमच्या भगिनींवर फार मोठा अन्याय होतो. कारण ज्यांचे माहेरचे नाव होते त्या भगिनींची नावे त्या यादीमध्ये आलेली नाहीत. त्यामुळे या भमिनींवर जो अन्याय होतो तो दूर करावा अशी माझी मागणी आहे. त्यासाठी विशेष समिती बसवावी जेणेकरुन लोकप्रतिनिधींचे मत त्या ठिकाणी ऐकले जाईल. त्यांना पुढच्या निवडणुकीमध्ये भाग घ्यावयाचा असतो. या बाबीचा शासनाने विचार करावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मला सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 5 बाबत बोलावयाचे आहे. या बाबीवर अनेक सन्माननीय सदस्य बोलले. मी एक आठवण करुन देतो. विधिमंडळाच्या प्रांगणामध्ये सुध्दा छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवावयाचा होता. त्याचे पुढे काय झाले हे अजून कळलेले नाही. त्याबद्दलची माहिती आता तातडीने सभागृहात द्यावी, अशी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मला सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 9 बाबत बोलावयाचे आहे. ही बाब विधिमंडळातील उपहारगृहाबाबत आहे. आपण आपल्याकडील उपहारगृह पहावे. त्या ठिकाणी स्वच्छता असावी. पिण्याचे पाणी स्वच्छ असावे. विधिमंडळात येणाऱ्या पिण्याच्या पाण्याची तपासणी करुन घ्यावी आणि ते पिण्यासाठी योग्य आहे की, नाही याचे सर्टिफिकेट आपल्या दालनातून इश्यू झाले तर ते पाणी आम्ही पिऊ. येथील पाणी अतिशय अस्वच्छ असते. ग्लासेस सुध्दा घाणेरडे असतात. यासंदर्भात दक्षता घ्यावी अशी विनंती करतो.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ श्री.बरवडनंतर 11:25

श्री.अरविंद सावंत....

यानंतर नगरविकास विभाग, बाब क्रमांक 68, पृष्ठ क्रमांक 55, महानगरपालिकांना पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतूद या मागणीद्वारे केली आहे. त्यानुसार मुंबई, ठाणे महानगरपालिकेला किती निधी दिला याची माहिती द्यावी आणि मुंबई महानगरपालिकेला किती देणे शिल्लक आहे त्याची माहिती द्यावी अशी मी मागणी करतो.

यानंतर मी जलसंपदा विभाग, बाब क्रमांक 107, पृष्ठ क्रमांक 112 व 113 वर मी बोलतो. पाटबंधारे प्रकल्पांचे परिरक्षण व दुरुस्ती करणे यासाठी ही मागणी केलेली आहे. मी अलिकडेच पश्चिम महाराष्ट्रातील कोयना धरणाला समितीच्या माध्यमातून भेट दिली आहे. दूधगंगा प्रकल्पाचे काम मेशनरी पध्दतीने केलेले आहे. त्याठिकाणी मोठया प्रमाणात पाण्याची गळती होत आहे. या प्रकल्पाचा यामध्ये समावेश आहे किंवा नाही ही माहीत नाही, पण शासनाने त्याकडे लक्ष द्यावे. जलसंपदा विभागाने 508 टीएमसी पाणी अडवावयास पाहिजे होते. पण आजही 52 टीमीसी पाणी अडविण्याचे राहिलेले आहे. साठविलेल्या पाण्याचा पूर्णपणे वापर आजही होत नाही असे समितीच्या माध्यमातून आढळून आले आहे. हे सर्व पाणी कर्नाटक राज्यामध्ये जात आहे. यासंदर्भात मी अधिका-यांकडे विचारणा केली असता त्यांनी मला लेखी उत्तर दिले आहे की, पाणी अडविण्यासाठी लागणारी कालव्याची कामे झालेली नाहीत. चिकोत्रा धरणाला कालवा नाही, दूधगंगा प्रकल्पाला कालवा नाही, शासनाने यासाठी तरतूद केलेली नाही. अडविलेल्या पाण्याचा वापर जलसंपदा विभागाकडून केला जात नाही. याकडेही शासनाने लक्ष द्यावे अशी मी मागणी करतो.

यानंतर ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या बाब क्रमांक 137 वर मी बोलणार आहे. कोकणात पावसाचे पाणी वाया जाते. त्याठिकाणी जलसंधारणाची कामे होत नाहीत. लघुपाटबंधारे विभागाने पश्चिम महाराष्ट्रासाठी जे प्रचलित निकष आहेत तेच निकष कोकणात लावले आहेत. त्यामुळे हे निकष बदलण्याची आवश्यकता आहे. पाटबंधारे हा विषय आला म्हणजे पाटाचे पाणी अडविणे हा विषय येतो, परंतु कोकणातील लोकांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही. अशा परिस्थितीत कोकणात पाटबंधारे प्रकल्प कसे काय होणार ? पाटबंधारे प्रकल्प होण्यासाठी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



NTK/

श्री.अरविंद सावंत....

काही टक्के जमीन सिंचनाखाली आली पाहिजे असे सध्याचे निकष आहेत. हे निकष बदलले पाहिजेत. यावर्षी कोकणातही कमी पाऊस पडल्यामुळे दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. मागील 5 वर्षापासून पाटबंधारे विभागाचे निकष बदलण्याची मी मागणी करीत आहे. प्रत्येक वेळी सभागृहात केवळ आश्वासन दिले जाते, त्यासाठी साधी बैठकही बोलविली जात नाही. त्यामुळे मी आग्रहाची विनंती करतो की, हे निकष तातडीने बदलण्यात यावेत.

यानंतर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक 229 वर मी बोलतो. राज्यातील ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रांची अवस्था अतिशय वाईट आहे. ग्रामीण रुग्णालयासाठी 50 खाटा व 22 खोल्यांचे निकष आहेत. त्याशिवाय डॉक्टर्स, नर्सेसची पुरेशी पाहिजे. या विभागाच्या सचिवांच्या सचिव श्रीमती अय्यंगार यांचे म्हणणे होते की, जोपर्यंत या सुविधा दिल्या जात नाहीत तोपर्यंत डॉक्टर्स, नर्सेस देऊ शकत नाही. राष्ट्रीय सार्वजनिक आरोग्य योजने अंतर्गत वेगवेगळया जिल्हयासाठी केलेल्या तरतुदीमध्ये प्रचंड तफावत आहे. एका ठिकाणी ग्रामीण रुग्णालयासाठी मुबलक तरतूद केली जाते तर दुस-या ठिकाणी केवळ 7 खोल्या दिल्या जातात. जे कोणी खाजगी डॉक्टर्स व्यवसाय करतात त्यांना सुध्दा ग्रामीण भागात नेमले पाहिजे. अशाप्रकारे हा प्रश्न सोडविण्यासाठी मार्ग काढला पाहिजे. तसेच यासाठी तरतूद करावी अशी मी मागणी करतो.

यानंतर आदिवासी विभागाच्या मागणीवर माझे विचार मांडतो. राज्यातील आदिवासी आश्रमशाळांची अतिशय दुरावस्था आहे. त्याठिकाणी असलेल्या आमच्या छोटया छोटया मुलींसाठी स्वच्छतागृहे नाहीत. पिण्याचे पाणी नाही, काही ठिकाणी स्वच्छतागृहे आहेत तर त्यांना कडया व दरवाजे नाहीत. त्यामुळे शासनाने संपूर्ण राज्यातील आदिवासी आश्रमशाळांच्या संदर्भात अहवाल सादर करावा अशी विनंती करतो.

यानंतर रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या बाब क्रमांक 306, पृष्ठ क्रमांक 285 यावर माझे विचार मांडतो. अत्यंत दुर्लक्षित असा हा विभाग आहे. या खात्याचे मंत्री महोदय सुध्दा दुर्लक्षित आहेत असे वाटते. त्याप्रमाणे राज्यातील बेरोजगारांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. रिजनल एम्प्लॉयमेंट ॲक्टची राज्यात आजही अंमलबजावणी होत नाही.

नंतर श्री.शिगम....

अशुध्दप्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत...)

परप्रांतीयांचा विषय सातत्याने पुढे येत आहे. भूमिपुत्रांना न्याय द्यावयाचा असेल तर प्रत्येक नोकरी आणि रोजगार हा सेवायोजन कार्यालयाच्या माध्यमातून गेला तर आणि तरच निश्चितपणे किती लोकांना नोक-या आणि रोजगार उपलब्ध झाला हे कळेल. आता ऑन-लाईन नोक-या दिल्या जाऊ लागल्यामुळे कोण कुठे नोकरीला लागतो हे कळत नाही आणि सर्वसामान्य माणूस मात्र सेवायोजन कार्यालयाच्या दारात तिष्ठत असतो, त्याला मात्र रोजगार मिळत नाही. तेव्हा याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी लक्ष द्यावी अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, कलावंतांसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु कोकणातील भजनीबुवा आणि दशावतारी कलावंत यांच्यासाठी कोठेही तरतूद केलेली दिसत नाही. तेव्हा कोकणातील भजनीबुवा आणि दशावतारी कलावंत यांच्यासाठीही तरतूद करावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, वनासंबंधी "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे" असे संत तुकाराम महाराजांनी म्हटलेले आहे. परंतु या वनखात्याच्या बाबतीत मात्र "वृक्षवल्ली वनखाते चोरी करीतसे, करीतसे" असेच म्हणावे लागेल, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

--

**उपसभापती** : माननीय मंत्री महोदयांना उत्तर द्यावयाचे असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री. बाळासाहेब थोरात : संसदेमध्ये रिटन नोट देण्याची पध्दत आहे. त्याप्रमाणे ज्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळणार नाही त्यांच्याकडून रिटन नोट घेण्याची पध्दत सुरु करावी अशी माझी आपणांस विनंती आहे.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2008-09च्या पुरवणी मागणीवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या पृ.क्र.5 वरील बाब क्रमांक 5 मध्ये राष्ट्रपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. यानुषंगाने मी एक सूचना करु इच्छितो की, राष्ट्रपुरुषांची आधीची जी स्मारके उभारलेली आहेत त्यांची सुरक्षा, स्वच्छता आणि देखभाल यासंदर्भात शासनाने नियोजन करण्याची गरज आहे. मुंबईतील अनेक पुतळयांच्या सुरक्षेची व्यवस्था केलेली असली तरी त्यांची स्वच्छता आणि देखभालीकडे लक्ष दिले जात नाही. तेव्हा याकडे माननीय मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे.

पृ.क्र.6 वरील बाब क्रमांक 7 मध्ये एक सदस्य चौकशी आयोगाच्यासंदर्भात तरतूद करण्यात आलेली आहे. ठाणे जिल्ह्यातील अनधिकृत बांधकामांच्या संदर्भात अनेक प्रकारचे चौकशी आयोग नेमण्यात आले. परंतु त्यांचे पुढे काय झाले हे कोणालाच काही कळले नाही. तेव्हा अशा आयोगांचे निष्कर्ष शासनाने जनतेसमोर आणावेत अशी माझी शासनाला सूचना आहे.

पृ.क्र.7 वरील बाब क्रमांक 10 मध्ये भूमी संपादनाकरिता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस सहायक अनुदानाकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. मुंबईतील हवाई वाहतूक लक्षात घेता पनवेल मलकपट्टी येथे होणा-या विमानतळाबाबत वर्तमानपत्रातून वृत्त प्रसिध्द झालेले आहे. तेव्हा या विमानतळाच्या संदर्भात काय स्थिती आहे हे देखील या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांनी जाहीर करावे अशी माझी त्यांना विनंती आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पान क्रमांक 299 वर विविध बाबीअंतर्गत तरतूद करण्यात आलेली आहे. माझी माननीय मंत्री महोदयांना कळकळीची विनंती आहे की, त्यांनी ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रुग्णालयमध्ये कोणकोणत्या सुविधा उपलब्ध आहेत याची प्रत्यक्ष दौरा करुन माहिती घ्यावी. ह्या दौ-याच्या वेळी आमची देखील माननीय मंत्री महोदयांसोबत येण्याची तयारी आहे. ठाणे जिल्ह्यातील तलासरी, जव्हार, मोखाडा, विक्रमगड, डहाणू येथील ग्रामीण रुग्णालयासाठी रुग्णवाहिका नाही. रुग्णवाहिका नसल्यामुळे सर्पदंशामुळे दोन मुलींचा मृत्यू झाला

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय केळकर....)

हे मी या आधीही या ठिकाणी सांगितलेले आहे. अशी परिस्थिती असताना देखील तेथे रुग्णवाहिका दिली जात नाही. तेव्हा ठाण्याच्या ग्रामीण भागातील रुग्णालयांसाठी तातडीने 5 रुग्णवाहिकांची व्यवस्था करावी अशी माझी मागणी आहे.

नगरविकास विभागाच्या पृ.क्र.55 वरील बाब क्रमांक 68 मध्ये महानगरपालिकांना प्राथमिक पायाभूत सोईसुविधा देण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री. शिगम 11:35

श्री. संजय केळकर...

ठाणे महानगरपालिकेला प्राथमिक पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी माझी विनंती आहे. शासनाकडून प्राथमिक पायाभूत सुविधासाठी जो निधी उपलब्ध करुन दिला जातो, त्या निधीच्या खर्चासबंधीचा ताळेबंद महानगरपालिकांनी सादर करावा अशा प्रकारचे बंधन शासनातर्फे घालून देण्यात यावे अशाही प्रकारची माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 117, विधी व न्याय विभागाची मागणी आहे. या मागणीच्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, कल्याण येथे न्यायालयासाठी नवीन इमारत तयार झाली आहे, या इमरतीचे उद्‌घाटन लवकरात लवकर व्हावे या संबंधी मी विधी व न्याय विभागाच्या मंत्र्याबरोबर पत्र व्यवहार केला आहे. माननीय मंत्री महोदयांचे यासंबंधीचे पत्र सुध्दा मला प्राप्त झाले आहे. परंतु अजून सदर न्यायालयाच्या नवीन इमारतीचे उद्‌घाटन झालेले नाही. कल्याण येथील न्यायालयाच्या नवीन इमारतीचे सत्वर उद्‌घाटन करण्यात यावे अशी मी शासनास विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-----------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ( विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित ) : सभापती महोदय, 2008-09 या वर्षाच्या पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. मी वेळे अभावी फक्त महत्वाच्या मागण्या या ठिकाणी करणार आहे.

सभापती महोदय, चौंढीचा विकास करण्यासाठी 2 कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारची मागणी मी गेल्या पाच वर्षापासून या सभागृहात करीत आहे. परंतु चौंढीचा विकास करण्यासाठी शासनाने आज तागायत एक रुपयांची देखील तरतूद शासनाने उपलब्ध करुन दिलेली नाही. चौंढीच्या विकासासाकडे शासन पूर्णपणे दुर्लक्ष करीत आहे. चौंढीचा विकास करण्यासाठी शासनाने 2 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन द्यावा अशी माझी शासनास पुन:श्च विनंती आहे.

सभापती महोदय, मत्स्यव्यवसाय विभागाची बाब क्रमांक 49 ही मराठवाडा विकास पॅकेज अंतर्गत जलाशयामध्ये गोडया पाण्यातील कोळंबी व माशांची पिल्ले साठविण्यासाठी 4.75 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. गोडया पाण्यातील मच्छिमारीचे ठेके मोठमोठया कंत्राटदारांना देण्यात येतात. या राज्यात भाई समाज मोठया प्रमाणात असून तो विमुक्त व भटक्या जमातीत त्याचा समावेश करण्यात आलेला आहे. हा समाज मच्छिमारीचा व्यवसाय करणार आहे. त्यामुळे अशा जलाशयातील मच्छिमारीचे ठेके भोई समाजाच्या मच्छिमार सोयायटींना देण्यात यावेत व त्या समाजाला आर्थिकदृष्टया सक्षम करण्यात यावे अशा प्रकारची माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या मागण्यांच्या निमित्ताने एक गोष्ट मी शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, पारधी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी शासनाने 25 कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करुन दिली आहे. या राज्यात विमुक्त व भटक्या जमातीमध्ये धनगर, वडार, वंजारी, भोई, वीट भट्टीवाले अशा विविध समाजाचा समावेश करण्यात आलेला आहे. सदरहू समाज देखील आर्थिकदृष्टया खूप कमकुवत आहेत. विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील सर्व समाजांची आर्थिक प्रगती व्हावी म्हणून शासनाने मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन द्यावा अशी माझी शासनास नम्र विनंती आहे.

सभापती महोदय, आदिवासी विभागाची बाब क्रमांक 243 ही आदिवासी विद्यार्थ्यांसाठी 68 शासकीय वसतिगृहे सुरु करण्यासाठी 15.50 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. परंतु शासनाने

2....



ABG/ प्रथम श्री. शिगम 11:35

श्री. प्रकाश शेंडगे....

विमुक्त व भटक्या जमातीतील विद्यार्थ्यांसाठी एकही वसतिगृह आज तागायत सुरु केलेले नाही. विमुक्त व भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्हयात एक वसतिगृह सुरु करावे व त्यासाठी शासनाने त्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाची बाब क्रमांक 153 च्या अनुषंगाने वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाला अतिरिक्त भाग भांडवली अंशदान देण्यासाठी 16 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या राज्यात विमुक्त व भटक्या जमाती प्रवर्गाची लोकसंख्या 25 लाख एवढी आहे. या समाजाच्या लोकसंख्येचा विचार करता 100 कोटी रुपयांचा निधी या महामंडळास उपलब्ध करुन दिला जावा अशा प्रकारची मागणी मी प्रत्येक अधिवेशन करीत आहे. परंतु माझ्या मागणीचा अद्यापपर्यंत शासनाकडून कोणत्याही प्रकारचा विचार केला गेलेला नाही. म्हणून माझी पुन्हा विनंती आहे की, विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील लोकांना या महामंडळाच्या माध्यमातून लाभ मिळावा म्हणून सदर महामंडळास 100 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन द्यावा अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य शेळी-मेंढी विकास महामंडळास मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यात येईल अशा प्रकारच्या घोषणा माननीय मंत्री महोदयांनी या सभागृहात अनेक वेळा केलेल्या आहेत. मागच्या वर्षी या महामंडळास 50 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला जाईल अशा प्रकारची स्पेसिफीक घोषण माननीय मंत्री महोदयांनी केली होती. परंतु या वर्षाच्या अर्थसंकल्पात या महामंडळासाठी एकही रुपयांची तरतूद केली नाही. म्हणून शासनाने शेळी मेंढी विकास महामंडळास 50 कोटी रुपयांची तरतूद ताबडतोबीने उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारची मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो.

--------------

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ पूर्वी श्री.गिते 11:40

श्री. हसन मुश्रीफ (पशुसंवर्धन,विधी व न्याय राज्यमंत्री) : माननीय सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांच्या विभागाच्या मागण्यांपैकी अल्पसंख्याक विभाग आणि विधी व न्याय विभागाच्या मागण्या तसेच पशुसंवर्धन विभागाच्या पूरक मागण्यांवर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, एच.क्यू.जामा, संजय केळकर, प्रकाश शेंडगे, श्रीमती उषाताई दराडे, श्रीमती फौजिया खान यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी ब्रिटीशकालीन न्यायमूर्तींची तैलचित्रे काढून टाकावीत अशी सूचना केली आहे. त्यांनी महात्मा गांधींची सनद रद्द केली होती आणि टिळकांनी अग्रलेख लिहिला म्हणून त्यांना शिक्षा दिली होती त्या न्यायाधिशांची तैलचित्रे काढून टाकण्याबाबत सूचना केली आहे. यासंदर्भात कायदेशीर मत घेऊन दोन्ही न्यायमूर्तींची तैलचित्रे काढून टाकण्याबाबतचे आदेश शासन निश्चितपणाने देईल.

सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी फायबर बोटींचा अंतर्भाव नाही आणि पॅकेज पुरेसे नाही आणि शीतपेटयांएवेजी पैसे द्यावेत अशी सूचना केली आहे. निश्चितपणाने याबाबतीत शासनाने शीतपेटयांऐवजी पैसे देण्याचे प्रस्तावित केलेले आहे. रॉकेल सुध्दा देणार आहोत.

सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान तसेच सन्माननीय सदस्य श्री. झामा यांनी अल्पसंख्यांकांसाठी 15 कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी सच्चर समितीने सुचविली आहे त्याबाबत कार्यवाही करावी अशी सूचना केली आहे. या समाजाला राष्ट्रीय प्रवाहात येण्यासाठी 167 कोटी रुपयांची तरतूद मागितली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे आणि श्री. संजय केळकर यांनी न्यायालयाच्या इमारतींसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी सूचना केलेली आहे. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी कौटुंबिक न्यायालये प्रत्येक जिल्हयात निर्माण करावीत अशी सूचना केली आहे.ते शासन करणार आहे. काही न्यायालयांचे काम जागेच्या अभावी राहिलेले आहे. या प्रश्नांना न्याय मिळेल असे मी आश्वासन देतो. माझी सदनाला विनंती आहे की, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय आणि विधी व न्याय विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात.

-----





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजयसिंह मोहिते-पाटील(ग्रामविकास मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, राजन तेली आणि सुभाष चव्हाण यांनी ग्रामविकास आणि पर्यटन विभागाच्या मागण्यांवर आपले विचार व्यक्त केले त्याबद्दल मी मनापासून त्यांचे आभार मानतो.

ग्रामविकास विभागाच्या बाबतीत माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी सांगितले की, जिल्हा परिषदांच्या भरतीमध्ये गडबड होते आहे आणि याची चौकशी करावी अशी सूचना केली . गेली तीन वर्षे जिल्हा परिषदांमध्ये भरती होत असताना ही भरती प्रत्येक जिल्हयात एकाच वेळी घेण्याच्या सूचना दिलेल्या होत्या. एका जिल्हयातील व्यक्ती दुसऱ्या जिल्हयात जाते त्यावेळी तक्रारी होतात. म्हणून शिक्षक,ग्रामसेवक यांची भरती सर्व जिल्हयात एकाच दिवशी परीक्षा घेतली गेली. पदाधिकाऱ्यांचे किंवा अधिकाऱ्यांचे नातेवाईक त्याठिकाणी आलेले असतात अशी तक्रार करण्यात आली. यासंदर्भात काही ठराविक तक्रार असेल तर त्याची निश्चितपणाने चौकशी केली जाईल. श्री. राजन तेली यांनी पदे रिक्त असण्याबाबत सूचना केलेली आहे. गेल्या तीन वर्षाच्या कालावधीमध्ये ग्रामविकास विभागामार्फत जिल्हा परिषदांमध्ये जवळपास 50 हजार पदे भरली गेली.पदोन्नती दिल्या गेल्या. इतक्या मोठया प्रमाणावर कर्मचाऱ्यांची भरती यापूर्वी कधीच झाली नव्हती. यासंदर्भात काही तक्रार असेल तर त्याची चौकशी करण्यात शासनाला कोणतीही अडचण नाही. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी धामापूर येथील पर्यटन केंद्राची इमारत बांधली आहे तेथे पर्यटन केंद्र तात्काळ सुरु करण्याबाबत सूचना केली आहे. तातडीने पर्यटन महामंडळाला आदेश दिले जातील आणि ते लवकरात लवकर सुरु केले जाईल. हे पर्यटन केंद्र सुरु होईल अशी खात्री बाळगण्यास हरकत नाही. पर्यटन आणि ग्रामविका विभागाच्या पूरक मागण्या सदनाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

----

....3





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे(नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, नगविकास विकास, सामान्य प्रशासन आणि जलसंधारण विभागाच्या मागण्यांसदर्भात काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक मुंबईतील समुद्रामध्ये होणार आहे याबद्दल सर्वांनीच शासनाचे अभिनंदन केले आहे. 1 कोटीची जी तरतूद यासाठी करण्यात आलेली आहे ती स्मारकाची किंमत नाही. या स्मारकाचे प्लॅन आणि एस्टीमेट तयार करण्यासाठी ही रक्कम सार्वजनिक बांधकाम खात्याला उपलब्ध करुन दिलेली आहे. हे स्मारक बीओटी तत्वावर बांधण्यात येणार आहे. याचा स्मारकाचा अंदाजित खर्च 100 कोटीपेक्षा अधिक होईल. केवळ महाराजांचा पुतळा बसविण्यात येणार नसून पूर्ण जीवनचरित्राचे प्रदर्शन यामध्ये दाखविले जाणार आहे. जीवनकार्याची सगळी माहिती दिली जाणार आहे. बीओटी तत्वावर 300 फूटापेक्षा अधिक उंचीचे स्मारक बनविण्याचा शासनाचा मनोदय आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी पुरवणी मागण्यांवर आपले विचार व्यक्त केले आहेत. पदवीधर मतदारसंघातील निवडणुकीसंदर्भातील ओळखपत्रांच्या संदर्भात तक्रारी करण्यात आल्या. ज्या मतदार याद्या तयार करण्यात आल्या होत्या त्या मतदारयाद्या दुबार झाल्याचे काही सदस्यांनी निदर्शनास आणले आहे. यासंदर्भात तक्रारी केल्या आहेत आणि ॲफेडेव्हीट का केले नाही असेही सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितले.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 11:45

श्री.राजेश टोपे.....

सभापती महोदय, मी एवढेच सांगू इच्छितो की, हा संपूर्ण विषय निवडणूक आयोगाच्या नियंत्रणाखालील आहे. त्यांनी निश्चित केल्याप्रमाणे कारवाई केली जाते व त्याबाबत त्यांचेच सुपरव्हिजन असते. काही त्रुटी निदर्शनास आणून दिल्या आहेत त्या निश्चितपणे आयोगाच्या लक्षात आणून देण्याचे काम शासनाच्या वतीने केले जाईल. आयकार्ड बनविण्याचे काम ही कंटिन्यूअस प्रोसेस आहे. प्रत्येक तहसीलमध्ये कॉम्प्युटरवर फोटो काढण्याच्या दृष्टीने कायमस्वरुपी व्यवस्था केली आहे. ज्यांचे नाव मतदार यादीमध्ये नसेल त्यांना आपल्या नावाची नोंदणी करता येते व पुरवणी यादी जाहीर करण्याचे काम केले जाते.

सभापती महोदय, स्मारकांच्या संदर्भात पावनखिंडी येथे तसेच कान्होजी आंग्रे यांच्या स्मारकाच्या ठिकाणी लाईट आणि साऊंडची तरतूद करावी अशी विनंती केली आहे. याबात निश्चित विचार केला जाईल.

श्री.अरविंद सावंत : विधानभवनाच्या प्रांगणामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला जाणार होता, त्याचे काय झाले?

श्री.राजेश टोपे : ती बाब विचाराधीन आहे एवढेच सांगतो. सभापती महोदय, काही विमानतळांचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. टप्प्याटप्प्याने हे काम केले जाईल. सिंधुदुर्ग व अकोला येथील विमानतळाबाबत विचार करण्यात येईल. ब आणि क शहरांच्या विकासाच्या संदर्भात अर्थसंकल्पीय तरतूद करावी अशी विनंती करण्यात आली आहे. निश्चितपणे अधिकाधिक बजेट तरतूद करण्याचे काम केले जात आहे.

सभापती महोदय, अकोला, सोलापूर महानगरपालिकेमध्ये महिला व बालविकास समिती अस्तित्वात नाही असे सांगण्यात आले. त्याची माहिती उपलब्ध करुन घेतली आहे. उपविधीमध्ये बदल करण्यात आला असून शासनाकडून मान्यता देण्याचे काम ताबडतोब होईल.

सभापती महोदय, बीड जिल्हयाच्या संदर्भात मुद्दा मांडण्यात आला आहे. स्विमींग पूलसाठी निधी देण्याबाबत विचार केला जाईल. जलसंधारणाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी मापदंडात बदल करण्याची विनंती केली आहे. जलसंधारण विभागाकडून हे काम केले जाते. यासाठी त्या विभागाला कळवून तातडीने हे काम करुन घेण्यासाठी पाठपुरावा करण्याचे काम केले जाईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे जलसंधारण विभागाच्या संदर्भात बैठक घेऊन हा विषय मार्गी लावण्यात येईल. सामान्य प्रशासन, नगरविकास व जलसंधारण विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, बाब क्रमांक 140 ते 146 च्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्याची योग्य ती नोंद घेऊन निश्चित कारवाई करण्यात येईल. या विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात अशी मी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करतो.

----------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावीत (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या मागण्यांवर चर्चा करताना सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वेळेवर दिले गेले नाहीत असा मुद्दा मांडला आहे. गणवेश वस्त्रोद्योग विभागाकडून पुरविलें जातात. त्या विभागाला निधी दिलेला असून सर्वसामान्यपणे ऑगस्ट महिन्यापूर्वी गणवेश दिले जातात. हे काम ताबडतोब होईल याची काळजी घेतली जाईल.

सभापती महोदय, आश्रमशाळांच्या दुरुस्तीबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, अरविंद सावंत, रामनाथ मोते यांनी मुद्दे मांडले आहेत. आश्रमशाळांच्या दुरुस्तीबाबत मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला आहे. पूर्वी नॉनप्लॅनमधून पैसा दिला जात होता. आता खास बाब म्हणून दुरुस्तीसाठी वेगळे हेड निर्माण केले असून त्या माध्यमातून निधी देण्यास सुरुवात केली आहे. मोठया प्रमाणात निधी देऊन कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहोत. शिक्षकांना जे वेतन दिले जाते ते तासिका बेसवर शिक्षण विभागाकडून निश्चित केलेल्या नॉर्म्सप्रमाणे दिले जाते. आदिवासी विकास विभागाने तुकड्याबाबत ठरविले आहे की, जोपर्यंत आदिवासी विकास विभाग आराखडा मंजूर करीत नाही तोपर्यंत अनुदान देणार नाही. जलस्वराज्य प्रकल्पांचे काम सुरु केले जाते ते त्यांच्या निधीमधून केले जाते. ती रक्कम रिकूप करु पहात आहेत, ती देऊ. सभागृहाने आदिवासी विकास विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात अशी मी विनंती करतो.

--------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत हंडोरे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या पुरवणी मागण्यांवर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापली मते व्यक्त केली आहेत. सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, हेमंत टकले, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान, श्रीमती उषा दराडे, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी चांगल्या सूचना केलेल्या आहेत. बाब क्रमांक 147 ते 150 व 152, 154 या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मंजुरी द्यावी अशी विनंती करतो.

--------

(नंतर श्री.भारवि.......

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतिश चतुर्वेदी (रोजगार व स्वयंरोजगार मंत्री) : सभापती महोदय, वस्त्रोद्योग व स्वयंरोजगार विभागावर हँडलूम वर्कर्सच्या मागण्या पूर्ण करण्याच्या राहून गेल्या आहेत अशी सूचना सन्माननीय सदस्यांनी केली आहे. या सूचनेचा शासन जरूर विचार करील व हँडलूम वर्कर्सना पैसे देण्यासंबंधी शासन जरूर प्रयत्न करील. येथे वस्त्रोद्योग, माजी सैनिकांचे कल्याण व रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या ज्या मागण्या सादर करण्यात आल्या आहेत, त्या मंजूर कराव्यात अशी मी विनंती करीत आहे.

.......

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**हरकतीच्या मुद्यासंबंधी.**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहामध्ये आता जे कामकाज चालले आहे, त्यासंबंधीच माझा हरकतीचा मुद्दा आहे. कामकाज संपविण्यासाठी शासनाची धांदल उडाली आहे. त्यामुळे पुरवणी मागण्यांवरील चर्चा सभागृहामध्ये बंद करून टाकावी. पुरवणी मागण्यांवरील चर्चा उरकण्याची घाई मंत्रिमहोदयांना झाली आहे. आता आपण बघितल ना जुलाब लागल्यासारखे तू-तू करत मंत्रिमहोदय भाषण करीत होते. हे काय चालले आहे ? सभागृहामध्ये सदस्य अभ्यास करून येत असतात आणि पुरवणी मागण्यांवर बोलतात. यावेळी सदस्य आपल्या भाषणातून काही प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधतात. पण त्याकडे उत्तर देण्याचे बाजूला राहते. सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांची दखल देखील घेतली जात नाही. माननीय मंत्री महोदय आपल्या भाषणात फक्त सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी विचार व्यक्त केले आहेत, अशा प्रकारचा उल्लेख करत धन्यवाद देतात आणि माझ्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करतात. मग मंत्रिमहोदय येथे भाषण तरी कशाला करतात. या प्रकारामुळेच मी पुरवणी मागण्यांवर बोलण्याचे बंद केले आहे. पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून सन्माननीय सदस्य आपले प्रश्न मांडत असतात. यासाठी बंधन आहे. बाब क्रमांकचा उल्लेख करून त्यावरच बोलावयाचे असते. इकडतेच तिकडचे बोलायचे नसते. दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य ज्यावेळी पुरवणी मागण्यांच्याद्वारे आपल्या भाषणातून प्रश्न विचारत असतात पण त्याचे उत्तर मंत्रिमहोदय देणार नसतील, आपले भाषण गुंडाळून जाणार असतील तर सदर चर्चा बंद करावी. या सदनाला पावित्र्य आहे की नाही. सदनामध्ये आता छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान झाला. तो आपण कसा काय सहन करू शकतो. छत्रपती शिवाजी महाराजांची उंची कशावर आहे ? लिबर्टी पुतळ्या पेक्षा 150 फूट अधिक उंच आहे असे मंत्रिमहोदय येथे सांगत होते, त्यावेळी मी सभागृहात उपस्थित नव्हतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्त्वाची उंची लिबर्टी पुतळ्याच्या उंचीवर आहे. हा छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान आहे. त्यांच्या कर्तृत्त्वाची तुलना अमेरिकेच्या लिबर्टी पुतळ्याशी करीत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

हे कशासाठी ? यामध्ये आपण कोणते कर्तृत्त्व दाखवत आहात. यासंबंधी प्रश्न आलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक आपण बीओटीवर बांधणार आहात. यात महाराष्ट्र शासन काहीच करणार नाही. बांधा वापरा आणि हस्तांतरित करा. छत्रपतींना या सदनामध्ये छत्रपतींना बांधा, वापरा आणि हस्तांतरित करायला निघालेले सरकार किती फुशारक्या मारीत आहेत. महाराष्ट्रामध्ये सगळीकडे बोर्ड लागले होते. मी सगळे ऐकले असलामुळे येथे धावत आलो. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या पुरवणी मागण्यांवरील भाषणांवर पूर्णपणे उत्तर मिळणार नसेल तर ही चर्चा अशीच चालू ठेवावी. अशी चर्चा शासनाने मांडावी त्यावर आम्ही बोलणार नाही. ती चर्चा शासनाने मंजूर करून घ्यावी. असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

(दोन्ही बाजूकडील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती** : छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर उभारण्यात येणार आहे, हे बरोबर नाही. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करायचा होता असे मला कुठेही आढळले नाही. त्यामुळे मला असे वाटते की, आपण नाहक वाद घालू नये. त्यांनी भावना व्यक्त केल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल त्यांनी जे काही अभिप्रेत आहे, ते बोलले आहेत. त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करायचा होता असे कुठेही मला आढळले नाही, असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. तसा उल्लेख देखील त्यांनी केलेला नाही. त्यामुळे येथे काहीही वगळण्याचा प्रश्न येत नाही. मी आता सभागृहाच्या कामकाजाची वेळ 12 वाजून 25 मिनिटांपर्यंत वाढवित आहे. तो पर्यंत पुरवणी मागण्यांवरील उत्तर मंत्रिमहोदयांनी सुरू करावे. कुठल्याही सन्माननीय सदस्यांना काही प्रश्न विचारावयाचे असतील तर ते विचारू शकतात. ज्या मंत्रिमहोदयांची भाषणे झाली आहेत, त्यांच्याबद्दल मी बोलत नाही. ज्यांची भाषणे राहिली आहेत, त्याबद्दल मी बोललो आहे.

श्री राणा जगजितसिंह पाटील (कृषि,जलसंधारण व खार जमीन राज्यमंत्री) : सभापती महोदय, कृषि, रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये ज्या सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्या आहेत, त्यांच्या प्रती मी मनापासून आभार व्यक्त करीत आहे.

यानंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील.....

रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.राजन् तेली यांनी पुरवणी मागण्यांच्या अनुषंगाने विभागाने जी दोन कोटीची तरतूद करण्यात आली ती अत्यल्प असल्याचा उल्लेख केला तसेच ही तरतूद सामाजिक न्याय विभागासाठी देखील करावी आणि त्या माध्यमातून राज्यातील अनुसूचित जातीसाठी देखील ती करण्यात आली असून ही योजना लवकरच आपण त्यांच्यासाठी नेत आहोत आणि त्यासाठी काही तरी तरतूद करण्यात येईल. त्यानंतर बेरोजगार युवक-युवतींसाठी शाश्वत रोजगार योजना शासनाने प्रस्तावित केली असून राज्यातील 3.50 लाख युवक व युवतींना शाश्वत रोजगाराची संधी उपलब्ध करण्यासाठी ही योजना आहे. त्या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की, राज्यातील प्रत्येक जिल्हयातून 10 हजार नोंदणीकृत युवक-युवतींना प्रशिक्षण देणे, त्यांची ॲप्टिटयुट टेस्ट घेऊन त्यांना व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देण्याची ही योजना आहे. त्यानंतर त्यांना शाश्वत रोजगार उपलब्ध करण्यासाठी आपण ही योजना हाती घेतली असून त्याचा लाभ आपल्या भागातील बेरोजगारयुवक-युवतींना मोठया प्रमाणात मिळणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी पर्यटनाच्या बाबतीत उल्लेख केला असून या योजनेच्या अंतर्गत वेगवेगळे छोटे कोर्सेस हाती घ्यावयाचे आहेत.

पदवीधर अंशकालीन उमेदवारांच्या बाबतीत सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी उल्लेख केला त्या अनुषंगाने मला सांगावयाचेआहे की, असे जे उमेदवार आहेत, त्यांना काही सवलती जाहीर केल्या आहेत. त्यात त्यांना वयात 45 वर्षापर्यंत सवलत देण्याचे ठरविले असून, स्पर्धा परीक्षेत 5 टक्के गुण जास्त दिले जातील, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांकडे जी लिस्ट दिली जाते त्यात 50 टक्के नावे या पदवीधर अंशकालीन उमेदवारांची पाठवावी अशा प्रकारे या उमेदवारांना प्राधान्य देण्याचे प्रयत्न आपण करीत आहोत.

कृषी विभागाच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी वेगवेगळे मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यात सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया यांनी कृषी विभागामार्फत देण्यात येणाऱ्या पुरस्काराच्या संदर्भात आपला मुद्दा येथे मांडलेला आहे. त्यासंदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, "डॉ.पंजाबराव देशमुख कृषी रत्न पुरस्कार" या पुरस्काराची रोख रक्कम 75 हजार रुपये, स्मृति चिन्ह व सपत्नीक सत्कार, कै. वसंतराव नाईक यांच्या नावाने हा पुरस्कार आपण

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील.....

देतो. त्यात सुध्दा रोख रक्कम, स्मृतिचिन्ह आणि सत्कार करण्यात येतो. जिजामाता पुरस्कारामध्ये 50 हजार रुपये रोख, "कै.वसंतराव नाईक शेती मित्र" उपाधि या पुरस्कारात आपण 30 हजार रुपये रोख देतो. त्यानंतर "वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार" यात 11 हजार रुपये रोख, या पुरस्कारांची रक्कम अदा करण्यासाठी तरतूद केली आहे. तसेच सन 2005-06 या वर्षात प्रदान केलेल्या सुवर्ण पदकांमध्ये सोन्याचे प्रमाण कमी होते, त्या अनुषंगाने आता ही रक्कम रोख स्वरुपात देण्याचे शासनाने ठरविले आहे.

श्री. अरविंद सावंत : माझी अशी मागणी आहे की, राज्यातील सर्व बेरोजगारांना आपली नावे रिजनल एम्प्लॉयमेंट एक्सचेंजमध्ये नोंदणे सक्तीचे केले तरच या योजनेतून भूमी पुत्रांना न्याय मिळेल.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : याबाबत जे नियम अस्तित्वात आहेत त्यानुसार गांभीर्याने कार्यवाही केली जाईल, तसेच यासंदर्भात पुन्हा एकदा माननीय मंत्री महोदयांबरोबर बसून चर्चा करण्यात येईल.

त्यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदचे जे नियम आहेत त्यांच्या अनुषंगाने कार्यवाही करावी, तसेच या सूचनेचा फेरविचार करुन योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जजगजितसिंह पाटील ...

सेंद्रीय खतांच्या बाबतीत विद्यापीठात नवीन विभाग सुरु करण्याच्या संदर्भात निर्णय झालेला आहे त्यामुळे यासंदर्भातील कार्यवाही सुरु होणार आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या नावाने अगोदर जे पुरस्कार देण्यात येत होते ते गेल्या चार वर्षापासून बंद आहेत. ही बाब मागच्या अधिवेशनात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सुध्दा मान्य केली होती. चांगले काम करणा-या महिलांना पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या नावाने पुरस्कार दिले जात होते, ते गेल्या चार वर्षापासून दिले जात नाहीत. यासंदर्भात शासनाने अर्ज देखील मागवलेले आहेत परंतु या अर्जावर अद्यापपर्यंत निर्णय घेतले गेले नाहीत. पुरस्कार मिळेल म्हणून महिला चार वर्षापासून वाट पहात आहेत. पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या नावाने पुरस्कार द्यावयाचे नसतील तर शासनाने तसे जाहीर करावे व मागविलेले अर्ज पुन्हा परत करुन टाकावेत.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी कृषी विभागातर्फे दिल्या जाणा-या जिजामाता कृषी भूषण पुरस्काराचा उल्लेख केलेला आहे. हे पुरस्कार महिलांना दिले जातात.

...2.........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे (सामाजिक न्याय मंत्री): सभापती महोदय, मी माझ्या विभागाच्या मागण्या मांडल्या होत्या परंतु सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भात अशी विचारणा केली आहे की, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन प्रत्येक जिल्हयात बांधण्याचे काम सुरु झाले आहे, त्यामध्ये महिला बचत गटांना जागा उपलब्ध करुन दिली जाईल काय ?" यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, प्रत्येक जिल्हयातील डॉ. आंबेडकर भवनात महिला बचत गटांना सामावून घेतले जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी अलिबाग येथील सागाव वस्तीचे पुनर्वसन करावे, अशी मागणी केलेली आहे. या विभागाने पुनर्वसनाच्या तरतुदीसाठीचा विषय सभागृहात आणलेला आहे. त्यामुळे अलिबाग येथील वस्तीचे सर्वेक्षण करुन पुनर्वसन करण्याचे काम करु.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी स्वच्छता आणि दुरुस्तीच्या संदर्भात प्रश्न विचारला आहे. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, मोठया प्रमाणात नवीन होस्टेल बांधण्याच्या कामाला शासनाने सुरुवात केलेली आहे. होस्टेलची व्यवस्था चांगली असावी यासाठी आम्ही अनुदानित होस्टेलच्या संस्था चालकांना सूचना केलेल्या आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी सांगितले आहे की, "होस्टेलमध्ये मुस्लीम विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नाही." मी सभागृहाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या घटकांसाठी होस्टेलची व्यवस्था केली जाते. त्यामध्ये 20 टक्के इतर प्रवर्गातील विद्यार्थी सामावून घेण्याची प्रोव्हिजन आहे. त्यामुळे या होस्टेलमध्ये मुस्लीम विद्यार्थ्यांना निश्चितपणे प्रवेश मिळण्याच्या संदर्भात प्रयत्न केला जाईल. तसेच दलित मित्र पुरस्कारा संदर्भात देखील सन्माननीय सदस्यांनी सूचना केली आहे. दलित मित्र पुरस्कार लवकरात लवकर देण्याच्या संदर्भात आम्ही अर्ज मागविले आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी सातारा येथील डॉ. बाबसाहेब आंबेडकर स्मारक लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी सूचना केली आहे. सातारा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारण्याच्या संदर्भात शासनातर्फे पाठपुरावा करण्यात येत आहे.

...3.....

श्री.चंद्रकांत हंडोरे.........

सभापती महोदय, मी माझ्या विभागाच्या मागण्या अगोदरच मांडल्या होत्या. तथापि, सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांना खुलासेवार उत्तर देण्याचा मी आता प्रयत्न केला आहे.

------------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....4..........

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण विभागाच्या बाब क्रमांक 150 व 153 या मागण्या या ठिकाणी मांडलेल्या आहेत. या मागण्यांवर बोलतांना सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी बीड जिल्ह्यात ऊस कामगारांच्या दोन प्राथमिक शाळा आहेत त्यांना श्रेणीवाढ करुन माध्यमिक शाळा चालविण्याच्या संदर्भात परवानगी देण्याची मागणी केलेली आहे. परंतु या दोन प्राथमिक शाळांना श्रेणीवाढ करुन माध्यमिक शाळा चालविण्याच्या संदर्भातील प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे. या शाळेच्या प्रश्नासंदर्भात जरुर लक्ष घालून शासन योग्य ती कार्यवाही करेल. त्यामुळे विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण विभागाच्या 57,49,10,000/- रुपयांच्या मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

----------

....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे ( सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, आरोग्य विभागाच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी विचार मांडलेले आहेत. आरोग्य विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी दोन-तीन मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यांनी एमआरएचएम, नर्सींग ट्रेनिंग, तसेच इक्विपमेंटच्या संदर्भात माहिती मागितलेली आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, आयपीएचएसच्या स्टँडर्ड प्रमाणे आपण यावर्षी कार्यक्रम राबवित आहोत. त्यामुळे जिल्हा रुग्णालये, महिला रुग्णालये अशी जवळपास 171 रुग्णालयांना आपण अपग्रेड करणार आहोत. यामध्ये 450 पीएचसी आणि 5550 सब सेंटर्सना अपग्रेड केले जाणार आहे.

यानंतर श्री. गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 12.05

श्री.रणजित कांबळे ..

त्याचबरोबर या कामासाठी केन्द्र सरकारने राज्य शासनाला जवळजवळ 75 कोटी रुपये दिलेले आहेत. राज्यातील 48 सब डिस्ट्रिक्ट हॉस्पिटल्स तसेच रुरल हॉस्पिटल्समधून ब्लड स्टोअरेज सेन्टर्स उपलब्ध करुन द्यावयाचे आहेत. तसे पाहिले तर आय.पी.एच.एस. मधून वेगवेगळया कन्स्ट्रक्शनची कामे आपण करु शकतो. त्यानुसार सिव्हील वर्कस घेऊ शकतो त्याचप्रमाणे कॉन्ट्रॅक्टचुअल सर्व्हिसेस घेऊ शकतो. त्यामध्ये ब्लड बॅन्क, लॅबरोटरीचे मॉर्डनायझेशन ,डेन्टल सर्व्हिसेस यांचासुध्दा समावेश करण्यात आलेला आहे.या वर्षी 48 ठिकाणी या सर्व सर्व्हिसेस आपण प्रोव्हाईड करणार आहोत. त्या व्यतिरिक्त या वर्षी जवळपास 3598 ए.एन.एम.ची भरती केलेली आहे. त्यामुळे सब सेन्टरमध्ये एक ॲडिशनल ए.एन.एम.देण्यात येणार आहे. त्याचबरोबर ज्या ठिकाणी 24 तास पी.एच.सी आहेत. त्या ठिकाणी 525 स्टाफ नर्सेस राहणार आहेत. त्याचप्रमाणे 1003 लेडी हेल्थ व्हिजीटर्स पी.एच.सी.मध्ये राहणार आहेत. अशा प्रकारे या कर्मचा-यांची नेमणूक करण्यात आलेली असून एन.आर.एच.एम.च्या माध्यमातून हा खर्च करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे या कर्मचा-यांच्या पगारांसबंधी मी खुलासा करतो की, आदिवासी आणि नक्षलग्रस्त भागात काम करणा-या कर्मचा-यांसाठी इतर भागात काम करणा-या कर्मचा-यापेक्षा दुप्पट पगार देण्यात येत आहे. बिगर आदिवासी भागात जर एक हजार रुपये पगार देण्यात येत असेल तर आदिवासी भागात काम करणा-याला दोन हजार रुपये आणि नक्षलग्रस्त भागात काम करणा-या कर्मचा-यांला 2 हजार 500 रुपये पगार देण्यात येत असून त्याकरिता एन.आर.एच.एम.च्या माध्यमातून आपण खर्च करीत आहोत. त्याचप्रमाणे नवीन कन्स्ट्रक्शनची कामे आणि रिपेअर्सची कामे देखील आपण एन.आर.एच.एम.च्या माध्यमातून करीत आहोत. मागच्या वर्षी फक्त रिपेअर्सच्या कामासाठी दहा कोटी रुपयाची तरतूद केली होती आणि त्यानुसार शासनाने खर्च केला आहे. या वर्षी या कामसाठी जवळपास 65 कोटी रुपयांची तरतूद केलेली असून त्यापैकी 70 टक्के खर्च नवीन बांधकामासाठी करण्यात येणार आहे आणि 30 टक्के खर्च दुरुस्तीच्या कामासाठी करण्यात येणार आहे.

सभापती महोदय, त्या व्यतिरिक्त "आशा"मधील 9 हजार पदे मंजूर करण्यात आली असून त्यापैकी 7 हजार 813 व्यक्तींची नेमणूक करण्यात आली आहे.केन्द्र सरकारने जे नॉर्म्स ठरवून दिलेले आहे त्या नॉम्सप्रमाणे या कर्मचा-यांना ट्रेनिंगसुध्दा देण्यात आलेले आहे त्याचबरोबर या कर्मचा-यांना मेडिकल कीटस् देण्यात आलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी असा

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे ..

प्रश्न विचारला होता की, ए.एन.एम.ना ट्रेनिंग देण्याचा कार्यक्रम कशा पध्दतीने सुरु आहे ? याबाबतीत मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की,ए.एन.एम.ना ट्रेनिग देण्यासाठी आपला ऑन गोईग प्रोग्राम आहे. परंतु या वर्षी मोठया प्रमाणावर भरती करण्यात आल्यामुळे इनटेक वाढलेले आहे. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी ट्रेनिग सेन्टर्स आहेत त्या त्या ठिकाणच्या ट्रेनिग सेन्टर्सची इनटेक कॅपेसिटी दुप्पट केलेली आहे. त्यासाठी जो काही खर्च येणार आहे तो एन.आर.एच.एम.च्या माध्यामतून करण्यात येणार आहे. आपल्या राज्यात शासनाचे 23 ट्रेनिग सेन्टर्स असून त्या ठिकाणी ट्रेनिंगचा कार्यक्रम सुरु आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सब सेन्टर्समधील इक्युपमेन्टस्च्या बाबतीत एक प्रश्न विचारला असून त्याबाबतीत मी खुलासा करतो की सब सेन्टर्समध्ये डिलेव्हरी टेबल्स तसेच चेकअपचे कीटस् त्याचबरोबर पी.एच.सी.मध्ये टयुबॅक्टोमी, व्हायसोक्टीम कीटस,एम.टी.पी. सेटस्, लॅब इक्युपमेन्टस, सक्शन मशिन्स आणि डिलेव्हरी टेबल द्यावयाचे आहेत. सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, सब सेन्टर्स आणि पी.एच.सी.मध्ये कोण कोणते इक्युपमेन्टस ठेवावयास पाहिजेत या बाबतीत केन्द्र सरकारने एक बेसिक गाईड लाईन ठरवून दिलेली आहे.ज्या ठिकाणी गॅपस् किंवा लॅक्युना आहे तो दूर करण्याच्या संदर्भात आदेश देण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर एन.आर.एच.एम. मधून यासाठी जो काही खर्च करावयाचा आहे तो करण्यासाठी संपूर्ण अधिकार डिस्ट्रीक्ट सोसायटयांना देण्यात आला असून हे काम त्यांच्याकडून केले जाते. किंवा पी.एच.सी. ना जो काही फंडस देण्यात आलेला आहे त्या फडातून त्यांनी हा खर्च करावयाचा आहे. काही पी.एच.सी.मध्ये काही इक्युपमेन्टस आहेत तर काही पी.एच.सी.मध्ये ते नाहीत. तेव्हा इक्युपमेन्टच्या संदर्भात जो काही गॅप आहे तो दूर करण्याचे काम सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी असा मुद्दा उपस्थित केला होता की, केन्द्र सरकारकडून जो पैसा आला होता तो अखर्चित राहिला होता. त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की , 2005-2006 साली केन्द्र सरकारकडून 240 कोटी रुपये आले होते त्यापैकी 195 कोटी रुपये खर्च करण्यात आले असून हा खर्च 81 टक्के झाला होता , त्याचबरोबर 2006-2007 साली केन्द्र सरकारकडून 324 कोटी रुपये आले होते त्यापैकी 320 कोटी रुपये खर्च करण्यात आले होते हा खर्च 98 टक्के झाला होता.2007-2008 मध्ये 668 कोटी रुपये केन्द्र सरकारकडून आले होते त्यापैकी 483 कोटी रुपये

3..



VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 12.05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे ..

खर्च करण्यात आला असून  हा खर्च 72 टक्के झाला होता.123 कोटी रुपये फेब्रुवारी महिन्यात आले होते त्यामुळे हे पैसे अखर्चित राहिले होते. परंतु एक गोष्ट मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हे पैसे लॅप्स होत नाहीत ते पैसे पुढच्या वर्षी कॅरी फॉरवर्ड केले जातात. त्याच प्रमाणे सोसायटीच्या अकाऊन्टमध्ये ते डायरेक्टली जमा होता असतात. सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया यांनी इनव्हर्टर्ससंबंधी एक प्रश्न उपस्थित केला होता. त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, त्यांच्या जिल्हयात एकूण् 5 रुरल हॉस्पिटल्स असून त्यापैकी 3 ठिकाणी इनव्हर्टर्स उपलब्ध आणि दोन ठिकाणी जनरेटर्स उपलब्ध आहेत. सन्माननीय सदस्यांनी असे विचारले आहे की, त्या ठिकाणी जर शक्य असेल तर एक्सप्रेस फिडर्स उपलब्ध करुन देऊ शकतो किंवा नाही ? मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की,

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ श्री. गायकवाड नंतर --- 12:10

श्री. रणजित कांबळे .....

याबाबतीत मागणी होती पण ती नाकारली गेली. आता आम्ही अशी तरतूद केली की, जितके शक्य आहे, यासाठी की, एक एक एक्स्प्रेस फीडरचा खर्च हा जवळपास 25 लाख रूपये पर्यंत आहे. तेव्हा आपण इन्व्हर्टर्स देत आहोत पण लोड शेडींगमुळे ते रिचार्ज होऊ शकत नाहीत अशी परिस्थिती आहे. आणि जनरेटरचा खर्च देखील फार महाग पडतो आहे. त्यामुळे एक्स्प्रेस फीडर्स साठी आपल्या पीएलएममध्ये जितका खर्च आपण करू शकतो तो मान्य केला जातो आणि उर्वरित पैसे आपण एनआरएचएमच्या माध्यमातून आपण करू शकतो. जेव्हा ज्या ग्रामीण रूग्णालयात किंवा स्थानिक लोकप्रतिनिधीला वाटले की, त्यांच्या भागामध्ये एक्स्प्रेस फीडर अत्यंत गरजेचे आहे तर ते त्याबाबत निर्णय घेऊ शकतात. कारण हा निर्णय स्थानिक स्तरावर घेतला जाऊ शकतो.

त्या नंतर सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी 2-3 प्रश्न उपस्थित केले आहेत. पालन येथील ग्रामीण रूग्णालय आहे त्यांचे प्लॅन्स आणि एस्टिमेट मंजूर आहे पण अजून काम चालू झालेले नाही असा एक मुद्दा त्यांनी मांडला होता. मी त्यांना सांगू इच्छितो की, यासाठीचे पैसे लॅप्स होणार नाहीत मात्र त्याची प्लॅन्स-एस्टिमेट ॲप्रूव झाले की लवकरात लवकर आम्ही त्याचे काम सुरू करू. त्यांचा दुसरा मुद्दा डायलेसिस युनिट परभणी हॉस्पिटलमध्ये आवश्यक असल्याबाबतचा होता. मी त्यांना सांगू इच्छितो की, कोणत्याही आपल्या जिल्हा हॉस्पिटलमध्ये डायलेसिस युनिट सध्या तरी उपलब्ध नाही. केव्हा आपल्या विभागातील औरंगाबाद मेडिकल कॉलेजमध्येच ते उपलब्ध आहे. तसेच कॅन्सर हॉस्पिटलसंबंधात देखील त्यांनी मुद्दा उपस्थित केला होता त्याबाबत मी सांगेन की, औरंगाबाद मध्ये सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा एक प्रस्ताव आहे आणि मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत हे हॉस्पिटल घेतले जात आहे. मी आपल्याला नम्रपणे सांगू इच्छितो की, केवळ आपाल्या परभणीचाच हा प्रश्न नाही तर पूर्ण राज्यामध्येच वर्ग 1 ची पदे रिक्त आहेत. स्पेशालिटी सर्विसेस आपल्याला भेटतील पण त्यासाठी आपण कंत्राटी पद्धतीने ही पदे भरू शकतो त्यासाठी तरतूद देखील आपण केलेली आहे. सुपर स्पेशालिटीचे जे डॉक्टर्स आहेत ते सारे आपल्याकडे ग्रूप बी चे आहेत. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी एक प्रश्न उपस्थित असा केला की, 22 क्वार्टर्स रूरल हॉस्पिटल्स मध्ये असायला पाहिजेत, परंतु सध्या केवळ 7 आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, आमचा या संबंधातील प्रस्ताव हा 22 क्वार्टर्सचाच होता, पण वित्त विभागाने तो कमी करून 7 पर्यंत आणलेले आहे. तरीही त्याबाबत

...... डीडी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे .....

त्यांच्याकडे आमचा पाठपुरावा सतत चालू आहे. आम्ही त्यांना सांगत आहोत की, 7 मध्ये आमचे भागणार नाही, आम्हाला तेथे 22 क्वार्टर्स आवश्यक आहेत. कारण रूरल हॉस्पिटल्स ही ग्रामीण भागात असतात आणि तेथे डॉक्टर्स व अन्य स्टाफ हा तेथे राहणे अत्यंत आवश्यक असते. तसेच सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी डहाणू व जव्हार मध्ये ॲम्ब्युलन्स नाहीत असा मुद्दा उपस्थित केला. पण मी त्यांना सांगू इच्छितो की, डहाणू व जव्हारमध्ये ॲम्ब्युलन्स आहेत पण त्याशिवाय सध्या प्रत्येक आरएच आणि प्रत्येक पीएचसीमध्ये यासाठी आपल्या स्थायी सूचना आहेत. जेथे ॲम्ब्युलन्स असूनही त्या नादुरूस्त असतील त्यांच्या दुरूस्तीसाठी देखील तसेच जेथे अगदीच नाही तेथे भाड्याने देखील ॲम्ब्युलन्स घेण्यासाठी पैशाची तरतूद आपण केलेली आहे.

सभापती महोदय, शेवटचा एकच मुद्दा मला सांगावयाचा आहे. एनआरएचए चे फार मोठे काम आहे. त्याच्यासाठी आम्ही दक्षता समितीसंबंधात जीआर काढलेला आहे. त्यानुसार प्रत्येक तालुक्यातील आमदार हे त्या समितीचे अध्यक्ष आहेत आणि सगळे आमदार हे जिल्हा दक्षता समितीचे सदस्य असतील. त्यामुळे आपण आताही येथे जे स्थानिक स्तरावरील जे प्रश्न येथे उपस्थित केले त्याबाबत तेथेच, स्थानिक स्तरावरच निर्णय घेतला जाऊ शकतो. तेव्हा माझी विनंती राहील की, आपण आपल्याकडील दक्षता समिती लवकरात लवकर गठित करून त्याची बैठक घ्यावी असे झाले तर आपले बहुतांश प्रश्न सुटणार आहेत. तरी सभापती महोदय, आरोग्य विभागाच्या पुरवणी मागण्या आपण मंजूर कराव्यात अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**उपसभापती** : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी एक प्रश्न उपस्थित केला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने जो पुरस्कार दिला जात होता तो गेली चार वर्षे दिला गेलेला नाही. त्या संबंधात कोणताही खुलासा संबंधित विभागाकडून येथे झ ाालेला नाही. तेव्हा तो खुलासा संबंधित विभागाच्या मंत्र्यांनी या पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने अवश्य करावा एवढीच माझी शासनाला सूचना आहे.

( यानंतर श्री. सरफरे .... इइ 1 ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते (वने मंत्री) : सभापती महोदय, वन विभागाच्या बाब क्र. 41, 42 आणि 43 या तीन मागण्यांवर माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील, राजन तेली, भास्कर जाधव आणि माननीय सदस्या सर्वश्रीमती नीलमताई गोऱ्हे व उषाताई दराडे यांनी आपली मते मांडली. त्याची नोंद घेण्यात आलेली आहे. माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी वाघाच्या केल्या जाणाऱ्या शिकारीसंबंधी मुद्दा उपस्थित केला. त्याकरिता केंद्र शासनाचे एक बोर्ड स्थापन झाले असून त्यांच्यामार्फत मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध होणार आहे. त्या मंडळांतर्गत सहयाद्री व्याघ्र प्रकल्पाला प्राथमिक स्वरुपात मंजूरी मिळाली आहे. हा प्रकल्प सुरु झाल्यानंतर वाघाच्या शिकारीवर प्रतिबंध आणणे आणि वाघाचे संगोपन करणे या कामाकरिता आपल्याला जास्त निधी मिळेल. तसेच, माननीय सदस्यांनी वाघाची शिकार करणाऱ्याविरुध्द कारवाई करण्यासंबंधी प्रश्न विचारला होता. त्याबाबत चौकशी सुरु असून योग्य ती कारवाई होईल. त्याकरिता देश पातळीवर एक बोर्ड तयार झाले असून त्या बोर्डामार्फत या प्रकरणाची चौकशी आणि शोध या दोन्ही गोष्टी केल्या जातील.

सभापती महोदय, अभयारण्यामध्ये अतिक्रमण केलेल्या कुटुंबांना बाहेर काढून त्यांचे पुनर्वसन करण्याकरिता एका कुटुंबासाठी 1 लाख रुपयांची तरतूद होती, त्याठिकाणी आपण 10 लाख रुपये देण्याची तरतूद केली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील ज्या ज्याठिकाणी व्याघ्र प्रकल्प असतील, ताडोबा, अंधारी, पेंच, मेळघाट आणि सहयाद्री व्याघ्र प्रकल्प अशा चारही व्याघ्र प्रकल्पाकरिता मोठया प्रमाणावर पैसे मिळतील. आणि त्या पैश्यामधून सर्वांचे पुनर्वसन होईल. सभापती महोदय, माननीय सदस्यांनी कर्नाळा येथील रस्त्यासंबंधी सूचना केली आहे, त्याबाबत जरुर विचार केला जाईल. माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी सिंधुदुर्ग जिल्हयातील हत्तीच्या अतिक्रमणासंबंधी मुद्दा मांडला. त्यासंबंधी विधानसभेत अनेक वेळा चर्चा झालेली आहे. हत्तीला पुन्हा जंगलामध्ये परत पाठविणे, हत्तीपासून बाधित झालेल्या शेतकऱ्यांचे पुनर्वसन करणे किंवा हत्तीच्या अतिक्रमणामुळे ज्या शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाले आहे त्यांना योग्य तो मोबदला देण्यासंबंधी अनेक वेळा चर्चा झालेली आहे. यासंबंधी माननीय सदस्यांच्या आणखी काही सूचना असतील तर त्या जरुर विचारात घेतल्या जातील.

त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. भास्करराव जाधव यांनी कोकणातील हरडा, बेहडा, बिब्बा इत्यादी वनस्पतींच्या संवर्धनासंबंधी मुद्दा मांडला आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की, शासनाने



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते.....

वनौषधी महामंडळ निर्माण केले असल्यामुळे सर्व वनौषधी त्या शेडयुल्डमध्ये आणल्यानंतर ज्या अडचणी येत आहेत त्या कमी होतील. त्यामुळे त्या परिसरातील लोकांनाही त्याचा फायदा होईल. माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी वन कामगारांच्या प्रश्नासंबंधी विचार मांडले. त्यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा झाली असून हे अधिवेशन संपल्यानंतर या विषयासंबंधी बैठक घेण्यात येणार आहे. या बैठकीमध्ये साधारणत: 5 वर्षे किंवा 5 वर्षापेक्षा जास्त काम केलेल्या किंवा तुटक कालावधीमध्ये काम केलेल्या कामगारांबाबत अंतिम निर्णय घेण्याच्या टप्प्यापर्यंत आपण आलो आहोत. मध्यंतरी तामिळनाडूमध्ये अशाच एका प्रकरणासंबंधी उच्च न्यायालयामध्ये निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे बॅक डोअर इंट्री करावयाची नाही याबाबत सुध्दा आपण मार्ग काढला असून वन कामगारांना व्यवस्थितपणे न्याय देऊ शकू इथपर्यंत आपण पोहोचलो आहोत.

माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी नायगाव येथील अभयारण्यास वनक्षेत्रातील पर्यटन या योजनेंतर्गत निधी देण्याबाबत सूचना केली आहे. ते एक चांगले स्थळ असून त्यासाठी निधी दिला जाईल. त्याचप्रमाणे वनतळयाबाबत आपण सूचना केली असून त्यासाठी सुध्दा पैसे दिले जातील. सर्व माननीय सदस्यांनी वन विभागाच्या पूरक मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेतल्याबद्दल सर्वांना धन्यवाद देऊन वन विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाची बाब क्र. 231 वरील 18 कोटी 22 लाख रुपयांची मागणी सभागृहाने मंजूर करावी अशी विनंती करतो. त्याचप्रमाणे बंदरे विभागाची बाब क्र. ओ 18 वरील पूरक मागणी सभागृहाने मंजूर करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती अशाप्रकारची बाब या मागण्यांमध्ये लिहिण्यात आली आहे. परंतु दुर्दैवाने या संपूर्ण पुरवणी मागण्यांमध्ये मी दोन-तीन वेळा चाळून पहात आहे की, ...

**उपसभापती** : माननीय सदस्यांनी बाब क्रमांक आणि पृष्ठ क्रमांक सांगावे....

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी बाब क्रमांक सांगावी...

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, या व्यसनमुक्तीकरिता या पुस्तकामध्ये बाब मांडण्यात आलेली नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. व्यसनमुक्तीचा विषयच याठिकाणी घेतलेला नाही.

**उपसभापती** : माननीय सदस्यांनी बाब क्रमांक आणि पृष्ठ क्रमांक सांगावा...

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, शासनाने व्यसनमुक्तीचा विषय या पुस्तकामध्ये टाकलेला नाही हे मी याठिकाणी सांगू इच्छित आहे. याठिकाणी बाब क्रमांक नाही, तरतूद नाही, मागणी नाही हे मी सांगत आहे?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, व्यसनमुक्ती हा विषय माझ्या विभागाकडे आहे. परंतु वित्त विभाग त्याकरिता निधी उपलब्ध करुन देत नाही. त्यामुळे ती बाब याठिकाणी आलेली नाही.

----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12 वाजून 30 मिनिटांनी पुन्हा सुरु होईल.

( सभागृहाची बैठक 12.20 ते 12.30 पर्यंत स्थगित झाली.)

----

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर )

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**औचित्याच्या मुद्यासंबंधी**

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. या सभागृहामध्ये आता प्रश्नोत्तराच्या तासाच्या निमित्ताने माननीय मुख्यमंत्री उपस्थित झालेले आहेत. मी या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. दोन दिवस माननीय मुख्यमंत्री ज्या कामाच्या निमित्ताने दिल्लीला गेले होते त्या कामामध्ये त्यांना यश आले आहे. या देशाच्या इतिहासात लोकसभेमध्ये विश्वासदर्शक ठराव मांडल्यानंतर यापूर्वीचे तीन विश्वासदर्शक ठराव अयशस्वी झाले परंतु यावेळी पहिल्याप्रथम हा विश्वासदर्शक ठराव यशस्वी झाल्यामुळे मी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग, श्रीमती सोनिया गांधी तसेच श्री. शरद पवार यांचे स्वागत करतो.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपण सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना बोलण्याची परवानगी दिली त्यामुळे मलाही बोलण्याची परवानगी द्यावी.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना बोलण्याची परवानगी दिलेली नाही. प्रश्नोत्तराच्या तासाच्या अगोदर सभागृहाचे कामकाज सुरु नव्हते. आता सन्माननीय सदस्यांना काही बोलावयाचे असेल तर बोलावे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपण न्याय दिला असेल तर आम्ही खाली बसतो. आपण सन्माननीय सदस्यांचे वक्तव्य रेकॉर्डवरुन काढून टाकले काय ? आपण मला बोलण्याची परवानगी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो. परंतु सन्माननीय सदस्यांचे वक्तव्य आपण रेकॉर्डवरुन काढून टाकले असेल तर आपल्याला धन्यवाद देऊन मी खाली बसतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांचे वक्तव्य कामकाजातून काढून टाकण्याचा निर्णय मी दिलेला नाही. मी ते जरुर तपासून पाहीन.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची परवानगी द्यावी.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपापल्या जागेवर जाऊन बसावे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात तसेच सत्ताधारी पक्षाचे अनेक सदस्य घोषणा देतात )

**सभापती** : मी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना विनंती करतो. मी एवढाच निर्णय दिलेला आहे की, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी या ठिकाणी जे बोलले ते मी तपासून घेतो. ते तपासल्यानंतर कामकाजातून काढणे आवश्यक असेल तर मी ते नक्की काढीन.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात )

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना मी बोलण्याची परवानगी दिलेली नव्हती. त्यावेळी प्रश्नोत्तराचा तास सुरु झालेला नव्हता. अशा परिस्थितीमध्ये त्यांनी या ठिकाणी जे वक्तव्य केले ते कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

---

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/ श्री.बरवडनंतर 12:35

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**इयत्ता नववी व दहावीच्या अभ्यासात लैंगिक शिक्षणाचा समावेश करण्याबाबत**

**(१) * ४२०८४ डॉ. दिपक सावंत : दिनांक २४ एप्रिल, २००८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या एकोणतिसाव्या यादीतील प्रश्न क्रमांक ३७२३२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण अभ्यासात लैंगिक शिक्षणाचा समावेश करुन, सन २००८-२००९ या शैक्षणिक वर्षात नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना लैंगिक शिक्षण शिकविण्यात येणार आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लैंगिक शिक्षणाचा एक भाग म्हणून शासनाने माहे मे-जून २००८ मध्ये मुंबई,पुणे, नागपूरमध्ये चर्चा सत्रांचे आयोजन केले होते, हे खरे आहे काय,

(३) तसेच, मध्यंतरी शासनाने लैंगिक शिक्षणास स्थगिती दिली होती हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शाळांमधून लैंगिक शिक्षण देण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे काय ?

**श्री.हसन मुश्रीफ, प्रा.वसंत पुरके यांच्याकरिता** : (१) याबाबत शासनाने निर्णय घेतलेला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) नाही.

डॉ.दीपक सावंत : या प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "याबाबत शासनाने निर्णय घेतलेला नाही." गेल्या अधिवेशनामध्ये शिक्षणावरील चर्चा झाल्यावर माननीय शिक्षणमंत्र्यांनी विधान केले होते त्याचे प्रोसिडिंग माझ्याकडे आहे. ते मी आपल्या परवानगीने वाचून दाखवितो. त्यात असे म्हटले आहे की, "माझी शारीरिक डेफिशिएन्सी काय आहे, मला होणारे रोग कोणते आहेत, याचा साकल्याने विचार करता यावा म्हणून सुंदर, गुटगुटीत मुलांच्या मनावर वाईट परिणाम होणार नाहीत, त्यांच्या भावना खूप प्रक्षोभित करता येणार नाहीत म्हणून या वर्षापासून लैंगिक शिक्षण सुरु करणार आहोत, ही काळाची गरज आहे." तेच माननीय शिक्षण मंत्री आज म्हणतात की, याबाबत शासनाने निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे माझा पहिला प्रश्न असा आहे की, शासनाचे यासंबंधी नेमके धोरण काय आहे ? लैंगिक शिक्षण सुरु केले जाणार आहे काय, जर सुरु केले जाणार असेल तर कोणत्या माध्यमातून शिकविले जाणार आहे, त्याचे स्वरुप कसे असणार आहे, त्यामध्ये कोणते विषय असणार आहेत ? ही सर्व माहिती सभागृहाला जाणून घ्यावयाची आहे. त्यानंतर शासनाने निर्णय घ्यावा.

२...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42084...

श्री.हसन मुश्रीफ : इयत्ता नववी ते बारावी या इयत्तांसाठी अभ्यासक्रम तयार करीत असताना भाषेतर विषयाचे पाठयपुस्तक मंडळ यांना जी मुले वयामध्ये येतात त्यांची किशोर अवस्था ते प्रौढावस्था या वयोगटातील जीवनाशी निगडीत आवश्यक त्या विषयाचा समावेश करावा असे प्रथम शासनाने ठरविले होते. पण विधानसभेमध्ये फार मोठा गोंधळ झाला. सीबीएसई आणि आयसीएसई या मंडळांच्या इंग्रजी भाषेतील पाठ्यपुस्तकांमध्ये लैंगिक शिक्षणाबाबत विकृत उल्लेख आला होता. त्यावेळी शासनाने शिक्षण तज्ज्ञ, दोन्ही सभागृहांचे सदस्य, शिक्षक संघटना, पालक यांच्याबरोबर चर्चा करुनच निर्णय घेण्याचे ठरविले. सन्माननीय सदस्यांनी लैंगिक शिक्षण शिकविण्यात येणार आहे काय असा प्रश्न विचारला असल्यामुळे याबाबत शासनाने निर्णय घेतलेला नाही असे उत्तर दिलेले आहे. हे शिक्षण सुरु करणार होतो, परंतु सर्वांच्या भावना लक्षात घेऊन शासनाने या विषयाला स्थगिती दिलेली आहे. सर्वांशी चर्चा करुनच हा विषय पुन्हा चर्चेला आणावयाचे ठरलेले आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सन्माननीय मंत्रिमहोदयांनी दिनांक २२.४.२००८ रोजी सभागृहात दिलेले उत्तर वाचून दाखविले आहे. ते मी पुन्हा वाचत नाही. आता सांगण्यात आले आहे की, या विषयाला शासनाने स्थगिती दिलेली आहे. याबाबत सभागृहाला एक गोष्ट स्पष्ट करुन सांगावी की, लैंगिक शिक्षणाचे सिलॅबस कसे असणार आहे ? यासंबंधी सर्वांशी सल्लामसलत करुन नवीन पाऊल सरकार उचलणार आहे. केवळ एका शब्दामुळे त्याला विरोध करावा असे माझे म्हणणे नाही. पण यासंदर्भात शासनाची काय योजना आहे हे सर्वांसमोर ठेवून चर्चा करुनच निर्णय घेतला जाईल असे ठामपणे उत्तर मंत्रिमहोदय सभागृहाला देतील काय ?

श्री.हसन मुश्रीफ : मी मघाशीच सांगितले आहे की, यासंबंधी निर्णय घेण्यापूर्वी डॉक्टर्स, पालक, लोकप्रतिनिधी, शिक्षक संघटना, या सगळयांशी चर्चा करुन शासन निर्णय घेणार आहे. सिलॅबसबाबत मी सांगेन की, आरोग्य विभागाने स्कूल ॲडल्टस् ॲण्ड लाईफ स्किल्स, म्हणजेच सॅसेल्स नावाच्या संस्थेमार्फत इयत्ता नववी आणि बारावीसाठी स्वतंत्र पुस्तके तयार केली होती. यासंदर्भात केंद्र सरकारमध्येही चर्चा झाली होती. व्यंकय्या नायडू यांच्या अध्यक्षतेखाली समिती

३....



NTK/ SBT/ MMP/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नेमण्यात आली होती. त्या समितीनेही यासंबंधीची मते विचारात घेतली आहेत. त्यामुळे यासंबंधीची सर्व कार्यवाही थांबलेली असून सर्वांशी चर्चा करुन निर्णय घेण्याचे ठरले आहे.

नंतर श्री.शिगम

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.42084....

डॉ. नीलम गो-हे : शालेय अभ्यासक्रमात लैंगिक शिक्षणाचा समावेश करावयाचा की नाही यासंबंधी विधानसभेमध्ये आणि विधानपरिषदेमध्ये चर्चा झाली असताना माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, लैंगिक शिक्षण देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. गेल्या अधिवेशनामध्ये असा प्रकार झाला की, सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री प्रा.वसंत पुरके यांनी सभागृहामध्ये लैंगिक शिक्षण देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे सांगितल्यानंतरही त्यांनी लैंगिक शिक्षण देणार असे वृत्तवाहिन्यांना सांगितले. मला वाटते ते त्यांचे वैयक्तिक मत असावे अन्यथा त्याबाबतीत आम्हाला हक्कभंग आणता येईल. माझे म्हणणे एवढेच आहे की, शालेय अभ्यासात लैंगिग शिक्षणाचा अंतर्भाव करावयाचा नाही असा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतलेला असताना माननीय शालेय शिक्षण मंत्री वृत्त वाहिन्यांना चुकीची माहिती कशी काय देऊ शकतात ?

श्री. हसन मुश्रीफ : यासंदर्भात दिवसभर चर्चा झाली. त्यावेळी उत्तर देताना डॉक्टर, विचारवंत, शिक्षण तज्ज्ञ आणि लोकप्रतिनिधी यांच्या बरोबर व्यापक चर्चा झाल्या शिवाय लैंगिक शिक्षण हा विषय शालेय अभ्यासक्रमात आणला जाणार नाही असे सांगितले.

डॉ. दीपक सावंत : सीबीएसई आणि आयसीएसईच्या शाळांमधून विकृत स्वरुपाचे लैंगिक शिक्षण दिले जाते असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. तेव्हा सीबीएसई आणि आयसीएसईच्या शाळांमधून अशा प्रकारचे विकृत लैंगिक शिक्षण दिले जात असेल तर ते बंद करण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : आमच्या राज्यामध्ये अशा प्रकारचे शिक्षण शिकविले जाणार नाही असे केन्द्राला सांगून ते शिक्षण त्याच वेळी बंद करण्यात आलेले आहे.

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 44710**

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये सातत्याने या प्रश्नाचा उल्लेख होत असतो. हा संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेचा प्रश्न आहे. असे असताना सन्माननीय सदस्य गैरहजर राहाणे इष्ट नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी हे सातत्याने सभागृहामध्ये उपस्थित असतात. कदाचित काही अपरिहार्य कारणामुळे त्यांना सभागृहात उपस्थित राहाता आले नसावे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी हे कौटुंबिक कारणासाठी साता-याला गेले आहेत.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**जुहू, मुंबई येथील "गृह स्वप्न" सोसायटीने २८ हजार चौरस फूट एफ.एस.आय.खुल्या बाजारात विकल्याबाबत**

**(३) * ४२२३९ श्री. अनिल परब , डॉ. दिपक सावंत , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. चरणसिंग सप्रा , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुहू, मुंबई येथील "गृह स्वप्न" सोसायटीला २५० रुपये दराने मिळालेला २८ हजार चौरस फूट एफ.एस.आय.खुल्या बाजारात विकल्याप्रकरणी गृहनिर्माण विभागामार्फत सध्या चौकशी सुरु आहे काय तसेच २८ हजार चौरस फूट एफ.एस.आय. विकण्यास परवानगी मिळाल्याच्या मोबदल्यात "गृह स्वप्न" सोसायटीच्या विकासकाने सोसायटीला १ कोटी ९८ हाजार रुपये दिले आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गृहनिर्माण विभाग याप्रकरणी करीत असलेल्या चौकशीची सद्य:स्थिती काय आहे,
(३) सदर चौकशी पूर्ण झाली असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप चौकशी अपूर्ण असल्यास वा कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१), (२), (३) व (४) सदर प्रकरणाचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याबाबत म्हाडास कळविण्यात आले आहे.

ॲड. अनिल परब : एक महिन्यापूर्वी हा प्रश्न विचारलेला असताना अद्याप वस्तुस्थितीदर्शक अहवाल प्राप्त झालेला नाही. प्रश्न असा आहे की, नियमानुसार 1.2 एफएसआय आणि 0.8 टीडीआर द्यावयास पाहिजे. असे असताना या सोसायटीला कोणत्या खास कारणास्तव अतिरिक्त एफएसआय देण्यात आला ? हे प्रकरण नगरविकास खात्याकडे मंजुरीसाठी गेले होते काय आणि नगर विकास खात्याने त्यास मंजुरी दिली होती काय ?

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : या प्रकरणी म्हाडाला पत्र देऊन त्यांच्याकडून अहवाल मागविलेला आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबतीत कारवाई करता येईल. नगरविकास विभागाने नियमाप्रमाणे हा वाढीव एफएसआय दिलेला आहे.

ॲड. अनिल परब : कोणत्या खास कारणासाठी या सोसायटीला अतिरिक्त एफएसआय देण्यात आलेला आहे ?

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.42239....

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : एफएसआय जाहीर झाला त्यावेळी तो कोणाकडूनही विकत घेतला जात नव्हता. परंतु या सोसायटीने मागणी केल्यानंतर नियमाप्रमाणे त्यांना एफएसआय देण्यात आला. त्यानंतर त्या सोसायटीने जास्तीच्या एफएसआयची मागणी केली होती ती म्हाडाने मंजूर केली नाही. नगर विकास खात्याने त्यांची मागणी मंजूर केली असून त्याचे पैसे भरलेले आहेत. याप्रकरणी चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : म्हाडाकडून वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागितलेला आहे. हे जर नियमाप्रमाणे केलेले असेल तर "हे नियमाप्रमाणे केलेले असल्यामुळे प्रश्न उद्‌भवत नाही" असे उत्तर द्यावयास पाहिजे होते. तेव्हा वस्तुस्थितीदर्शक अहवाल केव्हा मागविलेला आहे, तो मागविण्याचे कारण काय आहे आणि तो केव्हा येणार आहे ?

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42229....

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, या प्रकरणात अनियमितता झाली आहे काय यासंबंधीची माहिती घेण्यासाठी म्हाडाकडून अहवाल मागितला आहे. सदरहू सोसायटीला नियमाप्रमाणे एफ.एस.आय.दिलेला आहे. या प्रकरणाची पुन्हा सखोल चौकशी करावी, या प्रकरणी काही अनियमितता झाली आहे काय, यासंबंधीची माहिती घेण्यासाठी शासनाने म्हाडाला पत्र पाठविले आहे. सदर प्रकरणाचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : "गृह स्वप्न" या गृहनिर्माण संस्थेमध्ये म्हाडाच्या अधिका-यांनी फ्लॅट घेतलेले आहेत याची मंत्री महोदयांना माहिती आहे काय ? सन्माननीय सदस्य 40 दिवस अगोदर तारांकित प्रश्न विचारीत असतात. परंतु या 40 दिवसांच्या कालावधीत देखील विभागांकडून शासनास उत्तरे प्राप्त होत नाहीत ही गोष्ट भूषणावह नाही. सदर प्रकरणाचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल अद्यापपर्यंत का आला नाही ? तसेच या प्रकरणी जे अधिकारी दोषी असतील त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात येईल काय ?

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, या गृहनिर्माण संस्थेत म्हाडाच्या अधिका-यांनी फ्लॅट घेतले असण्याची शक्यता मी नाकारीत नाही. त्या सोसायटीला सदर भूखंड कल्याणासाठी उपलब्ध करुन देण्यात आला होता व त्याप्रमाणे त्यांना सर्व नागरी सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्या सोसायटीने एफ.एस.आय.काढलेला आहे. या प्रकरणात अनियमितता झालेली आहे. यासंबंधीची चौकशी करुन म्हाडाकडून अहवाल मागितला आहे. सदरहू अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नाच्या अनुषंगाने असाही मुद्दा उपस्थित केला की, तारांकित प्रश्न 40 दिवस अगोदर विचारले जातात, तरी देखील विभागाकडून शासनास माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही. याबाबतीत मी सभागृहाला नम्रपणे सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी सदर विषयासंबंधी तारांकित प्रश्न विचारला आणि तो विभागाकडे माहिती घेण्यासाठी आला. त्यानंतर विभागाने लागलीच म्हाडाला चौकशी करुन अहवाल देण्यासंबंधीचे पत्र पाठविले आहे. परंतु सदर प्रकरणाचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. तो अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकरणी काही अनियमितता आढळून आली तर संबंधितांविरुध्द निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42229....

श्री. मधुकर चव्हाण : या गृहनिर्माण संस्थेला नियमाप्रमाणे एफ.एस.आय.दिलेला आहे. एफ.एस.आय.देण्याच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांची पॉलिसी जाहीर होणार आहे, त्यात काही नियम चांगले केलेले आहेत. या गृहनिर्माण सोसायटीमधील सदनिकाधारकांना वन रुम किचन ऐवजी टू रुम किचनच्या सदनिका मिळाव्यात म्हणून एफ.एस.आय.उपलब्ध करुन दिला आहे. तो एफ.एस.आय. त्या सोसायटीला विक्री करण्यासाठी उपलब्ध करुन दिलेला नाही. या संदर्भात माझा असा प्रश्न आहे की, "गृह स्वप्न" या सहकारी गृहनिर्माण संस्थेला उपलब्ध करुन दिलेला एफ.एस.आय. त्यांनी कमर्शियल रेटने विकला ही गोष्ट खरी आहे काय ? तारांकित प्रश्न विचारुन 40 दिवसांचा कालावधी झालेला आहे. या प्रश्नाच्या बाबतीत सभागृहातील सन्माननीय सदस्य उप प्रश्न विचारतील याची शासनास कल्पना होती. या 40 दिवसांच्या कालावधीत शासनाने वस्तुस्थितीदर्शक अहवाल म्हाडाकडून का मागितला नाही ?

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : सदरहू सोसायटीने म्हाडाकडे 91 लाख 48 हजार 456 रुपये जमा केलेले आहेत. त्यांनी काही नुकसान केलेले नाही. सदरहू सोसायटीने एफ.एस.आय.बाबत काही चूक केली असेल, काही गैरव्यवहार केले असेल असे चौकशी अहवालात आढळून आले तर संबंधित दोषीवर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. मी पुन्हा नम्रपणे सांगू इच्छितो की, सदरहू प्रकरणाचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल प्राप्त झाल्याबरोबर संबंधितांविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल.

-------------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ MMP/ SBT/ प्रथम श्री. शिगम 12:45

**राज्यातील शालेय शिक्षण पोषण सकस आहार योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(४) * ४५०८९ श्री. जयंत प्र. पाटील , श्री. रामनाथ मोते , श्री. संजय केळकर , श्री. विनोद तावडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय शिक्षण पोषण सकस आहार योजनेंतर्गत निधी नाही म्हणून शाळकरी विद्यार्थ्यांना केवळ पिवळा भात खाऊ घालणाऱ्या शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी शालेय पोषण आहाराच्या ३९० कोटी रुपयांच्या थकबाकीच्या रकमेत गैरव्यवहार केल्याची घटना दिनांक २२ मे, २००८ रोजी वा तत्पूर्वी उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा स्तरावर ६ ते ७ कोटी रुपये, पंचायत समिती स्तरावर रुपये ५ ते ७ लाख आणि प्रत्येक शाळेला किमान ८० हजार रुपये असे या थकबाकीचे स्वरुप असून किराणा दुकानदारांची खोटी उधारी देयके चुकविल्याचे दाखवून बहुतांश जिल्ह्यात ३९० कोटीच्या रक्कमेचा गैरव्यवहार करण्यात आला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) सदरहू योजनेत गैरव्यवहार करणाऱ्या सर्व संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) भविष्यात अशा गैर घटनांना प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ?

**श्री. हसन मुश्रीफ, प्रा.वसंत पुरके यांच्याकरिता** : (१), (२) व (३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

...४

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : ऑक्टोबर, 2007 ते फेब्रुवारी, 2008 या कालावधीत शालेय पोषण आहारासाठी किती निधी प्राप्त झाला होता आणि प्रत्यक्षात किती निधी वितरीत करण्यात आला आहे ? या योजनेसाठी प्राप्त झालेला निधी पुरेसा होतो काय ? या योजनेंतर्गत खिचडीचे वाटप होते ते वाटप गेली सहा, सात महिन्यापासून बंद होते. त्याबाबतीत खात्याने काही दखल घेतली होती काय ?

श्री. हसन मुश्रीफ :सभापती महोदय, 2007-08 या आर्थिक वर्षात या योजनेसाठी 395.35 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली होती. दिनांक 3.9.2007 रोजी 157.58 कोटी आणि दिनांक 16.1.08 रोजी 180.12 कोटी रुपये असे एकूण 336 कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले आहे. गेल्या वेळेस बी.डी.एस. योजना आणली होती....

यानंतर श्री.कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 45089 पुढे सुरु..

श्री. हसन मुश्रीफ ..

त्यावेळी उशीर झाला होता. परंतु यावर्षी शासनाने ॲडव्हान्स शालेय पोषण आहाराचे पैसे देण्याचे ठरविले आहे. म्हणजे आता जून महिन्यात शाळा सुरु झाल्या परंतु आता ॲडव्हान्स पैसे दिलेले आहेत. अशी परत चूक होणार नाही याकरिता ॲडव्हान्स पैसे दिलेले आहेत. शालेय पोषण आहाराची बिले थकित राहू नयेत यासाठी शालेय शिक्षण विभागाने योग्य ती काळजी घेतलेली आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सांगितले की या योजनेमध्ये गैरप्रकार झालेले नाहीत. परंतु या योजनेसंदर्भात अनेक जिल्हयांमध्ये अनेक प्रकारच्या तक्रारी आलेल्या आहेत. यासंदर्भात उदाहरणेही देता येतील. शालेय पोषण आहारामध्ये प्रचंड प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. शासनाच्या वतीने या गैरव्यवहाराची चौकशी करण्यात येणार आहे काय? तसेच जर काही प्रकरणे शासनाकडे आणून दिली तर त्याबाबत सुध्दा चौकशी होऊन संबंधित अधिकाऱ्यांवर शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शालेय पोषण आहारामध्ये गैरव्यवहार झाल्याची एकही तक्रार प्राप्त झालेली नाही. तशी तक्रार आल्यास निश्चितपणाने त्याची चौकशी केली जाईल.

-----

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या योजना राज्यातील इतर महामंडळ व बचत गटासाठी लागू करणेबाबत**

**(५) * ४२०३६ श्रीमती उषाताई दराडे , श्रीमती मंदा म्हात्रे :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिलांचे सबलीकरण, राज्य व देशाची प्रमुख गरज असल्याने मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाने ज्या योजना लागू केल्या आहेत त्या सर्व योजना राज्यातील इतर महामंडळ व बचत गटासाठी लागू करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २८ एप्रिल, २००८ रोजी वा त्या सुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, या प्रकरणी शासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ ,श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाने महिलांना स्वयंरोजगाराद्वारे स्वावलंबी व आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या दृष्टीने सुरु केलेल्या सुक्ष्म पतपुरवठा योजना सारखी योजना इतर महामंडळानीही सुरु करण्याचे सुचविण्यात आले आहे.

(२) व (३) संबंधित प्रशासकीय विभागांना अशा स्वरुपाच्या योजना सुरु करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव करण्याचे अल्पसंख्याक विकास विभागामार्फत कळविण्यात येत आहे.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, उत्तरामध्ये सांगण्यात आले आहे की, मौलाना आझाद महामंडळाने सुरु केलेली सूक्ष्म पतपुरवठा योजना राज्यातील इतर महामंडळांनी सुरु करावी असे सुचविण्यात आले आहे. माझा प्रश्न असा आहे की, ही योजना वैयक्तिक लाभार्थी या स्वरुपात असेल किंवा बचत गटांमार्फत योजना राबविली जाईल ? तसेच अर्थसहाय्य करताना कोणत्या दराने ते देण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे आणि यामध्ये कोणकोणत्या महामंडळांचा समावेश करण्यात येणार आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत १४६ बचत गटातील ७९४ महिलांना ५० लाख रुपयांचे बिनव्याजी कर्ज शासनाच्या योजनेतून दिलेले आहे. ही योजना इतर महामंडळांमध्ये सुध्दा लागू करण्याबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केली आहे. म्हणजे साठे महामंडळ, महात्मा फुले महामंडळ अशा महामंडळांमध्ये ही योजना लागू केली जाणार आहे. निश्चितपणाने यासंदर्भात संबंधित विभागांना सूचना देऊन समाजातील गरीब घटकांना अर्थसहाय्य करण्याबाबत सांगितले जाईल.

...३



ता.प्र.क्र. ४२०३६ पुढे सुरु..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, मौलाना आझाद महामंडळामार्फत अतिशय चांगले असे काम या राज्यामध्ये सुरु आहे. महिला बचत गटामार्फत कर्ज पुरवठा केलेला आहे. इतर महामंडळांना देखील ही योजना लागू केली जाणार आहे असे आताच मंत्रीमहोदयांनी सांगितले. इतर महामंडळांना ही योजनो किती दिवसात लागू केली जाईल आणि याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आझाद महामंडळातर्फे कर्ज वाटप करीत असताना माननीय मुख्यमंत्र्यांनी इतर महामंडळांना ही योजना लागू करण्याबाबत घोषणा केली होती. याबाबतची कार्यवाही लवकरात लवकर करण्याचा शासनाचा प्रयत्न राहील.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, लातूर येथे झालेल्या कार्यक्रमास माननीय मुख्यमंत्री उपस्थित होते. परंतु उत्तर देत असताना गफलत झालेली दिसत आहे. इतर महामंडळांना योजना लागू करीत असताना महिला आर्थिक विकास महामंडळाचे सूक्ष्म पतपुरवठयाच्या संदर्भात मार्गदर्शन घ्यावे आणि त्यांच्या अनुभवाच्या आधारे महिला बचत गटांना पतपुरवठा करण्याबाबत शासन काय प्रयत्न करणार आहे ? १४६ बचत गटांना वित्तसहाय्य केल्याचे ऐकून आहे. अल्पसंख्यांकांमध्ये केवळ मुस्लीम नाहीत तर बौध्द आणि इतर समाजाचा देखील समावेश आहे. समाजातील मुस्लीम लोकांना मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन देत असताना महिला आर्थिक विकास महामंडळाची मदत कशी घेतली जाणार आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, १६७ कोटी रुपयांची तरतूद अल्पसंख्यांकांना मदत करण्यासाठी नव्याने मागणीद्वारे केलेली आहे. महिला बचत गटामार्फत वाटप केले जाते. महंमद युनुस यांनी यासंदर्भात अतिशय चांगले काम केले आहे. त्यांच्या देशात आता गरीब माणूस सापडत नाही. अशा पध्दतीने राज्यात सूक्ष्म पतपुरवठा करण्याबाबत शासन प्रयत्नशील आहे.

नंतर श्री. भोगले

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 12:55

ता.प्र.क्र.42036..........

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, यहां अभी श्री मुहम्मद यूनूस का उल्लेख किया गया. उसी संबंध में मेरा यह प्रश्न है कि क्या महाराष्ट्र में महिलाओं के लिए स्पेशल बैंक स्थापित किया जाएगा, मौलाना आजाद महामंडल के लिए कितना निधि ईयर मार्क किया गया है, वार्षिक टार्गेट के अन्दर कितने महिला बचत गट को निधि देने का निर्णय लिया गया है और कौन कौन से महामंडल को यह योजना शुरु करने के लिए कहा जा रहा है ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाला यावर्षी सुध्दा 50 कोटी रुपये अतिरिक्त दिले, मागील वर्षी 50 कोटी रुपये दिले होते. त्यांनी स्वत:च्या भागभांडवलामधून योजना राबविली आहे. केंद्र शासनाची जी योजना राज्य शासनाकडे आली आहे ती वेगळी आहे. त्यामध्ये फ्री कोचिंग, अलाईड स्किम, 10 शाळा मुलींसाठी, 6 शाळा मुलांसाठी, प्राथमिक शाळेतील मुलांना गणवेश देणे या केंद्राची योजना आहेत. प्रश्नाधीन योजना राज्य शासनाची आहे. पहिल्यांदा हा प्रयोग केला आहे. जास्तीत जास्त निधी देण्याचा सुध्दा शासनाचा विचार आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाची योजना इतर अशा महामंडळांना लागू करण्याची चांगली घोषणा केली आहे. इतर महामंडळांसाठी अर्थसंकल्पात तरतूद केलेली नाही. केवळ कागदोपत्री घोषणा करण्यापेक्षा त्या त्या महामंडळांच्या नावे निधीची तरतूद करणार आहात काय?

श्री.हसन मुश्रीफ : करावीच लागेल. निवडणुकीचे वर्ष पुढे आहे. शेळी मेंढी महामंडळासाठी तरतूद करु. ती चिंता सन्माननीय सदस्यांनी करु नये.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, निवडणूक जवळ आली म्हणून आता तरतूद करायची हा चुकीचा पायंडा महाराष्ट्रात पाडला जाणार आहे. निवडणूक आली म्हणून तरतूद करण्यापेक्षा मौलाना आझाद महामंडळाला ज्याप्रमाणे निधी दिला त्या धर्तीवर इतर महामंडळांना निधी दिला जाईल काय?

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42036..........

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मला तसे म्हणावयाचे नव्हते. सकाळी मी सन्माननीय सदस्य सर्वश्री रमेश शेंडगे व प्रकाश शेंडगे या दोघा बंधूंशी चर्चा केली. आपला भाऊ महामंडळाचा अध्यक्ष असताना पैसा दिला नाही ही खंत सन्माननीय सदस्यांनी बोलून दाखविली. राष्ट्रवादी पक्षात असलेल्या शेळीमेंढी विकास महामंडळाच्या अध्यक्षांबद्दल त्यांनी भूमिका मांडली. म्हणून मी निधी द्यायचा आहे असे म्हणालो.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्यातील गरीब व मध्यमवर्गीयांसाठी बांधण्यात येणारी दहा लाख घरे

**(६) * ४२७४६ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री सुभाष चव्हाण , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. प्रकाश शेंडगे , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. विनोद तावडे , श्री. रामनाथ मोते , श्री. शिवाजीराव पाटील , डॉ. दिपक सावंत , श्री. दिवाकर रावते , श्री. अरविंद सावंत , श्री. अनिल परब , श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गरीब आणि मध्यम वर्गासाठी येत्या दोन वर्षात १० लाख घरे बांधण्यात येणार असल्याचे दिनांक १ मे, २००८ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त मा.मुख्यमंत्री यांनी घोषित केले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई परिसरात नोकरी निमित्त येणाऱ्यांना भाडेतत्वावर सोय उपलब्ध करुन देण्यासाठी एम.एम.आर.डी.ए.मार्फत येत्या पाच वर्षात सुमारे ५ लाख घरे बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) म्हाडाकडे केवळ ११ हजार घरांचाच आरखडा तयार असून सदर घरांच्या योजनेसाठी आर्थिक आणि प्रशासकीय अशी कोणतीही अंमलबजावणी शासनातर्फे झालेली नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, म्हाडामार्फत बांधण्यात येणारी ही घरे केव्हा बांधून पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(६) मुंबई शहरातील गरीब व मध्यमवर्गीयांच्या घरांची समस्या सोडविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येणार आहे ?

**ॲड.प्रीतमकुमार शेगावकर, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता :** (१) होय.

(२) व (३) येत्या दोन वर्षात राज्य शासनाच्या व केंद्र पुरस्कृत योजनेतून पुढीलप्रमाणे १० लाख सदनिकांची/घरांची निर्मिती करण्याचे प्रस्तावित आहे.

| | **योजना** | **घरांची/सदनिकांची संख्या (लाखात)** |
|---|---|---|
| अ. | इंदिरा आवास योजना | २.५ |
| ब. | राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र.१ व २ | २.५ |
| क. | जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण कार्यक्रम (आयएचएसडीपी व बीएसयुपी) | २.५ |
| ड. | झोपडपट्टी पुनर्विकास योजना (एसआरए) | १.५ |
| ई. | म्हाडा प्राधिकरणाचा गृहनिर्माण कार्यक्रम | १.० |
| | **एकूण =** | **१०.० लाख** |

(४), (५) व (६) वरीलप्रमाणे १० लाख सदनिकांची/घरांची निर्मिती करण्याबरोबरच

एक) सार्वजनिक तसेच खाजगी रेखांकनात आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन्न गटाकरीता तसेच मध्यम उत्पन्न गटाकरीता प्रत्येकी किमान १० टक्के सक्तीचे आरक्षण ठेवणे,

..४..

दोन) २० टक्के पेक्षा अधिक आरक्षण ठेवणाऱ्यांना अतिरिक्त चटई क्षेत्राची सवलत देणे,

तीन) मोठ्या प्रमाणावर भाडे तत्त्वावरील घरांची निर्मिती करणे त्यासाठी वाढीव चटई क्षेत्र अनुज्ञेय करणे, मालमत्ताकर, उपकर आणि इतर शुल्कात सवलती देणे,

चार) प्रामुख्याने अल्प व मध्यम उत्पन्न गटासाठी बांधण्यात येणाऱ्या घरांच्या किंमतीवर नियंत्रण ठेवता यावे, म्हणून निवासी बांधकामाची विक्री चटईक्षेत्राच्या आधारेच करण्याची तरतूद इत्यादी उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

सभापती महोदय, असे करीत असताना मला या उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे. प्रश्नाच्या भाग क्रमांक- 2 ला "होय" असे उत्तर वाचावे. उत्तर क्रमांक-3 च्या शेवटी "त्याशिवाय एमएमआरडीएमार्फत या क्षेत्रामध्ये मुंबईमध्ये 5 लाख भाड्याच्या सदनिका बांधण्याचे प्रस्तावित आहे" असे वाचावे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, येत्या दोन वर्षात गोरगरिबांसाठी 10 लाख घरे बांधण्याची योजना माननीय मुख्यमंत्री साहेबांनी जाहीर केली आणि पुन्हा एकदा सिध्द केले की, हे सरकार गोरगरिबांचे आहे. म्हणून मी त्यांचे अभिनंदन करतो. 10 लाख घरे बांधण्यासाठी एकूण किती खर्च अपेक्षित आहे? त्याची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे काय? गेल्या 30 वर्षात म्हाडा प्राधिकरणाने अंदाजे 2 लाख घरे बांधली, तेव्हा येत्या दोन वर्षात 1 लाख घरे बांधण्याचे नियोजन कशाप्रकारे करण्यात आले आहे याची थोडक्यात माहिती दिली जाईल काय?

ॲड.प्रितमकुमार शेगावकर : सभापती महोदय, 10 लाख घरांच्या योजनेची सविस्तर माहिती उत्तरामध्ये दिलेली आहे. या घरांसाठी बजेट तरतूद केली आहे. वेगवेगळ्या योजनांतर्गत ही घरे बांधली जाणार आहेत. त्यामुळे पैशाची अडचण नाही. जेएनएनयुआरएम अंतर्गत 2.5 लाख घरे बांधली जाणार असून त्यासाठी तरतूद केली आहे. शासनाच्या वेगवेगळया योजना आहेत.

(नंतर श्री.भारवि.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ SBT/ MMP/ भोगले.... 13:00

ता.प्र.क्र.42746.....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आमच्या प्रश्नांची उत्तरे येत नाहीत.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, दहा लाख घरांचा कार्यक्रम आपल्याला दोन वर्षामध्ये पूर्ण करावयाच्या आहेत. केंद्र सरकारची योजना, राज्य सरकारची योजना आणि एसआरए या माध्यमातून आपल्याला घरे उपलब्ध करावयाची आहेत. त्या अनुषंगाने आपण दहा लाख घरांचा कार्यक्रम आखलेला आहे. सन 2008-2009 मध्ये इंदिरा आवास योजनेमध्ये 1 लाख 17 हजार, राजीव गांधी योजनेमध्ये 1 लाख 25 हजार JNNURM अंतर्गत 1 लाख 36 हजार एसएमटीपी अंतर्गत 31793, एसआरए मध्ये 79000 आणि म्हाडाच्यावतीने 1 लाख घरे बांधण्याचा कार्यक्रम आखलेला आहे. विविध योजनांमध्ये आवश्यक ती आर्थिक तरतूद आपण या कामासाठी केली आहे. म्हाडाला सांगितले आहे की, राज्य शासनाकडून निधी येण्यास विलंब झाला तर म्हाडाने आपल्या निधीतून पैसा खर्च करावा व नंतर तो शासनाकडून घ्यावा. अशा प्रकारची व्यवस्था झालेली आहे. हा राज्य सरकारचा महत्त्वाचा कार्यक्रम आहे. राज्याचा मुख्यमंत्री आणि या विभागाचा मंत्री म्हणून मी वैयक्तिक यावर सुपरव्हीजन करीत आहे. सदर कार्यक्रम दोन वर्षात पूर्ण होईल अशी खात्री मी सदनाला देऊ इच्छितो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, काल माननीय मुख्यमंत्री सभागृहात नव्हते म्हणून एक गोष्ट मी त्यांच्या निदर्शनास आणून देत आहे.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, काल मी दिल्लीला होतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री दिल्लीला होते हे मला माहित आहे. मी येथे पुढचे जे सांगत आहे, ते महत्त्वाचे आहे. या सदनामध्ये एकच कॅबिनेट मंत्री उपस्थित होते. त्यावेळी आम्ही ऑब्जेक्शन घेतले होते. तेव्हा माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील म्हणाले की, यापुढे आम्ही गृहनिर्माण राज्यमंत्री ॲड.शेगांवकर यांना सभागृहामध्ये बसवणार. बाकी कुणालाही बसणार नाही. एवढा आदर त्यांनी ॲड.शेगावकर यांचा

....2

ता.प्र.क्र.42746.....

श्री.दिवाकर रावते...

केला आहे. हे मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे. श्री.आर.आर.पाटील काय म्हणाले याचा अर्थ ॲड.शेगावकर यांनी समजून घ्यावा. आता मी प्रश्न विचारतो. लेखी उत्तरामध्ये नमूद केले आहे की, 20 टक्के पेक्षा अधिक आरक्षण ठेवणाऱ्यांना अतिरिक्त चटई क्षेत्राची सवलत देण्यात येईल. ती किती देण्यात येणार आहे ? मोठ्या प्रमाणावर भाडे तत्त्वावरील घरांची निर्मिती करणे, वाढीव चटई क्षेत्र अनुज्ञेय करणे. ते किती देण्यात येणार आहे ? मालमत्ता कर, उपकर आणि इतर शुल्कात सवलत देण्यात येणार आहे. ती कोणत्या पद्धतीने असेल ? ही पद्धत टक्केवारी पद्धतीने असणार आहे की, 50 टक्के सवलत असणार आहे की, एसआरएच्या योजनेवर असणार आहे की, 20 वर्ष सवलत असणार आहे की, 4-5 वर्षाने सवलत वाढत जाणार आहे. चटई क्षेत्र वाढवून देण्यासंबंधी कायदा पास झाला आहे. त्यामुळे शासन किती चटई क्षेत्र वाढवून देणार आहे.

श्री.विलासराव देशमख : सभापती महोदय, कामासाठी एफएसआय मंजूर केलेला असतो. जेवढे वाढीव क्षेत्र असते त्याप्रमाणे घराचा आकार मोठा होतो. सुरूवातीला आपण 225 चौरस फूट क्षेत्रफळाचे घर देण्यासंबंधी सांगितले होते. पण नंतर आपण 69 चौरस मीटर केले असेल तर त्यासाठी लागणारा तेवढाच एफएसआय देणार आहोत. त्यापेक्षा जास्त एफएसआय देणार नाही. तसेच कराची आकारणी आपण टेलिस्कोपीक पद्धतीने करणार आहोत. त्यामुळे कुठलाही जादा आकार द्यावा लागणार नाही. आता नवीन घरे बांधल्यानंतर महापालिका मालमत्ता कर आकारणार आहे. तो त्यांना आकारू लागू नये म्हणून टेलिस्कोपीक पद्धती सुरू करणार आहोत. म्हणजे आज जेवढा कर भरण्यात येत आहे, तेवढाच कर काही वर्षे असला पाहिजे व त्यामध्ये टप्प्याटप्प्याने वाढ झाली पाहिजे अशा प्रकारचा आपण कायदा केलेला आहे. आपण जे गृहनिर्माण धोरण जाहीर केले आहे, त्यात या सर्व बाबींचा उल्लेख केला आहे.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना आहे. या योजनेसाठी बँका मदत करीत नाही. योजना अतिशय चांगली आहे. पण ग्रामीण भागातील कुठल्याही बँका सहकार्य करीत नाही. त्यामुळे मदत करण्यासंबंधी शासन बँकांना सूचना करणार आहे काय ?

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42746.....

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्त्वाचा प्रश्न विचारलेला आहे. सुरूवातील राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना सुरू केली त्यावेळी घराची किंमत रूपये 50000/- होती. परंतु, आता अन्य वस्तूंच्या किंमती वाढल्यामुळे या घराची किंमत 50,000/- रूपयावरून 1 लाख रूपये केलेली आहे.

यानंतर श्री.पी.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख ........ ता. प्र. क्र. 42796......

आणि त्यामध्ये घर मालकाने फक्त 10 टक्के एवढीच रक्कम भरावयाची आणि 90 हजार रुपयाच्या कर्जावरील व्याजाची रक्कम शासन भरणार. यासंदर्भात मुख्य सचिवांनी सर्व बँकर्सना बोलावून बैठक घेतली व या योजनेसाठी देण्यात येणाऱ्या कर्जावरील व्याजाचा दर 10 टक्क्याच्या वर जाणार नाही अशी चर्चा त्या बैठकीत झाली व त्यांची मान्यताही घेतली. त्यानुसार संपूर्ण राज्यात प्रत्येक जिल्ह्याचा प्रमुख या नात्याने त्यांचे नियंत्रण या योजनेवर राहील. तसेच त्यांनी त्यांच्या त्यांच्या जिल्ह्यातील बँकांची बैठक घ्यावी व संपूर्ण जिल्ह्यासाठी घरांचा जो आकडा दिलेला आहे तेवढ्या घरांसाठी ठरलेल्या दराने कर्ज उपलब्ध होईल अशी भूमिका जिल्हाधिकाऱ्यांनी पूर्ण करावी, अशाही सूचना त्यांना दिलेल्या आहेत. त्याचबरोबर ग्रामीण भागात घरे बांधणीचा कार्यक्रम जो आहे तो बीपीएल साठी आहेच पण सामान्य माणूस, जो बीपीएलमध्ये बसत नाही असा शेतकरी, एपीएलमध्ये येतो त्यालाही आपले जुने घर पाडून त्या जागेवर नवीन घर बांधावयाचे असेल तर अशा लोकांसाठी देखील हा कार्यक्रम राबवावयाचा आणि त्यांच्या घराची किंमत सुध्दा एक लाखापर्यंत असावी, अशी ही योजना आहे.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : महोदय, उत्तरामध्ये जेएनयुआरएम अंतर्गत आयएचएसडीपी मधून 2.5 लाख घरे प्रस्तावित असल्याचे सांगितले आहे. परंतु अकोला, बुलडाणा, वाशिम आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये या योजनेच्या माध्यमातून एकाही घराचे काम सुरु झालेले नाही. त्याचे कारण असे आहे की, या योजनेत केंद्रशासनाकडून 80 हजार, राज्य शासनाचे 10 टक्के आणि लाभार्थ्याने भरावयाची रक्कम 10 टक्के अशी रक्कम दिली जाते. परंतु सध्याच्या परिस्थितीत लोखंड व इतर बांधकाम साहित्याच्या किंमती भरमसाठ वाढलेल्या असल्यामुळे 1 लाख रुपयात 225 चौरस फुटाची घरे बांधून होत नाहीत. त्यामुळे यामध्ये राज्यशासनाचा जो 10 टक्क्याचा वाटा आहे तो वाढवून 30 टक्के करण्यात येणार काय ?

श्री. विलासराव देशमुख : महोदय, यासंदर्भात केंद्रशासनाला आम्ही पत्र दिलेले आहे. कारण हा केवळ एका राज्यापुरता प्रश्न नाही तर केंद्रशासनाचा निर्णय असल्यामुळे राज्यांनी किती वाटा उचलावा हे ठरविण्याचा अधिकार सुध्दा केंद्राचाच आहे म्हणून आम्ही पत्र पाठविलेले आहे. त्याचबरोबर मी स्वत: संबंधित केंद्रिय मंत्र्यांना जाऊन भेटलो आणि त्यांच्याकडे आग्रही मागणी

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख ........ ता. प्र. क्र. 42796......

केली आहे. त्यांनी यासंदर्भात सकारात्मक भूमिका घेतली व त्याचा निश्चितपणे आपल्याला फायदा होऊ शकेल आणि राज्याने यात किती वाटा उचलायचा यासंबंधीचाही निर्णय नंतर घेण्यात येईल.

श्री. राजेन्द्र जैन : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. राजन तेली ने यहां पर बताया कि बँक सहयोग नहीं करती हैं. यह बात सच है. अभी गोंदिया जिले में लीड बँक की मीटिंग हुई थी और उसमें 2 बातें हमारे सामने आईं. एक बात तो यह है कि लाभार्थी की जगह का एन.ए. होना चाहिए और दूसरी अट बँक ने यह रखी है कि सर्च रिपोर्ट होनी चाहिए. सर्च रिपोर्ट लेने के लिए 3-4 हजार रुपए का खर्च आता है. मेरा निवेदन यह है कि क्या राज्य सरकार यह अट शिथिल करेगी ?

श्री. विलासराव देशमुख : यासंबंधीची तपासणी करुन मार्ग काढण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, वाढीव क्षेत्रफळाइतकाच एफएसआय शासन देणार आहे. मग त्यात 225 चौ. फुटाच्या सदनिकांऐवजी 300 चौ. फुटाच्या सदनिका बांधल्या तर तेवढ्यापुरताच एफएसआय वाढवून दिला जाईल. मुंबईमध्ये मात्र डी.सी. रुल मधील क्र. 33 (9) मध्ये जी तरतूद केलेली आहे ती फक्त क्लस्टरच्याच बाबतीत असून ती तरतूद सर्वच ठिकाणी लागू होईल असे नाही. म्हणून अशा भाडेकरुंना या वाढीव एफएसआयचा लाभ मिळणार आहे की नाही ?

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 42746.....**

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, क्लस्टर ॲप्रोच आपण एवढयासाठी मान्य केला आहे की, मोडकळीस आलेली सिंगल इमारत जरी आपण पाडली व त्याची पुनर्बांधणी केली तरी त्यासाठी जे डेव्हलपमेंट कंट्रोल रुल्स आहेत त्याप्रमाणे आजूबाजूला जी स्पेस सोडावी लागते ती जागा त्याला उपलब्ध होत नाही. मागे सुध्दा अशा प्रकारच्या इमारती पाडण्यात आल्या होत्या त्या अजूनपर्यंत बांधून झाल्याच नाहीत. इमारत पाडल्यानंतर ते लोक पिढयांपिढया ट्रान्झीट कॅंपमध्ये राहत आहेत. मोकळी जागा सोडण्याच्या संदर्भात क्लस्टरचा निर्णय आपण एवढयासाठी घेतला की, मोकळया जागा ठेवता येतील व वाढीव क्षेत्र देता येईल. वाढीव क्षेत्र आपण जेवढे वाढवून देऊ तेवढा एफएसआय विकासकांना वाढवून द्यावा लागतो व त्यामध्ये त्याला काही फ्लॅट ठेवावे लागतात. लोकांची संख्या वाढल्यामुळे त्याचा परिणाम साधनसामुग्रीवर होत असतो. क्लस्टर ॲप्रोचला आपण या ठिकाणी अधिक महत्व देतो परंतु वैयक्तिक इमारत असेल आणि त्या ठिकाणी जर या अटी बसत असतील तर त्यांना सुध्दा निश्चितपणे वाढीव एफएसआय देण्यात शासनाला काही अडचण नाही.

-------------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्याबाबत**

**(७) * ४२१०७ श्री. रामनाथ मोते , श्री. संजय केळकर , श्री. विनोद तावडे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. प्रकाश शेंडगे , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. जयंत पाटील , श्री.कपिल पाटील , श्री.सुमंत गायकवाड , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. प्रतापराव सोनवणे , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. मधुकर चव्हाण , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. संजय दत्त :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कायम विनाअनुदानित तत्त्वावर शाळांना अनुदान देण्याबाबत निश्चित धोरण ठरविण्यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर सादर करण्यात येऊन, एका महिन्याच्या आत निर्णय घेण्याबाबत शासनाने दिलेल्या आश्वासनानुसार शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(२) असल्यास, त्या अनुषंगाने शासनाने घेतलेल्या निर्णयाचे व कार्यवाहीचे स्वरुप काय आहे व केव्हा घेण्यात आला आहे,

(३) अद्याप निर्णय घेण्यात आला नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व सदर निर्णय केव्हापर्यंत अपेक्षित आहे ?

**श्री. हसन मुश्रीफ, प्रा.वसंत पुरके यांच्या करिता** : (१) व (२) मंत्रीमंडळाच्या समोर प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, कायम विनाअनुदानित शाळेचा प्रश्न या सभागृहात वेगवेगळया माध्यमातून उपस्थित करण्यात आलेला आहे. या प्रश्नासंदर्भात माननीय सभापती महोदयांच्या दालनात बैठक झाली होती व कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्याच्या संदर्भात आपण निर्देशही दिले होते. 4 एप्रिल, 2008 रोजी या सभागृहात या प्रश्नाच्या संदर्भात चर्चा झाली होती व त्यावेळी सुध्दा शासनाने मान्य केले होते की, एका महिन्याच्या आत मंत्रिमंडळासमोर जाऊन आम्ही निर्णय घेऊ. आता शासनाने उत्तरात असे म्हटले आहे की, अद्यापही यासंदर्भातील कोणताही निर्णय झालेला नाही. मंत्रिमंडळासमोर जाण्यासाठी आणि निर्णय घेण्यासाठी कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे मी आपल्या माध्यमातून जाणून घेऊ इच्छितो की, अधिवेशन संपण्यापूर्वी हा विषय शासन तातडीने संपविणार आहे काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्याच्या संदर्भातील विषय या सभागृहात ब-याच वेळा चर्चेला आलेला आहे. एक महिन्यामध्ये आम्ही मंत्रिमंडळापुढे जाऊ, असे मी म्हणालो होतो. शिक्षण विभागाने हा प्रस्ताव नियोजन आणि अर्थ विभागाकडे पाठविला होता. "कायम" शब्द काढण्याच्या संदर्भात या विभागांनी काही त्रुटी काढल्या

...3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : ४२१०७...**

श्री. हसन मुश्रीफ ....

होत्या. किती शाळांना किती खर्च येईल, प्राथमिक शाळा किती ? अशा प्रकारच्या त्यांनी त्रुटी काढल्या होत्या. मंत्रिमंडळासमोर ताबडतोब फाईल जात नाही तर नियोजन विभाग, अर्थ विभाग अशा पध्दतीने फाईल मंत्रिमंडळासमोर जात असते. "कायम" हा शब्द काढण्याच्या संदर्भात आमच्या विभागाचा सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. प्राथमिक, माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालयांचे मुल्यांकन पूर्ण झालेले असून यासंदर्भात विभागाने हायकोर्टात प्रतिज्ञापत्र दिलेले आहे त्या प्रमाणे अनुदान द्यावे अशी आमची मागणी आहे. आम्ही या प्रश्नासंदर्भात बांधील आहोत व त्यासंदर्भात आमचा प्रामाणिक प्रयत्न सुरु आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, अतिशय कष्टपूर्वक विचारलेल्या प्रश्नाला अजिबात कष्ट न घेता दिलेल्या उत्तराचा सुंदर नमुना म्हणून आजचे उत्तर आपल्याला आर्काइजमध्ये ठेवता येईल. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे, असे उत्तर कोणालाही, केव्हांही, काहीही तयारी न करता देता येईल. या विषयाच्या संदर्भात हाय कोर्टाने निर्णय दिलेला आहे. "कायम विनाअनुदानित' असा शब्द परवानगी पत्रात वापरल्याने अशा शाळांना अजिबात अनुदान देणार नाही असा अर्थ लावता येणार नाही, असा निर्णय माननीय मुंबई उच्च न्यायालयाने 2003 मधील याचिका क्रमांक 138 मध्ये दिनांक 8 एप्रिल,2005 रोजी दिला आहे, ही गोष्ट खरी आहे का ? या प्रश्नाला "होय" असे उत्तर देण्यात आलेले आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 42107 प्रा.बी.टी.देशमुख ...

2005 सालातील हा निर्णय होता. मंत्रिमंडळासमोर जाण्यास वेळ लागला असल्यामुळे मी तारीख सांगितली आहे. "कायम विनाअनुदान" हा शब्द वापरण्यात आला असल्यामुळे अशा प्रकारचा भेदभाव करता येणार नाही व सर्व व्यावहारिक प्रयोजनासाठी (for all practical purposes) परवानगी देतांना वापरण्यात आलेली "कायम विना अनुदान तत्वावरील मान्यता " ही शब्द रचना विना अनुदान तत्वावरील मान्यता अशीच वाचली पाहिजे व अशीच समजली पाहिजे असाही निणय मुंबईच्या माननीय उच्च न्यायालयाने सन 2005 च्या याचिका क्रमांक 8736 मध्ये दिला होता ही गोष्ट खरी आहे काय ? असा प्रश्न विचारला असतांना त्या प्रश्नाला " होय " असे उत्तर देण्यात आले होते. सभापती महोदय, याबाबतीत माननीय हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर आर्थिक बाबीसंबंधी निर्णय घेण्याच्या बाबतीत वेळ लागणे हे मी समजू शकतो. परंतु त्या दिवशी सभागृहात असा आग्रह धरण्यात आला होता की, पहिल्यांदा बिना पैशाचे पत्रक काढावे आणि
" कायम "हा शब्द काढून टाकावा. तेव्हा हा शब्द काढून टाकण्यात येणार आहे काय ?त्यावर माननीय मंत्री महोदयांनी "होय " असे उत्तर दिले होते. या संदर्भात हाय कोर्टाने निर्णय दिला होता , त्यानंतर माननीय सभापतींनी निदेश दिले होते, त्यानंतर या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारले होते. माननीय सभापतींनी त्या दिवशी सभागृहात असा निदेश दिला होता की, "एक महिन्यात या संबंधीचा प्रश्न मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडण्यात यावा आणि मंत्रिमंडळाला उच्च न्यायालयाचा निर्णय दाखवून कायम हा शब्द कसा दूर होईल याची व्यवस्था करावी." यानंतर माननीय शिक्षण मंत्र्यांना थोडासा राग आला होता. माननीय सभापतींनी निदेश दिल्यानंतर मी माननीय शिक्षण मंत्र्यांना प्रश्न विचारला होता तेव्हा त्यांना थोडासा राग आला होता. मी असा प्रश्न विचारला होता की, माननीय सभापतींनी जो निदेश दिला आहे त्याप्रमाणे एक महिन्यात आपण कार्यवाही करणार आहात काय ? तर त्या प्रश्नाला माननीय शिक्षण मंत्र्यानी दिलेले उत्तर ऐकण्यासारखे आहे. ते असे म्हणाले की, सभापती महोदय, मी "होय" म्हटलेले आहे आणखी किती वेळा "होय "असे म्हणावयाचे ? त्यामुळे हे उत्तर बिन कष्टाने दिलेले आहे असे मी मघाशी म्हटले होते गलथान अधिकारी आणि दुर्लक्ष करणारे माननीय मंत्रीमहोदय यांच्यासाठी ते उत्तर आहे परंतु हायकोर्टाने आणि माननीय सभापतीनी , सभागृहहातील सदस्यांनी सांगितल्यानंतर दिलेले हे उत्तर आहे नाही. त्यामुळे मला माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न आहे की याबाबतीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

"कायम" हा शब्द वगळण्याचे आदेश आजच्या आज निर्गमित होतील असे आता जाहीर करण्यात येणार आहे काय ? अन्यथा माननीय मंत्रिमहोदयांनी पुढच्या आठवडयात उत्तर देण्यासाठी माननीय सभापतींना विनंती करावी.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात माझ्या ह्रदयातील भावना काय आहेत हे जर सन्माननीय सदस्यांना कळल्या असत्या तर ते बरे झाले असते. जी काही वस्तुस्थिती आहे ती मी मघाशीच सांगितली आहे की, कायम हा शब्द काढण्यासाठी वित्त आणि नियोजन विभागाकडून फाईल लवकर यावी यासाठी माझा सातत्याने व प्रामाणिकपणे प्रयत्न सुरु आहेत. सभापती महोदय, मी ज्यावेळी सभागृहात आलो त्यावेळी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना पाहिल्यानंतर माझ्या पोटातसुध्दा धस्स झाले होते. त्यामुळे मी माननीय मुख्यमंत्र्याशी बोललो होतो त्यावेळी ते असे म्हणाले की,"ही फाईल जशी असेल तशी ताबडतोबीने द्यावी असे मी स्वत:वित्त विभागाला सांगेन ". अशा प्रकारे आमच्या दोघांमध्ये चर्चा झालेली आहे. त्यामुळे आम्ही ही बाब विसरलो आहोत आणि आम्ही गेंडयाच्या कातडीचे आहोत असे नाही. कायम विना अनुदान हा शब्द काढून टाकावा आणि त्यांना लवकरात लनवकर अनुदान मिळावे असे आम्हाला देखील प्रामाणिकपणे वाटते परंतु आजची जी काही व्यवस्था आहे त्यामुळे तसे करणे जमलेले नाही हे मी अत्यंत प्रांजळपणे सांगू इच्छितो...........

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात )

**सभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, एकाच वेळी जर अनेक सन्माननीय सदस्य बोलू लागले तर या प्रश्नाला न्याय मिळणार नाही. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी उपस्थित केलेल्या उपप्रश्नाला सन्माननीय शिक्षण राज्यमंत्रानी उत्तर दिलेले आहे. यापूर्वी मी माननीय मंत्रिमहोदयांना देखील सांगितले होते तसेच आज पुन्हा मी माननीय शिक्षण राज्यमंत्र्यांना सांगतो की, उच्च न्यायालयाने "कायम" हा शब्द काढून टाकावा असे आदेश दिले होते. उच्च न्यायालयामध्ये किंवा सर्वोच्च न्यायालयामध्ये जेव्हा एखादे प्रकरण येते व त्यावर जेव्हा निर्णय दिला जातो त्यावेळी शक्यतो ती बाब शासन तपासून पाहते .उच्च न्यायालयातील एखादी बाब सर्वोच्च न्यायालयात देखील जाते परंतु या प्रकरणी अशी कोणतीही गोष्ट झालेली नसल्यामुळे मी असे सांगतो की, सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय

3..

**सभापती** ....

सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन "कायम" हा शब्द काढून टाकण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे याबाबतीत माननीय शिक्षण राज्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे.

श्री.हसन मुश्रीफ :सभापती महोदय, मी मघाशी सांगितले आहे की अर्थ आणि नियोजन विभागाकडून ही फाईल ताबडतोबीने काढण्यासाठी मी माननीय मुख्यमंत्र्यांना भेटेन. त्या विभागाकडे ही फाईल अडकलेली आहे. सभापती महोदय, आपण देखील अनेक वर्षे मंत्री असल्युाळे आपल्याला देखील सर्व माहीत आहे. " कायम " हा शब्द काढून टाकणे म्हणजे केव्हा ना केव्हा तरी त्यांना अनुदान देणे असा त्याचा अर्थ आहे

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुश्रीफ (पुढे चालू....) ता.प्र.क्र.42107 ...

म्हणून नियोजन विभागाला आणि वित्त विभागाला आम्हाला हे दाखवावे लागते आणि एवढीच आमची अडचण आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, खरे तर ही बाब मंत्रिमंडळासमोर जाण्याची आवश्यकताच नाही. हायकोर्टाने सांगितले आहे की, यातील 'कायम' हा शब्द काढून टाकावा आणि केवळ 'विना अनुदानित' हा शब्द ठेवावा. तर अशी दुरूस्ती ताबडतोब करण्याचा निर्णय आजच्या आज आपण घेणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 'कायम विनाअनुदानित' हा निर्णय मंत्रिमंडळाचा असल्याने मंत्रिमंडळापुढे आपल्याला जावेच लागेल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, 'गेंड्याच्या कातडीचा' हा शब्दप्रयोग मी वापरलेला नव्हता. बिनकष्टाने तुम्ही उत्तर दिलेले आहे एवढेच मी या संदर्भात म्हटले होते. परंतु त्याचा अर्थ त्यांनी तसा लावला असेल तर माझ्या मनातील भावनाच त्यांनी येथे सांगितल्या आहेत असेच मी म्हणेन. मात्र माझ्या मनातदेखील हे शब्द तेव्हा आले नव्हते. सभापती महोदय, माझा या संबंधात आता नेमका प्रश्न असा आहे की, माननीय राज्यमंत्र्यांनी या बाबत मेहनत केलेली आहे, माननीय मुख्यमंत्र्यांशी आताच त्यांचे याबाबत बोलणेही झाले असेही त्यांनी सांगितले आहे. तेव्हा माझे म्हणणे असे आहे की, या सभागृहामध्ये या प्रश्नाच्या बाबतीत ... 5 हजार लोक पुण्याच्या आपल्या संचालनालयावर काल मोर्चा घेऊन आले होते. त्यातील काहींना आपण अटक देखील केलेले आहे. तेव्हा आपले याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांशी काही बोलणे झालेले आहे असे म्हणता तर याबाबत आता माननीय मुख्यमंत्र्यांनीच काही सांगितले तर अधिक बरे होईल. अन्यथा तोपर्यंत हा प्रश्न सभापती महोदय, आपण राखून ठेवावा.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, याबाबत आताच मला माननीय मुख्यमंत्र्यांनी सूचना केली आहे की, हा प्रश्न राखून ठेवण्यास हरकत नाही. तरी आपण हा प्रश्न राखून ठेवावा अशी माझी आपल्याला विनंती राहील.

**सभापती** : ठीक आहे. मी हा प्रश्न राखून ठेवतो.

***

...... क्यूक्यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक बांधण्यासाठी अरबी समुद्रामध्ये जागा निश्चित करण्याबाबत

**(8) * 43471 श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री. जितेंद्र आव्हाड, प्रा. फौजिया खान, श्री. गुरुमुख जगवानी, श्री.सय्यद पाशा पटेल, डॉ. वसंत पवार, श्री. दिवाकर रावते, श्री. अरविंद सावंत, डॉ.दीपक सावंत, डॉ. निलम गोऱ्हे, श्री. अनिल परब, श्री.परशुराम उपरकर : दिनांक 25 एप्रिल, 2008 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या चौविसाव्या यादीतील प्रश्न क्रमांक 35333 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक बांधण्यासाठी अरबी समुद्रामध्ये मा.मुख्यमंत्री यांनी माहे जून, 2008 मध्ये जागा निश्चित केली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर स्मारकासाठी किती निधी लागणार आहे,
(3) असल्यास, स्मारकाचे काम केव्हा सुरु होणार आहे व स्मारक केव्हा पूर्ण होणार आहे ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1) हे खरे आहे.
(2) व (3) सदर कामाचे प्राथमिक सर्वेक्षण शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरु असून त्याबाबतचे आराखडे व अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे व त्याआधारे निधीची निश्चिती करण्यात येईल.

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी निश्चित केलेल्या जागेचे ठिकाण कोठे आहे आणि त्या जागेचे क्षेत्रफळ किती आहे ? तसेच या स्मारकाच्या कामाचे सर्वेक्षण आणि अंदाजपत्रकाचे काम सुरू आहे असे या ठिकाणी सांगण्यात आलेले आहे. तर ते केव्हा पासून सुरू झाले आहे आणि हे सर्व्हेचे काम किती दिवसात पूर्ण होईल व प्रत्यक्ष स्मारकाचे काम केव्हा पूर्ण होईल ? सर्व्हेचे काम झाले असेल तर या स्मारकासाठी एकंदर किती खर्च येणे अपेक्षित आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन तीन प्रश्न या संबंधात विचारले आहेत. महाराष्ट्राच्या अस्मितेचा विषय म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांविषयी अभिमान हे निश्चितच आहे. त्यामुळे याठिकाणी लोकशाही आघाडी शासनाने जो जाहीरनामा जाहीर केला होता त्यामध्ये देखील याबाबत वचन दिले होते की, छत्रपती शिवाजी महाराजांचे यथोचित स्मारक उभे केले जाईल. तेव्हा त्यादृष्टीने माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली गेली आणि त्या समितीने स्मारक उभे करण्याच्या दृष्टीने अनेक स्थळांची पाहणी केली. त्यानंतर

...... क्यूक्यू 3 ...

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. टोपे (पुढे चालू....) ता.प्र.क्र. 43471 ....

मरीन ड्राईव्ह येथे किनाऱ्यापासून आत 1 कि.मी. अंतरावरील जागा यासाठी निश्चित केली आहे. या ठिकाणी प्रामुख्याने आराखडा म्हणजे प्लॅन आणि एस्टिमेट करण्याचे काम पीडब्ल्यूडीला देण्यात आलेले आहे. या संबंधीचा निर्णय हा मागील महिन्यातच म्हणजे जून मध्येच झालेला आहे. त्यासाठी एक कोटी रूपयांची तरतूद देखील आपण या पुरवणी मागण्यांमध्ये ठेवली आहे. त्यातून लवकरात लवकर या स्मारकाचे प्लॅन-एस्टिमेट करण्यात यावे अशी अपेक्षा आहे. सभापती महोदय, या समितीने ज्या काही सूचना या संबंधात दिलेल्या आहेत त्यात यामध्ये कोणकोणत्या गोष्टींचा प्लॅन करायचा आहे, त्यात छत्रपतींचा अश्वारूढ पुतळा असावा, तसेच त्या ठिकाणी साधारणत: 6 ते 10 एकर जागा अपेक्षित आहे, त्या दृष्टिकोनातून तेथे काय काय करायचे आहे हेही त्यात सांगितले आहे. त्या पुतळ्याला पूर्ण रोषणाई करावी., गार्डन देखील तेथे असावे, त्याचबरोबर तेथे एक वस्तुसंग्रहालय असावे, छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्ण जीवनपट लाईव्ह स्वरूपात दाखविण्याचा कार्यक्रम करण्याची व्यवस्था असावी तसेच तेथे एक ओपन थिएटर असावे. त्याचप्रमाणे छत्रपतींचा पुतळ्याची उंची ही 309 फूटापर्यंत असावी अशा सूचना त्यांनी केलेल्या आहेत. ....

( यानंतर श्री. सरफरे ....आरआर 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे...

सभापती महोदय, त्याठिकाणी कोणकोणत्या गोष्टी असाव्यात यासंबंधी निर्णय घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे त्याठिकाणी काही कमर्शिअल गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आला असून त्यामध्ये गार्डन तयार करणे, मरीन ड्राईव्हपासून आत 1 कि.मी पर्यंत जाण्याकरिता ॲप्रोच रोड तयार करणे किंवा ज्या काही कमर्शिअल ॲक्टिव्हिटीज होणार आहेत त्या खाजगी तत्वावर विकसित करता येतील. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभा करण्यासाठी जो काही खर्च येणार आहे त्याचे अंदाजपत्रक संबंधित समितीने अपेक्षित केले असून त्यासाठी येणारा खर्च शासनाच्या वतीने निश्चितपणे केला जाईल. त्याचप्रमाणे त्यामध्ये ज्या काही गोष्टी कराव्या लागणार आहेत त्यासाठी येणाऱ्या खर्चासाठी निधी कसा उभा करावयाचा हे निश्चित झाले आहे. त्याचप्रमाणे त्याठिकाणी कमर्शिअल ॲक्टिव्हिटीज खाजगी तत्वावर किंवा देणगी तत्वावर करण्यासाठी निश्चितपणे निधी उभा करता येईल. त्यामुळे बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा या माध्यमातून कमर्शिअल ॲक्टिव्हिटीजपुरते बी.ओ.टी. तत्व लावता येऊ शकेल. त्यासाठी समितीने अभ्यास करण्याबाबत सूचना केली आहे. आणि म्हणून ज्या प्रायमाफॅसी स्टेजेस करावयाच्या आहेत त्यामध्ये काही गोष्टी अभिप्रेत आहेत. त्यासंदर्भात पी.डब्लू. डी. विभागाकडून महिन्याभरात प्लॅन आणि एस्टिमेट दाखल झाल्यानंतर त्या अनुषंगिक गोष्टी निश्चितपणे केल्या जातील.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी बी.ओ.टी. तत्वावर कमर्शिअल ॲक्टिव्हिटीज सुरु करणार असल्याचे सांगितले. त्यामध्ये नेमक्या कोणत्या गोष्टींचा अंतर्भाव असणार आहे याचे स्पष्टीकरण करावे? दुसरा प्रश्न असा की, समुद्र किनाऱ्यापासून 1 कि.मी. आतमध्ये हे स्मारक उभे रहाणार आहे. त्याकरिता सी.आर.झेड. किंवा इतर संबंधित असलेल्या परवानग्या आपण घेतल्या आहेत काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर मी सांगितले आहे. त्याठिकाणी गार्डन बांधण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांचा जीवनपट उलगडणारा साऊंड अँड लाईटच्या आधारावर कार्यक्रम दाखविला जाणार आहे. तसेच, त्याठिकाणी एक वस्तू संग्रहालय रहाणार आहे. यापैकी काही भाग हा बी.ओ.टी. तत्वावर विकसित करता येईल. त्याचप्रमाण् शासन आणि खाजगी एजन्सीच्या माध्यमातून हा निधी उभा करावयाचा आहे. माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न सी.आर.झेड. च्या क्लिअरन्सबाबत विचारला आहे. त्याकरिता अनेक विभागांची एन.ओ.सी. घेणे आवश्यक आहे.त्यामध्ये प्रामुख्याने नेव्ही, बी.पी.टी.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे...

यांच्याकडून एन.ओ.सी. मिळाली आहे. आणखी काही ठिकाणाहून एन.ओ.सी. मिळणे बाकी असून त्याबाबत कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे केबल लाईनबाबत बी.एस.एन.एल. यांचेकडून एन.ओ.सी. घेण्याचे काम सुरु आहे. एकूण 7 ते 8 एन.ओ.सी. असून त्यापैकी 4 ते 5 एन.ओ.सी. मिळाल्या आहेत व 1-2 एन.ओ.सी. मिळणे अजून बाकी आहेत.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये सिंधुदुर्ग आणि विजयदुर्ग या दोन किल्ल्यांचे बुरुज आणि तटबंदी ढासळायला सुरुवात झाली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना याबाबत विचारु इच्छितो की, पुरातन खात्याचे यासंबंधी लक्ष वेधून त्यांच्याकडून या किल्ल्याला न्याय मिळेल काय? दुसरा प्रश्न असा की, सिंधुदुर्ग किल्ल्यावर भगवा झेंडा लावण्याबाबत पुरातन खात्याकडून परवानगी मिळवून देण्यात येईल काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेले प्रश्न या प्रश्नाशी निगडीत नाहीत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी मघाशी उत्तरामध्ये जी सुधारणा केली त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आपणा सर्वांची एकच भावना आहे. याठिकाणी दोन-तीन गोष्टींबाबत स्पष्टपणे सांगण्यात आलेले नाही. आपण त्याठिकाणी साऊंड आणि लाईटचा वापर करुन महाराजांचा जीवनपट मांडणार आहात. त्यामध्ये शाहिस्तेखानाची तोडलेली बोटे आणि अफझलखानाचा काढलेला कोथळा दाखविण्यात येणार आहे काय? त्याचप्रमाणे साऊंडमध्ये "या अल्लाह, तोबा तोबा" असे शब्द येणार आहेत काय? कारण ते नैसर्गिक आहे. दुसरा प्रश्न असा की, हा पुतळा उभारण्यासंदर्भात दै. लोकसत्तामध्ये आलेल्या अग्रलेखातून महाराजांवर टीका करण्यात आलेली नव्हती तर ती सरकारवर टीका होती. अशाप्रकारे माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील यांनी वक्तव्य केले. आणि त्यासंदर्भात झालेल्या हल्ल्यातील आरोपी सापडले कां? ते फरारी आहेत कां? त्या संदर्भात काय कारवाई करणार आहात?

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(यानंतर सौ. रणदिवे)

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:30

ता.प्र.क्र.43471 . . . .

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे या सभागृहामधील ज्येष्ठ सदस्य आहेत. त्यामुळे मी याठिकाणी त्यांच्या संदर्भात काही बोलणे उचित होणार नाही. याठिकाणी जे प्रश्न विचारलेले आहेत, त्याबाबतीत मी सांगितले की, ही अतिशय प्रायमाफेसी केस आहे. त्यामुळे सर्व केस निश्चितपणे तपासण्यात येईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी आरोपींच्या बाबतीत जो प्रश्न विचारलेला आहे, तो पूर्णपणे वेगळा आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

----

. . . .2 एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी "छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या रायगड किल्ल्यावर येणाऱ्या पर्यटकांनी दारुच्या पार्ट्या, भरदिवसा होळीचा माळ आदी सुरु केल्याने पुण्यपावन रायगडाची सुरु असलेली विटंबना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी "रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली येथील टेटवली ग्रामस्थांची कोकण कृषी विद्यापीठासाठी सुमारे 230 हेक्टर जमीन शेतकऱ्यांचा विरोध असूनही संपादित करण्यात येणे, सदर जमिनीवरील शेतकऱ्यांची घरे तोडण्याच्या नोटीसा कृषी विद्यापीठाला दिल्या असल्याने त्यांच्यात निर्माण झालेले चिंतेचे वातावरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया यांनी "मराठवाडा व कोकण विकासाच्या सुधारित कार्यक्रमांतर्गत जिल्हा मुख्यालय असलेल्या नगरपरिषदांकरिता शासनाने विशेष अनुदान योजना सुरु केलेली असून सदर योजनेतून विदर्भातील जिल्हा मुख्यालयातील नगरपरिषदांना वगळल्याने विदर्भावर झालेला अन्याय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, भगवान साळुंखे, चंद्रकांत पाटील यांनी "राज्यातील माध्यमिक विभागातील पायाभूत पेक्षा वाढीव पदावर काम करणाऱ्या मागील 4 वर्षातील शेकडो शिक्षकांना अद्यापही मान्यता न दिल्याने सदर शिक्षक गेल्या 4 वर्षापासून वेतनापासून वंचित असल्याने त्यांची होत असलेली उपासमार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री भगवान साळुंखे, रामरनाथ मोते,चंद्रकांत पाटील, संजय केळकर यांनी "राज्यातील हजारो अप्रशिक्षित शिक्षक सेवक काम नियमित करीत असून सदर ....





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सेवकांना नियमित वेतनश्रेणी न देणे, परिणामी त्यांच्यावर आलेली उपासमारीची वेळ" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी यांनी "अमरावती शहरात केंद्रीय प्रवेश समिती वर्ग 11 वीच्या क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना राखीव 15 टक्के जागेवर फक्त 10 वीत क्रीडा क्षेत्रात प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांनाही सूट देण्यात येणे, वर्ग 5 वी ते 9 वी चे विद्यार्थ्यांनी प्राविण्य प्राप्त केले असूनही त्यांचा 11 वीच्या 5 टक्के जागेवर विचार केला नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, संजय केळकर, पाशा पटेल यांनी "कृष्णा खोऱ्याच्या सर्व योजना बच्छावत आयोगाच्या शिफारशीनुसार दि.31 मे 2000 पूर्वी पूर्ण करावयाच्या असणे, या योजनेच्या नियोजनशुन्य कारभारामुळे सदर काम अद्यापही पूर्ण न होणे, या प्रकल्पाच्या सर्व पाणी योजनेसाठी सुमारे 21 कोटीची आवश्यकता असूनही त्याची पूर्तता न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 21 जुलै 2008 रोजी मुंबई उपनगरे, ठाणे, मुलुंड, कल्याण, वसई येथे होत असलेल्या अतिरिक्त भारनियमनाला कंटाळून विरारच्या रहिवाशांनी केलेला रस्ता रोको आंदोलन, विरार रेल्वे लोकलमध्ये बसण्यास जागा न मिळाल्याने बंद केलेली लोकलसेवा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे यांनी "दिनांक 1-8-2004 पासून मूळ वेतनाच्या 50 टक्के एवढा महागाई भत्ता कर्मचाऱ्यांना मूळ वेतनात विलीन करण्यात यावा,महागाई वेतन व वेतनेत्तर भत्ते आणि इतर अनुज्ञेय भत्त्याच्या परिगणनेसाठी

. . . .2एस-4



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

मूळ वेतनामध्ये विलीन केल्याचे गृहित करुन त्याप्रमाणे परिगणना करण्यात यावी असे शासन निर्णयात स्पष्टपणे नमूद करुनही त्यावर कार्यवाही न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथे इमारतीच्या बांधकामासाठी सुमारे 807 झाडे तोडण्यात येणे, आकुर्ली गावातील कल्पतरु बिल्डरने कॉम्प्लेक्सचे काम सुरु करण्यासाठी झाडे तोडल्यास त्याच्या दुप्पट झाडे लावण्यात येतील असे आश्वासन देऊनही दुप्पट झाडे पुनर्रोपित न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "मागील 25 वर्षापासून रोहयोच्या कामावर 4297 सेवा खंडित सहाय्यक काम करीत असणे, काही हजेरी सहाय्यकांना शासनाने सेवेत सामावून घेणे, मात्र या 4297 हजेरी सहाय्यकांना रोहयोचे काम देताना डावलण्यात आल्याने त्यांच्या कुटुंबियांवर ओढवलेली उपासमारीची पाळी " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना दालनात अनुमती नाकारलेली आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ. शी.** : खाण्यास अयोग्य असलेल्या लाल गव्हाची विदर्भात विक्री सुरु असणे

**मु. शी.** : खाण्यास अयोग्य असलेल्या लाल गव्हाची विदर्भात विक्री सुरु असणे याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सुनील तटकरे ( अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ) : सभापती महोदय, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "खाण्यास अयोग्य असलेल्या लाल गव्हाची विदर्भात विक्री सुरु असणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, नाईलाजाने हा लाल गव्हाचा प्रश्न परतपरत उपस्थित करावा लागत आहे. नाईलाजाने म्हणण्याचे कारण असे की, सभागृहामध्ये यापूर्वी मंत्रिमहोदयांनी असे आश्वासन दिले होते की, या गव्हाचा साठा आम्ही रद्द केलेला आहे. धान्य दुकानांमध्ये हा खराब गव्हाचा साठा पोहोचला तो कशा पध्दतीने नष्ट करावा किंवा सरकार तो परत घेणार काय याबाबत काय सूचना दिल्या आहेत ? तांदूळ पाहिजे असेल तर हा लाल गहू घेतलाच पाहिजे अशी सक्ती ठिकठिकाणी रेशन दुकानदार करीत आहेत. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी लाल गव्हाचे वितरण चालू आहे. आपण निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, तो गहू एकत्रित केला. हा लाल गहू कोणत्या पध्दतीने दुकानांतून जमा केला ? त्याचे वितरण अजूनही चालू आहे.

श्री सुनील तटकरे : सभापती महोदय, लाल गव्हाचे वितरण ऑक्टोबर महिन्यापासून बंद केलेले आहे. ऑक्टोबर, 2007 पासून सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत हा गहू दिला जात नाही. हा सर्व गहू गोदामामध्ये जमा केलेला आहे. ज्या गोदामाकमध्ये हा गहू जमा केलेला आहे त्या गोदामातून प्रत्येक ठिकाणी आपण तो प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी पाठविलेला आहे. प्रयोगशाळेकडून त्याबाबतीत जे अहवाल आले त्यामध्ये ज्या गव्हाच्या बाबतीत मानवी खाण्यास योग्य असल्याचा अहवाल आला त्याबाबतीत आपल्या विहित पध्दतीप्रमाणे जाहीर निविदा काढलेली आहे. ज्या गव्हाच्या बाबतीत मानवी खाण्यास योग्य नाही परंतु पशुखाद्यास योग्य असल्याचा अहवाल आला आहे तो गहू पशुखाद्यासाठी डिस्पोजअप करण्याची जी विहित पध्दत आहे त्याप्रमाणे त्याच्या ग्रेडेशनसाठी त्या त्या प्रयोगशाळेमध्ये गेलेला आहे. ज्या गव्हाच्या बाबतीत अहवाल प्राप्त झालेला आहे त्याबाबतीत पुढची कार्यवाही सुरु आहे.

**सभापती** : यानंतर निवेदन क्रमांक 2 घेण्यात येईल.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, दुष्काळामध्ये गुरांसाठी हा गहू देणार काय ?

**सभापती** : नियम 93 च्या निवेदनाच्या संदर्भात कामकाज सल्लागार समितीमध्ये असा निर्णय झाला की, ज्यांनी तो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यांना 1 प्रश्न विचारण्यास परवानगी द्यावयाची. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे आणि त्यांना 1 प्रश्न विचारण्याची परवानगी दिलेली आहे. त्यानंतर मी निवेदन क्रमांक 2 पुकारले आहे.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, अनेक वेळा महत्वाच्या निवेदनावर सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन इतर सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची परवानगी देतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांना सांगू इच्छितो की, कामकाज सल्लागार समितीमध्ये याबाबत सविस्तर चर्चा झालेली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, यापुढे आपण सभागृहामध्ये एकाही निवेदनावर दुसरा प्रश्न विचारु देणार नाही काय ?

**सभापती** : कामकाज सल्लागार समितीमध्ये अशी चर्चा झाली की, कोणत्याही परिस्थितीमध्ये....

श्री. नितीन गडकरी : आम्ही हे मान्य केलेले नाही.

**सभापती** : आपण त्यावेळी उपस्थित नव्हता.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ही बाब अन्याय करणारी आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण असेही ठरविले की, ज्यावेळी एखादे महत्वाचे निवेदन असेल त्यावेळी आपल्या अनुमतीने प्रश्न विचारावयाचे.

श्री. नितीन गडकरी : काही प्रस्तावांवर प्रत्येक गटातील एका सन्माननीय सदस्यांनी बोलावयाचे असे आपण ठरवतो पण तसे होत नाही.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, आपण जे म्हणत आहात ते एखाद्या निवेदनाच्या बाबतीत ठीक आहे. सन्माननीय सदस्य मेहनतीने नियम 93 ची सूचना देतात आणि त्यावर शासनाकडून निवेदन येते. त्यावर सायक्लोस्टाईल पध्दतीने एक प्रश्न विचारुन आपण पुढे जाण्यापेक्षा आपल्याला महत्वाचे वाटले तर तो अधिकार आपल्याकडे आहे. तो अधिकार वापरुन आपण प्रश्न विचारण्यास परवानगी द्यावी.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, नियम 93 ची सूचना हे विरोधकांचे महत्वाचे शस्त्र आहे. त्याची वासलात एका प्रश्नाने लावणे योग्य नाही. कामकाज सल्लागार समितीने अशाप्रकारचा निर्णय घेतला आहे हे मला मान्य आहे. तो निर्णय सभागृहाने मान्य केला आहे असे झ ाालेले नाही. एखाद्या निवेदनानंतर एक-दोन प्रश्न विचारण्याची आपण परवानगी देणार आहात. परंतु ज्यावेळी एखादा विषय तातडीचा, सार्वजनिक महत्वाचा, गांभीर्याचा असतो त्यावेळी त्याची चर्चा सभागृहात होणे अपेक्षित असते. त्यादिवशी चर्चा झाल्यानंतर त्यावर निर्णय झाला पाहिजे अशी आमची अपेक्षा आहे. कामकाज सल्लागार समितीच्या माध्यमातून सभागृहामध्ये वापरले जाणारे शस्त्र काढून घेणे हा चुकीचा पायंडा पाडला जाईल. यासंबंधी सभागृहामध्ये चर्चा व्हावी, त्यानंतर आपण निर्णय द्यावा.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, शोक प्रस्तावावर केवळ गट नेत्यांनी बोलल्यानंतरही आपण आपले अधिकार वापरुन इतर सदस्यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे. हा प्रश्न अतिशय व्यापक स्वरुपाचा, महत्वाचा आहे. त्याच्यावर सभागृहात प्रश्नाच्या स्वरुपात चर्चा होणे आवश्यक आहे. बाकीच्या निवेदनांवर अधिक प्रश्न विचारण्यास दिले नाही तरी चालेल.

**सभापती** : कामकाज सल्लागार समितीमध्ये शोक प्रस्तावावर केवळ सदनाचे नेते, विरोधी पक्ष नेते आणि गट नेते यांनीच आपल्या भावना व्यक्त कराव्यात अशाप्रकारची चर्चा झाली होती. परवा सुध्दा शोक प्रस्ताव आला असताना गट नेत्यांच्या भाषणानंतर आणखी एक-दोन सदस्यांना बोलण्याची परवानगी देताना मी सदनाच्या निदर्शनास आणून दिले होते की, यापुढे शोक प्रस्तावावर सदनाचे नेते, विरोधी पक्ष नेते, गट नेते यांनाच शोक प्रस्तावावर आपल्या भावना व्यक्त करता येतील. एखादा अपवाद असेल त्यावेळी एखाद दुस-या सदस्यांना बोलण्याची परवानगी मी देईन.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीला सभागृहाचे नियम ठरविण्याचा अधिकार आहे काय असा माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये सभागृहाच्या नियमांची वासलात लावली जात असेल तर ते बरोबर नाही. आपण याबाबत खुलासा करावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सभागृहाच्या कामकाजाचे संचलन हे सर्व गट नेत्यांच्या व आपल्या मार्गदर्शनानुसार केले जाते. ती गोष्ट वेगळी आहे. कामकाज सल्लागार समितीने ठरविलेला कार्यक्रम सुध्दा सभागृहाच्या मान्यतेशिवाय अंतिम होत नाही. तेथे कामकाजाचा कार्यक्रम ठरला असला तरी त्याला नियमाचे स्वरुप असू शकत नाही. नियम 93 चा विषय महत्वाचा असल्यामुळे त्याला एका प्रश्नाचा नियम लावणे हे त्या प्रश्नावर अन्याय करणारे होईल. श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, नियम 93 वरील निवेदनाबाबत सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी महत्वाचा विषय उपस्थित केला आहे, त्याचे मी समर्थन करतो. आपल्याला नियम समितीसमोर जाऊन यामध्ये दुरुस्ती करता येते. सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी कायदेशीर मुद्दा मांडला आहे. कामकाज सल्लागार समितीने ठरविलेला कार्यक्रम देखील सभागृहामध्ये मंजूर करुन घेतला जातो. कामकाज सल्लागार समितीमध्ये 93 च्या निवेदनावर केवळ एकच प्रश्न विचारण्याचा निर्णय झाला असला तरी सदस्यांच्या प्रश्न विचारण्याच्या अधिकाराला कामकाज सल्लागार समिती बाधा आणू शकत शकत नाही. आपण या सर्वोच्च सभागृहाचे सभापती आहात, आपल्याला तो अधिकार आहे. एखादा महत्वाच्या विषयाबाबत आपण आपले अधिकार वापरले पाहिजेत. लाल गव्हाचा विषय महत्वाचा आहे. हा गहू खाल्यामुळे आमदार, मंत्र्यांची तब्येत बिघडली आहे, प्राण्यांना हगवण लागली आहे, माणसांना कॉलरा, डायरियाचा त्रास सुरु झाला आहे, या गव्हापासून तयार झालेला ब्रेड खाल्यामुळे लोकांना डिसेंट्री सुरु झाली आहे. गाई, म्हशी मरण्याची शक्यता आहे. या गव्हाचे 44 नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविल्यानंतर त्यांनी देखील हा गहू मानवास खाण्यास अयोग्य असल्याचे प्रमाणपत्र दिलेले आहे. या निवेदनामध्ये चुकीचे उत्तर देण्यात आलेले आहे. त्यामुळे आपण या निवेदनावर अधिक प्रश्न विचारण्यास परवानगी द्यावी.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, याचा वाईट व दुष्परिणाम असा होण्याची शक्यता आहे की, मंत्रिमहोदय अगदी ब्लाईंडली उत्तरे देतील. एका निवेदनावर एकच प्रश्न विचारण्याची अनुमती असल्यामुळे गोलमाल उत्तर देण्याचा प्रघात पडेल. त्यामुळे यासंबंधी आपण आपला अधिकार वापरावा.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, नियम 93 हा प्रश्नाच्या संदर्भात नाही. नियम 93मध्ये असे म्हटलेले आहे की, "निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करु इच्छिणारा सदस्य...". तेव्हा चर्चा उपस्थित करण्याविषयीचा हा नियम आहे. त्यामुळे एक प्रश्न विचारण्याची संधी देणे अयोग्य होईल असे मला वाटते. तेव्हा याबाबतीत आपण जरुर विचार करावा अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाच्या विषयावर एखादी सूचना दिली आणि ती सभापतींनी अपवाद म्हणून चर्चेसाठी स्वीकारली तर त्या विषयावर चर्चा होते. असा 93चा नियम आहे. परंतु माझ्याकडे आलेल्या नियम 93च्या सूचना न स्वीकारता त्याबाबतीत निवेदन करण्याचे निदेश दिले तर ते निवेदन सदनामध्ये येणे आवश्यक आहे. निवेदनावर अमर्याद चर्चा होता कामा नये. यापूर्वी काही वेळा असेही झालेले मी पाहिले आहे की, 93च्या अनुषंगाने आलेल्या निवेदनावर तीन तास चर्चा झाली आणि त्यानंतर शासकीय किंवा अशासकीय कामकाज करण्यासाठी देखील वेळ मिळाला नाही. हे मान्य आहे की, सभापतींना आणि सदनाला एखादे निवेदन किवा एखादा विषय अति महत्वाचा वाटला तर त्यावर एखाद दुसरा किंवा तिसरा प्रश्न विचारण्याची मी जरुर परवानगी दिलेली आहे. यासंदर्भात कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा झाली असून त्यानुषंगाने मी 15 तारखेला नियम समितीची बैठक बोलाविणार होतो. परंतु अधिवेशनापूर्वीचा माननीय मुख्यमंत्र्याचा चहापानाचा कार्यक्रम असल्यामुळे ती बैठक घेता आली नाही. येत्या दोन दिवसांमध्ये ही बाब नियम समितीच्या कक्षेत कशी आणता येईल हे बघून मी या संबंधीचा निर्णय घेतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी विदेशामध्ये पांढरी डुकरे खातात तो सडका, कुजका लाल गहू महाराष्ट्रातील गोरगरीब जनतेला उपलब्ध करुन दिला त्याबद्दल महाराष्ट्रातील जनतेच्या वतीने मी त्यांचे अभिनंदन करतो. या गव्हाच्या पोळ्या मी खाल्ल्या असून त्या चवदार आणि खाण्यास योग्य आहेत असे केंद्रीय कृषी मंत्र्यांनी सांगितल्याचे मी वृत्तपत्रातून वाचलेले आहे. या गव्हामुळे कॉलरा, गॅस्ट्रो या सारख्या रोगांची लागण झाली. डिसेण्ट्री केवळ माणसांना झाली असे नाही तर हेले आणि म्हशींना देखील

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी...)

ती झाली. या गव्हाचे 44 नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविलेले आहेत. हा गहू माणसांना खाण्यास योग्य नाही असे रिपोर्ट आल्याची माझी माहिती आहे. माहितीच्या अधिकारामध्ये मी माहिती मागविलेली असून ती माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. केवळ माणसांनाच नाही तर पशुंना देखील हा गहू खाण्यास योग्य नाही असा रिपोर्ट आहे. तेव्हा या गव्हाचे आपण काय करणार आहात ? या शासनाचा समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याचा एक चांगला प्रकल्प आहे. हा गहू बोटीमध्ये ठेवून माननीय मंत्री महोदयांच्या हस्ते तो समुद्रामध्ये सोडून त्यांची विल्हेवाट लावण्यात येणार आहे काय ? या गव्हाची विल्हेवाट लावण्यात येणार, म्हणजे नेमके काय करण्यात येणार आहे ? या गव्हाचा जनतेवर पडलेला भूर्दंड कशा प्रकारे वसूल करण्यात येणार आहे ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, एकंदर मानवी खाण्यास अयोग, परंतु पशुखाद्यास योग्य अशा पध्दतीचे नमुने प्राप्त झालेले आहेत.

श्री. नितीन गडकरी : अमरावती विभागातील किती नमुने प्राप्त झाले याची आम्हाला माननीय मंत्री महोदयांनी माहिती सांगावी.

श्री. सुनील तटकरे : मी यासंदर्भात मघाशी उत्तरे अगदी बरोबर दिलेले आहे. या विषयाबाबतची सर्व माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. यासंबंधीची सर्व माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे.

**सभापती** : आजच्या कार्यक्रमपत्रिकेत गव्हाच्या बाबतीत लक्षवेधी सूचना दाखविण्यात आलेली आहेत. एखाद्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नसेल तर लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी ते उत्तर सन्माननीय सदस्यांना घेता येईल.

श्री. सुनील तटकरे :सभापती महोदय, अमरावती विभागामध्ये 17 नमुने तपासणीसाठी पाठविले होते. हे 17 नमुने मानवी खाण्यास अयोग्य असल्याचा अहवाल आम्हाला प्राप्त झालेला आहे. अकोला विभागात 5 नमुने पाठविले.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, अमरावती येथून 47 नमुने फेरतपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते. त्यापैकी 44 नमुन्यांचे अहवाल प्राप्त झालेले असून तो मानवी खाण्यास अयोग्य असल्याचे आढळून आले. उर्वरित तीन नमुन्यांचे अहवाल अप्राप्त आहे. या 47 नमुने माणसांनाच नव्हे तर प्राण्यांना खाण्यास देखील अयोग्य आहेत असा अहवाल शासनास प्रयोगशाळेकडून प्राप्त झालेला आहे. मी सदरहू माहिती माहितीच्या अधिकारात मिळवून घेतली आहे. तेव्हा याबाबतीत सत्य काय आहे यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मी निवेदनातच म्हटले आहे की, 47 नमुने प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यापैकी 44 नमुने मानवी खाण्यास अयोग्य असल्याचे आढळून आले आहे. जे खाद्य मानवी खाण्यास अयोग्य असल्याचे आढळून आल्यानंतर ते नमुने पशुखाद्यास योग्य आहेत किंवा नाहीत यासाठी पुन्हा ते प्रयोगशाळेकडे फेर तपासणीसाठी पाठविले जातात. अशा प्रकारचे खाद्य पशुखाद्यास योग्य असले तर त्या खाद्याची विक्री करताना त्याचे ग्रेडेशन ठरविण्यासाठी दुस-या प्रयोगशाळेकडे नमुने पाठवित असतो. सदर खाद्य पशुखाद्यास

2...

श्री. सुनील तटकरे....

योग्य आहे किंवा नाही यासाठी त्याचे नमुने दुस-या प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आलेले असून त्या नमुन्यांचा अहवाल शासनाला अजून प्राप्त झालेले नाहीत. शासनाच्या पूर्वापार चालत आलेल्या निर्णयानुसार त्याची अंमलबजावणी केली जाईल.

**सभापती** : संपूर्ण राज्यात दुष्काळाचे सावट निर्माण झालेले आहे. आज महाराष्ट्रातील जनावरांना खाण्यासाठी चारा उपलब्ध नाही अशी वस्तुस्थिती आहे. म्हणून जो गहू पशुंना खाण्यास योग्य आहे, अशा गव्हाचे पशुखाद्य म्हणून राज्यातील शेतक-यांच्या जनावरांसाठी मोफत उपलब्ध करुन देण्यात येईल काय ?

श्री. सुनील तटकरे : सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा विचार केला जाईल.

--------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री. शिगम 13:50

**पृ. शी.** : विषयतज्ज्ञ कंत्राटी कर्मचा-यांच्या मानधनात कपात न करता त्यांना पूर्वीप्रमाणेच मानधन देणे

**मु. शी.** : विषयतज्ज्ञ कंत्राटी कर्मचा-यांच्या मानधनात कपात न करता त्यांना पूर्वीप्रमाणेच मानधन देणे याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर,जगदीश गुप्ता वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "विषयतज्ज्ञ कंत्राटी कर्मचा-यांच्या मानधनात कपात न करता त्यांना पूर्वीप्रमाणेच मानधन देणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, विषयतज्ज्ञा कंत्राटी कर्मचा-यांचे मानधन पूर्वी 10 हजार रुपये एवढे होते. सदरहू मानधनात कपात करुन ते 4 हजार रुपये करण्यात आले आहे. या कर्मचा-यांना पूर्वीप्रमाणे 10 हजार रुपये मानधन कसे मिळेल याबाबतीत शासन काय प्रयत्न करणार आहे ? या कर्मचा-यांना सेवेत कायम करुन घेण्यासाठी शासन काय प्रयत्न करणार आहे?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, विद्यार्थ्यांचा गुणवत्तेचा स्तर उंचविण्यासाठी विषयतज्ज्ञ आणि साधन व्यक्तिच्या नियुक्त्या सर्व शिक्षा अभियानातंर्गत शासनाने केल्या आहेत. त्यांना 10 हजार रुपये मानधन देण्यात येत होते. सर्व शिक्षा अभियानाने त्यांचे मानधन कमी केले असून त्यांना 4 हजार रुपये मानधन देण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु सदर मानधन वाढवून देण्यात यावे म्हणून शासनाने सर्व शिक्षा अभियानास कळविले आहे. 4 हजार रुपयांमध्ये विषयतज्ज्ञांना आणि साधन व्यक्तिंना फिरती करावी लागणार आहे. म्हणून सर्व शिक्षा अभियानाच्या दुस-या बजेटमधून 1200 रुपये प्रवास भत्त्यासाठी ॲडजेस करुन देण्याचे शासनाने ठरविले आहे.

श्री. कपिल पाटील : माननीय राज्यमंत्र्यांनी निवेदनात साधन व्यक्तीची पदे कंत्राटी पध्दतीने वार्षिक रुपये 50 हजार एवढया मानधनावर भरण्यास अनुमती दिली आहे असे म्हटले आहे. त्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे असे मला वाटते. विषयतज्ञ आणि साधन व्यक्तीचे मानधन 10 हजार रुपये मानधन देण्यास अनुमती दिली असेल तर ते मानधन अचानक 4 हजार रुपये करण्याचे कारण काय ? उर्वरित खर्चाचा भार राज्य शासनाने उचलला पाहिजे. तो भार राज्य शासन उचलेल काय ? अनेक लोक नोक-या सोडून 10 हजार मानधन मिळते म्हणून तेथे हजर झाले आहेत. आता शासन या व्यक्तींना फक्त 4 हजार रुपये मानधन देणार आहे. हा निर्णय विषयतज्ञ आणि साधन व्यक्तींवर अन्याय करणारा आहे. हा विषय गुणवत्तेशी निगडीत आहे, म्हणून विषयतज्ञ आणि साधन व्यक्तिंना पूर्णपणे मानधन देण्यासाठी शासन स्वत: भार उचलेल काय ?

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ही बाब न्याप्रविष्ट झालेली आहे. शिक्षक संघटनेचे म्हणणे आहे की, उमेदवार आमच्याकडून घ्या बाहेरुन घेण्याची आवश्यकता नाही. एक शिक्षक संघटना औरंगाबाद उच्च न्यायालयात गेली आहे. उच्च न्यायालयाने परिस्थिती जैसे थे ठेवली आहे. कंत्राटी पध्दतीने शिक्षक नेमण्याचे बंद झालेले आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, शिक्षणमंत्री सदनाची दिशाभूल करीत आहेत. कोर्टातील प्रकरण वेगळे आहे. नव्याने शिक्षक घेण्याबद्दलचे प्रकरण कोर्टात आहे. निवेदनामध्ये मानधनाचा विषय उपस्थित करण्यात आला आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, साधन व्यक्तिची पदे गरजेप्रमाणे कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी अनुमती मिळण्याच्या संदर्भातील हा मुद्दा आहे. कंत्राटी पध्दतीने पदे भरण्याकरिता शिक्षक संघटना न्यायालयात गेलेली आहे. न्यायालयाने स्थगनादेश दिलेला नाही.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शासनाने सिव्हील ॲप्लीकेशन केले आहे की पदे भरायला परवानगी द्या.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या प्रश्नावर कोर्टाचा स्थगनादेश नाही. सरकारला निर्णय घेण्याकरिता कोर्टाने बंधन टाकलेले नाही. इंटरीम ऑर्डर दिलेली नाही. फक्त प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. स्टे दिला असेल तर गोष्ट वेगळी होती.

श्री. हसन मुश्रीफ : श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, निवेदनातील दुसऱ्या परिच्छेदात स्पष्टपणे म्हटले आहे की, पदवीधर प्राथमिक शिक्षक संघ व केंद्रप्रमुख सभा, धुळे यांनी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्रमांक 5408/2006 दाखल केली होती. त्याप्रकरणी न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की साधन व्यक्तिची पदे प्रथम कार्यरत शिक्षकांमधूनच भरण्यात यावीत व ही कार्यवाही जून 2008 पर्यंत पूर्ण करावी. त्यामुळे जून 2008 नंतर साधन व्यक्ती पदावर कंत्राटी पध्दतीने नव्याने नियुक्त्या देण्यात येऊ नयेत असे आदेश देण्यात आले आहेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, यासंदर्भातील बाबी तपासून घेण्यासाठी आपण आपल्या दालनात बैठक घ्यावी.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : याविषयावर मी माझ्या दालनात उद्या सायंकाळी 4.30 वाजता बैठक बोलवीन. शिक्षक प्रतिनिधी आमदार आणि सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी या बैठकीला उपस्थित राहतील. संबंधित खात्याचे राज्यमंत्री आणि संबंधित अधिकारीही बैठकीसाठी उपस्थित राहतील.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, आम्हांला सुध्दा या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी निमंत्रण मिळणे आवश्यक आहे.

**सभापती** : होय.

-----

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : सिंधुदूर्ग जिल्हयातील वेंगुर्ले तालुक्यात धूप प्रतिबंधक बंधारे बांधणे

**मु. शी.** : सिंधुदूर्ग जिल्हयातील वेंगुर्ले तालुक्यात धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्याबाबत श्री. परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर ( खारभूमी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री. परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी "सिंधुदूर्ग जिल्हयातील वेंगुर्ले तालुक्यात धूप प्रतिबंधक बंधारे बांधणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, वर्षानुवर्षे समुद्राचे पाणी गावागावात घुसते आहे म्हणून धूपप्रतिबंधक बंधारे बांधण्याची आवश्यकता आहे. उत्तरामध्ये सांगितले आहे की, या कामासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. सिंधुदूर्ग जिल्हयाचा वार्षिक आराखडा 28 कोटींचा असताना त्यामध्ये 13 कोटी रुपये तरतूद करणे योग्य होणार नाही. म्हणून शासन यासाठी आणखी तरतूद करणार आहे काय ? मालवण तालुक्यातील देवबाग येथील साळगांवकर यांच्या घराकडे समुद्राचे पाणी घुसत असल्यामुळे येथे एका गावाची दोन गावे निर्माण होण्याची शक्यता आहे. म्हणून धूपप्रतिबंधक बंधारे बांधण्यासाठी शासन एस्टीमेट तयार करणार आहे काय ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हयातील वेंगुर्ले तालुक्यामध्ये धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्याची योजना आहे. त्यासाठी मेरीटाईम बोर्डने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

नंतर श्री. भोगले

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 14:00

निवेदन क्रमांक-3...... ॲड.प्रीतमकुमार शेगावकर........

त्यासाठी बजेट अंदाजपत्रक तयार केले आहे. परंतु जिल्हा नियोजन मंडळाकडे योजना असल्यामुळे तरतूद ही नियोजन मंडळामार्फत करणे गरजेचे आहे. बंधारे मंजूर आहेत परंतु नियोजन मंडळाकडून बजेट मिळाल्यानंतरच त्या कामाला सुरुवात होईल. शासनाकडून या कामाला पैसा दिला जात नाही. मेरिटाईम बोर्डाच्या निधीमधून व जिल्हा नियोजन मंडळाच्या योजनेतून निधी उपलब्ध होईल त्याप्रमाणे कामे घेण्यात येतील व आवश्यकतेप्रमाणे लवकरात लवकर कामे केली जातील.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, कोकणातील संपूर्ण किनारपट्टीवर अशा प्रकारच्या धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांची सातत्याने मागणी केली जाते. शासनाकडून कळविले आहे की, जिल्हा नियोजन मंडळाकडून तरतूद करुन घ्यावी. प्रशासकीय मान्यता मागील 10 वर्षापूर्वीच मिळालेली आहे. तांबळडेग, दांडी, उभादांडा, देवबाग, शिरोडा आदी ठिकाणी समुद्राच्या पाण्यामुळे शेतीचे, बागायतीचे नुकसान होत आहे. काही वस्त्यांमध्ये समुद्राचे पाणी घुसते. संपूर्ण किनारपट्टीच्या या बंधाऱ्यांसाठी शासन निधी देणार आहे का?

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : हा विषय जिल्हा नियोजन मंडळाच्या विकास आराखड्यामध्ये आहे.

**सभापती** : सन्माननीय मंत्रीमहोदय, सन्माननीय सदस्यांची भावना अशी आहे की, जरी राज्यस्तरीय योजना म्हणून शासनाने आज या योजनेला स्थान दिले असले तरी कोकणाच्या अनुषंगाने अत्यंत मुलभूत व महत्वाची योजना आहे. या योजनेला राज्यस्तरीय योजना म्हणून मान्यता देऊन त्या अनुषंगाने योजना राबविण्यात येईल का अशी सन्माननीय सदस्यांची भावना आहे. त्याचा पाठपुरावा करण्याबाबत आपण प्रयत्न करावा.

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, राज्य शासनाच्या बजेटमधील पैसा या कामाला उपलब्ध करुन दिला जात नाही. प्रत्येक जिल्हयाचे नियोजन मंडळ या कामासाठी पैसा देते. आवश्यकता आहे त्याप्रमाणे बंधारे बांधले जातात आणि तरतुदीप्रमाणे खर्च केला जातो.

डॉ.दीपक सावंत : विशेष बाब म्हणून मंजुरी देणे आवश्यक आहे. ते काम आपण करणार आहात का? नियोजन मंडळाव्यतिरिक्त शासनाकडे पाठपुरावा करणार आहात का?

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : शासनाच्या बजेटमध्ये तशी काही तरतूद नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-3......

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, मंत्रीमहोदय वारंवार सांगत आहेत की, नियोजन मंडळाकडून तरतूद करुन घ्यावी. नियोजन मंडळाचे बजेट 28 कोटी रुपयांचे असून बंधाऱ्यांच्या कामासाठी 13 कोटी रुपयांचे प्रस्ताव सुचविले आहेत. नियोजन मंडळाकडून 13 कोटी रुपये द्यायचे झाले तर अन्य विकास कामासाठी निधी उपलब्ध होणार नाही. त्यामुळे खास बाब म्हणून कोकणातील किनारपट्टीवर बंधारे बांधण्यासाठी शासनाच्या बजेटमधून अनुशेषांतर्गत निधी दिला जाण्याबाबत विचार करण्यात येईल काय?

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : याबाबत विचार करण्यात येईल.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मच्छिमारांना दिल्या गेलेल्या मासेमारी परवान्याची चौकशी होणे

**मु.शी.** : मच्छिमारांना दिल्या गेलेल्या मासेमारी परवान्याची चौकशी होण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ (मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "मच्छिमारांना दिल्या गेलेल्या मासेमारी परवान्याची चौकशी होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मच्छिमार कृती समितीचे श्री.दामोदर तांडेल यांनी असा धोका व्यक्त केला होता.  परदेशी न म्हणता परप्रांतातील बोटींना परवाने मिळाले आहेत.  म्हणून पहिल्याप्रथम शासनाने उत्तरामध्ये दुरुस्ती केली पाहिजे.  परदेशी या शब्दाऐवजी परप्रांतातील लोकांच्या बोटींना परवाने मिळाल्यामुळे बांगलादेशी, पाकिस्तानी लोकांच्या घुसखोरीचा धोका निर्माण झाला आहे.  देशाच्या सुरक्षिततेचा प्रश्न देखील निर्माण झालेला आहे.  स्थानिक मच्छिमारांवर अन्याय होत आहे.  म्हणून यापूर्वी दिलेल्या सर्व परवान्यांची चौकशी करावी आणि अशा पध्दतीचे लोक आढळून आले तर पूर्वी दिलेले सर्व परवाने रद्द केले जातील काय? स्थानिक मच्छिमार कृती समितीचे श्री.दामोदर तांडेल यांना विश्वासात घेऊन परवाने दिले जातील काय?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, परवाने देत असताना महाराष्ट्राचे रहिवासी तसेच अधिवास प्रमाणपत्र घेतल्याशिवाय नवीन परवाना दिला जात नाही किंवा पूर्वीच्या परवान्याचे नुतनीकरण केले जात नाही.

(नंतर श्री.भारवि..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ....

सभापती महोदय, कृती समितीने तक्रार दिली आहे. त्याची चौकशी आयुक्तांनी करण्याच्यासंबंधीचे आदेश शासनाने दिलेले आहेत. आता सर्व लायसेन्स रद्द करता येणार नाहीत. महाराष्ट्राचा रहिवासी असल्याशिवाय आम्ही लायसेन्स अजिबात देत नाही. यापुढे देखील आम्ही योग्य ती खबरदारी घेऊ.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यात खास करून गोवा राज्यातील मच्छिमारांच्या बोटी येतात. त्यांना पकडण्यासाठी गस्ती नौका ठेवण्यात आल्या आहेत. परंतु, त्यांना वेग नसतो. यासंबंधी सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. तेव्हा गती असलेल्या गस्ती नौका शासन विकत घेणार आहे काय ? सिंधुदुर्ग समुद्राच्या हद्दीत गोवा-गुजरात राज्यातील मच्छिमारांच्या बोटी मासेमारीकरिता येतात त्यांच्याविरूद्ध ठोस कारवाई करण्याकरिता शासन ठोस उपाययोजना करणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, वेगवान गस्तीनौका केंद्राने दिल्या होत्या. शासनाला त्या गस्ती नौकांचा मेंटेनन्स करणे जमले नाही. म्हणून त्या केंद्र शासनाला परत करण्याचा निर्णय घेतला. मग राज्य शासनाने चार गस्ती नौका भाड्याने घेतलेल्या आहेत. या गस्ती नौका कमी वेगाच्या आहेत काय ? हे तपासून पाहिले जाईल. अधिक वेगाच्या गस्ती नौका घेऊन परप्रांतीय मच्छिमार आपल्या सीमेत येऊन आपल्या मच्छिमारांचे नुकसान करणार नाहीत याची दक्षता घेऊ.

......

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शासनाच्या निर्णयामुळे वस्तीशाळा शिक्षकांमध्ये झालेली भयावह स्थिती.

**मु.शी.**: शासनाच्या निर्णयामुळे वस्तीशाळा शिक्षकांमध्ये झालेली भयावह स्थिती याबाबत श्री.कपिल पाटील,वि.प.स.यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.हसन मुश्रीफ (शिक्षण राजयमंत्री) : सभापती महोदय, श्री.कपिल पाटील,वि.प.स यांनी "शासनाच्या निर्णयामुळे वस्तीशाळा शिक्षकांमध्ये झालेली भयावह स्थिती" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मी पुढील निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, जे उर्वरित वस्तीशाळा शिक्षक आहेत आणि ज्या वस्ती शाळांचे रूपांतर पूर्ण वेळ शाळेत होऊ शकत नाही अशांचा समावेश नाविन्यपूर्ण किंवा महात्मा फुले शिक्षण अभियोजना यासारख्या योजनांमध्ये केला आहे, असे लेखी निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये नमूद केले आहे. या सगळ्या वस्ती शाळा शिक्षकांना निम शिक्षकांचा दर्जा दिला पाहिजे. अशाने शासनावर कोणताही आर्थिक भार पडत नाही. त्यांना सेवांतर्गत डी.एड.करायला परवानगी द्यावी अशाप्रकारची त्यांची मागणी आहे. ही मागणी शासनाच्या विचाराधीन आहे, असे नमूद करण्यात आले आहे. पण सेवांतर्गत केंद्र सुरू झालेली आहेत. त्यामुळे शासन ताबडतोबीने यासंबंधीचा जी.आर.निर्गमित करणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, राज्यामध्ये एकूण 8665 वस्तीशाळा शिक्षक आहेत. शासनाने अभ्यंकर समिती नेमली होती. पटसंख्या 10 च्या आत असलेल्या ज्या वस्ती शाळा होत्या त्या आपण बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार 686 वस्ती शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सन 2007-2008 मध्ये 3384 वस्ती शाळांचे प्राथमिक शाळेत रूपांतरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे व सन 2008-2009 या चालू वर्षामध्ये 1625 वस्ती शाळांचे प्राथमिक शाळेत रूपांतरण करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यामुळे 5695 वस्ती शाळांतील शिक्षकांना नियमित करण्याचा जी.आर.काढत आहोत. उर्वरित 2970 शिक्षक नियमित करण्याचे राहिलेले आहेत. त्यांना देखील लवकरात लवकर नियमित करण्यासंबंधी आम्ही केंद्र शासनाकडे पाठपुरावा करीत आहोत. त्यामुळे यासंबंधी ताबडतोबीने निर्णय घेता येणार नाही. या वस्ती शाळा बंद करता येणार नाहीत अशा प्रकारचे परिपत्रक दिनांक 9 जुलै 2008 रोजी आम्ही काढलेले आहे. या वस्ती शाळेतील शिक्षकांना कमी केले जाणार नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, ज्या वस्तीशाळांचे नियमित शाळांमध्ये रूपांतरण झाले आहे, तेथे 2 शिक्षक नेमण्याचे मान्य केले आहे. एक नियमित शिक्षक तर दुसरा सहायक शिक्षक म्हणून. आज माझ्या हातामध्ये पत्र मिळाले की, अनेक शिक्षणाधिकाऱ्यांनी या शिक्षकांना वस्तीशाळेमध्ये पाठविले आहे. कालच त्यांना ऑर्डर दिलेल्या आहेत. हे आपण तातडीने थांबविणार आहात काय ?

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे तक्रार द्यावी. त्यावर ताबडतोबीने कारवाई केली जाईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न होता. मंत्रिमहोदयांनी सांगितले की, त्यांना कमी केले जाणार नाही. परंतु, श्री.मोते यांनी सांगितल्याप्रमाणे अनेकांना कमी करण्यात आले आहे. या सर्व शिक्षकांना सेवेत सामावून घेऊन त्यांना निम शिक्षकाचा दर्जा देणे आणि सेवांतर्गत डी.एड.करण्याची संधी देणे यासंबंधीचा सुस्पष्ट जी.आर.शासन या आठवड्यात जारी करणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, यासंबंधी प्रोसेस सुरू आहे. यास वित्त विभागाने मध्यंतरीच्या कालावधीत परवानगी दिली नव्हती म्हणून जी.आर.निर्गमित करण्याचे राहून गेले होते. यासंबंधीचे आदेश आम्ही लवकरात लवकर काढू.

------

यानंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कोयना प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनाचे काम पूर्ण न होणे

**मु.शी.**: कोयना प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनाचे काम पूर्ण न होणे याबाबत श्री.संजय केळकर व इतर विधानपरिषद सदस्य यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री. संजय केळकर, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी "कोयना प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनाचे काम पूर्ण न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

.........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : महोदय, रायगड जिल्ह्याकरिता 10.65 कोटी व ठाणे जिल्ह्यासाठी 4.50 कोटी इतका निधी शासनाने कोयना प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी उपलब्ध करुन दिल्याचे निवेदनात म्हटले आहे. यातील किती रक्कम आतापर्यंत खर्च झालेली आहे आणि किती रक्कम शिल्लक आहे ? आणि पुढील काळात ज्या ज्या ठिकाणी हे प्रकल्पग्रस्त निरनिराळ्या गावांत वसलेले आहेत त्यांच्या पुनर्वसनासाठी किती निधी मिळणार आहे ? आणि आज ठाणे जिल्ह्यात 527 प्रकल्पग्रस्त आहेत, त्यापैकी 297 खातेदारांना जमिनी दिलेल्या आहेत, उर्वरित 230 लोकांना जमिनी देण्याची कार्यवाही किती दिवसात पूर्ण होणार आहे ? तसेच रायगड जिल्ह्यातील 757 खातेदारांपैकी फक्त 511 लोकांनाच पर्यायी जमिनी दिल्या असून उर्वरित 246 लोकांना किती दिवसात पर्यायी जमिनीचे वाटप होणार आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सन्माननीय सदस्यांनी कोयना प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या संदर्भात ही नियम 93 ची सूचना दिलेली असून त्या अनुषंगाने मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, रायगड जिल्ह्यातील 208 कामांसाठी 10.65 कोटी इतका निधी दिला आहे व त्यापैकी 191 कामे प्रगतीपथावर आहेत आणि या प्रगतीपथावर असलेल्या कामांवर 1.83 कोटी इतका निधी खर्ची पडलेला आहे, उर्वरित कामांना जागेअभावी सुरुवातच करता आली नाही. रायगड आणि ठाणे जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन वाटपाच्या संदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, ठाणे जिल्ह्यात सातारा जिल्ह्यातील 527 खातेदारांचे 12 वसाहतींमध्ये करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे रायगड जिल्ह्यातील एकूण 757 प्रकल्पग्रस्ताना त्यांच्या पसंतीप्रमाणे पर्यायी जमीन वाटप करण्यात आली असून या 250 खातेदारांना एकूण 259.64 हेक्टर एवढ्या जमिनीचे वाटप करण्यात आले आहे व काही जमिनीचे वाटप सुरु आहे. अशा प्रकारे कोयना प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन वाटपाच्या संदर्भात अथवा ज्या वसाहती स्थापन केलेल्या आहेत त्यामध्ये नागरी सुविधा देण्याबाबत असे विविध प्रश्न असतील त्यांच्या संदर्भात शासनाचे प्रयत्न सुरुच आहेत. कोयना प्रकल्प अत्यंत जुना असून राज्याला मोठ्या प्रमाणात वीज पुरवठा या प्रकल्पामार्फत होत आहे. त्यामुळे शासनाने याप्रकरणी लक्ष घालून विभागीय आयुक्तांच्या माध्यमातून ही समिती स्थापन केली आहे आणि त्यात संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनाही समाविष्ट करण्यात आलेले आहे. त्यानुसार आपापल्या जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांना जमिनीचे वाटप, पुनर्वसित वसाहतींना नागरी सुविधा, प्रकल्पग्रस्त म्हणून दाखले

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे ......

देण्याबाबतचे विषय अशा सर्व प्रश्नांचा आढावा घेण्याचे काम या समितीच्या माध्यमातून करण्यात येत आहे व त्या समितीचा अहवाल लवकरच अपेक्षित आहे. हा अहवाल आल्यानंतर ज्या ज्या लोकांना अशा सुविधा मिळाल्या नाहीत, त्यांच्या संदर्भात समितीच्या माध्यमातून कार्यवाही करण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : महोदय, मी स्वत: या प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत सभागृहात चार-पाच वेळा प्रश्न विचारलेला आहे. ज्यांनी आपल्या जमिनी प्रकल्पासाठी दिलेले आहे तो शेतकरी आज पूर्णपणे उद्ध्वस्त झालेला आहे. या निमित्ताने माझा असा प्रश्न आहे की, 527 खातेदारांपैकी 98 प्रकल्पग्रस्तांनाच नोकऱ्या मिळाल्या आहेत, बाकीच्या प्रकल्पग्रस्तांचे वय आता निघून गेले असेल, कारण प्रकल्प सुरु होऊन 43 वर्षे होऊन गेली आहेत. म्हणून शासनाने याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे की, शासकीय सेवेत कुठल्याही विभागात नोकऱ्या उपलब्ध करुन द्याव्यात, कारण त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त केलेले आहे, म्हणून त्यांना नोकरीत 100 टक्के प्राधान्य दिले पाहिजे. तसेच ज्या प्रकल्पग्रस्ताना अद्यापही नोकऱ्या मिळाल्या नाहीत, त्यांना आरक्षणाची टक्केवारी वाढवून शासन नोकऱ्या देणार आहे काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : महोदय, प्रकल्पग्रस्ताना नोकऱ्या देण्याच्या संदर्भात शासनाचे धोरण आहे व त्यानुसार 5 टक्क्याचे आरक्षण वर्ग-3 आणि वर्ग-4 च्या पदांसाठी आपण देतोच आणि इतर आरक्षण सुध्दा त्या त्या ठिकाणी असतेच. सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते खरे आहे की, प्रकल्पग्रस्त स्वत:ची जमीन प्रकल्पासाठी देतात, त्या जमिनीचा आपण त्यांना मोबदला देत असलो तरी अतिशय महत्वाची आणि अमूल्य अशी जमीन ते देतात म्हणून या प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देणे हे आपले कर्तव्य आहे हे मी समजू शकतो. म्हणून सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना तपासून पाहून या आरक्षणात कशी वाढ करता येईल याचा विचार करण्यात येईल ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : कोयना प्रकल्पग्रस्तांची तिसरी पिढी आज रायगडमध्ये आहे. कोयना प्रकल्पग्रस्तांचे किती ठिकाणी पुनर्वसन करणार आहात ? असा माझा माननीय पुनर्वसन मंत्र्यांना प्रश्न आहे. कोयना प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्यांचे पुनर्वसन सुरुवातीला रायगड जिल्हयात करण्यात आले. कोयनेवरुन या लोकांना खोपोलीमध्ये आणले नंतर खोपोलीवरुन पुन्हा धानसरला आणले आता धानसर गाव पुन्हा कोठे तरी पुनर्वसित करण्यात येणार आहे. या पुनर्वसित लोकांचे तीन तीन वेळा पुनर्वसन करण्यात येत आहे. एकप्रकारे या प्रकल्पग्रस्तांची चेष्टा चालली आहे. सभापती महोदय, आपण स्वत: कोयनेच्या जवळचे आहात. मागील वेळेस शासनाने जे उत्तर दिले होते तशाच प्रकारचे स्टिरिओटाईप उत्तर याही वेळी शासनाने दिले आहे. या प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याच्या दृष्टीने शासन काही धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, कोयना प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळावा, ही शासनाची भूमिका आहे. कोयना प्रकल्प हा अनेक वर्षापूर्वीचा आहे. कोयना प्रकल्पग्रस्तांची दुसरी पिढी, तिसरी पिढी आलेली असतांना त्यांना न्याय मिळालेला नाही, असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. मला स्वत:ला या गोष्टीची जाणीव आहे. कोयना प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्यासाठी शासनाने आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली असून कोयना प्रकल्पग्रस्त ज्या ज्या जिल्हयात विखुरले गेले आहेत त्या सर्वांची यादी बनवण्याचे काम शासन करीत आहे. या अगोदर तीन महिन्यात ही यादी बनविण्याच्या सूचना आयुक्तांना देण्यात आल्या होत्या. परंतु, आता ही माहिती एक महिन्याच्या आत गोळा करण्यात येईल. प्रकल्प्रस्तांच्या नोकरीचा प्रश्न असेल, जमिनीचा प्रश्न असेल, वसाहतींना निधी देण्याचा प्रश्न असेल या सर्व गोष्टींची माहिती घेतली जाईल व एक महिन्याच्या आत कोयना प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळेल या दृष्टीने शासन खबरदारी घेईल.

श्री. दिवाकर रावते : कोयना प्रकल्पग्रस्तांना अजून पर्याप्त न्याय न मिळाल्यामुळे या सदनाची मान शरमेने खाली गेलेली आहे. कोयना प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न हाताळणारे सध्याचे पुनर्वसन मंत्री हे आतापर्यन्तचे कितवे पुनर्वसन मंत्री आहेत ? असा प्रश्न पडतो. कोयना प्रकल्पामुळे प्रकल्पबाधित झालेल्या तिस-या पिढीला अजून न्याय मिळाला नाही. या तिन्ही पिढयांची मुले-बाळे, भाऊ वगैरे सर्वांचा पुनर्वसनामध्ये क्लेम असल्यामुळे घराघरात मारामा-या सुरु झाल्या आहेत. शासनाच्या नियमाप्रमाणे एका कुटुंबातील एकालाच नोकरी मिळणार आहे. जमिनी घेऊन

....2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते............

45 वर्षे उलटून गेल्यानंतरही जर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन होणार नसेल तर माननीय पुनर्वसन राज्यमंत्री सांगतात त्याप्रमाणे आयुक्त एका महिन्याच्या आत ही सर्व माहिती कशी गोळा करणार आहेत ? ज्यावेळेस या जमिनी शासनाने ताब्यात घेतल्या त्याच वेळी बुडून मरुन गेलो असतो तर बरे झाले असते, असे या प्रकल्पग्रस्तांना वाटत आहे. धानसर गावात मी तीनदा राहिलेलो आहे. शासनाने प्रकल्पाच्या वेळेस ज्या जमिनी घेतल्या त्यावेळेस त्या घरात जो कोणी कर्ता होता त्याला त्याच वेळेस नोकरी दिली असती तर प्रश्न निर्माण झाला नसता. हा सर्व दृष्टीकोन समोर ठेऊन या प्रकल्पग्रस्तांना मोबदला द्या, त्या पिढीला एकदाचे मोकळे करा आणि आपण सुध्दा मोकळे व्हा. प्रकल्पग्रस्तांचे जे दावे येतात त्यामध्ये लुटालूट चालू आहे. त्या ठिकाणी सगळी ॲडजस्टमेंट सुरु आहे. दाव्यामध्ये शासनाचे कोटयावधी रुपये खर्च होतात. 45 वर्षे उलटून गेल्यानंतरही कोयनेच्या प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळत नाही ही आपल्या सर्वांसाठी लज्जास्पद गोष्ट आहे. हा प्रश्न हाताळणारे आपण कितवे मंत्री आहोत, याची गणना करता करता माननीय पुनर्वसन राज्यमंत्र्यांना कंटाळा येईल. त्यामुळे आता माननीय सभापती महोदयांना प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने निदेश द्यावेत, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : कोयना प्रकल्प 1965 मध्ये झाला, त्यावेळेला महाराष्ट्र पुनर्वसन कायदा अस्तित्वात नव्हता. त्यावेळेस आपण भूसंपादनाची रक्कम देत होतो व पर्यायी गावठाण देऊन पुनर्वसन करीत होतो. नंतरच्या काळात स्वर्गीय वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात मी पुनर्वसन राज्यमंत्री असतांना प्रथम यासंदर्भातील विचार करण्यात आला. त्यावेळेला कायदा नसल्यामुळे प्रकल्पग्रस्तांना फक्त नुकसानभरपाई देऊन पाठविले जात होते. आजच्या भुसंपादन कायद्याच्या ज्या तरतूदी आहेत त्या सर्व तरतूदी कोयना प्रकल्पग्रस्तांना लावा. काही प्रकल्पग्रस्त रायगडमध्ये, काही साता-यात, काही सांगलीत होते तर काही प्रकल्पग्रस्त सोलापूरमध्ये होते. अशा चार जिल्हयात हे प्रकल्पग्रस्त विखुरलेले होते. मला असे वाटते की, याबाबतीत शासनाने एक काळजी घेतली, त्यांना ज्या ज्या ठिकाणी पर्यायी जमिनी दिल्या आहेत त्या जमिनींची विक्रीची परवानगी जर त्यांनी मागितली तर ती शासनाने दिली पाहिजे.

यानंतर श्री. गायकवाड....



VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 14.20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याचप्रमाणे अनअर्न्ड इनकम म्हणून 50 टक्के रक्कम भरण्याचा जो दंडक आहे तो सोडून देण्यात यावा. अशा प्रकारे जर करण्यात आले तर या प्रकल्पग्रस्तांचे कल्याण होणार आहे. पुणे जिल्हयातील उदाहरण मी देऊ इच्छितो. पूर्वी काही प्रकल्प्रस्तांसाठी शासनाने जमिनी दिल्या होत्या. परंतु दोन तीन पिढया होऊन गेल्या तरी या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झालेले नाही. नंतरच्या काळात तेथे उद्यागधंदे वाढल्यामुळे त्या प्रकल्पग्रस्तांनी अशी विनंती केली होती की आमाच्याकडील जमिनी उद्योगासाठी उद्योंगपती विकत घेत आहेत तेव्हा त्या जमिनी विकण्यासाठी शासनाने परवानगी द्यावी. त्यावेळी असा कायदा लावण्यात आला की शासनाने त्यांना या जमिनी दिल्या आहेत आणि अनअर्न्ड इनकम म्हणून 50 टक्के रक्कम त्यांनी भरावी. वास्तविक नंबर एकची वतन असणारी जमीन शासनाने ताब्यात घेतली आणि त्यांना दोन नंबरची जमीन दिली. होती. अशा परिस्थितीमध्ये पुणे विभागात असा निर्णय घेण्यात आला होता. म्हणून माझी माननीय मंत्रिमहोदयांना अशी विनंती आहे की, या प्रकरणात त्यांनी स्वत: लक्ष घालावे .त्याचप्रमाणे या संदर्भात मी माझ्या दालनातसुध्दा एखादी बैठक घेईन. त्या बैठकीच्या वेळी माननीय पुनर्वसन मंत्री आणि तुम्ही - आम्ही सर्वजण एकत्र बसून या प्रकल्पग्रस्ताचे हित कशामध्ये आहे हे आपण पाहू या. अशा प्रकारे जर आपण केले तरच तिस-या पिढीसाठी का होईना पण त्या पिढीला मदत करण्यासाठी आपण काही तरी केले असा त्याचा अर्थ होईल.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.**: श्री.सय्यद लाल यांना मधुमेहावरील इन्शुलीनचे इंजेक्शन घेऊ न दिल्यामुळे बुलढाणा पोलीस कस्टडीत त्यांचा झालेला मृत्यू
**मु. शी.** : श्री.सय्यद लाल यांना मधुमेहावरील इन्शुलीनचे इंजेक्शन घेऊ न दिल्यामुळे बुलढाणा पोलीस कस्टडीत त्यांचा झालेला मृत्यू याबाबत सर्वश्री दिवाकर रावते, गोपीकिसन बाजोरिया,डॉ.दीपक सावंत,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्य मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, गोपीकिसन बाजोरिया, डॉ.दीपक सावंत. यांनी " श्री.सय्यद लाल यांना मधुमेहापवरील इन्शुलीनचे इंजेक्शन घेऊ न दिल्यामुळे बुलढाणा पोलीस कस्टडीत त्यांचा झालेला मृत्यू " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...

...I

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



- निवेदनानंतर -

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, न्यायालयीन कस्टडीच्या संदर्भात पोलिसांची कोणती जबाबदारी आहे आणि न्यायालयीन कस्टडीत असलेला आरोपी तसेच पोलिसांच्या कस्टडीत असलेला आरोपी या संदर्भात नियमामध्ये कोणती तरतूद आहे ?एखादा आरोपी कस्टडीत गेल्यानंतर त्याला सुई, दोरा, टाचणी इत्यादी वस्तू जवळ बाळगता येत नाहीत असे असतांना हा आरोपी स्वत: इन्शुलीन घेत असल्याचे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. आरोपीला जर सुई जवळ बाळगता येत नसेल तर या आरोपीला इन्शुलीन कसे काय घेता येत होते ? त्याचबरोबर या आरोपीचा मृत्यू न्यायालयीन कस्टडीत झाला आहे असे म्हटलेले आहे तेव्हा पोलीस कस्टडी आणि न्यायालयीन कस्टडी यामध्ये आरोपीच्या बाबतीत काय फरक करण्यात येतो. ?

एक सन्माननीय सदस्य : याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी स्वत:चा अनुभव सांगू नये

श्री.सिध्दाराम म्हेत्रे :मला तो अनुभव नाही. पोलीस कस्टडी म्हणजे पी.सी.आर. ज्यावेळी पोलीस ठाण्यातील लॉक अपमध्ये आरोपीला ठेवण्यात येते त्याला पोलीस कस्टडी म्हटले जाते.जेल कस्टडी म्हणजे राज्यामध्ये जे मोठे जेल असतात त्यामध्ये जेव्हा आरोपींना ठेवण्यात येत असते तेव्हा ....

श्री.दिवाकर रावते : न्यायालयीन कस्टडीच्या बाबतीत खुलासा करावा.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे :सभापती महोदय, मी खुलासा करतो. पोलीस कस्टडी म्हणजे पोलीस स्टेशनमध्ये जे लॉकअप असते त्याला पोलीस कस्टडी म्हटले जाते आणि न्यायालयीन कस्टडी म्हणजे जेल होय....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मॅजेस्ट्रिअल कस्टडीमध्ये सुध्दा पोलीस गुन्हेगारांना ठेवते.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : एक विभाग असला तरी त्याचा अर्थ एकच आहे.

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना मी विनंती करतो या बाबतीत त्यांनी योग्य तो प्रकाश टाकावा. मॅजेस्ट्रिअल कस्टडीमध्ये जेलमध्ये ठेवतात. माननीय मंत्रीमहोदयांचे असे म्हणणे आहे की, मॅजेस्ट्रिअल कस्टडी म्हणजे जेल आहे. कधी कधी



श्री.नितीन गडकरी ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मॅजेस्ट्रिअल कस्टडीमध्ये पोलीस स्टेशनमध्येसुध्दा आरोपींना ठेवतात. तेव्हा याबाबतीत आपण एक्सपर्ट ओपिनियन द्यावे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी :सभापती महोदय, मॅजेस्ट्रिअल कस्टडी आणि पोलीस कस्टडी यामध्ये फरक आहे. एखाद्या आरोपीला पुढील चौकशी करण्यासाठी पोलिसांच्या ताब्यात ठेवले जाते.तेव्हा त्याला पोलीस कस्टडी म्हणतात. ज्यावेळी मॅजिस्ट्रेट एखाद्या गुन्हेगाराला मॅजेस्ट्रिअल कस्टडी देतात त्यावेळी ती पूर्णपणे ज्युडिशिअल कस्टडी असते. त्याला मॅजेस्ट्रिअल कस्टडी म्हणतात.

एक सन्माननीय सदस्य : त्यावेळी आरोपी कोठे असतो ?

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : त्यावेळी ज्युडिशिअल कस्टडीमध्ये आरोपी असतो व त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले जात नाही.

श्री नितीन गडकरी :सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी याबाबतीत खुलासा करावा.

श्रीमती उषा दराडे : आता त्यांनी जे काही सागितलेले आहे ते बरोबर आहे किंवा नाही हे संगण्यासाठी मी त्यांच्या इतकी सिनिअर नाही परंतु त्यामध्ये थोडी ॲडिशन अशी आहे की...

श्री.नितीन गडकरी : आपण खुलासा करण्यास घाबरत आहात काय ?

श्रीमती उषा दराडे : . मी कोणालाही घाबरत नाही. उलट मी त्यांचा आदर करते.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा एक साधा प्रश्न आहे की, मॅजेस्ट्रिअल कस्टडी दिली असतांना आरोपी पोलीस कस्टडीत राहतो काय ?

नंतर श्री.सुंबरे U

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, मॅजेस्ट्रिअल कस्टडीमध्ये असलेला आरोपी हा कारागृहातच ठेवला जातो आणि पोलिसांना चौकशीसाठी सदर आरोपी पाहिजे असल्यास त्यासाठी पोलिसांना न्यायालयाची परवानगी लागते. पोलीस कस्टडीमध्ये असलेल्या आरोपीला मात्र पोलीस केव्हाही चौकशीसाठी घेऊ शकतात.

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, हा आरोपी जेलमध्ये न्यायालयीन कस्टडीमध्ये होता.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, हा अत्यंत गंभीर प्रश्न आहे. हा जो आरोपी आहे, श्री.सैय्यद आरिफ सैय्यद लाल याला 3.6.2008 रोजी पोलिसांनी बुलढाणा येथे अटक केली. त्यानंतर त्याच्या घरच्या लोकांनी पोलिसांना सांगितले की, हा माणूस मधुमेहाचा रूग्ण असून त्याला रोज इन्सुलीनचे इंजेक्शन घ्यावे लागते तसेच त्याला बीपीचा देखील त्रास आहे. असे असतानाही पोलिसांकडून त्याबाबत कोणत्याही प्रकारची काळजी घेण्यात आली नाही. पोलिसांनी सदर आरोपीस बुलढाणाच्या सामान्य रूग्णालयात पाठविले. तेथील डॉक्टरांनी सांगितले की, आमच्याकडे इन्सुलीन नाही. त्यामुळे त्याने स्वत:च इन्सुलीन टोचून घेतले. नंतर पोलिसांनी त्याला एमसीआरमध्ये असताना औरंगाबाद येथील हॉस्पिटलमध्ये पाठविले. तेथे जात असताना त्याचा पोलिसांच्या निष्काळजीपणामुळे मृत्यू झालेला आहे. तेव्हा या प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करून त्यात सामान्य रूग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी तसेच या प्रकरणातील संबंधित पीएसआय, पीआय यांचेवर कारवाई आपण करणार काय ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : होय.

**सभापती** : ठीक आहे. आता नियम 93 खालील निवेदने संपली आहेत. यानंतर सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होऊन, दुपारी 3.00 वाजता पुन्हा भरेल.

( 2.27 ते 3.00 मध्यंतर )

( यानंतर श्री. सरफरे .....3इ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**औचित्याच्या मुद्दयासंबंधी**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. गेल्या दोन-तीन वर्षामध्ये झुणका भाकर केंद्र चालविणाऱ्या अनेक कुटुंबांना त्यांच्या उद्ध्वस्त होणा-या उदरनिर्वाहाच्या मार्गापासून थांबविल्याबद्दल मी प्रथमत: आपणास मनापासून धन्यवाद देतो. हा विषय आता त्यांना वरदान म्हणून मिळालेला आहे. ते लोक आपणाकडे मोठया अपेक्षेने पहात आहेत. मागील अधिवेशनामध्ये या सभागृहामध्ये या विषयी चर्चा झाल्यानंतर व आम्ही आग्रह धरल्यानंतर माननीय सभापतींनी या प्रकरणी स्वत: लक्ष घालून त्यांच्या दालनामध्ये बैठक आयोजित केली. त्या बैठकीला माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय संसदीय कार्यमंत्री, माननीय विरोधी पक्षनेते आणि मी स्वत: उपस्थित होतो. त्या बैठकीमध्ये या विषयावर मोठी साधकबाधक चर्चा झाली. त्या बैठकीमधील माननीय मुख्यमंत्र्यांची भूमिका ही नकारात्मक नव्हती ही त्यातील समाधानाची बाब आहे, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. त्या बैठकीमध्ये हा विषय समोर आल्यानंतर महाराष्ट्रामध्ये एकूण साडे चार हजार झुणका भाकर केंद्रे असून त्यातील फक्त 700 ते 750 केंद्रे चालू असल्याची माहिती मिळाली. ही केंद्रे चालू ठेवावयाची तर मग बाकीच्या केंद्रांबाबत काय करावयाचे असा प्रश्न निर्माण झाला. त्याबाबत एक वेगळी योजना पुढे आणून आपण तोडगा सुचवावा असे सांगण्यात आले असता, अधिकाऱ्यांनी अन्नपूर्णा नावाची एक वेगळया पध्दतीची योजना पुढे आणली. योजना आपण बदलायची नसते तर ती सरकारने बदलायची असते. आणि म्हणून त्यावेळी एक चांगली सूचना करण्यात आली तिचे माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वागत केले. त्यामध्ये सद्या जी 750 केंद्रे चालू आहेत ती तशीच पुढे चालू ठेवावयाची. आणि इतर साडे चार हजार केंद्राच्या बाबतीत आज महाराष्ट्रामध्ये महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण होत आहे, त्यांना बळ दिले जात आहे त्या महिला बचत गटाकडे ही केद्रे सुपूर्द करावीत. त्या केंद्रामार्फत खाद्य पदार्थाची निर्मिती करुन त्यांची विक्री करण्यास त्यांना स्थान मिळेल अशाप्रकारचा पर्याय माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वीकारला. माननीय मुख्यमंत्री सांगली येथे गेले होते त्यावेळी याबाबत त्यांनी भाष्य केले व ते दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रामध्ये छापून आले. याबाबत त्यांनी माननीय संसदीय कार्यमंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांना

DGS/ MMP/ KGS/

श्री. दिवाकर रावते....

तातडीने योजना बनवून आणि तिला शासनाच्या माध्यमातून मान्यता देऊन ती पुढे सुरु ठेवावी असे सांगितले. त्यानंतर मागील अधिवेशन संपले व आता हे अधिवेशन देखील संपेल. मागील अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्री दोन दिवसात नक्की निवेदन करण्यात येईल असे म्हणाले होते. परंतु याबाबतीत तांत्रिक अडचण असल्यामुळे मध्यंतरीच्या काळात शासनाची सहानुभूती असतांना सुध्दा अनेक ठिकाणी झुणका भाकर केंद्रे ताब्यात घेण्याचा प्रयत्न झाला. रायगड जिल्हयामध्ये एका केंद्र चालकाने स्वत:ला जाळून घेऊन आत्महत्त्या करण्याचा प्रयत्न केला. शेवटी जगायचे कसे? हा प्रश्न निर्माण होतो. बाप मारावयाचा नाही हे उत्तर शोधून माणूस स्वत:हून हाराकिरी करावयास तयार होतो. उपसभापती महोदय, आपल्या प्रयासाने आणि माननीय सभापतींकडे याबाबत आग्रह धरल्यानंतर माननीय सभापती, माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री यांनी त्याबाबत सकारात्मक भूमिका घेतली. मी त्यावेळी म्हणालो होतो की, दादांच्या हातात ही योजना असती तर ती एवढयात मार्गी लागली असती. जे खाते याबाबतीत काम करीत आहे त्या खात्याकडून न्याय कसा मिळेल ही आमची अपेक्षा आहे. हे अधिवेशन चार-पाच दिवसांनी संपणार आहे. तेव्हा या अधिवेशनाच्या निमित्ताने साडे सातशे केंद्र चालकांवर जी लटकती तलवार आहे ती आपण थांबविली पाहिजे. आज जिल्हाधिकारी सर्व ठिकाणी जात आहेत, काही ठिकाणी सील लावीत आहेत तर काही ठिकाणी ते तोडत आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 15:05

श्री.दिवाकर रावते . . . .

कुठे ही केंद्रे तोडत आहेत, काही ठिकाणी बुलडोझर लावण्यात येत आहेत. मी अनेक वेळा आपल्याला, तसेच सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री.सुनील तटकरेसाहेबांना फोन करावा लागतो. मी कधी-कधी संबंधित विभागाच्या सचिवांबरोबर सुध्दा बोलतो, विनंती करतो. पण हे असे किती दिवस सुरु रहाणार आहे ? हा प्रश्न आहे. मग ते संबंधित ठिकाणी फोन करुन सांगतात. मी माननीय संसदीय कार्य मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनाही फोन करुन सांगितले. यावर त्यांनी असे सांगितले की, याबाबतीत ताबडतोब सूचना सर्व आयुक्तांना देतो. तरी सुध्दा काही ठिकाणी ही केंद्रे तोडण्याचे काम सुरु राहिले. म्हणून मी आपल्याला पुन्हा एकदा विनंती करतो की, आपण आता हा विषय गांभीर्याने घ्यावा आणि माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी याबाबतीत जे काही धोरण तयार केलेले असेल तर त्याचा मसूदा किमान तात्पुरता मानून, त्याबाबतीत माननीय मंत्री महोदयांचा निर्णय होईपर्यंत सध्या जी केंद्रे आहेत, ती तशीच सुरु रहावीत अशा प्रकारची सकारात्मक भूमिका शासनामार्फत मांडण्यात यावी अशी मी शासनाला विनंती करतो. तसेच सभापती महोदय, आपण याबाबतीत पुढाकार घ्यावा अशी आपल्याला विनंती करतो. धन्यवाद.

**उपसभापती** : मी यासंदर्भात काय झाले होते, याची एका मिनिटामध्ये माहिती देतो. हा प्रश्न जेव्हा वारंवार उपस्थित करण्यात आला, तेव्हा आदरणीय मुख्यमंत्री, आदरणीय उप मुख्यमंत्री, सभागृहातील बहुतेक सर्व पक्षांचे गटनेते यांची माननीय सभापतींच्या दालनामध्ये एक संयुक्त बैठक बोलाविण्यात आली होती. तेव्हा असेही सांगण्यात आले की, या योजनेला पर्यायी दुसरी योजना निर्माण करता येईल का ? यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी, माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना तशा सूचना दिल्या होत्या की, आपण यासंदर्भात जरा विचार करुन एखादी पर्यायी उपाययोजना सुचवावी. परंतु अजून तशा प्रकारची पर्यायी योजना समोर आल्याचे दिसत नाही. कारण ती योजना सदनामध्ये येण्यापूर्वी मंत्रिमंडळासमोर सादर केली जाईल असे मला वाटते. त्यावेळी काही सन्माननीय सदस्यांनी अशी सूचना केली की, आतापर्यंत जी केंद्रे पाडण्यात आली आहेत, ते ठीक आहे. पण जी केंद्रे शिल्लक आहेत, त्यांच्या बाबतीत किमानपक्षी शासनाचे धोरण ठरेपर्यंत तरी हात लावू नये. ही केंद्रे आहेत त्याच ठिकाणी ठेवण्यात यावीत आणि असे ठरलेले होते ही वस्तुस्थिती आहे. त्यानंतर देखील असे काही प्रकार झाले असतील तर मलाही त्याची काही कल्पना नाही. पण सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे याबाबतीत शासनाचे

. . . .3 एफ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** . . . .

नेमके धोरण काय आहे ? त्याची माहिती अधिवेशन संपण्यापूर्वी सांगितली किंवा संबंधित अधिकाऱ्यांना तशा प्रकारच्या सूचना देण्यात आल्या तर ते योग्य होईल असेच सन्माननीय सदस्यांना म्हणावयाचे असावे असे मला वाटते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शासनाचे यासंबंधातील धोरण ठरेपर्यंत या केंद्राना हात लावू नये अशा प्रकारच्या अधिकाऱ्यांना सूचना देण्यास हरकत नाही.

**उपसभापती** : शासनाचे याबाबतीत धोरण ठरेपर्यंत या केंद्रांना हात लावू नये असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. सन्माननीय सदस्यांनी येथे अपेक्षा व्यक्त केलेली आहे की, शासनाने अधिवेशन संपण्यापूर्वी येथे माहिती द्यावी. मला असे वाटते की, याबाबतीत उद्या संध्याकाळच्या आत निवेदन केले तर ते जास्त ॲप्रोप्रिएट होईल.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सदनामध्ये या विषयाच्या संदर्भात अधिवेशन संपण्यापूर्वी निवेदन करण्यात येईल. कारण मला याबाबतीत जास्त माहिती नाही. एकदा मंत्रिमंडळा मध्ये हा विषय उपस्थित करण्यात आला होता. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांनी, तसेच आपणही जे काही सुतोवाच केले आहे, त्या सर्व घटना मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर घडलेल्या आहेत. त्यामुळे कोणतेही नवीन धोरण स्विकारुन ते संबंधित विभागाने अंमलात आणावयाचे ठरविले तर तशा प्रकारचा नवीन प्रस्ताव अजून तरी मंत्रिमंडळापुढे आलेला नाही. परंतु मी ही गोष्ट शासनाच्या आणि संसदीय कार्य विभागाचे मंत्री श्री.हर्षवर्धन पाटीलसाहेब आणि अन्न व नागरी पुरवठा विभागाचे मंत्री श्री.सुनील तटकरे यांच्या निदर्शनास आणून देईन की, सदनामध्ये या विषयावर अशी-अशी चर्चा झालेली आहे. सभापती महोदय, आपल्या अशा सूचना आहेत की, या विषयाच्या संबंधातील निवेदन उद्या सभागृहासमोरील कामकाज संपण्यापूर्वी करण्यात यावे.

**उपसभापती** : नाहीतर अधिवेशन संपण्यापूर्वी निवेदन करण्यात यावे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, किंवा अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबतचा निर्णय व्हावा.

-----

. . . .3 एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्याबाबत

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आज एका वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर असा फोटो छापलेला आहे की, रायगड किल्ल्यावर काही तरुण मुले दारु पित आहेत. याबाबतीत वृत्त देखील प्रसिध्द झालेले आहे की, काही मुले तेथे सहलीला गेली होती. त्यांचे हेडमास्तर मुलांना तेथे सहलीसाठी घेऊन गेले होते. या हेडमास्तरांनी मुलांना हटकल्यानंतर दारुच्या नशेमध्ये तरर्र असलेल्या या युवकांनी मुख्याध्यापकांना, शिक्षकांना शिव्या दिल्या आणि त्यांची अर्वाच्य भाषेमध्ये हेटाळणी केली. आज याबाबतचे सविस्तर वृत्त वृत्तपत्रामध्ये छापून आलेले आहे. तसेच ती मुले दारु पित असल्याचा फोटो देखील छापून आलेला आहे. एकीकडे महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन पुढे जात आहे आणि जेथे छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला, तेथे जर असे प्रकार होणार असतील तर ही महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने लांच्छनास्पद बाब आहे.

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी या विषयाच्या संबंधात नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. त्यावर . . . .

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, हा अतिशय संवेदनाशील विषय आहे.

**उपसभापती** : यासंबंधात शासनाने निवेदन करावे असे आदेश देण्यात आलेले आहेत. आता आपण पुढील कामकाजास सुरुवात करु या.

----

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात राज्य लॉटरीच्या नावाखाली बेकायदेशीर एक अंकी ऑन लाईन लॉटरी सुरु असणे

**मु. शी.** : राज्यात राज्य लॉटरीच्या नावाखाली बेकायदेशीर एक अंकी ऑन लाईन लॉटरी सुरु असणे यासंबंधी सर्वश्री दिवाकर रावते, अरविंद सावंत, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री अनिल परब, किरण पावसकर, सुरेश जेथलिया, परशुराम उपरकर, किसनचंद तनवाणी, गोपीकिसन बाजोरिया, डॉ. दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वित्त मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्य लॉटरीच्या नावाखाली बेकायदेशीर एक अंकी ऑनलाइन लॉटरी राज्याच्या बहुतांश व विशेषत: मुंबई शहरात सुरु असणे, लॉटरी कायद्यांतर्गत खाजगी संचालकांवर कारवाई करण्याचे अधिकार राज्य शासनाला असणे, ऑन लाइन इंटरनेंट लॉटरीच्या घोटाळ्याबाबत शासनाकडे आलेल्या तक्रारीची गुप्तचर विभागाकडून करण्यात आलेली चौकशी व चौकशीचा अहवाल सीआयडीने शासनाला सादर केलेला असणे, राज्यात भूतान, पंजाब, हरियाणा आदी दहा राज्यामधील इंटरनेट लॉटरी, वीन लॉटरी आदी दहा लॉटऱ्या ऑनलाइन एक व दोन अंकी, दहा अंकी लॉटरी आदींची दर पंधरा मिनिटाने सोडत सुरु असणे, एक अंकी लॉटरीच्या 254 सोडती रोज काढण्यात येणे, राज्य लॉटरीच्या नावाखाली अवैध लॉटरी सोडत सुरु असणे, सदर लॉटऱ्या या खाजगी असून हे लॉटरी चालक शासनाची व पोलिसांची करीत असलेली फसवणूक, त्यामुळे लॉटरी कायद्यांचा भंग होत असणे, काही खाजगी लॉटरींना या राज्यात सोडत काढण्याची राज्य लॉटरी संचालनालयाने दिलेली बेकायदा परवानगी, लॉटरीशी काही संबंधित व्यक्ती व कंपन्यांनी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्री. दिवाकर रावते .....

कायद्याचे उल्लंघन करुन शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल रोज बुडत असताना लॉटरी संचालनालयातील अधिकारी खाजगी लॉटरी संचालकांना पाठीशी घालत असणे, लॉटरी घोटाळा हा मुद्रांक शुल्कापेक्षा अधिक व्यापक असून त्याकडे राज्य शासनाने केलेलें अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट, याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. जयंत पाटील ( वित्त मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मुळात हा जो राज्य लॉटरीच्या संदर्भातील विषय या ठिकाणी आलेला आहे त्यामध्ये कायदेशीर तरतुदींच्या अहवालाच्या संदर्भात उल्लेख केलेला असल्यामुळे हा विषय गृह खात्याकडे जावयास पाहिजे होता परंतु माननीय माननीय वित्त मंत्र्यांकडे हा विषय आला आहे. माननीय वित्त मंत्र्यांनी उत्तर दिले तरी चालेल. यासंदर्भात मी माननीय मंत्रिमहोदयांना स्पेसिफिक प्रश्न विचारतो. कारण 52 हजार कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल यामध्ये होत आहे. मी आधीच खुलासा करतो की, ज्या राज्य लॉटरी छापील कागदावर आहेत आणि ज्यावर कोणत्याही राज्याचा सरकारी शिक्का आहे त्याबाबतीत जोपर्यंत आपली लॉटरी बंद करीत नाही तोपर्यंत आपल्याला कायद्याप्रमाणे दुसऱ्या लॉटऱ्या बंद करता येत नाहीत. परंतु त्यासंदर्भातील हा प्रश्न नाही किंवा त्या लॉटऱ्या विकून जे उपजीविका करतात त्यासंदर्भातला सुध्दा हा प्रश्न नाही. ऑन लाईन लॉटरी म्हणजे मटक्यासारखे दर 15-15 मिनिटाला सोडत काढतात. सभापती महोदय, इंटरनेट लॉटरी, विनलॉट, गोल्डविन, कॉम्प्लॉट, पिकलॉट, सनलॉट, प्ले वीन, दणादण, लोटस, स्मार्ट वीन, विवेन अशा ऑन लाईन लॉटऱ्या आहेत आणि एक एक लॉटरी दिवसाला 254 ते 255 लॉटऱ्या काढतात. म्हणजे दिवसाला 5 हजारच्या वर लॉटऱ्या काढतात. या माध्यमातून जवळजवळ 52 हजार कोटीची वार्षिक उलाढाल होते. एवढ्या मोठ्या प्रमाणावर हे सर्व कॅशमध्ये चालते. सर्वसामान्य गरीब माणूस जे पैसे कमावतो तो या जुगारात पैसे मिळतील या नादामध्ये आपल्या घामाचे, कष्टाचे पैसे ओततो. एकवेळ दारुचे व्यसन परवडेल परंतु हे व्यसन नको असे म्हणण्याची पाळी काही कुटुंबांवर आलेली आहे, अशी भयानक परिस्थिती आहे. मी माननीय मंत्रिमहोदयांना प्रश्न विचारु इच्छितो की, लॉटरी विषयक कायद्यातील तरतुदीनुसार खाजगी लॉटरी चालकांवर कारवाई करण्याची आवश्यकता आहे असे नमूद करणारा राज्य गुप्तचर विभागाचा गोपीनीय अहवाल गृह खात्याकडे 7 महिन्यांपूर्वी पाठविण्यात आला हे खरे आहे काय ? सी.आय.डी.चे अतिरिक्त महासंचालक श्री. एस.पी.एस. यादव यांनी याबाबत चौकशी पूर्ण करुन 2 नोव्हेंबर, 2007 रोजी राज्याच्या पोलीस महासंचालकांना अहवाल पाठविला हे खरे आहे काय ? मघाशी मी जे सांगितले त्याप्रमाणे राज्य लॉटरीच्या नावाखाली हा एवढा मोठा प्रकार सुरु आहे. या सगळ्या ज्या लॉटऱ्या आहेत त्यामध्ये कल्याण मटका आणि त्याच्यासारखे त्या त्या राज्यातील सगळे

...4...

श्री. दिवाकर रावते .....

मटकेवाले आहेत. या लॉटऱ्या सरकारच्या नाहीत. ऑन लाईन लॉटऱ्या या खाजगी लोकांच्या आहेत. ही लॉटरी कोठली असे विचारले तर बिहार राज्यातील आहे, ही लॉटरी कोठली आहे असे विचारले तर मध्यप्रदेशची आहे असे सांगितले जाते. आपल्याला असे वाटते की, त्या त्या राज्यांच्या या लॉटऱ्या आहेत. ती लॉटरी त्या राज्याची नसते तर त्या राज्यामध्ये असलेल्या लॉटरी माफियांच्या माध्यमातून हे सगळे आकडे ऑन लाईनवर चालतात. या लॉटऱ्या ते खाजगीरित्या चालवित असून पोलीस आणि शासनाची दिशाभूल करीत आहेत. शासन त्यांच्यावर पोलीस कारवाई करणार काय ? लॉटरीवर बंदी घालणे हा सर्वस्वी राज्य लॉटरी महासंचालनाचा अधिकार आहे काय ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, हा विषय राज्य सरकारच्या लॉटरीच्या संदर्भात नाही असे माननीय सदस्यांनी सांगितले आहे. राज्याने ऑन लाईन लॉटरी 16 ऑक्टोबर, 2006 पासून बंद केलेली आहे. दोन अंकी लॉटरी देखील 20 जानेवारी, 2007 पासून बंद आहे. आपल्या सरकारची लॉटरी सध्या आपण चालवित नाही. ज्या पारंपारिक लॉटऱ्या आहेत त्या मात्र चालू आहेत. अशा सहा-सात लॉटऱ्या असतात. आपल्या सभागृहाच्या लक्षात असेल की, 30 नोव्हेंबरला राज्य सरकारने वेळेचे नियमन करणारे नोटिफिकेशन काढले होते. मी स्वत: पुढाकार घेऊन या राज्यात अन्य राज्यांच्या ज्या लॉटऱ्या चालतात त्या सगळ्यांना एकत्रित बोलवून माननीय गृह मंत्र्यांच्या उपस्थितीत एक बैठक घेतली आणि काही नियम पाळून त्यांनी कामकाज करावे असे आवाहन केले. अशा स्वरुपाचे आवाहन करताना आपण जो टॅक्स बसविणार आहोत तो टॅक्स त्यांनी मान्य करावा अशा स्वरुपाची चर्चा देखील झाली.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील....

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उल्लेख केला की, परराज्यातील लॉटरी आपल्या राज्यामध्ये चालते. राज्य सरकारने काही प्रमाणात बंधन घालून अशा लॉट-या चालविल्या नाही. मधल्या काळामध्ये या लॉट-या बंद केल्या आहेत. परंतु परराज्यातील लॉट-या मोठया प्रमाणावर सुरु आहेत. त्यांनी नियमांचे उल्लंघन केले आहे काय याचा तपशीलवार अभ्यास केल्यानंतर असे लक्षात आले की, ते नियमांना धरुन लॉटरीचे काम चालवितात. तथापि, राज्यामध्ये मोठया प्रमाणावर स्क्रॅच लॉट-या चालू आहेत. कालच एक शिष्टमंडळ मला भेटले होते. या स्क्रॅच लॉट-यांसंबंधी माझ्याकडे तक्रारी प्राप्त झाल्यामुळे मी ठाणे शहराच्या पोलीस आयुक्तांशी बोललो आहे. या झटपट लॉट-या खाजगी स्वरुपात चालविल्या जातात. त्याचे तिकिट घेऊन ते स्क्रॅच केल्यानंतर त्यावर नंबर येतो आणि तो नंबर पाहून बक्षिस दिले जाते. अशा स्वरुपाच्या लॉट-यांचा राज्यात सुळसुळाट झाला आहे. खरे तर कायद्याने याला बंधन आहे. अशा लॉट-या चालविता येत नाही. पण अशा लॉट-या चालू असल्याच्या तक्रारी माझ्याकडे आलेल्या आहेत, त्यामुळे मी या तक्रारी माननीय गृहमंत्र्यांकडे पाठविल्या असून त्या तक्रारींवर विभागाकडून योग्य ती कारवाई केली जाईल.

डॉ.दीपक सावंत : प्लेविन नावाची ऑन लाईन लॉटरी आहे ती कोठे चालवावी, त्याचे सेंटर कोठे असावे यासाठी शासनाने त्यांना नियम घालून दिले आहेत काय, हे लॉटरीवाले शाळेजवळ नसावेत, दारुच्या दुकानाजवळ असावेत असे नियम आहेत काय ? असल्यास सभागृहाला त्याची माहिती द्यावी.

श्री.जयंत पाटील : अशा स्वरुपाचे स्पेसिपिक निकष घालून दिलेले नाहीत. परंतु अशा स्वरुपाच्या लॉटरीसाठी त्यांना टर्मिनल उभे करावयाचे असेल तर त्यांनी कर भरावा असा एक प्रस्ताव तयार केला होता. परंतु विधी विभागाने त्यासंबंधी वेगळे मत दिल्यामुळे वित्त विभागाने पुढील कार्यवाही केलेली आहे. एखाद्याने टर्मिनल सुरु केले तर त्यांना थोडासा जास्त कर द्यावा असा प्रस्ताव केलेला आहे, त्याला अंतिम स्वरुप आलेले नाही. त्याचप्रमाणे त्यांनी ठराविक ठिकाणी लॉटरी चालवावी किंवा नाही अशा स्वरुपाचे बंधन त्यांच्यावर घातलेले नाही. मात्र वयाची अट घातलेली आहे.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : राज्यामध्ये जवळजवळ 25 हजार झटपट लॉटरी सेंटर्स आहेत आणि त्यामध्ये 1.50 लाख लोक काम करीत आहेत. आजच दुष्काळाची परिस्थिती असताना हया लॉट-या बंद झाल्या तर मोठया संख्येने लोक बेरोजगार होतील. या सेंटरमध्ये काम करणारे लोक कमी शिकलेले असतात. ते लोक कमी जागेमध्ये काम करतात. या लॉट-या बंद केल्यामुळे जे बेरोजगार होतील त्यांना रोजगार उपलब्ध करुन दिला जाणार आहे काय ?

श्री.जयंत पाटील : मला वाटते की, सन्माननीय सदस्यांचा काही तरी गैरसमज झालेला दिसतो. अधिकृतपणे लॉटरी चालविली जाते त्याच्यावर अवलंबून असणारी मुले आहेत त्यांच्या रोजंदारीचा प्रश्न उद्‌भवत नाही. परंतु जे अनधिकृतपणे लॉटरीचा व्यवसाय करतात....

श्री.दिवाकर रावते : सभागृहात चुकीचे रेकॉर्डवर येत आहे म्हणून मी बोलत आहे. इतर राज्यातील ज्या अधिकृत लॉट-या आहेत त्या बंद कराव्यात अशी आमची मागणी नाही. त्यामुळे त्या लॉट-यांवर उपजीविका करणारे लोक उपाशी मरतील असा प्रश्नच येत नाही. पण भगवा, कल्याण नावाचा मटका चालू होता. त्याप्रमाणे इतर राज्यातील ऑन लाईन लॉट-या चालतात ज्याला मटका म्हणता येणार नाही परंतु मटक्या सारख्या लॉट-या चालतात त्यासाठी हा विषय मांडलेला आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती म्हात्रे यांचे म्हणणे आहे की, या लॉट-या बंद केल्यामुळे अनेकजण बेरोजगार होतील. मग मटक्याला सुध्दा नियमित करावे लागेल.

श्री.जयप्रकाश छाजेड : माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले की, एखाद्याला या लॉटरीसाठी टर्मिनल उभे करावयाचे असेल तर त्यासाठी जादा कर द्यावा लागेल. दारुचा बार शाळेजवळ, मंदिराजवळ असू नये असा शासनाने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. पण या लॉटरीबाबत शासन वयाची अट घालणार आहे. लॉटरी चालविणारे कोण किती वयाचे आहेत हे कोण पाहणार आहे ?

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(श्री. जयप्रकाश छाजेड...)

तेव्हा याबाबतीत शासनाचे नियंत्रण राहील आणि शाळा, मंदिर या ठिकाणी ही लॉटरीची टर्मिनल्स उभी राहाणार नाहीत असे धोरण शासन घेणार आहे काय ?

श्री. जयंत पाटील : शाळेपासून विशिष्ट अंतरावर ही टर्मिनल्स नसावित असे धोरण निश्चितपणे घेण्यात येईल. शाळेच्या जवळपास देखील ऑन लाईन लॉटरी टर्मिनल्स नसावीत, पेपर लॉटरी मी समजू शकतो. परंतु ऑन लाईन लॉटरी टर्मिनल्स शाळांजवळ नसावित यासाठी नवी आचारसंहिता जारी करण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एकूण किती लॉटरी विक्रेते आहेत ? त्यातील पेपर लॉटरी विकणारे आणि ऑन लाईन धंदा करणारे किती आहेत ? त्यांची नोंद शासनाकडे आहे काय ? बसस्टॉपच्या शेजारी देखील ही लॉटरी टर्मिनल्स असू नयेत. बसस्टॉपवर महिला उभ्या राहू शकत नाहीत अशी परिस्थिती आहे. तेव्हा बसस्टॉप शेजारी ही लॉटरी टर्मिनल्स न ठेवण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय ?

श्री. जयंत पाटील : बसस्टॉपच्या शेजारी ही लॉटरी टर्मिनल्स असू नयेत ही सन्माननीय सदस्यांनी केलेली मागणी मान्य करता येणार नाही. परंतु शाळेच्या संदर्भातील मागणी मान्य करतो. लॉटरी विक्रेत्यांच्या एकत्रित नोंदीची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ती माहिती मी पटलावर ठेवण्याची व्यवस्था करतो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MMP/ 15:20

**पृ. शी.** : बल्लारपूर (जि. चंद्रपूर) येथील वन विभागात झाडांची होत असलेली अवैध तोड

**मु. शी.** : बल्लारपूर (जि. चंद्रपूर) येथील वन विभागात झाडांची होत असलेली अवैध तोड यासंबंधी सर्वश्री जैनुद्दीन जव्हेरी व संजय दत्त,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वने मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"बल्लारपूर (जि. चंद्रपूर) येथील भामरागड, सिरोंचा, आलापल्ली, मध्यचांदा या वन विभागातील जागतिक किर्तीच्या व किंमती लाकडांची वन अधिकारी यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात अवैधरित्या तोड करुन त्याची कोट्यवधी रुपयांना बेकायदेशीर विक्री करण्यात येत असल्याचे माहे जुलै, 2008 मध्ये वा त्यादरम्यान आढळून येणे, प्रत्येक लिलावात 20 ते 25 लॉटची किंमत कमी दर्शवून व्यापारी लिलाव करीत असल्याचे आढळून येणे, वन अधिकारी व कर्मचारी आपल्या मर्जीतील व्यापाऱ्यांना कमी किंमतीत लिलाव देऊन वन विभागाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान करीत असल्याचे आढळून येणे, लिलाव धनादेशच्या माध्यमातून करण्याची कोणतीही तरतूद नसतानाही सर्व नियम धाब्यावर बसवून वन अधिकारी या किंमती लाकडांचा लिलाव करीत असल्याचे आढळून येणे, याबाबत तेथील ग्रामस्थांनी संबंधित विभागाकडे वारंवार तक्रार करुनही या प्रकरणाची चौकशी करण्यात न येणे, यामुळे त्यांच्यात निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, सबब किंमती झाडांची होत असलेली अवैध तोड थांबविण्याची तसेच या प्रकरणात सामील असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

...3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते (वने मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापति महोदय, यह लक्षवेधी सूचना वन विभाग के बारे में है. गडचिरोली जिले में 67 प्रतिशत जंगल है और चंद्रपुर जिले में 48 प्रतिशत जंगल है. माननीय मंत्री महोदय ने इस लक्षवेधी सूचना के लिखित उत्तर में 2-3 मुद्दों का जबाब विस्तार से दिया है. मेरा कहना यह है कि गलत ढंग से जंगल में लकड़ी तोड़ी जाती है, उसके बारे में शासन की ओर से कोई ठोस उपाय-योजना नहीं की गई है. इसके साथ साथ वर्ष 2006-07 में तूफान आया था और इसमें हजारों की संख्या में पेड़ गिर गए थे और लकड़ी टूट गई थी. इसमें से कुछ ही लकड़ी बाहर निकाली गई है. जंगल में अभी भी करोड़ों रुपए की लकड़ी पड़ी हुई है, यह लकड़ी शासन को बाहर निकालनी चाहिए. गडचिरोली जिले से लगे हुए सिरोंचा, भामरागढ़ इत्यादि क्षेत्र में सागवान की अच्छी लकड़ी मिलती है और यह लकड़ी बल्लारशाह डिपो में लाई जाती है और पूरे हिन्दुस्तान के व्यापारी यहां पर लकड़ी खरीदने के लिए आते हैं. अच्छी लकड़ी को कम दर्जे की लकड़ी बताकर उसका ऑक्शन किया जाता है और जितनी लकड़ी रिकॉर्ड में बताई जाती है, उससे अधिक लकड़ी की बिक्री की जाती है. इस कार्य में वन विभाग के अधिकारी और कर्मचारी शामिल हैं.

**उपसभापती** : आप प्रश्न पूछिए.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापति महोदय, मैं अपने प्रश्न पर आ रहा हूँ. गैर कानूनी रुप से जंगल में कटाई होती है और पुलिस विभाग और वन विभाग के अधिकारियों व कर्मचारियों की मिली-भगत रहती है. सरकार खुद लकड़ी की कटाई का काम नहीं करती है और उसके लिए हमें सरकार की तरफ से नक्सलवाद की समस्या बताई जाती है. कोयला बनाने के बारे में शासन का कायदा है कि जहां पर जंगल में लकड़ी काटते हैं, वहां से एक निश्चित दूरी तक आप कोयला नहीं बना सकते. हमने कई बार इस बारे में शिकायत की है, लेकिन कोयला बनाने की भट्टी वहां से नहीं हटती है, सिर्फ कागज पर नोटिस आ गया है. हमने जो सवाल पूछे हैं, उसके बारे में उपाय-योजना यहां पर दी गई हैं, लेकिन वह सिर्फ कागज पर रहेगी. इसलिए मेरा प्रश्न यह है कि क्या मंत्री महोदय इस बारे में लोक-प्रतिनिधियों की बैठक बुलाकर उनके प्रश्नों को सुनेंगे ?

. . . नंतर गिते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.शिगम 15:25

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेमधील विषय वेगळा असून सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्या प्रश्नाचा विषय वेगळा आहे. बल्लारपूर येथील डेपोमधील मालाचा लिलाव करताना लिलावाचे पैसे संबंधित अधिका-यांनी चेकने घेतलेले आहे. सदरहू पैसे चेकने न घेता डी.डी.ने घेतले पाहिजे असे मी निवेदनात उत्तर दिलेले आहे. या ठिकाणी दोन वर्षापूर्वी खूप मोठे वादळ झाले आणि त्यात मोठया प्रमाणात वृक्ष पडले. त्या ठिकाणी वृक्षांची लागवड करण्यासाठी वन विभागाने एक कार्यक्रम तयार केला होता आणि तो कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र शासनाकडून 2 कोटी रुपये घेतले होते. तो कार्यक्रम वन विभागाने पूर्ण केलेला आहे. काही वृक्ष तुटून पडले आहेत, ते बाहेर काढता येत नाही. यासंदर्भात अधिका-यां बरोबर मी दोन बैठका घेतल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी त्या विभागात कोळशाच्या भट्टया लावल्या जातात असाही मुद्दा उपस्थित केला आहे. यासंदर्भात देखील दोन बैठका झालेल्या आहेत. 10 किलोमीटरच्या पुढे कोळशाच्या भट्टया लावल्या जातील असे सांगितले होते. त्या भागात वन खूप मोठया प्रमाणात असल्यामुळे 10 किलोमीटरच्या पुढे भट्टया लावण्यासाठी जागा मिळत नाहीत. त्यामुळे पूर्वीच्या निर्णयात सुधारणा करुन 2 किलोमीटर अंतरावर कोळशाच्या भट्टया लावण्यासंबंधीचा निर्णय घेतलेला आहे. त्या निर्णयाप्रमाणे कोळशाच्या भट्टया लावण्यास परवानगी देण्यात येत आहे. याही संदर्भात दोन बैठका संबंधितांबरोबर घेण्यात आल्या आहेत. त्या बैठकींमध्ये यासंबंधीचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या विभागात जंगल घनदाट असल्यामुळे आतले लाकूड बाहेर काढता येत नाही. म्हणून त्या लाकडांचा लिलाव जागेवरच केला जातो. सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे त्या विभागातील सर्व लोकप्रतिनिधींची एक बैठक बल्लारपूर डेपोच्या ठिकाणी निश्चितपणे आयोजित करण्यात येईल. त्या ठिकाणी जो व्यवहार होतो आहे, तो व्यवहार आमच्या दृष्टीने बरोबर होतो आहे. सन्माननीय सदस्यांना जर आणखी काही सूचना करावयाच्या असतील व त्यांनी त्या सूचना मला पत्राव्दारे कळविल्या तर त्या सूचनांचा देखील निश्चितपणे विचार करण्यात येईल.

श्री. संजय दत्त : गेल्या वर्षभरात या विभागात अवैध वृक्ष तोडीची किती प्रकरणे उघडकीस आली आहेत आणि त्या अनुषंगाने किती लोकांवर कारवाई करण्यात आली आहे ?

श्री. बबनराव पाचपुते : माझ्याकडे यासंबंधी संपूर्ण राज्याची माहिती उपलब्ध आहे. यासंबंधीची आकडेवारी खूप मोठी आहे. परंतु प्रत्यक्षात चोरी गेलेले लाकूड आणि पकडण्यात

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

आलेले लाकूड यात काही विशेष तफावत नाही. उलट पकडलेले लाकूड मोठया प्रमाणात आहे व त्याची किंमत देखील जास्त आहे. यासंबंधीची आकडेवारी खूप मोठी आहे. सदरहू आकडेवारी मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

श्री. संजय केळकर : लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये वन संरक्षणासाठी करण्यात येत असलेली उपाययोजना यासंबंधीची माहिती दिलेली आहे. ठाणे जिल्हयात देखील मोठया प्रमाणात अवैध वृक्षतोड होते. अवैध वृक्षतोड कुठे झाली आहे यासबंधीचे पुरावे मागच्या वर्षी या सभागृहात माननीय वन मंत्र्यांना सादर केले होते. मुरबाड तालुक्यात सागाची झाडे तोडली, त्या तोडलेल्या झाडाची लांबी किती आहे यासंबंधीचे फोटो काढून वन मंत्री आणि वन सचिवांकडे तक्रार केली आहे. या अवैध वृक्ष तोडीच्या संदर्भात नागपूरच्या दक्षता पथकाने चौकशी केली. परंतु त्या चौकशीचे पुढे काय झाले, याबाबतीत दोषी अधिका-यांवर काय ॲक्शन घेतली गेली या गोष्टींचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा. वाडा, जव्हार, मोखाडा या तालुक्यात अवैध वृक्षतोड झाली आहे व त्या अनुषंगाने तेथील अधिका-यांची चौकशी समिती नेमली गेली. त्या चौकशी समितीचा अहवाल नेमका काय आला आहे ? या संदर्भात कोणकोणत्या अधिका-यांविरुध्द कारवाई केली गेली आहे ? याबाबतची देखील खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा.

श्री. बबनराव पाचपुते : हा विषय लक्षवेधी सूचनेशी संबंधित नाही. सदर लक्षवेधी सूचना बल्लारपूर आणि भामरागड विभागातील वृक्ष तोडीसंदर्भातील आहे. सन्माननीय सदस्यांनी पूर्वी जी माहिती दिली होती, त्यासंबंधी चौकशी करण्यात आली आहे. या परिसरामध्ये वन विभागाशिवाय खाजगी मालकीची मोठया प्रमाणात झाडे आहेत. दोन भावांच्या भांडणात हा प्रकार झाला होता. एका भावाने झाडे तोडावयास सांगितले, दुस-या भावाने झाडे तोडू नयेत असे सांगितले...

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ KGS/ पूर्वी श्री.गिते 15:30

श्री. बबनराव पाचपुते..

त्यामुळे ही तक्रार झाली होती. एका भावाने स्वत:च्या जमिनीतील लाकूड तोडले आणि दुसऱ्या भावाच्या जमिनीतील सुध्दा लाकूड तोडले. त्याबाबतची चौकशी पूर्ण झालेली आहे. सन्माननीय सदस्यांकडे आणखी काही माहिती असेल तर ती माझ्याकडे द्यावी त्याबाबत सुध्दा चौकशी केली जाईल.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जव्हेरी यांनी जी लक्षवेधी सूचना विचारली आहे त्यामध्ये वनकर्मचारी आणि दलाल यांच्या संगनमताने काही गैरप्रकाराच्या घटना घडत आहेत काय याबद्दल विचारली आहे. असे गैरप्रकार होत आहेत याबद्दल त्यांचा आक्षेप आणि आरोप आहे. परंतु याप्रश्नाला निवेदनामध्ये स्पर्श करण्यात आलेला नाही. माझा प्रश्न असा आहे की, अशा घटना घडल्या आहेत आणि वनकर्मचारी व दलाल यांच्या संगनमताने गैरव्यवहार झालेला त्याची सुध्दा चौकशी केली जाईल काय आणि केली नसेल तर जी माहिती सन्माननीय सदस्य उपलब्ध करुन देतील त्याच्या आधारे चौकशी होईल काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, अशा प्रकारे गैरव्यवहाराची कुठलीही घटना घडलेली नाही. जंगलातून लाकूड बाजारात आणले जाते. त्याची मोजणी करुन डेपोमध्ये ते लावले जाते. डेपोमध्ये लावल्यानंतर स्थानिक वर्तमानपत्रात आणि इतर वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाते. डेपोची किंमत ठरविली जाते आणि त्याप्रमाणे लिलाव होतो. लिलावाद्वारे पैसे जमा झाल्यानंतर माल उचलण्यास परवानगी दिली जाते. याठिकाणी लक्षवेधीमध्ये जो प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे तो पहिल्या 10 टक्के रकमेचा हप्ता डीडीऐवजी चेकने स्वीकारला गेला याबाबतचा आहे. चेकने स्वीकारल्यानंतर सुध्दा सगळे पैसे वसूल झालेले आहेत. आता यापुढे चेकने रक्कम स्वीकारु नये डीडीने स्वीकारावी असे परिपत्रक काढण्यात आलेले आहे. चेकने रक्कम स्वीकारल्यामुळे व्याजाचा तोटा झालेला आहे. तरीसुध्दा व्याजाची 2 लाख 28 हजार रुपयांची रक्कम वसूल झालेली आहे. त्यामुळे कोणतीही अनियमितता झालेली नाही. आता लिलावाद्वारे येणाऱ्या रकमेचा चेक स्वीकारण्याऐवजी डीडी स्वीकारावा असे आदेश काढलेले आहेत. चेकने किंवा रोखीने पैसे स्वीकारु नयेत अशा सूचना दिलेल्या आहेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जव्हेरी यांना तिसऱ्यांदा हाप्रश्न उपस्थित केलेला आहे. बल्लारशा पेपरमिलमध्ये लाकूड येण्यासाठी लाकूड तोडण्यासाठी प्रवृत्त केले जाते. तसेच तोडलेला लाकडाचा माल त्यांच्या डेपोमध्ये येतो ही गोष्ट खरी आहे काय ? याप्रकरणाची चौकशी केली जाईल आणि मी स्वत: त्याठिकाणी भेट देईन असे मंत्रीमहोदयांनी मागील अधिवेशनात आश्वासन दिले होते. तसेच पेपर मिलवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते. मंत्रीमहोदय स्वत: त्याठिकाणी गेले होते काय आणि असल्यास काय दोष आढळून आले ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, लाकडाच्या लिलावाचा बल्लारशा पेपरमिलशी काहीही संबंध नाही. फक्त जंगलातील लाकूड निष्कासित करण्याची व्यवस्था त्यांच्याकडे आहे. लिलावाचा कुठलाही संबंध या मिलशी येत नाही. याची चौकशी झालेली आहे आणि त्याबाबतचा अहवाल सुध्दा आलेला आहे. अहवालावर योग्य ती कार्यवाही केली जाईल.

------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SSK/ MMP/ KGS/ पूर्वी श्री.गिते 15:30

**पृ. शी**. : राज्यात होणारा अतिरिक्त दुधाचा पुरवठा

**मु. शी**. : राज्यात होणारा अतिरिक्त दुधाचा पुरवठा यासंबंधी सर्वश्री सर्वश्री किशनचंद तनवाणी, दिवाकर रावते, सुरेश जेथलिया, परशुराम उपरकर , गोपीकिसन बाजोरिया, रणजितसिंह मोहिते-पाटील, जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, डॉ. वसंत पवार, सर्वश्री भास्कर जाधव, रमेश शेंडगे, श्रीमती उषाताई दराडे, प्रा. फौजीया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील, संजय दत्त, सुरेश नवले, सागर मेघे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय दुग्धविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात सध्या नऊ लाख लिटर दुधाचा अतिरिक्त पुरवठा होणे, सदर अतिरिक्त दुध घेण्याचे शासनाने बंद करणे, सदर नऊ लाख लिटर अतिरिक्त दुधाची भुकटी व अन्य दुग्धजन्य पदार्थ करण्याची नितांत आवश्यकता, सदर दुधापैकी सुमारे सहा लाख लिटर शेजारी व परराज्यातून येणे, पेट्रोल डिझेलच्या किंमतीत मोठी वाढ झाल्याने दुध वाहतुकीच्या खर्चात झालेली वाढ, त्यामुळे दुध दरात वाढ करण्याची दुध उत्पादक शेतकऱ्यांनी शासनाकडे केलेली मागणी, इतर राज्यातून या राज्यात येणारे 6 लाख लिटर दुधावर बंदी आणण्याची नितांत आवश्यकता, दुधाला उठाव नसल्याने दुध उत्पादक शेतकरी चिंताग्रस्त होणे, याबाबत शासनाची अक्षम्य उदासिनता, त्यामुळे राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांत पसरलेला तीव्र असंतोष, राज्यातून अतिरिक्त दुध शासनाने तात्काळ घेण्याबाबत केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. हसन मुश्रीफ (दुग्धविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



<u>**निवेदनानंतर**</u>

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, राज्यामध्ये 9 लाख लिटर अतिरिक्त दूध शिल्लक राहते आहे त्यासंदर्भातील हाप्रश्न आहे. या दुधाची पावडर बनविली जाते असे शासन सांगते. परंतु वरळी डेअरीमध्ये दूधभुकटी बनविण्याचा प्रकल्प बंद असल्यामुळे हे दूध कोठे जाते ? वरळी येथील दूधभुकटी प्रकल्पाची सद्यस्थिती काय आहे ?

यानंतर श्री. भोगले

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ KGS/ MMP/ KGS/ 15:35

लक्षवेधी सूचना क्र.4..

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना विचारली त्यावेळची स्थिती आणि आजची स्थिती यामध्ये खूप अंतर पडले आहे. दीड महिन्यापूर्वी दूध संकलन हे अतिरिक्त होते. आता शॉर्टेज निर्माण झाले असून दुष्काळ पडल्यास आणखी शॉर्टेज येणार आहे. शासनाचे मिरज, अकोला व उदगीर येथे दूध भुकटीचे प्लँट चालू असून वरळी येथील प्लँटसंबंधीची माहिती घेऊन ती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : मंत्रीमहोदयांनी उत्तरामध्ये दुधाची कमतरता असल्याचे म्हटले आहे. परंतु निवेदनामध्ये 2.5 लाख लिटर अतिरिक्त दूध गोळा होत असल्याचे म्हटले आहे?

श्री.हसन मुश्रीफ : ही माहिती पूर्वी तयार करण्यात आली होती. आता 70 हजार लिटर दुधाची पावडर केली जात आहे. महानंद डेअरीने 16 टक्के विक्रीमध्ये कपात केली आहे. आता परिस्थिती बदलली आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, अतिरिक्त दूध सरकारच्या प्लँटमध्ये पाठवून भुकटी करण्याचे काम केले जात आहे. मिरज डेअरीचा मंत्रीमहोदयांनी उल्लेख केला. ती डेअरी पूर्ण क्षमतेने सुरु आहे का?

श्री.हसन मुश्रीफ : होय. पूर्ण क्षमतेने सुरु आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, राज्यात मोठया प्रमाणात दुष्काळ पडला आहे. अशा वेळेला दूध देणाऱ्या जनावरांच्या दुधाचे संकलन शासनामार्फत व वेगवेगळ्या दूध महासंघामार्फत केले जाते. आज दुष्काळ पडल्यामुळे महाराष्ट्रभर जनावरांसाठी छावण्या निर्माण करण्याचे शासनाने आदेश दिले आहेत. या छावण्यांमध्ये सर्व जनावरे एकत्रित बांधली जातात. त्यांना एकत्रितपणे खाद्य दिले जाते. जनावरांनी अधिक दूध द्यावे, त्यापासून शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळावे यासाठी दुभत्या जनावरांना वेगळे खाद्य मिळण्यासाठी शासन योजना तयार करणार आहे काय?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, अभी दुष्काल आ गया है, ऐसा नहीं कहा जा सकता, इतना जरुर है कि दुष्काल जैसी स्थिति है. सरकार ने सावधानी के तौर पर चीफ सेक्रेटरी से कहा है कि . . .

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.4..

श्री.दिवाकर रावते : माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय राज्यमंत्री व मंत्री यांच्यात एकमत व्हावे. राज्यमंत्र्यांनी म्हटले की, दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे दूध संकलन कमी होत आहे. मंत्री म्हणतात की, दुष्काळसदृश परिस्थिती आहे. नेमकी काय परिस्थिती आहे?

Shri Anees Ahmed : Draught like situation.

श्री.हसन मुश्रीफ : दुष्काळ आहे असा शब्द वापरलेला नाही. दुष्काळसदृश परिस्थिती आहे, पाऊस कमी आहे त्यामुळे यापुढे दूध संकलन कमी होणार आहे.

श्री.दिवाकर रावते : माननीय मंत्रीमहोदय दुष्काळसदृश परिस्थिती आहे असे म्हणतात. म्हणून मी हरकत घेतली.

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, भले ही मैं शेतकरी नहीं हूँ, लेकिन मैं माननीय सदस्य श्री. रावते जी को बताना चाहता हूँ कि शेतकरी की चिन्ता मुझे आपसे ज्यादा है. मैं जब से मंत्री बना हूँ, दूध का भाव 2 रुपए प्रति लीटर बढ़ाने का काम किया है. पहले हम किसानों को 3 करोड़ रुपए रोजाना देते थे, अब उनको 5.50 से लेकर 6 करोड़ रुपए तक रोजाना दे रहे हैं. हमारे यहां पर मिल्क प्रोक्योरमेंट एक्ट है, जो कि पूरे देश के किसी भी राज्य में नहीं है. हम हर किसान को मदद देने का काम कर रहे हैं.

श्री.नितीन गडकरी : आप गाय और भैंस को लाल गेहूँ मत दीजिए, उनको तकलीफ हो जाएगी और उससे नई समस्या तैयार हो जाएगी.

147 नमुने प्राण्यांना खाण्याकरीता योग्य नसल्याचे आढळले. आमच्या भागातील हेले आणि म्हशी यांच्यावर देखील या गव्हाचा परिणाम झाला आहे. हा लाल गहू चुकूनही गायी आणि म्हशींना खाण्यास देण्यात येणार नाही या शासनाच्या निर्णयाचे मी स्वागत करतो.

(उत्तर देण्यात आले नाही)

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये दुष्काळी परिस्थिती आहे. जनावरांच्या चाऱ्याच्या किंमती मोठया प्रमाणात वाढल्या आहेत. 2000 रुपये दराने कडबा विकला जात आहे. अशा स्थितीत जनावरे सांभाळणे शेतकऱ्यांना कठीण झाले आहे.

(नंतर श्री.भारवि.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ KGS/ MMP/ श्री.भोगले... 15:40

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील.....

शेतकऱ्यांनी पतसंस्थांकडून घेतलेले कर्ज माफ केलेले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांवर कर्जाचा बोजा वाढत आहे. त्यामुळे दुष्काळी स्थितीमध्ये जनावरांना सांभाळणे शेतकऱ्यांना जिकिरीचे झाले आहे. आज डिझेल-पेट्रोलचे दर वाढले आहेत. या सगळ्या गोष्टीचा विचार करता दूध दरवाढ करणे नैसर्गिक ठरेल. तेव्हा माझी सरकारला आग्रहाची विनंती आहे की, नैसर्गिक दरवाढ म्हणून दूध दरवाढ शासनाने केली पाहिजे. त्याप्रमाणे शासन दूध दरवाढ करणार आहे काय ? असा माझा मुख्य प्रश्न आहे.

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, माननीय सदस्य ने किसानों के हित का सवाल पूछा है. मैं उनको बताना चाहता हूँ कि पहले शासन ने किसानों के हित में 1 रुपया दूध का भाव बढ़ाया और अभी दूध का भाग 2 रुपए बढ़ाया है. पहले हम किसानों को 3 करोड़ 64 लाख रुपए रोजाना देते थे और अब उनको 5 करोड़ 70 लाख रुपए रोजाना दे रहे हैं. जो चारा राज्य से बाहर जा रहा है, जरुरत पड़ने पर उसको रोकने का काम करेंगे. अगर जानवरों के लिए चारे की कमी होगी तो हम कॅम्प लगाने के लिए तैयार हैं. माननीय सदस्य ने जो सवाल पूछा है, उसके बारे में जरुर विचार किया जाएगा.

श्री.सागर मेघे : सभापती महोदय, या वर्षी दुष्काळ परिस्थिती असल्यामुळे प्रत्येक जिल्ह्यामध्ये 25 टक्के ऊसाचे क्षेत्र कमी झालेले आहे. 10-15 दिवसांमध्ये ऊसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर कमी होणार आहे. दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे शासन छावण्या, चाऱ्यासंबंधी कोणती भूमिका घेणार आहे? असा माझा पहिला प्रश्न आहे. आज गायीच्या किंमती वाढत चालल्या आहेत. 35 हजार रुपयाला गाय मिळते. गेल्या 3 वर्षामध्ये गाय खरेदी करण्यासाठी तालुका आणि जिल्हा दूध संघाने प्रयत्न केला, पण विक्रीसाठी गाय उपलब्ध झाली नाही. काही वर्षांपूर्वी देखील दुष्काळी परिस्थिती राज्यात होती. त्यावेळी देखील दुधानेच शेतकऱ्यांनी वाचविले होते. त्यामुळे दूध दरवाढ देणे ही सरकारची जबाबदारी आहे. दूध दरवाढीसाठी दूध संघाचा, राज्य शासनाचा प्रतिनिधी यांचा समावेश असलेले एक दूध नियामक मंडळ किंवा समिती शासन नेमणार काय ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, सजेशन फॉर एक्शन.

. . . 3M 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी जोरात म्हटले की, आम्ही शेतकऱ्यांना दोन रूपये दर वाढवून दिले आहेत. तळेकर नावाच्या माणसाला आपण पोसले नसते तर बरे झाले असते. चार विद्यापीठांनी आणि तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना दुधाचा दर साडेतेरा रुपये मिळावा असे सुचविले होते. शासनाने जी समिती नेमली होती त्या समितीने तर जास्तीत जास्त दर सोळा रूपये देण्यात यावा असे अहवालात नमूद केलेले असताना आपण आठ रूपये दरात दोन रूपयांनी दर वाढ करून दूध उत्पादक शेतकऱ्यांना दहा रूपये देत आहात. ही काही शेतकऱ्यांवर मेहरबानी करीत नाही. आज राज्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती आहे. त्यामुळे जनावरांच्या चाऱ्यांचे दर वाढले आहेत. त्यामुळे शासन दुधाचे दर पुन्हा वाढवून देणार आहे काय ? लातूर जिल्ह्यामध्ये उद्‌गीर येथे शासकीय दूध डेअरी आहे. आधुनिक अशी चकाचक डेअरी बांधून तयार आहे. पण ती नुसती पडून आहे. तिचा वापर होत नाही. सदर डेअरी शासन सुरू करणार आहे काय ? नसेल, तर सदर डेअरी शासनाने विकायला काढली आहे, हे खरे आहे काय ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, पूरे देश में कहीं भी दूध को इतना भाव नहीं मिल रहा, जितना भाव महाराष्ट्र में मिल रहा है. पहले 8.50 रुपए प्रति लीटर का भाव किसानों को दे रहे थे और अब 10.50 रुपए प्रति लीटर का भाव दे रहे हैं. पूरे देश के अन्दर दूध का भाव सब से अधिक अगर कहीं मिल रहा है तो वह महाराष्ट्र के अन्दर मिल रहा है. महाराष्ट्र के अलावा पूरे देश में कहीं पर भी मिल्क प्रोक्योरमेंट एक्ट नहीं है. महाराष्ट्र में किसानों द्वारा उत्पादित पूरा दूध खरीदने के लिए सरकार तैयार है. अगर हमारे पास ज्यादा दूध आता है तो हम उसका पावडर बनाते हैं. पहले हमारे पास 70-80 हजार लीटर दूध ज्यादा आ रहा था, लेकिन अब उसकी मात्रा धीरे धीरे कम हो रही है. उदगीर में नई मशीनरी के लिए पैसा दिया है, टेंडर निकाले गए हैं और बजट में 10 करोड़ रुपए दिए गए हैं. इस प्लांट को जितने जल्दी हो सकेगा, उतनी जल्दी शुरु करने की कोशिश करेंगे.

यानंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : महोदय, दूध उत्पादकांना शासन 12 ते 12.50 रुपये प्रति लिटर एवढा भाव देते परंतु कन्झुमरपर्यंत मात्र हे दूध पोहचते तेव्हा त्याचा भाव 23-24 रुपये प्रति लिटर एवढा असतो. एवढी तफावत असण्याचे कारण काय आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, ग्राहकासाठी दुधाचा दर 22 रुपये असला तरी उत्पादकांना तेवढा दर मिळत नाही. कारण ग्रामीण भागातून शहरापर्यंत दूध आणताना त्यात ट्रान्सपोर्ट चार्जेस, दूध हाताळणी यामुळे हा दर वाढतो, परंतु शेतकऱ्याच्या पदरात हा दर पडत नाही.

---------------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : लाल व सडक्या गव्हाबाबत शासनाने करावयाची उपाययोजना

मु.शी. : "लाल व सडक्या गव्हाबाबत शासनाने करावयाची उपाययोजना" यासंबंधी सर्वश्री गोविंदराव आदिक, संजय दत्त, प्रतापसिंह मोहिते-पाटील, चरणसिंग सप्रा, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री जैनुद्दीन जव्हेरी, नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, डॉ. दीपक सावंत, श्री. दिवाकर रावते, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री अरविंद सावंत, किरण पावसकर, अनिल परब, सुरेश जेथलिया, परशुराम उपरकर, गोपीकिसन बाजोरिया, किशनचंद तनवाणी, सागर मेघे, पांडुरंग फुंडकर वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील विविध शासकीय गोदामांमध्ये आयात सडक्या लाल गव्हाचा सुमारे 40 हजार टनाचा साठा पडून असणे, सदर गव्हाचे वितरण बेकरी उत्पादकांना करण्याचे शासनाने जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना कळविणे, शासनाच्या आदेशानुसार बहुतांश जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी सदर गव्हाच्या नमुन्याची पुणे येथील राज्य आरोग्य प्रयोग शाळेत तपासणी करण्याकरिता पाठविलेल्या गव्हाच्या 124 नमुन्यांपैकी 119 नमुने मानवी सेवनास अयोग्य असल्याचे आढळून येणे, असे असतांना सदर लाल सडका व मानवी आरोग्याला अपायकारक असणारा गहू राज्यातील बेकरींना देवून त्यापासून तयार होणारे पाव, बिस्किटे आदी आरोग्याला अपायकारक असल्याने सदर गहू देण्याबाबत शासन आग्रही असल्याने जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता या प्रकरणी शासनाने सदर सडक्या व लाल गव्हाबाबत तात्काळ कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सुनील तटकरे (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो

**उप सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

-----------------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : महोदय, 30 हजार मेट्रिक टन लाल गव्हापैकी किती मेट्रिक टन गहू खाण्यायोग्य आढळून आला व त्याची एकूण किंमत किती ? निवेदनात मानवास खाण्यासाठी आलेल्या गव्हापैकी शासन निर्णय दिनांक 9.5.2008 अन्वये विल्हेवाट लावण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत, असे म्हटले आहे. या नेमक्या कोणत्या सूचना दिलेल्या आहेत ? तसेच ही विल्हेवाट करण्यासाठी टेक्नीकल स्टाफ आपल्याकडे आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : महोदय, 30444 मेट्रिक टन इतका लाल गहू शिल्लक होता, त्यातील 1669 नमुने प्रयोगशाळेत पाठविले असता त्यापैकी 627 नमुन्यांचे अहवाल प्राप्त झाले, त्यापैकी 5848 मेट्रिक टन गव्हाचे 97 नमुने मानवी खाण्यास अयोग्य असल्याचे आढळून आले. हे नमुने पुन्हा प्रयोगशाळेकडे पाठविले. तसेच 1530 नमुने जे पाठविले होते त्यातील 270 नमुन्यांचे अहवाल प्राप्त झाले असून त्यापैकी 213 नमुन्यातील 9429 मेट्रिक टन एवढा गहू पशुखाद्यासाठी योग्य आहे आणि 260 नमुन्यातील गहू पशुखाद्यास अयोग्य असून त्याचे अहवाल प्राप्त व्हावयाचे आहेत. सन्माननीय सदस्यांनी या गव्हाची विल्हेवाट लावणे म्हणजे काय असे विचारले त्याबाबत मला सांगावयाचे आहे की, मानवी खाण्यास जो गहू अयोग्य असेल तो लिलावाद्वारे विक्रीसाठी उपलब्ध केलेला आहे. मानवास अयोग्य आणि पशुसाठी योग्य आहे त्या गव्हाचे ग्रेडेशन लॅबोरेटरीकडून मिळाल्यानंतर त्याची किंमत ठरत असते. त्यानंतर एमएआयडीसी अथवा तत्सम संस्थांना विक्री करण्यासाठी अथवा तो खरेदी करण्यासाठी विचारणा करण्याची प्रचलित पध्दती आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : महोदय, मंत्री महोदयांनी सांगितलेल्या लाल गव्हाचे प्रकरण नेमके काय आहे हे पहिल्यांदा समजावून सांगितले पाहिजे. कारण काही विरोधी पक्षाचे नेते सिंधुदुर्गपर्यंत जातात आणि त्यांचे एकच काम आहे की, पत्रकार परिषद बोलावून या गव्हाचे पॅकेट्स वाटायचे, जणू काही हे सरकार फक्त हेच काम करीत आहे असे भासवावयाचे, असे चालू आहे. माजी सदस्य श्री. किरीट सोमय्या यांना तर दुसरे कामच नाही. कारण त्यांच्याकडून प्रत्येक दिवशी वर्तमानपत्रात लाल गव्हाबाबत सांगण्यात येते.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MMP/ KGS/ प्रथम श्री. खर्चे.... 15:50

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ....

लाल गव्हाचे प्रकरण दर दिवशी वर्तमानपत्रात येत आहे. श्री. किरीट सोमय्या सिंधुदुर्गमध्ये येतात, त्या ठिकाणी पत्रकारांना बोलावून पत्रकार परिषद बोलावतात व लाल गव्हाच्या संदर्भात वर्तमानपत्रात छापून आणतात.

( अडथळा )

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : दर दोन दिवसानंतर श्री. किरीट सोमय्या लाल गव्हाच्या संदर्भात पत्रकार परिषद घेत असतात त्यामुळे एकदा काय तो या लाल गव्हाच्या संदर्भातील प्रश्न मिटवून टाका.

श्री. नितीन गडकरी : लाल गव्हाच्या संदर्भात श्री. किरीट सोमय्या पत्रकार परिषद घेतात व आपली बदनामी करतात तर आपण त्यांच्यावर खटले का भरत नाही ?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : श्री. किरीट सोमय्या सिंधुदुर्ग येथे पत्रकार परिषद घेतात आता तर त्यांनी कल्याण येथेही पत्रकार परिषद घेतलेली आहे.

( अडथळा )

श्री. नितीन गडकरी : राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची बदनामी श्री. किरीट सोमय्या करीत असतील तर आपण त्यांच्यावर खटले का भरत नाही ? श्री. किरीट सोमय्या यांनी लाल गव्हाच्या संदर्भात चांगले काम केलेले आहे.

( अडथळा )

**उपसभापती** : माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, लक्षवेधी सूचनेतील विषय वेगळा आहे व या ठिकाणी वेगळयाच विषयावर चर्चा सुरु आहे. लाल गव्हाच्या संदर्भात या ठिकाणी आपण राजकीय भांडवल करु नका अशी माझी सर्वांना विनंती आहे. लाल गहू, किरीट सोमय्या आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस हा प्रश्न येथे येत नाही. लक्षवेधी सूचनेतील विषयावर चर्चा न करता वेगळयाचा विषयावर चर्चा करणे योग्य नाही. अशा पध्दतीने सभागृहाचा वेळ घेणे योग्य नाही. ज्या प्रश्नाचा या लक्षवेधी सूचनेशी संबंध नाही अशा प्रश्नांना माननीय मंत्रीमहोदयांनी सुध्दा उत्तरे देऊ नयेत.

( अडथळा )

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय,...

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, 30 हजार क्विंटल लाल गव्हा पैकी 27 हजार क्विंटल गहू कुजका असल्याचे तसेच हा गहू माणसांना खाण्यास योग्य नाही असे प्रयोगशाळेचे म्हणणे आहे.

**उपसभापती** : या विषयाला राजकीय रंग देऊ नये अशी माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जे विचार मांडलेले आहेत त्यासंदर्भात माझा हरकतीचा मुद्दा आहे. लाल गव्हाच्या संदर्भातील बाब माननीय मंत्रीमहोदयांनी स्वत: कबूल केलेली आहे. जो लाल गहू आयात केलेला आहे त्यातील 50 टक्क्यांपेक्षा जास्त गहू माणसांना खाण्यासाठी लायक नाही. मधाशी नियम 93 च्या सूचनेसंदर्भात देखील ही बाब माननीय मंत्रीमहोदयांनी कबूल केलेली आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेबांनी प्रश्न विचारला होता त्या प्रश्नाला "हा गहू माणसांना खाण्यास लायक नाही" असे माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे. हा गहू माणसांना खाण्यास लायक नाही ही बाब माननीय मंत्री महोदय कबूल करीत असतांना श्री. किरीट सोमय्या सिंधुदुर्ग मध्ये येऊन लाल गव्हाच्या संदर्भात पत्रकार परिषद घेतात त्यामध्ये काय चूक आहे ?

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

श्री. सुनील तटकरे : सन्माननीय सदस्य जे बोलत होते तो मुद्दा वेगळा होता परंतु या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी वेगळाच मुद्दा उपस्थित करीत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांच्या सर्व प्रश्नांना उत्तर देण्यास मीा समर्थ आहे.

( अडथळा )

श्री. सुनील तटकरे : श्री. किरीट सोमय्यांचे समर्थन श्री. जयंत पाटील करीत आहेत ते बरोबर आहे काय ? सन्माननीय सदस्यांच्या कोणत्याही प्रश्नाला उत्तर देण्यास मी समर्थ आहे.

श्री. नितीन गडकरी : हा लाल गहू कोणी आणला ? हा गहू आणल्यामुळे कोणाचे नुकसान झाले आहे ?

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

यानंतर श्री. गायकवाड.....

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सभागृहामध्ये लाल गव्हाच्या प्रश्नावरुन वाद निर्माण झाला आहे. या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी लाल गव्हाच्या पिशव्या भरुन आणल्या होत्या. त्यांच्या पहिल्या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने त्यानी लाल गव्हाचे सॅम्पल आणले होते. ते सॅम्पल त्यांनी आपल्या हातामध्ये दिले होते. या निमित्ताने मला माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, केन्द्र सरकारच्या कृषी मंत्रालयाने लाल गहू मागवला होता हे खरे आहे काय, त्याचबरोबर हा गहू ऑस्ट्रेलियातून मागवला होता हे खरे आहे काय,आपल्या देशातील गोर गरीब जनतेकरता हा गहू मागवला होता हे खरे आहे काय,आपल्या देशातील जनतेला खाण्याकरिता जर तो गहू मागविला असेल तर तो गहू माणसांना खाण्याकरिता योग्य आहे किंवा नाही याची तपासणी करण्याची जबाबदारी जर राज्य शासनावर आली असेल तर हा निकृष्ट गहू आपल्या देशात आणून तो आपल्या राज्यावर ज्यांनी लादला त्या संदर्भात त्याच्याविरुध्द आपल्या राज्याच्या वतीने कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, ही वस्तुस्थिती खरी आहे की, केन्द्र सरकारने हा गहू आयात केला होता. याचे कारण असे आहे की, यांचे तथाकथित सरकार ज्यावेळी देशामध्ये सत्तेवर होते...........................

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात )

मला माझे उत्तर पूर्ण करु द्यावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, पैसे खाण्याच्या बाबतीत तरी आपण स्टॅन्डर्ड मेन्टेन करावयास पाहिजे. भूखंडात पैसे खाता, आयात लाल गव्हामध्येसुध्दा पैसे खाता.

(गोंधळ)

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, लाल गहू खायला धालणा-या मंत्र्यांचा निषेध करुन आम्ही सभात्याग करतो.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्यानी घोषणा देत बर्हिगमन केले )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : काल लोकसभेमध्ये विश्वास दर्शक ठरावाच्या वेळी विरोधी पक्षाचा जो पराभव झाला आहे त्याचा हा परिणाम आहे.....

(गोधळ )

**उपसभापती** : अशा परिस्थितीमध्ये कामकाज चालविणे अशक्य असल्यामुळे सभागृहाची बैठक 4 वाजून 10 मिनिटांपर्यत स्थगित करण्यात येईल.

(सभागृहाची बैठक 3 .59 ते 4.10 पर्यत स्थगित झाली )

---------

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगिती नंतर .. )

**<u>सभापतीस्थानी - माननीय उपसभापती</u>**

**उपसभापती** : मी सभागृहाची बैठक 4.25 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

सभागृहाची बैठक 4.10 वाजता 4.25 पर्यंत स्थगित झाली.

( यानंतर श्री. सरफरे .... 3आर 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

पृ.शी. : गोंदिया जिल्हयातील नागझिरा जंगलातील वन्य प्राण्यांच्या संख्येत होत असलेली घट

मु.शी. : गोंदिया जिल्हयातील नागझिरा जंगलातील वन्य प्राण्यांच्या संख्येत होत असलेली घट यासंबंधी सर्वश्री राजेंद्र जैन, जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, डॉ. वसंत पवार, सर्वश्री भास्कर जाधव, रमेश शेंडगे, श्रीमती उषाताई दराडे, प्रा. फौजिया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. राजेंद्र जैन (भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वनमंत्र्यांचे लक्षवेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे. अशी विनंती करतो.

"गोंदिया जिल्ह्यातील नागझिरा जंगलात चार वर्षापूर्वी पट्टेदार वाघांची संख्या १५ असणे ती संख्या १० होणे, बिबट्याची संख्या १२ ची १० होणे, रानगव्याची संख्या ४६३ वरुन ४०० होणे, ६५ अस्वलांची संख्या ६० होणे, निलगाईची संख्या ३८६ वरुन २९० होणे, रानडुकरांची संख्या ५५० वरुन ५०० पर्यंत कमी होणे, जंगलाच्या वन्य प्राण्यांच्या संख्येत होत असलेली घट पाहता त्याचे संवर्धन करण्याची निर्माण झालेली परिस्थिती, कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे प्राण्यांची सुरक्षा धोक्यात येणे, याबाबत कर्मचाऱ्यांची भरती करुन प्राण्यांचे संरक्षण करणेबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. बबनराव पाचपुते (वने मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री राजेंद्र जैन : सभापति महोदय, हर साल जब नागपुर में महाराष्ट्र विधान मंडल का सत्र होता है तब कई सम्माननीय सदस्य गोंदिया जिले में नागझिरा जंगल में पर्यटन के लिए आते हैं. इस नागझिरा जंगल में वर्ष 2003 में पट्टेदार वाधों की संख्या 15 थीं वह फिलहाल 10 हो गई हैं, बिबटों की संख्या 12 थीं वह 10 हो गई है. इस प्रकार से दिन-ब-दिन वन्य जीवों की संख्या कम होती जा रही है. माननीय मंत्री जी ने इसका जो जवाब दिया है वह केज्युअल है और सामान्य तौर पर दिया गया जवाब है. केवल दो शेर कम हुए हैं, इस प्रकार का जवाब दिया गया है. एक तरफ सरकार यह कहती है कि पर्यटन को प्रोत्साहन दिया जाना चाहिए, पर्यटन के माध्यम से राज्य की आय बढ़नी चाहिए लेकिन दूसरी तरफ हमारी धरोहर की तरफ अनदेखा और वन्य जीवों का अवैध रुप से शिकार किया जा रहा है. नागझिरा जंगल के पास ही नवेगांव राष्ट्रीय उद्यान है, वहां भी 15 दिन पहले शिकार की एक घटना घटी, उसके 7 दिन बाद, 10 दिन बाद, इस प्रकार से 24 दिनों में 3 बिबटों की मृत्यु हुई है. जब वन अधिकारियों से बिबटों की मृत्यु का कारण पूछा गया तो वे कोई जवाब नहीं दे सके. इस संबंध में वन विभाग के बड़े बड़े अधिकारी भी मृत्यु का कारण बता नहीं सके. वन विभाग के अधिकारियों की मिलीभगत से वन्य जीवों का अवैध रुप से शिकार किया जा रहा है.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्य जंगलातील वन्य प्राण्यांची संख्या कमी होत असल्याबद्दल सांगत आहेत. परंतु आपल्याच सरकारमधील काही मंत्री जर शिकार करीत असतील तर प्राणी कसे वाचतील. त्या संदर्भात संबंधित मंत्र्यांवर आपण काय कारवाई केली, त्यांना अटक करण्यात आली की नाही ? याची माहिती सभागृहापुढे आली पाहिजे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य माननीय श्री. दिवाकर रावते यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित करुन असा शब्दप्रयोग केला की, आपल्या सरकारमधील मंत्री जर वन्य प्राण्यांची शिकार करीत असतील तर हे वन्य प्राणी वाचणार कसे? सभापती महोदय, माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, या सभागृहातील किंवा मंत्रिमंडळातील कुणीही मंत्र्यांनी शिकार केल्याचे अद्यापपर्यंत सिद्ध झाले नाही. तेव्हा माननीय सदस्यांचा हरकतीचा मुद्दा आपण सभागृहाच्या कामकाजामधून काढून टाकावा अशी माझी विनंती आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. राजेंद्र जैन यांनी प्रश्न विचारावा.

श्री राजेंद्र जैन :सभापति महोदय, यह बहुत महत्वपूर्ण प्रश्न है. सम्माननीय सदस्य श्री रावते जी शेर के शिकार से हरिन के शिकार पर आ गए. इसलिए मेरे प्रश्न के बीच व्यवधान हो गया. मैं यह बता रहा रहा था कि वन विभाग के अधिकारियों की मिलीभगत से वन्य जीवों का शिकार हो रहा है, चूंकि नागझिरा जंगल में फिरते पथक एवं वन कर्मचारियों की संख्या कम है, दूसरी बात यह है कि नागझिरा जंगल में एक तरफ वन विभाग का कार्यालय है और वहां पर तार का कम्पाउण्ड है तथा दूसरी तरफ एफडीसीएम का क्षेत्र है. मेरा यह प्रश्न है कि क्या वन्य जीवों के शिकार के मामले में वन अधिकारियों की मिलीभगत संबंधी मामले दर्ज हुए हैं, जो फिरते पथक बंद कर दिए गए हैं, क्या उन फिरते पथकों को फिर से शुरु किया जाएगा, वन विभाग के अधिकारियों की मिलीभगत से वन्य जीवों का शिकार हो रहा है इसलिए क्या वन विभाग के अधिकारियों पर निगरानी रखने के लिए समाजसेवी संस्था के प्रतिनिधियों और जनप्रतिनिधियों का सहयोग लेते हुए इन सब की एक कमेटी बनाई जाएगी ?

(यानंतर सौ. रणदिवे)

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या परिसरामध्ये विशेषत: नागझिरा अभयारण्यामध्ये ज्या गोष्टी झाल्याचे सन्माननीय सदस्य सांगत आहेत, ती गोष्ट खरी नसली तरी सुध्दा नागझिरा अभयारण्याच्या परिसरामध्ये कर्मचाऱ्यांची संख्या कमी होती. मात्र गेल्या वर्षी तेथील कर्मचाऱ्यांची संख्या पूर्णपणे भरण्यात आलेली आहे. आता एकाही कर्मचाऱ्याचे पद रिक्त नाही. तसेच आपण त्याठिकाणी गस्त घालण्याचे काम सुरु केलेले आहे. याशिवाय व्याघ्र प्रकल्प देखील मंजूर झालेला आहे. त्यामध्ये ताडोबा अंभोरा, पेंच, मेळघाट आणि सह्याद्री असे चार व्याघ्र प्रकल्प आहेत. यासाठी केंद्र शासनाकडून मोठया प्रमाणात निधी मिळत आहे. आता आपल्याला वाहने देखील खरेदी करता येतील.तसेच आता पुनर्वसनाचा प्रश्न देखील संपुष्टात येणार आहे. पूर्वी एका कुटुंबाला बाहेर काढावयाचे असेल तर साधारणत: एक लाख रुपये देण्यात येत होते. पण आता केंद्र शासनाकडून पुनर्वसनासाठी दहा लाख रुपये देण्यास सुरुवात झाली आहे. यासाठी आम्ही बैठक घेऊन 31-7-2008 अशी डेड लाईन केलेली आहे. त्यानंतर आता येथे जी साडेचार-पाच हजार कुटुंबे रहात आहेत, त्यांना व्याघ्र प्रकल्पासाठी बाहेर काढण्यात येणार आहे आणि हे काम युध्द पातळीवर केले जाणार आहे. तसेच लक्षवेधी सूचनेमध्ये वाघांची संख्या कमी झाल्याचे म्हटलेले आहे. याबाबतीत जनरल सेन्सेस करण्यात येत आहेत. यापूर्वी 2004 मध्ये जनरल सेन्सेस झालेला आहे आणि आता 2009 मध्ये जनरल सेन्सेस होणार आहे. पण मध्यंतरी केंद्र शासनाने वेगळया पध्दतीने सेन्सेस करण्यासाठी परवानगी दिली. त्या पध्दतीने हे पदमार्कवर होत नाहीत. जगामध्ये सगळयात पदमार्कची पध्दत अतिशय उत्तम आहे. पदमार्कवर सेन्सेस न झाल्यामुळे हा फरक असल्याचे दिसून येत आहे. पण जेव्हा 2009 मध्ये डिटेल पूर्ण सेन्सेस होईल, त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे सामाजिक संस्था, एन.जी.ओ.आणि ज्यांना-ज्यांना या गणनेच्या प्रक्रियेमध्ये सहभागी व्हावयाचे आहे, त्यांना आम्ही जाहीररित्या कळवू आणि यामध्ये जे-जे सहभागी होऊ इच्छितात, त्यांना सहभागी करुन घेऊ. तसेच तेथे फिरते पथक सुरु करण्यात आले असून मिलीभगत असल्याचे कुठेही आढळलेले नाही. अधिकाऱ्यांनी उत्तम प्रकारे काम केलेले आहे आणि तशा प्रकारचे काम होत आहे म्हणूनच ही संख्या वाढलेली आहे.

----

. . . .3 एस-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विशेष उल्लेखासंबंधी</u>

**उपसभापती** : मी सभागृहातील सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आज विशेष उल्लेख घेण्यात येणार नाहीत. आता पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सुरुवात होईल.

----

. . . .3 एस-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/ SBT/ MMP/ 16:30

**पृ.शी./मु.शी.**: सन 2008-2009 च्या पूरक मागण्यांवर चर्चा

**उपसभापती** : पूरक मागण्यांवरील चर्चेचा आजचा शेवटचा दिवस आहे. कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवर चर्चा आज बुधवार, दिनांक 23 जुलै, 2008 रोजी घेण्यात येत आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधी माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन व्दारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नकोच. कार्यक्रम पत्रिकेवरील दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

<u>विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या</u>

**उपसभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील :-

(1) उप मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - बी-1, बी-5, बी-9

(2) महसूल मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - सी-1, सी-4

(3) सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - एच-3, एच-5, एच-6, एच-7, एच-8, एच-9

(4) सहकार, पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - सी-5, सी-6, व्ही-5

(5) जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून),लाभक्षेत्र विकास व पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - आय-3, आय-5, वाय-5

(6) वित्त व नियोजन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - जी-1, जी-2, जी-5, जी-10, ओ-1, ओ-7, ओ-8, ओ-9, ओ-11, ओ-13, ओ-14, ओ-15, ओ-16, ओ-17, ओ-18, ओ-19, ओ-20, ओ-21,ओ-22, ओ-23, ओ-24, ओ-25, ओ-26, ओ-27, ओ-28, ओ-29, ओ-30, ओ-31, ओ-32, ओ-33, ओ-35, ओ-36, ओ-37, ओ-38, ओ-39, ओ-40, ओ-41, ओ-42, ओ-43, ओ-44, ओ-45, ओ-46, ओ-47

(7) उद्योग व खनिकर्म, सांस्कृतिक कार्य व राजशिष्टाचार मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - के-10, झेडडी-1, झेडडी-2, झेडडी-4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(8) पणन, रोजगार हमी योजना, संसदीय कार्य, महिला व बाल विकास मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - व्ही-5

(9) राज्य उत्पादन शुल्क, पर्यावरण व कामगार मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - के-4

(10) शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - ई-3, ई-4

(11) ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून), वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - के-6, एस-1, डब्ल्यू-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4, डब्ल्यू-7

(12) अपारंपारिक ऊर्जा व फलोत्पादन मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - के-8

मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, आजच्या पूरक मागण्यांवर भाषण करण्यासाठी सन्माननीय सदस्यांची नावे माझ्याकडे आलेली आहेत. यानंतर माझ्याकडे कोणत्याही सन्माननीय सदस्यांची नावे देण्यात आली तर त्याचा विचार केला जाणार नाही.

तसेच सभागृहाची वेळ संध्याकाळी 6.00 वाजेपर्यंत होती. याठिकाणी भाषण करण्यासाठी ज्या सन्माननीय सदस्यांनी नावे दिलेली आहेत, त्यांनी जरुर भाषण करावे. परंतु सदनाच्या कामकामाचा वेळ आणि संबंधित विभागाच्या सन्माननीय मंत्री महोदयांना भाषण करण्यासाठी लागणारा वेळ लक्षात घेऊन सन्माननीय सदस्यांनी आपापली भाषण करावीत. आता सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी भाषणास सुरुवात करावी.

यानंतर श्री.बरवड . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2008-09 च्या पुरवणी विवरणपत्रावर बोलण्यासाठी मी उभा आहे. प्रथम मी पृष्ठ क्रमांक 15 वरील गृह विभागाच्या बाब क्रमांक 16 बाबत बोलणार आहे. या सभागृहामध्ये धान्य घोटाळ्याबाबत अनेक वेळा चर्चा झालेली आहे. त्यामध्ये अधिकाऱ्यांना अटक झाली परंतु अद्याप त्यांच्यावर दोषारोप पत्र दाखल केलेले नाही. आमच्या जिल्ह्याच्या पोलीस अधिक्षकांनी पत्रकार परिषदेमध्ये सांगितले की, जोपर्यंत राज्य शासनाची परवानगी मिळत नाही तोपर्यंत त्यांच्यावर दोषारोप पत्र दाखल करता येत नाही. या धान्य घोटाळ्यामध्ये अनेक अधिकारी अडकलेले आहेत. जे अधिकारी 48 तास अटकेत होते त्यांच्या बाबतीत माननीय सभापतींनी निदेश देताना सांगितले होते की, जे अधिकारी 48 तास अटकेत असतात ते डिम्ड टू सस्पेंड असतात. परंतु अद्यापही त्यांना सस्पेंड केलेले नाही. त्या अधिकाऱ्यांना वाचविण्यासाठी शासनाकडून अनेक प्रयत्न केले जात आहेत. त्या अधिकाऱ्यांवर दोषारोप पत्र दाखल करण्यासाठी शासनाने कोणत्याही प्रकारची परवानगी दिलेली नाही. ती परवानगी शासन केव्हा देणार याचा खुलासा व्हावा. त्याचप्रमाणे या शासनातील मंत्री अशा प्रकारे अडकलेल्या अधिकाऱ्याची बाजू घेऊन त्यांच्यावरील केसेस माननीय उपमुख्यमंत्र्याना सांगून काढून टाकू असे जाहीर वक्तव्य वर्तमानपत्रात करतात. याबाबत माननीय उपमुख्यमंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये खुलासा करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मी महसूल व वन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 27 वरील बाब क्रमांक 39 बाबत बोलणार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भातशेतीच्या नुकसानीबाबत 7 कोटी रुपये देण्यात आले. परंतु ते 7 कोटी रुपये महसूल आणि कृषी विभागाच्या वादामुळे परत गेलेले आहेत. याबाबतीत खुलासा व्हावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मी महसूल विभागाच्या पृष्ठ क्रमांक 29 वरील बाब क्रमांक 42 बाबत बोलू इच्छितो. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये विमानतळासाठी लोकांच्या बागायती जमिनी संपादित करण्यात आल्या. 15 रुपये गुंठा या दराने जमिनी संपादित केल्या. परंतु या विमानतळाच्या बाबतीत माननीय पालकमंत्री सांगतात की, हे विमानतळ होणार आहे आणि उद्योग मंत्री सांगतात की, हे विमानतळ निकषात बसणार नाही. कारण गोव्यामध्ये मोहपे या ठिकाणी असलेले विमानतळ

...2...

श्री. परशुराम उपरकर .....

आणि या विमानतळामधील अंतर 25 किलोमीटर असल्यामुळे या ठिकाणी विमानतळ होणार नाही असे सांगितले जाते. त्या ठिकाणी जमिनी संपादित केल्या असल्या तरी त्या जमिनीमध्ये जर विमानतळ होणार नसेल तर त्या जमिनी शेतकऱ्यांना परत देणार की नाही याबाबत शासनाने खुलासा करावा.

सभापती महोदय, यानंतर मी महसूल व वन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 28 वरील बाब क्रमांक 40 बाबत बोलणार आहे. कोकणातील बेदखल कुळांचा तसेच कबुलतदार गावकऱ्यांचा प्रश्न सातत्याने भेडसावतो. प्रत्येक वेळी ते शेतकरी आपल्या मागण्या शासन दरबारी मांडतात परंतु शासनाकडून असे सांगितले जाते की, बेदखल कुळांचा आणि कबुलतदार गावकऱ्यांचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल. परंतु अद्याप ते केलेले नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये वन सझेखाली 42 हजार हेक्टर जमीन दाखविलेली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात अशी फक्त 1600 हेक्टर असल्याबाबतचा खुलासा किंवा प्रतिज्ञापत्र सर्वोच्च न्यायालयात दखल करण्यात आले तरी सुध्दा शेतकऱ्यांना न्याय मिळालेला नाही. याबाबतीत शासनाची काय भूमिका आहे हे शासनाने जाहीर करावे.

सभापती महोदय, यानंतर वित्त विभागाच्या पृष्ठ क्रमांक 60 वरील बाब क्रमांक 69 बाबत मला बोलावयाचे आहे. मागच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये विधानसभेच्या सन्माननीय सदस्यांनी गदारोळ केल्यानंतर सत्ताधारी पक्षाच्या आमदारांना 5 कोटी रुपये निधी देण्याचे जाहीर केले.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर....

त्यानंतर विरोधी पक्षातील आमदारांना 2.5 कोटी रुपये देण्याचे जाहीर केले. त्याप्रमाणे विधानपरिषदेमध्ये तसा फंड देण्याची मागणी झाल्यावर माननीय वित्त मंत्र्यांनी अशाप्रकारची कामे दाखल झाल्यानंतर त्या कामांना मंजुरी दिली जाईल असे आश्वासन दिले होते. परंतु विधानपरिषदेच्या सदस्यांनी दिलेल्या कामांची यादी अद्याप मंजूर झालेली नाही. त्या कामांना मंजुरी देण्यात येईल अशी घोषणा माननीय वित्त मंत्र्यांनी करावी अशी मी त्यांना विनंती करतो.

यानंतर बाब क्रमांक 78, पृष्ठ क्रमांक 71, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च भागविणे यासाठी ही मागणी केलेली आहे. सिंधुदुर्ग जिल्हा हा अति पावसाचा जिल्हा असून पावसाळयात नदी, नाले, ओढे भरुन वाहतात. या नाल्यांच्या किंवा ओढयाच्या पलिकडे लोकांची वस्ती असते. कोकणामध्ये या लोकांना पावसाळयामध्ये साकवचा वापर करुन नदीतून जावे लागते आणि त्यांचे दळणवळणाचे हे एकमेव साधन आहे. तेथील अनेक साकव नादुरुस्त झाले आहेत. अशा नादुरुस्त स्थितीतील साकववरुन लोकांना ये-जा करावी लागते. त्यामुळे एखाद्या दिवशी दुर्देवी घटना घडून जीवित हानी होण्याची शक्यता आहे. नादुरुस्त अवस्थेतील 50 साकव निकषामध्ये बसतात. त्यासाठी 1.50 कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे. परंतु मागील 10 वर्षापासून साकव दुरुस्तीसाठी निधी मिळत नाही. हा निधी शासनाने तातडीने द्यावा अशी विनंती करतो. तसेच निकषामध्ये बसणारे 772 साकव आहेत त्यासाठी जवळजवळ 45 कोटींची गरज आहे. परंतु शासनाने याकरिता केवळ 3.10 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. कोकणातील विशेषत: सिंधुदुर्ग जिल्हयातील पावसाचे प्रमाण पाहता आणि तेथील लोकांचे साकव हे एकमेव दळणवळणाचे साधन असल्यामुळे शासनाने या साकवांसाठी जास्तीत जास्त निधी मंजूर करावा.

सिंधुदुर्ग जिल्हयात पाऊस मोठया प्रमाणात होत असल्यामुळे युतीच्या काळामध्ये पाटबंधारे विभागाने अनेक पाटबंधारे प्रकल्पाची कामे सुरु केली होती. ही कामे सुरु असली तरी ठेकेदारांची 500 कोटी रुपयांची देयके थकलेली आहेत. त्यामुळे गेल्या 2 वर्षामध्ये ही कामे अतिशय धिम्या गतीने सुरु आहेत. परिणामी या सर्व प्रकल्पांची किंमत दुप्पट, तिप्पट झाली आहे. या वाढत्या किंमतीचा शासनावर आर्थिक भार येत आहे. हा आर्थिक भार कमी करण्यासाठी शासनाने ठेकेदारांचे थकित असलेले पैसे देऊन कामे जलद गतीने सुरु करण्याची आवश्यकता आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर....

यानंतर मी बाब क्रमाक 126, पृष्ठ क्रमांक 130, पारेषण व वितरण या कंपन्यांच्या संबंधातील ही मागणी आहे. या मागणीवर मी बोलणार आहे. सिंधुदुर्ग, रायगड, रत्नागिरी या जिल्हयांमध्ये इमर्जन्सी लोडशेडिंग केले जात आहे. यासंदर्भात अधिका-यांकडे विचारणा केली असता एन्रॉन प्रकल्प बंद पडल्यामुळे इमर्जन्सी लोडशेडिंग केले जात आहे असे त्यांनी उत्तर दिले आहे. हा एन्रॉन प्रकल्प केव्हा सुरु होणार आहे आणि सिंधुदुर्ग जिल्हयाला लोडशेडिंगमधून केव्हा वगळले जाणार आहे याबाबत मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा अशी मी विनंती करतो.

यानंतर बाब क्रमांक 71, पृष्ठ क्रमांक 186, सिंधुदुर्ग जिल्हयातील अंगणवाडी केंद्राच्या इमारतीचे बांधकाम करण्यासाठी ही मागणी केली असून या मागणीवर मी बोलणार आहे. आज सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये अंगणवाडी इमारती बांधण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. अनेक मिनी अंगणवाडी जाहीर केल्या आहेत. या अंगणवाडयांमध्ये मुलांना बसण्यासाठी खोल्या देण्याची गरज आहे. त्यासाठी भरीव तरतुदीची आवश्यकता आहे. युनिसेफतर्फे संपूर्ण राज्यात अंगणवाडया बांधण्यात आल्या. आता त्या नादुरुस्त झाल्या आहेत, त्यांच्या दुरुस्तीसाठी कोणतीही तरतूद केली जात नाही, ती तरतूद करण्याची गरज आहे.

यानंतर बाब क्रमांक 298, पृष्ठ क्रमांक 276 तंत्र शिक्षण या मागणीवर माझे विचार मांडणार आहे. मागील अधिवेशनामध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसंबंधी चर्चा झाली होती. चर्चेला उत्तर देताना मंत्रिमहोदयांनी असे आश्वासन दिले होते की, कोकणातील सर्व आमदारांची आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या प्राचार्यांची बैठक घेऊन अपुरा पडत असलेल्या कर्मचा-यांसंबंधी आणि निधीसंबंधी चर्चा केली जाईल. परंतु ती बैठक अद्याप घेतलेली नाही, ही बैठक मंत्रिमहोदयांनी लवकरात लवकर घ्यावी अशी विनंती करतो.

सिंधुदुर्ग जिल्हा हा सिंधुदुर्ग किल्ल्याच्या नावाने ओळखला जातो. या किल्ल्याचे बुरुज ढासळत चालले आहेत. या किल्ल्याच्या दुरुस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु होते, परंतु ते काम निकृष्ट दर्जाचे आहे. विजयदुर्ग हा किल्ला 800 वर्षापूर्वीचा असून त्याचेही बुरुज ढासळत चालले आहेत, त्याचीही दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

नंतर श्री.शिगम....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. परशुराम उपरकर...

त्या ठिकाणचा भगवा झेंडा पडलेला आहे. तो परत लावण्यासाठी शासनाकडे अनेक वेळा मागणी केलेली असून तो झेंडा अद्याप लावण्यात आलेला नाही. सदरहू झेंडा माझ्या आमदार फंडातून लावण्यासाठी मला परवानगी द्यावी अशी माझी या निमित्ताने शासनाला विनंती आहे.

पान क्रमांक 192, बाब क्रमांक 317. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणी भाषा ज्या कलावंताने सातासमुद्रापार नेली त्या कै. मच्छिंद्र कांबळे यांच्या नावाने एक सांस्कृतिक भवन उभे करण्याची मागणी कोकणातील लोकांनी शासनाकडे केलेली आहे. ही मागणी मान्य करुन मच्छिंद्र कांबळे यांच्या नावे सांस्कृतिक भवन उभे करावे अशी पुनश्च एकदा मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 16:45

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2008-09च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

गृह विभागाच्या पृ.क्र. 17 वरील बाब क्रमांक 21 मध्ये गणवेषाचे कापड, बूट इत्यादी खरेदी करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. पोलीस खात्यातील पोलिसांना टोप्या देण्यासाठी 2.36 कोटीचे जादा कापड खरेदी करण्यात आले असा महालेखापालांनी आपल्या लेखा परीक्षणामध्ये आक्षेप घेतलेला असून त्याबाबतचा खुलासा सचिवांनी अद्यापपर्यन्त केलेला नाही. एक तर गृह विभागासाठी बजेटमध्ये तरतूद कमी असते. पोलीस स्टेशन्ससाठी, पोलिसांच्या हत्यारांसाठी पैसे नसताना जे काही पैसे मिळतात त्याचे नीट नियोजन होत नाही. तेव्हा याबाबतीत माननीय गृहमंत्र्यांनी खुलासा करावा.

सभापती महोदय, गृह खात्याच्या मागण्यांवर चर्चा होत असताना ज्यांच्याकडे हे गृहखाते आहेत ते या सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांचे मी एका गंभीर घटनेकडे लक्ष वेधू इच्छितो. श्री. टकले हे ज्वेलर्स असून त्यांचा दागिने, हिरे असा माल कुरियरने नाशिकला जातो. हा माल नाशिकला जात असताना नाशिकच्या ऑक्ट्राय नाक्यावर एका दरोडेखोरांच्या टोळीने दरोडा घातला. श्री. टकले यांनी याबाबतीत पोलिसांमध्ये तक्रार केल्यानंतर दरोड्याचा तपास सुरु झाला. चोर कोण आहेत हे देखील फिर्यादीने सांगितले. बुधकर नावाच्या पोलीस इन्स्पेक्टरने आरोपींना पकडून त्यांच्याकडून माल जप्त केला, आरोपींकडून 25 लाख रु. वसूल केले आणि माल स्वत:च्या ताब्यात घेऊन तो विकला. याबाबतीत मी आमदार म्हणून पोलीस आयुक्तांना फोन करुन संपूर्ण हकिकत सांगितली. पोलीस आयुक्तांनी बुधकर या पोलीस इन्स्पेक्टरला निलंबित केले. मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना देखील या प्रकरणी पत्र दिलेले आहे. सभापती महोदय, शेतच कुंपण खायाला लागले आहे. ज्यांच्याकडे संरक्षण मागायचे त्यांनीच डल्ला मारायचा ही बाब अतिशय गंभीर आहे. या बुधकर नावाच्या इन्स्पेक्टरकडे किती मालमत्ता आहे ? तक्रार मागे घेण्यासाठी या इन्स्पेक्टरने 50 लाख रुपये देऊ केले. त्याला सस्पेण्ड केल्यानंतर आयुक्तांना 25 लाख रु. देऊन सस्पेन्शन मागे धेण्याचे प्रयत्न त्याने केले. मी स्वत: या प्रकरणी आयुक्तांशी बोललो असून या प्रकरणी कारवाई थांबलेली आहे. ही गंभीर बाब या सभागृहाच्या माध्यमातून माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देत आहे. माननीय मुख्यमंत्री देखील सभागृहामध्ये उपस्थित आहेत.

...नंतर श्री. गिते....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील...

या सभागृहात नाशिक विभागातील बरेच सन्माननीय सदस्य आहेत. या पोलीस निरीक्षकांचे प्रताप भरपूर आहेत. नाशिक विभागात दरोडे टाकणारी एक मोठी टोळी कार्यरत झालेली आहे. नाशिक विभागात आतापर्यंत जेवढे दरोडे पडलेले आहेत, त्या दरोडयाच्या अनुषंगाने पोलीस स्टेशनमध्ये दाखल झालेल्या फिर्यादींची सखोल चौकशी उच्च पातळीवरुन अथवा न्यायालयीन पातळीवरुन करण्यात यावी अशी माझी या निमित्ताने मागणी आहे. नाशिक येथे मोठया प्रमाणात औद्योगिकरण होत आहे. नाशिक शहर औद्योगिकरणाच्या बाबतीत मुंबई शहराच्या बरोबरीने येत आहे. म्हणून त्या शहराचे आणि तेथील जनतेच्या सरंक्षणाबाबत पोलिसांनी जातीने लक्ष घातले पाहिजे अशीही मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, , पृष्ठ क्रमांक 60, बाब क्रमांक 70 ही वित्त विभागाशी संबंधित आहे. महाराष्ट्र शासनाने राज्यात व्हॅट लागू केला आहे. सहकारी ग्राहक संस्थांना व्हॅटमधून वगळले पाहिजे. पुणे येथे ग्राहक पेठ आहे, अपना बाजार आहे, रायगड बाजार आहे अशा अनेक सहकारी ग्राहक संस्था आहे. आज महागाईच्या दिवसात कमी किंमतीमध्ये ग्राहकांना उत्तम माल देण्याचे काम या ग्राहक संस्था करीत आहेत. या ग्राहक संस्थांचे टर्न ओव्हर किमान 40 ते 50 कोटी रुपये असेल अशा ग्राहक संस्थांना व्हॅटमधून काही सवलत दिली पाहिजे अशी माझी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, पान क्रमांक 52 ,बाब क्रमांक 67 ही मागणी शिक्षण विभागाशी संबंधित आहे. मुंबई शहरासमोर असलेल्या घारापुरी बेटावर कोकण एज्युकेशन ट्रस्टच्या माध्यमातून एक माध्यमिक शाळा चालविली जाते. त्या बेटावर आजपर्यंत विद्युत पुरवठा करण्यात आलेला नाही. तेथील लोक मुंबई शहराची वीज बघतात. त्या बेटावरुन मुंबई शहर फक्त आठ किलोमीटर एवढया अंतरावर आहे. त्या बेटात राहत असलेल्या कुटुंबियांना पिण्यासाठी पाणी नाही. विजेची व्यवस्था नाही. त्या बेटात रहात असलेल्या कुटुंबियातील मुले शिकावीत म्हणून कोकण एज्युकेशन सोसायटीने माध्यमिक शाळा सुरु केलेली आहे. या ठिकाणी सुरु असलेल्या माध्यमिक शाळेला शासनाने अनुदान उपलब्ध करुन द्यावे अशी मी या निमित्ताने मागणी करतो. घारापुरी बेटावर 200 कुटुंबे आहेत, ती कुटुंबे कशा अवस्थेत आपले जीवन जगत आहेत याची आपणास जाणीव व्हावी

2...



ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री. शिगम 16:50

श्री. जयंत प्र.पाटील...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणून माननीय शिक्षण मंत्र्यांनी तेथे निश्चितपणे भेट द्यावी अशीही माझी या निमित्ताने मागणी आहे. स्वातंत्र्य मिळून 60 वर्षाचा कालावधी झाला असताना मुंबई शेजारी असलेल्या एका बेटावर शासन शाळेसाठी कोणत्याही सुविधा देऊ शकत नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. या घारापुरी बेटाच्या सर्व बाजूने पाणी आहे. या ठिकाणच्या मुलांना चांगल्या प्रकारे शिक्षण मिळावे म्हणून तेथील माध्यमिक शाळेस अनुदान उपलब्ध करुन द्यावे अशी माझी माननीय शिक्षण मंत्र्यांना पुन:श्च विनंती आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 113, बाब क्रमांक 108, ही मागणी जलसंपदा विभागाशी संबंधित आहे. रायगड जिल्हयातील सांवरकुंडे, बिडवाघळे आणि पाली बुदरी या तीन प्रकल्पांना मंजुरी देऊन बराच कालावधी होऊन गेलेला आहे. परंतु सदरहू तिन्ही प्रकल्पाची कामे करण्यासाठी शासनाकडून तरतूद उपलब्ध करुन दिली जात नाही. सभापती महोदय, आपल्या शिरुर तालुक्यात चासकमान प्रकल्प आहे. या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा म्हणून आपण स्वत: शासनास पत्र लिहिले. त्या पत्राच्या अनुषंगाने शासनाने या प्रकल्पाच्या कामासाठी 70 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याचे कबूल केले आहे. मागच्या पंधरवाडयात माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन समितीची बैठक झाली. 1 हजार कोटी रुपयांचा नियतव्यय जलसंपदा विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. परंतु नियतव्ययामध्ये चासकमान प्रकल्पाचा समावेश करण्यात आलेला नाही. सभापती महोदय, आपण शासनास पत्राव्दारे विनंती करुनही या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला नाही. म्हणून या प्रकल्पासाठी किमान 40 कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करुन द्यावी अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 142, बाब क्रमांक 162 ही नियोजन विभागाची मागणी आहे. धूप प्रतिबंधक बंधा-यांना तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्राला 720 किलोमीटरचा समुद्र किनारा लाभलेला आहे. परंतु धूप प्रतिबंधक बंधा-यांच्या कामासाठी फक्त दोन कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. किमान 300 ते 400 कोटी रुपयांची तरतूद प्रत्येक अर्थसंकल्पात करण्यात आली पाहिजे. धूप प्रतिबंधक बंधा-यांच्या कामासाठी डी.पी.डी.सी.मधून तरतूद घेण्यात यावी असे आम्हाला सांगितले जाते.

यानंतर श्री. कानडे...

23-07-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3X-1

SSK/ MMP/ SBT/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.गिते 16:55

श्री.जयंत प्र.पाटील.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यादृष्टीने उपाययोजना होणे आवश्यक आहे. माझी यासंदर्भात एकच विनंती आहे की, धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्यासाठी तरतूद करताना ती डीपीडीसीमार्फत न करता राज्याच्या बजेटमधूनच करावी. कारण डीपीडीसीची तरतूद जिल्हयासाठी 27-28 कोटी रुपयांची असल्यामुळे त्यातून पुन्हा धूपप्रतिबंधक बंधारे बांधण्यासाठी तरतूद करणे शक्य नसते. म्हणून मी यासाठीची तरतूद राज्याच्या नियोजनातूनच करावी अशी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 187, पृष्ठ क्रमांक 145 यामध्ये रायगड जिल्हयातील मुळे, माला, सागा येथील नद्यांना संरक्षक भिंत बांधण्यासाठी निधीची तरतूद करावी अशी मी यानिमित्ताने मागणी करतो आणि मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री. उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 110, बाब क्रमांक 106 - जलसंपदा आणि पाटबंधारे विभागाच्या पूरक मागण्यासंदर्भात माझे विचार व्यक्त करणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी आपल्या भाषणात चासकमान धरणाचा

उल्लेख केला. मी पुणे जिल्हयातील असल्यामुळे याचा प्रामुख्याने उल्लेख करीत आहे. चासकमान म्हणजे चास प्रकल्प अगदी जुना प्रकल्प आहे. मोठया आणि मध्यम पाटबंधारे प्रकल्पांच्या परिरक्षणासाठी आणि दुरुस्तीसाठी जी तरतूद केलेली आहे त्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी उल्लेख केला आहे. अनेक वर्षे प्रयत्न करुन आणि विशेषत: माननीय उपसभापती यांनी ते शिरुर तालुक्यातील असल्यामुळे आग्रहपूर्वक प्रयत्न करुन या प्रकल्पाच्या दुरुस्तीकरिता 70 कोटी पैकी फक्त 20 कोटी रुपये मिळाले. पाटबंधारे प्रकल्पांसाठी दुरुस्ती आणि परिरक्षणासाठी जी तरतूद केलेली आहे त्यामध्ये चास प्रकल्पासाठी किमान 40 कोटी रुपयांची तरतूद करणे आवश्यक आहे. खरे पाहता मुख्यमंत्री महोदयांबरोबर झालेल्या बैठकीमध्ये याबाबतचा उल्लेख झाला होता. परंतु वारंवार मागणी करुनही या दुष्काळी भागासाठी केलेली तरतूद अपुरी आहे. पुणे जिल्हयातील शिरुर आणि त्या परिसरातील इतर दोन तालुके महाभयंकर दुष्काळी तालुके असतानाही या प्रकल्पाला तरतूद करण्यासाठी मुळातच दिरंगाई झालेली आहे. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, या प्रकल्पाच्या दुरुस्ती आणि परिरक्षणासाठी 40 कोटी रुपयांची तरतूद करावी. हा प्रकल्प जुना असल्यामुळे याचे बरेच काम प्रलंबित आहे. प्रकल्पामधून पाण्याची गळती होत असल्यामुळे शेतकऱ्यांना या प्रकल्पाचा खऱ्या अर्थाने फायदा होत नाही. म्हणून चासकमान प्रकल्पाची दुरुस्ती करण्याकरिता तातडीने 40 कोटी रुपयांची तरतूद करावी अशी मागणी या पूरक मागण्यांच्या निमित्ताने मी शासनाकडे करीत आहे.

---

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, बाब क्रमांक 63, पृष्ठ क्रमांक 49 यामध्ये सैनिकी शाळा व महाविद्यालयीन भारतीय सैन्य अकादमीमध्ये प्रवेश करण्यासाठी मुलांना 11000 रुपयांची शिष्यवृत्ती मिळत असते. पूरक मागण्यांच्या माध्यमातून माझी शासनाला

विनंती आहे की, आजची महागाईची परिस्थिती लक्षात घेता 11000 रुपयांची तरतूद अपुरी आहे. यामध्ये वाढ करुन ती 15000 रुपये करण्यात यावी.

सभापती महोदय, बाब क्रमांक 84, पृष्ठ क्रमांक 75 यामध्ये पोलिसांच्या वसाहतींकरिता तरतूद करण्यात आली आहे. गेल्या महिन्यामध्ये अंदाज समितीच्या माध्यमातून रायगड, नवी मुंबई आणि पनवेल येथील पोलीस वसाहतींना आम्ही भेट दिली होती. सन्माननीय सदस्य सर्वश्री अरविंद सावंत आणि मधुकर चव्हाण देखील या दौऱ्यामध्ये होते. पोलीस वसाहतीमधील इमारतींची अवस्था अतिशय वाईट आहे. यामध्ये माणूस राहू शकणार नाही. अशा परिस्थितीत पोलीस कर्मचारी आपली 24 तासांची डयूटी करुन अशा इमारतींमध्ये रहात आहेत. गेल्या वर्षी अधिवेशनामध्ये याबाबतचा उल्लेख करण्यात आला होता आणि सन्माननीय सदस्यांनी यासाठी अधिक निधीची तरतूद करण्याची मागणी केली होती. या इमारतींची पुर्नबांधणी व्हावी...

नंतर श्री. भोगले

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ SBT/ KGS/ 17:00

श्रीमती मंदा म्हात्रे.............

हे पुनर्बांधणीचे काम करण्यास सिडको तयार आहे. फक्त शासनाने पुरवणी मागणीद्वारे 2.5 एफएसआय दिला तर सिडको या इमारतींची पुनर्बांधणी मोफत करुन देईल. त्यामुळे मंत्रीमहोदयांनी यासंबंधी विचार करावा अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, बाब क्र.109, पृष्ठ क्र.113 वरील जलसंपदा विभागाच्या मागणीसंबंधी मी बोलणार आहे. बीड जिल्हयातील छोट्या छोट्या तलावांच्या बांधकामासाठी 2 लाख रुपयांची तरतूद केली आहे. ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या कोकणातील जिल्हयांचा या योजनेत समावेश करण्यात आलेला नाही. एकीकडे पावसाची अवकृपा झाल्यामुळे राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. बीड जिल्हयातील छोटे तलाव, हौद, विहिरी यासाठी 2 लाख रुपयांचा निधी देण्यात आला. परंतु ठाणे, रायगड या जिल्हयांतील गावांच्या ठिकाणी जे जुने तलाव आहेत त्यांना निधी देण्याबाबत पुरवणी मागण्यांमध्ये विचार व्हावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, चासकमान हा पुणे जिल्हयातील महत्वाकांक्षी प्रकल्प असून या प्रकल्पामुळे डोंगरी भागातील शेकडो गावातील शेतीसाठी पाणी उपलब्ध होऊन बळीराजाचे जीवनमान सुधारले आहे. या प्रकल्पातील अनेक कामे 40 वर्षापूर्वी रोजगार हमी योजनेमध्ये झालेली असल्यामुळे कालव्यातून मोठया प्रमाणात गळती होत असून 72 कि.मी. पुढे पाणी जात नाही. परिणामी दुष्काळग्रस्त शिरुर तालुक्यात पाणी नेण्यासाठी युध्द पातळीवर प्रयत्न सुरु आहेत. मागील वर्षात निधी उपलब्ध झाला नसला तरी 40 कोटी रुपयांची कामे ठेकेदाराने पूर्ण केली आहेत. चासकमान डावा कालवा कि.मी.72 मधील उर्वरित माती कामाचे अस्तरीकरण करण्यासाठी 2007-08 या वित्तीय वर्षात 70 कोटी रुपयांची तरतूद करण्याबाबत या सभागृहाचे माननीय उपसभापती यांनी अनेक प्रयत्न केले आहेत. या संदर्भात झालेल्या बैठकीमध्ये देखील माननीय उपसभापती महोदयांनी त्यासाठी प्रयत्न करुन पाठपुरावा केलेला आहे. त्यामुळेच शासनाने 20 कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. तरी देखील हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी 40 कोटी रुपयांची तरतूद करणे आवश्यक आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली नियोजन समितीची बैठक पार पडली होती. त्या बैठकीमध्ये 1000 कोटी रुपयांचा निधी जलसंपदा विभागाकडे वर्ग करण्यात आला असून त्यातील 250 ते 300 कोटी रुपये महाराष्ट्र कृष्णा खोरे पाटबंधारे विकास

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे.............

महामंडळाला देण्याचे निश्चित झाले आहे. या 300 कोटी रुपयांमधील किमान 40 कोटी रुपयांची रक्कम पुणे जिल्हयातील चासकमान प्रकल्पासाठी मंजूर करावी अशी मी शासनाला विनंती करते. माननीय उपसभापती महोदयांनी यासाठी विशेष प्रयत्न केलेले आहेत. माननीय उपसभापती महोदय हे त्याच जिल्हयातील असल्यामुळे आणि तेथील जे शेतकरी आहेत त्यांच्या दृष्टीने महाराष्ट्रात पडलेला दुष्काळ लक्षात घेऊन मंत्रीमहोदयांनी पुरवणी मागणीद्वारे निधी देण्याचा विचार करावा व आणखी 20 कोटी रुपयांची रक्कम मंजूर केली तर हा प्रकल्प पूर्ण होऊन अनेक शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळून त्यांना दिलासा मिळू शकेल व शेतकरी सुखी होतील एवढेच मला शासनाला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, बाब क्र.124, पृष्ठ क्र.130 वर कामगारांच्या सामाजिक सुरक्षिततेसाठी पुरवणी मागणी सादर केली आहे. मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या महापारेषण, महानिर्मिती व महावितरण कंपन्यांमध्ये मागासवर्गीयांच्या विविध संवर्गातील सुमारे 10 हजार पदांचा अनुशेष शिल्लक असल्याची घटना जुलै, 2008 मध्ये उघडकीस आली असून ही धक्कादायक माहिती महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेने माननीय उपमुख्यमंत्री, माननीय ऊर्जामंत्री यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. आज जवळजवळ 10 हजार पदांचा अनुशेष शिल्लक आहे.

(नंतर श्री.भारवि......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे....

आज मागासवर्गीयांचा अनुशेष न भरल्याने अनेक मागासवर्गीय उमेदवारांचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. तेव्हा मी आपल्या माध्यमातून विनंती करते की, सदर अनुशेष भरून काढण्यात यावा. शेवटी, मला येथे बोलण्यासाठी संधी दिल्याबद्दल आपले आभार मानते. धन्यवाद. जय हिंद जय महाराष्ट्र.

......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकरण संस्था) : सभापती महोदय, प्रथम मी गृह विभागाच्या मागण्या, पान क्रमांक 9, बाब क्रमांक 32 वर बोलणार आहे.

मी येथे एकच मुद्दा उपस्थित करणार आहे की, भिवंडी येथे पोलीस ठाणे शासन कधी बांधणार आहे ? भिवंडी येथे दंगल झाली होती. न्यायालयाने निर्णय दिला होता. त्यामुळे भिवंडीचे पोलीस ठाणे शासन का करीत नाही ? यासंबंधीचे उत्तर माननीय गृहमंत्र्यांकडून स्पष्टपणाने आले पाहिजे. तेथील कुठल्याही धार्मिक संस्थेने किंवा त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस ठाणे नको असे सांगितलेले नाही. येथे दोन पोलिसांचे बळी गेलेले आहेत. त्यामुळे यावर अधिक भाष्य न करता तेथे पोलीस ठाणे करण्यामध्ये शासनाला कोणती अडचण आहे, याचा खुलासा येथे व्हावा व पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून तेथे पोलीस ठाणे व्हावे अशी मी मागणी करीत आहे.

यानंतर मी शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 55 वर बोलणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून दहावी आणि बारावीचे शिक्षण मंडळ कोकण विभागासाठी वेगळे करण्यात यावे अशी मागणी करण्यात येत आहे. यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले होते. यासाठी माननीय मंत्रिमहोदय प्रयत्न करीत आहेत. मध्यंतरी असे सांगण्यात आले होते की, रत्नागिरी-चिपळूण येथे जागा मिळत नाही. ही बाब शासनाला योग्य नाही. शासन अर्जन्सी क्लॉज खाली आवश्यक असलेली कुठलीही जमीन संपादित करू शकते. लार्जर इंटरेस्ट ऑफ दी स्टेट अशा प्रकारची व्याख्या अर्जन्सी क्लॉजमध्ये आहे. त्यामुळे तेथील जमीन शासनाने संपादित करावी अशी मी विनंती करीत आहे. सन 2005, 2006, 2007 मध्ये सांगण्यात आले की, ऑक्टोबर आणि मार्च मध्ये घेण्यात येणाऱ्या परीक्षा येथे घेण्यात येतील. त्याच बरोबर वेतनेतर अनुदान व इमारतींचे भाडे देण्यात येत नाही. ते देखील देण्यात यावे अशी मी विनंती करतो.

यानंतर मी जलसंपदा विभागाच्या मागण्यांवर बोलणार आहे. तत्पूर्वी मी मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास एक गोष्ट आणणार आहे. शिरूर तालुक्यातील गावातील लोकांनी सर्वांना लेखी निवेदने दिली आहेत. त्या विषयावर अनेक सन्माननीय सदस्य बोलले असल्यामुळे मी जास्त काही बोलणार नाही. जवळ जवळ 300 कोटी रूपये माननीय मुख्यमंत्र्यांनी जलसंपदा विभागाकडे वर्ग

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ...

केला आहे. 300 कोटी रूपये कृष्णा खोऱ्यासाठी दिले आहेत. शिरूर तालुक्यातील ग्रामस्थांनी सर्वांना निवेदन दिलेले आहे. त्यामुळे 40 कोटी रूपयांची तरतूद शिरूर तालुक्यातील गावातील ग्रामस्थांसाठी करावी अशी मी विनंती करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर मी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या बाब क्र.278, पान क्र.267 वर बोलणार आहे. विद्यापीठात मराठी भाषेच्या अध्यासनाची स्थापना करण्याकरिता जवाहरलाल नेहरून विद्यापीठ, नवी दिल्ली यांना अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली. आता राज्यात शिक्षणाचा आकृतीबंध 10+2+3 असा आहे. आम्ही जेव्हा दहावीत होतो, तेव्हा 11+4 असा शैक्षणिक आकृतीबंध होता. म्हणजे महाविद्यालयात गेल्यानंतर प्रथम वर्ष कला, द्वितीय वर्ष कला, ज्युनिअर बी.ए., सिनिअर बी.ए.असा क्रम होता. त्यावेळी कला शाखेतील विद्यार्थ्यांना संस्कृत भाषा ही अनिवार्य होती. भारतातील सर्व भाषांची जननी संस्कृत आहे. आपल्याकडे संस्कृत साहित्य आहे. वेद आहे, पुराणे आहेत. जगात संपन्न साहित्य हे संस्कृतमध्ये होऊन गेले. जगात जेवढी महाकाव्ये झाली आहेत, त्यात फक्त शेक्सपिअरचे एक काव्य सोडले तर सगळी महाकाव्ये संस्कृतमध्ये कालिदास, भवभुती, भास, यांच्या माध्यमातून भारतात झाली आहेत. संस्कृतमध्ये अतिशय ज्ञान संपदा आहे. पूर्वी महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्ये कला शाखेत संस्कृत भाषा शिकविली जात होती. आता पुन्हा निष्णात व्यक्तिंना बोलावून संस्कृत विषय सुरू करणे आवश्यक आहे. तसे केले नाही तर जगात समृद्ध असलेली संस्कृत भाषा आणि ज्ञान लोप पावून जाईल. त्यामुळे आपण संस्कृत भाषेकडे अतिशय गांभीर्याने पहावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

यानंतर श्री.पी खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. भारवि.... 17:10

श्री. मधुकर चव्हाण ......

दुसरे म्हणजे पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या संदर्भात बाब क्र.315, पृ.क्र.292 व 293 या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की, या विभागाचे मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी अत्यंत चांगला निर्णय घेतलेला आहे तो म्हणजे कोल्हापूर येथे जवळपास 70 एकर जमिनीवर आधुनिक चित्रनगरी उभारण्यासंबंधीचा हा निर्णय आहे. कारण सध्या असलेली तेथील वास्तू पाहिली तर अतिशय वेदना होतील म्हणून आपल्याला माझी विनंती आहे की, आपण घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी त्वरित करावी. केवळ आश्वासन देऊ नये कारण हिंदीत एक कहावत आहे की, "शपथ लेना तो सरल है, पर निभाना कठिन है, साधना का पथ कठिन है. आपण सामाजिक विकासाच्या, दलितांच्या उध्दाराच्या, पर्यटन विकासाच्या अनेक शपथा घेतात, परंतु त्या पूर्ण केल्या नाही तर असे आश्वासन दिलेले शब्द व्याकरणातील शब्दच राहतात, म्हणून जो निर्णय आपण घेतलेला आहे त्याची अंमलबजावणी करावी अशी मी विनंती करतो.

त्यानंतर पर्यटन विभाग, बाब क्र.320, राज्यातील किल्ल्यांसंबंधीची असून वर्तमानपत्रातून नेहमीच आपण वाचत असतो. आपला ऐतिहासीक ठेवा म्हणजे राज्यातील किल्ले. त्यात पन्हाळगड, रायगड किंवा राजगड असेल. शिवनेरी किल्ल्यामध्ये 6 कोटी रुपये खर्च करुन शासनाने फक्त एक भिंत बांधलेली आहे. ज्या शिवनेरी किल्ल्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला त्याची आज अवस्था अत्यंत कठीण आहे. पन्हाळगड इतका सुंदर आहे परंतु तो सुध्दा ढासळत चालला आहे. संपूर्ण जगामध्ये भारत हा एकमेव देश अस आहे की, किल्ल्यांच्या माध्यमातून आपला ऐतिहासिक ठेवा महापुरुषांनी जतन करुन ठेवलेला आहे. परंतु जे त्यांनी जतन करुन ठेवले ते आपण पर्यटन स्थळे म्हणून विकसित केले नाही तर आपल्यासारखे नतद्रष्टे आपणच असे होईल, म्हणून याकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे औषधी द्रव्ये विभागाच्या संदर्भात मला सांगावयाचे आहे की, या विभागाचे मंत्री महोदय श्री. मनोहर नाईक यांना तर गेल्या चार वर्षात आम्ही कधीच पाहिले नाही. ते कसे बोलतात, कशी उत्तरे देतात, हे आम्हाला माहीत नाही. माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक आणि स्व. सुधाकरराव नाईक यांची पुण्याई म्हणावी लागेल अथवा त्यांच्या नशिबाने ते मंत्री झाले असे म्हणावे लागेल. आमच्या मालवणी भाषेत एक म्हण आहे ती म्हणजे "नशिबानं घोव खावचो"

......2

23-07-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4A-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ......

परंतु अन्न व औषध प्रशासन या विभागाच्या संदर्भात माझी अशी सूचना आहे की, हाफकिन संस्था बंद पडल्यापासून आपल्या राज्यात कुठलीही लस आपण निर्माण करु शकत नाही. म्हणून 50 कोटी रुपये शासनाने द्यावेत आणि 50 कोटी रुपये हाफकिन संस्थेने उभे करावे आणि ही संस्था पुन्हा कार्यरत करावी, अशी माझी विनंती आहे. या संस्थेची जी जमीन 7/12 च्या उताऱ्यावर दाखविलेली आहे ती संस्थेच्या नावाने ट्रान्सफर करुन, त्या जमिनीवर वित्तीय संस्थेकडून ही हाफकिन संस्था कर्ज काढू शकेल. अशा प्रकारे ही संस्था पुन्हा सुरु करुन ज्या लसी आपल्याकडे मिळत नाहीत, परदेशातून त्या विकत घ्याव्या लागतात त्या पुन्हा या संस्थेत निर्माण कराव्यात. हाफकिन संस्थेशी संबंधित राज्यमंत्री प्रामाणिकपणे काम करीत आहेत पण त्यांची अडचण त्यांनी मला सांगितली आहे, ती अडचण मी येथे सांगू शकत नाही. परंतु निदान मंत्रिमंडळासमोर सांगून ती दूर करावी, अशी माझी सूचना आहे.

अशा प्रकारे पुरवणी मागण्यांच्या अनुषंगाने आम्ही या सभागृहात मांडतो, मग ते ट्रेझरी बेंचचे असोत अथवा अपोझिशन बेंचचे असोत, ते सर्व जनतेच्याच अडचणी मांडतात, या सर्व प्रश्नांना रिझल्ट ओरिएंटेड उत्तरे द्यावीत अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-------------

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, बाब क्र. 21, पृ.क्र.17-गृह विभागाच्या संदर्भात मला अशी सूचना करावयाची आहे की, पोलीस खात्यातील कर्मचाऱ्यांना बूट व गणवेश पुरविण्यासाठी आपण ही पुरवणी मागणी सभागृहासमोर आणलेली आहे. परंतु माझी अशी विनंती आहे की, या पोलिसांना आपण त्यांच्याच मापाचे बूट द्यावेत. कारण ज्या पध्दतीने पोलिसांना ट्रिट केले जाते, त्यांची हेटाळणी केली जाते की, जे जोडे मिळतील ते घ्या. अशा प्रकारे त्यांच्या मापाचे नसतानाही बूट दिले जातात, यात सुधारणा झाली पाहिजे. आणि बाटा अथवा कुठल्याही स्टँडर्ड कंपनीचा बूट असो, त्यांच्याकडे ते घेण्यासाठी त्या त्या कंपनीचे कुपन्स द्यावेत, जेणेकरुन त्यांच्याच पायाचे बूट त्यांना घेता येतील, अशी माझी सूचना आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ SBT/ MMP/ प्रथम श्री. खर्चे.... 16:55

श्री. अरविंद सावंत ...

त्यामुळे पोलिसांच्या पायाच्या साईजचे बूट त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावे एवढी विनंती आहे. पोलिसांना त्यांच्या पायाच्या साईजचे बूट देण्यात यावे ही मागणी सभागृहात करावी लागली हे आमचे दुर्दैव आहे.

सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 23 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. पोलीस दलातील गस्ती नौकांच्या दुरुस्तीसाठी 90 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. गस्ती नौका आम्ही केंद्र सरकारकडे परत पाठवू असे आज सकाळी माननीय मंत्रीमहोदय श्री. हसन मुश्रीफ साहेबांनी सभागृहात सांगितले आहे त्यामुळे यासंदर्भात खुलासा करण्यात यावा. या गस्ती नौकांचा वापर आपण करणार आहात काय याचा सुध्दा खुलासा करावा. विद्यमान परिस्थितीत खाजगी मच्छिमारांच्या बोटींच्या माध्यमातून गस्त घातली जात आहे. गस्ती नौकांच्या प्रश्नाच्या उत्तरात दोन माननीय मंत्र्यांच्या उत्तरात तफावत आहे. सकाळी मंत्रीमहोदयांनी सांगितले होते की, आम्ही या बोटी केंद्रसरकारला परत पाठवू परंतु पुरवणी मागण्यांमध्ये या बोटीच्या दुरुस्तीसाठी 90 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे त्यामुळे गस्ती नौकांच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 32, पृष्ठ क्रमांक 20 वरील कारागृह इमारतीच्या दुस-या मजल्याचे बांधकाम यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. या विषयाच्या संदर्भात मी एकच प्रश्न विचारतो की, भिवंडी येथील पोलीस स्टेशनचे बांधकाम कधी पूर्ण होणार? या पोलीस स्टेशनवर मजला कधी चढणार ? भिवंडी येथील पोलीस स्टेशनचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करुन शासन नावाची चिज शिल्लक असून कोणत्या तरी समाजाच्या दबावाखाली येऊन समाजाचे रक्षण करणा-या इमारतीचे बांधकाम शासन थांबवते हे शासनास भूषणावह नाही.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक -62, बाब क्रमांक 76, मॅफकोच्या संदर्भात मी माझे विचार मांडणार आहे. पुरवणी मागण्यांमध्ये मॅफकोच्या कर्मचा-यांच्या स्वेच्छा निवृत्तीसाठी तरतूद नाही असे एक वर्ष तरी आम्हाला दाखवून द्या. आजपर्यंत मॅफकोतील किती कर्मचा-यांपैकी किती कर्मचा-यांनी स्वेच्छा निवृत्ती घेतली, अजून किती कर्मचा-यांची स्वेच्छा निवृत्ती शिल्लक आहे? मॅफकोच्या कर्मचा-यांना बसून पगार दिला जात आहे काय? त्यांची डिप्लॉयमेंट आपण करु शकत नाही काय? या सर्व प्रश्नांची उत्तरे या निमित्ताने माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावी.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ...

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 73, बाब क्रमांक 83, पोलीस कार्यालयीन इमारतीसाठी तरतूद केलेली आहे. मी या ठिकाणी सातत्याने मागणी करतो की, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी बीडीडी पोलीस चाळीत जाऊन स्वत: पाहणी करावी. या ठिकाणी श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी नव्या मुंबईतील पोलीस वसाहतीच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. आपला पोलीस कर्मचारी बीडीडी चाळीत कशा प्रकारे राहत आहे हे स्वत: पाहून यावे. बीडीडी चाळीतील पोलीस वसाहतीची दुरुस्ती कमिशनरांच्या वेलफेअर फंडातून तरी करावी अशी सूचना मी मागच्या वेळेस केली होती. बीडीडी चाळीतील पोलीस वसाहतीत पावसाचे पाणी घरात येऊ नये म्हणून पोलीस आपल्या घरातील छताला प्लॅस्टीकचा पेपर लावून पाण्याची गळती थांबवतात त्यामुळे या बीडीडी पोलीस चाळीच्या संदर्भात माननीय उपमुख्यमंत्र्यांनी जातीने लक्ष घालावे व त्यासाठी तरतूद करावी परंतु अशा प्रकारे तरतूद कोठेही दिसत नाही त्यामुळे मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 86, पृष्ठ क्रमांक 78, सिंधुदुर्ग येथील ओरस येथे शासकीय विश्रामगृह बांधण्यात आलेले आहे परंतु स्टाफ नसल्यामुळे हे विश्रामगृह अजून सुरु होऊ शकलेले नाही. त्यामुळे या ठिकाणचे विश्रामगृह लवकरात लवकर सुरु करण्याच्या संदर्भात खुलासा करावा.

सभापती महोदय, बाब क्रमांक 87, पृष्ठ क्रमांक 87, मार्ग व पुलांच्या बांधकामाच्या संदर्भात तरतूद करण्यात आलेली आहे त्यावर मी माझे विचार मांडणार आहे. या ठिकाणी माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी या ठिकाणी जसा गंभीर उल्लेख केला तसाच गंभीर प्रकार हा सुध्दा आहे. मुळशी धरणाच्या संदर्भात सेनापती बापट यांनी आंदोलन केले होते. मुळशी धरणग्रस्तांची 36 गावे त्या ठिकाणच्या तलावाच्या पलिकडे आहेत. या ठिकाणचे ग्रामस्थ वाघाडी पुलाची कित्येक वर्षापासून मागणी करीत आहेत. या पुलाला प्रशासकीय मान्यता मिळते. या पुलाचा खर्च 25 कोटी रुपयांपर्यंत गेलेला आहे. विधानसभेतील सन्माननीय सदस्य श्री. शरद ढमाले यांनी जलसमाधी घेण्याची घोषणा केल्यानंतर टाटा कंपनीने लिखित स्वरुपात दिले आहे की, आम्ही तातडीने 10 टक्के रक्कम देऊ. टाटा कंपनी या पुलासाठी 2.5 कोटी रुपये देत आहेत त्यामुळे उर्वरित रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दिली जाणार आहे काय? या ठिकाणी जर पूल झाला तर या ठिकाणच्या ग्रामस्थांना दिलासा मिळेल. मुळशी धरणग्रस्तांचा विषय सुध्दा असाच आहे. मुळशी धरणग्रस्तातील काही लोकांचे पुनर्वसन अजूनपर्यंत झालेले नाही त्यामुळे या निमित्ताने माननीय मंत्रीमहोदयांनी लक्ष घालावे अशी विनंती आहे.

...3



SGJ/ SBT/ MMP/ प्रथम श्री. खर्चे.... 16:55

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ...

सभापती महोदय, बाब क्रमांक 107, पृष्ठ क्रमांक 113 काळम्मा वाडीच्या धरणाची दुरुस्ती. चासकमान धरणाची जी अवस्था आहे तशीच अवस्था या ठिकाणी सुध्दा आहे. या धरणाच्या दुरुस्तीसाठी निधीची तरतूद करण्यात आलेली आहे काय यासंदर्भातील माहिती या निमित्ताने द्यावी.

सभापतीन महोदय, बाब क्रमांक 126, पृष्ठ क्रमांक 131 च्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. आपण गेल्या वर्षात किती मे.वॅट वीज निर्माण केली ? प्रत्यक्षात वीज निर्मितीची क्षमता असलेल्या ठिकाणी आपण किती वीज निर्माण करीत आहोत ? मुळशी धरणातून टाटा वीज निर्मिती करते परंतु मुळशी धरणग्रस्तांना वीज देत नाही अशी प्रकल्पग्रस्तांची मागणी आहे. त्यामुळे मुळशी प्रकल्पग्रस्तांना वीज उपलब्ध करुन द्यावी अशी माझी विनंती.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 17.20

श्री.अरविंद सावंत ..

सभापती महोदय, पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागाची बाब क्रमांक 312 , पान नंबर 291 संबंधी मला बोलावयाचे आहे. राज्य नृत्य, नाटय, तमाशा व संगीत महोत्सवाकरिता अतिरिक्त तरतूद करण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आली आहे. कोकणामध्ये भजनी बुवा आणि दशावतारी कला सादर करणारे कलावंत आहेत तेव्हा इतर नाटय कलावंताप्रमाणे भजनी बुवा आणि दशावतारी कलावंतासाठी निश्चित असे अनुदान देण्यात यावे अशी मी विनंती करतो .त्याचबरोबर राजगुरुंच्या चित्रपटाच्या बाबतीत एक प्रकार घडला असून ज्यांनी हा चित्रपट न काढताच शासनाकडून पैसे घेतलेले आहेत ते पैसे त्यांच्याकडून वसूल करण्यात येईल असे सभागृहात कबूल करण्यात आले होते तेव्हा ते पैसे त्यांच्याकडून वसूल केले होते काय ? त्याचबरोबर श्री.प्रकाश मोहाडीकर यांनी राजगुरुंचा जो चित्रपट निर्माण केलेला आहे त्याबाबतीत पुढे काय कार्यवाही करण्यात आली होती या बाबतीत देखील माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा.

सभापती महोदय,बाब क्रमांक 320 पान नंबर 293 संबंधी मला बोलावयाचे आहे. ऐतिहासिक वारसा असलेले किल्ले आणि ऐतिहासिक स्मारकांचे बांधकाम जतन करणे व पूर्ववत करण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे. किल्ल्याच्या संदर्भात मी जास्त काही बोलण्याची गरज नाही. आपल्याला सर्वांना कल्पना आहे की पन्हाळगड असो वा अन्य कोणताही किल्ला असो त्या किल्लयावर जाण्याच्या बाबतीत नवीन ट्रेन्ड पुढे आला असून त्याप्रमाणे अनेक दारुबाज किल्ल्यावर जावयास लागले आहेत. सिंहगडाच्या पायथ्याशी रेव्ह पार्टीचे प्रकरण मध्यंतरी घडले होते हे आपल्याला माहीत आहेच. तेव्हा असे प्रकार करणा-याविरुध्द कडक कारवाई करण्यात आली पाहिजे. रायगडावर काही तरुण मुले गेली होती आणि तेथे दारु पित असतांनाचे छायाचित्र आजच्या एका वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आले होते. अशा प्रकारामुळे शिवप्रभुंचा देखील अवमान होत आहे. तेव्हा शासनाने याबाबतीत कडक धोरण स्वीकारले पाहिजे अशी माझी विनंती आहे. याबाबतीत मी गृह विभागाला देखील विनंती करणार आहे कारण गृह खात्याच्या वतीने ही कडक कारवाई केली जाणार आहे. तेव्हा जेवढे किल्ले आहेत त्या ठिकाणी असे प्रकार घडता कामा नयेत या दृष्टीने गृह विभागाने सर्व पोलिसांना सूचना द्याव्यात. सांस्कृतिक विभाग तर याबाबतीत योग्य ती दक्षता घेईलच परंतु त्या ठिकाणी कचरा करणे, द

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ..

दारुच्या बाटल्या फेकणे, दारु पिणे असे प्रकार करणा-याविरुध्द कडक कारवाई करण्यात यावी तसेच त्याना अटक करण्यात यावी अशा सूचना देखील गृह विभागाने पोलिसांना दिल्या पाहिजेत. किल्ल्यावर जाऊन दारुच्या बाटल्या फोडण्यासारखे प्रकार तेथे घडत असतात तेव्हा ते थांबविण्यात यावेत अशी मी विनंती करतो आणि या पूरक मागण्यांवर बोलण्याकरिता आपण मला संधी दिली याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो जय हिंद जय महाराष्ट्र.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड ( विधान सभेने निवडलेले ): सभापती महोदय, सन 2008-2009 च्या पूरक मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, उद्योग,उर्जा व कामगार विभागाची बाब क्रमांक 125 पान नंबर 130 संबंधी प्रथम मी बोलणार आहे.सुधारित एकात्मिक गृह निर्माण योजनेअंतर्गत विडी कामगारांच्या घरकुलाच्या बांधकामासाठी अर्थसहाय्य देण्याकरिता 22 लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे. त्याबद्दल मी राज्य शासनाचे अभिनंदन करतो. राज्यामधील अनेक विडी कामगार आज अत्यंत हालाखीच्या आर्थिक परिस्थितीत काम करीत आहेत. त्यांना सुध्दा विडी कामगारांच्या घरकूल योजनेत समाविष्ट करुन घ्यावे. अशी मी या चर्चेच्या निमित्ताने शासनाला विनंती करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 309,310,311,312 पान नंबर 290 व 291 संबंधी मला बोलावयाचे आहे. या पूरक मागण्यामध्ये तरतूद करण्यात आल्याबद्दल माननीय मुख्यमंत्री आणि माननीय सास्कृतिक कार्य मंत्र्यांचे अभिनंदन करतो. सभापती महोदय, बाब क्रमांक 309 मध्ये लोककला सादर करण्यासाठी 1 कोटी 22 लाख 83 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे. त्याच बरोबर बाब क्रमांक 310 मध्ये शाहिरी व कीर्तन करणा-या नवीन कलाकारांकरिता प्रशिक्षण कार्यक्रमाच्या आयोजनासाठी 7 लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे बाब क्रमांक 312 मध्ये राज्य नृत्य, नाटय, तमाशा संगीत महोत्सवासाठी 96 लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे, तसेच विख्यात कलाकरांना मानधन देण्यासाठी या पूरक मागण्यांच्या माध्यमातून तरतूद केलेली आहे. शाहीरी , तमाशा , कोकणातील दशावतारी ही महाराष्ट्राची कला आणि परंपरा असून ही कला सादर करणारे कलाकार आता वृध्द झाले असल्यामुळे ही कला दिवसेंदिवस लोप पावत चालली आहे . गेल्या आठवडयात शाहीरी आणि लोककला सादर करणा-या कलाकारांनी मोर्चा काढण्याचा निर्णय जाहीर केला होता . आपल्या सारखे संवेदनशील सरकार व सास्कृतिक मंत्री या राज्यात असतांना त्या वृध्द कलाकारावर मोर्चा काढण्याची वेळ येऊ नये अशी माझी आपल्याला विनंती आहे. जे वृध्द कलावंत आहेत त्यांच्या मानधनाची रक्कम निश्चित करुन दहा वर्षापेक्षा अधिक काळ लोटला असून सध्या महागाईच्या काळात हे कलाकार अत्यंत अपु-या मानधनावर जीवन जगत आहेत तेव्हा त्यांचे मानधन वाढवून देण्यात यावे. त्याचबरोबर या कलाकाराच्या आरोग्याकडे सुध्दा गाभीर्याने लक्ष देण्यात यावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. राज्यातील लोककला जर जीवंत ठेवावयाच्या असतील तर या कलाकारांच्या घरातील मुले त्यांचे वारस म्हणून पुढे येणार आहेत त्यांना असा विश्वास वाटला पाहिजे की, लोककला जपण्याचे काम जर मी केले तर राज्य सरकार आणि समाज माझ्याकडे लक्ष देईल व माझा सांभाळ करील. तेव्हा या कलाकारांच्या मानधनाच्या व आरोग्य सेवेच्या प्रश्नात लक्ष घालावे आणि त्यांचे मानधन वाढवून देण्यात यावे अशी मी माननीय सांस्कृतिक कार्य मंत्र्यांना विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

------

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री.अरविंद सावंत )**

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, वेळ संपल्यानंतर मुद्दा मांडायचे विसरू नये म्हणून सर्वात शेवटी मांडावयाचा मुद्दा मी सुरुवातीसच मांडते. बाब क्रमांक 312, पृष्ठ क्र.291 - महाराष्ट्र शासनाने विठाबाई नारायणगावकरांची दखल घेतली आहे. नारायणगाव येथे त्यांच्या नावे एक स्मारक उभे करावे अशी चर्चाही झाली तसेच त्यांच्या नावाने एक स्मृती पुरस्कार देखील सुरू करावा अशाही प्रकारची चर्चा झाली. परंतु केवळ चर्चा होऊन भागणार नाही तर या बाबतीत शासनाने ताबडतोबीने निर्णय घेऊन हा पुरस्कार सुरू करावा आणि विठाबाई नारायणगावकर यांचे स्मारक कसे उभे होईल या दृष्टीने तातडीचे पाऊल टाकावे असे मला येथे आवर्जून सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 106 - यामध्ये कासारी, पिंपरवडा आणि सरफराजपूर या गावांना पाणी उपलब्ध करून दिले त्याबद्दल जलसंपदा खात्याला धन्यवाद दिले पाहिजेत. मोहा-वंजारवाडी, जांभूळडोह, तालुका परळी या ठिकाणी जो तलाव आहे त्याचे पाणी पावसाळ्यामध्ये मालदरा तांड्यामध्ये शिरते आणि तेथील संपर्क तुटतो. म्हणून या तलावावर कोल्हापूर पद्धतीचा बंधारा पुलासह बांधावा. तसेच याच तलावाची उंची वाढवावी. त्याचप्रमाणे बीड जिल्ह्यामध्ये काही साठवण तलाव होऊ शकतात, ज्यात पाणी उपलब्ध होऊ शकते. त्यामध्ये बुटेनाथ-अंबेजोगाई, कोरडेवाडी-काचरवाडी, तालुका केज, काठवडा, ता.बीड, चिंचोलीनाथ, ता.पाटोदा, हनुमानगड, ता.पाटोदा, मांडवा-परळी, लेंडेवाडी आणि दौंडवाडी क्र.3, तालुका परळी., हे तलाव त्यात होऊ शकतात. तसेच जहांगीर-मोहा साठवण तलाव, बांगरवाडा साठवण तलाव, मैंदवाडी साठवण तलाव हे तिन्ही धारूर तालुक्यातील आहेत हेही तलाव होऊ शकतात. सभापती महोदय, रेवली साठवण तलाव,तालुका परळी आणि जेगाव साठवण तलाव, ता.माजलगाव यांचा केवळ ताबा घेऊन काम करण्यासाठी हे काम प्रलंबित आहे, यावर लक्ष देणे गरजेचे आहे. आरणवाडी साठवण तलावाचे काम चालू आहे पण त्यात अजिबात काळी माती वापरली जात नाही. त्यामुळे काम बंद पडलेले आहे. काम बंद करणे हा त्यावरील पर्याय असू शकत नाही. कारण पुन्हा डीएसआर वाढणार आहे. तेव्हा आवश्यक वाटले तर लीड वाढवून देऊन, रिवाईज एस्टिमेट करावे आणि जेथून कोठून काळी माती मिळेत तेथून ती आणावी, कारण त्या परिसरामध्ये काळी माती नाही याची मलाही कल्पना आहे., म्हणूनच मिळेल तेथून काळी माती आणून या आरणवाडी साठवण तलावाचे काम कोठल्याही परिस्थितीत पूर्ण झाले पाहिजे.

..... 4डी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दराडे ....

सभापती महोदय, बाब क्रमांक 109, पृ.113 - पाटबंधारे प्रकल्पांची दुरूस्ती, पुर्नस्थापना, पुर्ननवीकरण, पथदर्शक प्रकल्पांतर्गत 1) मोहा वंजारवाडी एमआय टँक, ता.परळी, 2) उथळा बृहत लघुसिंचन तलाव, ता. शिरूर, 3) लघुसिंचन तलाव वांगी, 4) लघुसिंचन तलाव वाका, 5) लघुसिंचन तलाव खामगाव, 6) लघुसिंचन तलाव आमला, 7) लघुसिंचन तलाव तांबवा, 8) लघुसिंचन तलाव हिवरसिंगा, रोहतवाडी या तलावांचा समावेश करावा. तसेच निक्रूड लघुसिंचन तलाव, पारगाव लघुसिंचन तलाव, थेरला पाझर तलाव क्र.1 यांची उंची वाढवून त्यांचे साठवण तलावात रूपांतर करण्यात यावे.

सभापती महोदय, त्यानंतर बाब क्रमांक 106 च्या संदर्भात मी एक बाब सांगावयाचे राहून गेले आहे, ती बाब मी येथे नमूद करते. सभापती महोदय, बीड शहरामध्ये एक ऐतिहासिक असा निजामकालीन तलाव आहे, त्याला खजाना बावडी नावाची विहीर आहे. ही विहीर बघण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशातून देखील अनेक लोक येत असतात. या विहिरीचा तळ नजरेला दिसेल असा आहे. पूर्वेकडून एक अंडरग्राऊंड डोंगरातून कॅनॉल आहे आणि पश्चिमेकडून देखील एक कॅनॉल आहे. पण या विहिरीमध्ये नेमके पाणी कोठून येते हे समजत नाही. यातील एक कॅनॉल असा पुढे गेलेला आहे त्यातून दीड हजार हेक्टर सिंचन होऊ शकते. इतकी सिंचन क्षमता या एका विहिरीमध्ये आहे. पण आता अडचण अशी झाली आहे की, आता 500 हेक्टर सिंचन क्षमता या विहिरीची कमी झालेली आहे. कारण या विहिरीच्या मॅनहोलमध्ये, मॅनहोल म्हणजे ज्यात माणूस उतरून दुरूस्त करू शकेल अशी जागा आहे तेथे, कचरा साठला आहे. म्हणून कोठल्या पद्धतीने ही विहीर दुरूस्त करता येईल हे पहावे. कारण ही ऐतिहासिक अशी विहीर आहे, तिचे जतन होणे आवश्यक आहे. पूर्वी तर बीड शहराला देखील या विहिरीचे पाणी मिळत होते. नंतर पालीचा तलाव शहरासाठी बांधला गेला.

सभापती महोदय, बाब क्रमांक 125, पृ. 130 - दहिफळ वडमावली, ता.केज येथे साडेपाचशे एकर गायरान आहे. त्या गावात केमिकल झोन निर्माण करावा अशी मागणी आहे. या संदर्भात मी माननीय राज्यमंत्री श्री.राणा पाटील यांचे आभार मानीन की, त्यांनी या संदर्भात एक बैठक देखील घेतलेली आहे. परंतु याबाबत पुढे निर्णय घेऊन या गावात कोठलीही कारखानदारी आणली तरी त्यासाठी आम्हा गावकऱ्यांची तयारी आहे. याबाबत आपण निर्णय घ्यावा एवढीच मागणी आहे.

..... 4डी 3 ...



KBS/KGS/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 17:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दराडे ....

सभापती महोदय, महसूल व वन विभागाच्या बाब क्र.35, पृ. 26 या संबंधात मला बोलावयाचे आहे. आमच्या बीड जिल्ह्यात भूसंपादन अधिकारी नाही, त्यांची नेमणूक व्हावी. तसेच सुकळी या गावाला गुणवती प्रकल्पाचे पाणी जाते आणि गावात राहणे कठीण होते. या गावाचे पुनर्वसन करण्याबाबत फार पूर्वीच निर्णय घेतलेला आहे. परंतु अजून ती कारवाई पूर्ण झालेली नाही. जमीनही संपादित केलेली आहे तरी सुकळीच्या पुनर्वसनाची कारवाई त्वरित पूर्ण करावी ही विनंती. परळी शहरातील आणि अवती भोवतीचे डोंगर खोदणे बंद करावे. तसेच महाराष्ट्रातील सगळ्या 7-12 वर पतींच्या बरोबर पत्नींचे नाव लावण्याची कारवाई देखील करावी. तसेच तलाट्याच्या नवीन भरतीमध्ये 30 टक्के आरक्षणाची काटेकोर अमलबजावणी करावी अशी विनंती आहे.

त्यानंतर शेवटचा मुद्दा बाब क्रमांक 64, पृ. 51 - क्रीडा व युवक संचालनालय,पुणे यांच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या क्रीडा अधिकारी वर्ग 2 इ गट ब, राजपत्रिक अधिकारी दर्जा देऊन वेतनश्रेणी लागू करण्याचा जो प्रस्ताव शासनाकडे गेल्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहे तो मान्य करावा. तसेच जिल्ह्यातील क्रीडांगणाच्या जागा समपातळीवर कराव्यात. तसेच बीड स्टेडियमवरील कार्यक्रम बंद करावेत. बीडच्या स्टेडियमवर एवढे कार्यक्रम होतात... आमचे सहकारी श्री.नवले साहेब आता येथे उपस्थित नाहीत, पण त्यांच्या आई महोत्सवासह अनेक सामुदायिक विवाह होतात, ....

( यानंतर श्री. सरफरे ....4इ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे...

त्यानिमित्त ते स्टेडियम खोदण्याचे नेहमी काम केले जाते. तेव्हा बीड येथील स्टेडियममधील सर्वच सांस्कृतिक कार्यक्रम बंद करुन केवळ खेळण्यासाठी ते स्टेडियम ठेवावे. गावा-गावामध्ये व्यायामशाळा निर्माण कराव्यात. तसेच, 5 हजार लोकसंख्या असलेल्या गावाच्या ठिकाणी "गाव तिथे क्रीडांगण" ही योजना अंमलात आणावी.

सभापती महोदय, मागील अधिवेशनातील पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी मी ज्या रस्त्यांच्या नावांचा उल्लेख केला होता व मागणी केली होती त्या रस्त्यांबाबत कोणतीही कार्यवाही शासनाकडून झालेली नाही हे माझ्या लक्षात आले आहे. त्यामुळे मी रस्त्यांची नावे याठिकाणी सांगणार नाही. तरीसुध्दा बाब क्र.78, रस्ते व पूल दुरुस्ती ही मागणी आजही करण्यात आली आहे. या मागणी सोबत जोडपत्रांमध्ये खालील गावातील रस्त्यांचा समावेश करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपविणार आहे. परळी रेल्वेवरुन जाणारा पूल केव्हा पडेल हे सांगता येत नाही. तेव्हा त्या पूलाचे मजबूतीकरण आणि रुंदीकरण होणे गरजेचे आहे. बाभळगाव - दरडवाडी रस्ता झाला पाहिजे. सभापती महोदय, रस्ता नसल्यामुळे गेल्या वर्षी एका गर्भवती महिलेला दवाखान्यात नेता आले नाही म्हणून ती वारली अशी परिस्थिती आहे. नांदूर फाटा ते देवगाव फाटा, विडा - येवला रस्ता, तेलगाव - धारुर रस्ता, सोनीमोहा ते जहागीरमोहा रस्ता पुलासह झाला पाहिजे.गाढे - पिंपळगाव ते परळी बीड रस्ता, गाढे पिंपळगाव ते साबळी कवडगाव रस्ता, शिरसाळा ते मोहा रस्ता, मोहा ते गर्देवाडी हा रस्ता झाला पाहिजे. माझ्या सासूरवाडीच्या रस्त्यांची सुध्दा फार वाईट अवस्था झाली आहे. मोहा ते करेवाडी,तागडगाव जोड रस्ता, पाडोळी जोड रस्ता, बोरखेड जोड रस्ता आणि बीड बायपास रस्ता हे रस्त्यांचे प्रश्न कृपया, कृपया आणि कृपया सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्षपूर्वक सोडवावेत अशी विनंती करते आणि मला संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपविते. धन्यवाद.

तालिका सभापती (अरविंद सावंत) : माननीय सदस्यांच्या सासूरवाडीचा रस्ता प्राधान्याने करण्यात यावा, नाहीतर त्यांना माहेरी पाठविले जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2008-09 च्या पूरक मागण्यांच्या संदर्भात मी याठिक्**ाणी माझे विचार मांडणार आहे. पृष्ठ क्रमांक 46 व बाब क्रमांक 53 मध्ये शासकीय कर्मचारी आणि शिक्षण क्षेत्रामध्ये काम करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी याना अतिरिक्त महागाई भत्ता प्रदान करण्यासाठी तरतूद केली आहे. शासनाने शिक्षकांना महागाई भत्ता दिल्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. परंतु राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता प्रदान केल्यानंतर तीन महिन्यांनी अनुदानित शिक्षण संस्थेमध्ये काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता मिळते. ज्यावेळी राज्यसरकार एक जी.आर. काढून आपल्या कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता देते त्यावेळी अनुदानित संस्थांमध्ये काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुध्दा तीन-चार महिन्यांचा विलंब न लावता त्यांच्याबरोबरच महागाई भत्त्याचे प्रदान केले पाहिजे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 47, बाब क्रमांक 55 मध्ये खाजगी प्राथमिक शाळेतील विना अनुदानित तुकडयांना अनुदान देण्याबाबत 36 लाख 78 हजाराची तरतूद केली आहे. या शाळेचे मूल्यांकन करुन त्या तुकडयांना अनुदान दिले जाते. खरे म्हटले तर ते मूल्यांकन तयार करुन शासनाकडे प्रस्ताव आला पाहिजे. परंतु दुर्दैवाने तसे होत नाही. हे मी मुद्दाम माननीय शिक्षणमंत्र्यांच्या निदर्शनास आणतो. हा प्रस्ताव आपल्यापर्यंत येत नाही तो जिल्हा स्तरावरील शिक्षणाधिकारी किंवा प्रशासन अधिकाऱ्यांकडे आल्यानंतर त्या प्रस्तावांचे मूल्यांकन होते. त्याकरिता पैसे दिले तर कदाचित काहीतरी होते. पैसे दिले नाहीतर त्या वर्गांच्या मूल्यांकनाचे प्रस्ताव पाठविले जात नाहीत. अशाप्रकारची अडवणूक होणे बरोबर नाही. याबाबतचा निर्णय अधिकाऱ्यांच्या स्तरावर होतो तो शासन स्तरावर झाला पाहिजे. म्हणून संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर करावा. त्याठिकाणी खऱ्या अर्थाने मूल्यांकन होऊन आपल्या स्तरावर निर्णय होण्याची आवश्यकता आहे. तरच त्या शाळांना आणि तुकडयांना न्याय मिळेल.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 48, बाब क्रमांक 57 मध्ये वाशिम, नंदूरबार, हिंगोली, गोंदिया हे नवीन जिल्हे निर्माण करण्यात आले. त्याठिकाणी आतापर्यंत वेतन पथक कार्यालय नव्हते. ते वेतन पथक कार्यालय आपण स्थापन केले असून त्यासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यासंदर्भात पदे निर्माण करणे आणि त्यांच्या पगाराची व्यवस्था करणे याकरिता मागणी करण्यात आली आहे. सभापती महोदय, याठिकाणी अधिकाऱ्यांची पदे भरण्याबरोबर वेतन पथक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

श्री. रामनाथ मोते...

कार्यालयांचे खऱ्या अर्थाने संगणकीकरण होणे आवश्यक आहे. याबाबत मी नागपूर जिल्हयाचे उदाहरण देतो. नागपूर जिल्हयामध्ये लाखो रुपये सस्पेंन्स अकाऊंटमध्ये पडले आहेत. ते कोणाकडून आले आहेत? कोणत्या शाळेकडून आले आहेत, कोणत्या कर्मचाऱ्यांच्या अकाऊंटवर ट्रान्सफर करावयाचे आहेत? याबाबत शाळेला किंवा त्या कर्मचाऱ्यांना माहीत नाही. त्या सस्पेन्स अकाऊंटमध्ये पैसे असल्यामुळे त्या पैश्याचा भ्रष्टाचार झाला असे मी म्हणत नाही. परंतु ते पैसे पेंडींग आहेत ते कुणाचे आहेत? ते पैसे शिक्षकांच्या खात्यावर जमा झाले पाहिजेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते . . ..

हे टाळावयाचे असेल तर, आपण आता कॉम्प्युटरच्या युगामध्ये असल्यामुळे वेतन पथक कार्यालयाचे संगणकीकरण होणे आवश्यक आहे. अनेक वेळा हा विषय चर्चेसाठी आला होता आणि त्यादृष्टीने प्रोग्रॅम तयार करण्याचे ठरलेले आहे. परंतु अद्यापपर्यंत हा प्रोग्रॅम तयार झालेला नाही. त्यामुळे लवकरात लवकर याबाबतीत अंमलबजावणी व्हावी अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, पान क्र.49, बाब क्र.58 मध्ये आंतरवासिता याअंतर्गत सहा महिन्याची इंटर्नशीप पूर्ण करणाऱ्या डी.एड.धारकांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारचे मानधन दिले जात नव्हते. मात्र आता शासनाने त्यांना 1500 रुपये मानधन देण्याचे मान्य केलेले आहे याबद्दल मी अभिनंदन करतो आणि उशीरा का होईना इंटर्नशीप पूर्ण करणाऱ्या डी.एड.धारकांना हे मानधन मिळणार आहे. माझी या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना एकच विनंती आहे की, आता इंटर्नशीप करणाऱ्या डी.एड.धारकांना सहा महिन्याचे 1500 रुपये प्रमाणे मानधन देणार आहात. पण आता त्यांचा इंटर्नशीपचा कालावधी संपत आला आहे. त्यामुळे त्यांना रक्कम मिळेल की मिळणार नाही असा घोटाळा होण्याची शक्यता आहे. म्हणून माझी एकच विनंती आहे की, या डी.एड.धारकांना ही रक्कम चेकच्या माध्यमातून देण्यात यावी. त्यांना रोख रक्कम देऊ नये. तसेच ही रक्कम केंद्र प्रमुखाकडे किंवा जिल्हयाकडे न देता त्यांना चेकव्दारे दिली जावी म्हणजे ही रक्कम खऱ्या अर्थाने डी.एड.धारकांना मिळू शकेल.

सभापती महोदय, बाब क्र.59, पान क्र.49 बाबत सांगावयाचे तर याठिकाणी वसतीशाळांचा प्रश्न आहे. आपण काही वसती शाळा बंद केल्या आणि त्यांचे प्राथमिक शाळांमध्ये रुपांतर केले. पण काही ठिकाणी या वसती शाळा सुरु रहाणे गरजेचे आहे आणि त्या वसती शाळा निकषामध्ये बसणाऱ्या आहेत. परंतु त्या वसती शाळा देखील बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मी मंडणगड तालुक्यातील उदाहरण देऊ इच्छितो. तेथे 165 लोकसंख्या आहे आणि 28 विद्यार्थी आहेत. परंतु आतापर्यंत तेथे सुरु असलेली वसती शाळा देखील आता देखील बंद केलेली आहे. त्यामुळे येथील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित रहाण्याची शक्यता आहे. अशा वसती शाळा बंद करण्यात येऊ नये आणि तेथील विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, साधन व्यक्तींच्या बाबतीत संघर्ष सुरु असताना, याबाबतीत काही न्यायालयीन प्रकरणे असताना, एकतरी आपण त्यांचे मानधन देखील कमी केले आहे. हा वेगळा

. . . .4 एफ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते . . ..

विषय आहे आणि उद्या याबाबत चर्चा होईल. पण दोन दिवसामध्ये या साधन व्यक्तींना वस्ती शाळांमध्ये शिक्षक म्हणून काम करण्याच्या बाबतीत आदेश काढण्यात आले आहेत. माझ्याकडे याबाबतचा आदेश आहे. ठाणे जिल्हयाच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी या सगळया साधन व्यक्तींना वसती शाळा शिक्षक म्हणून त्यांच्या वेगवेगळया तालुक्यांमध्ये नेमणूका केलेल्या आहेत. हे बरोबर होणार नाही. या साधन व्यक्तींना, आपण ज्यांची कॉंट्रॅक्ट पध्दतीवर नेमणूक केलेली आहे, त्यांना अशा प्रकारे वस्ती शाळांवर पाठविणे बरोबर होणार नाही. त्यामुळे याबाबतीत देखील विचार होणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, पान क्र.52, बाब क्र.67 राष्ट्रकूल स्पर्धेसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. तालुका स्तरावर क्रिडा या विषयाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. पण तालुका स्तरावर एक तालुका क्रिडा अधिकारी, त्याला 2 सहाय्यक आणि दोन मार्गदर्शक नेमलेले आहेत. पण त्यांना वर्षानुवर्षे किती मानधन मिळत आहे ? हे महत्वाचे आहे. ते सकाळी तीन तास आणि संध्याकाळी तीन तास काम करीत आहेत. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत आहेत, चांगले खेळाडू घडवित आहेत आणि त्यांना केवळ 1500 रुपये मानधन मिळत आहे आणि त्यांच्या बाबतीत क्वॉलिफीकेशन काय ठरविण्यात आले आहे ? तर ते ट्रेण्ड ग्रॅज्युएट असावेत, बी.पी.एड.असावेत. पण कोणीही 1500 रुपयामध्ये काम करणार नाही आणि आपण अशा मार्गदर्शकांकडून चांगले खेळाडू निर्माण होण्याची अपेक्षा देखील करु नये. त्यांची फूल टाईम नेमणूक करण्याची आवश्यकता आहे, त्यांना चांगले वेतन, चांगले मानधन देण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांचा विचार होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा आहे. मला बाब क्र.61,62 व 63 बाबत सांगावयाचे आहे की, आपण तुकडयांना अनुदान दिलेले आहे. पण आपण उशीरा का होईना, या तुकडया अनुदानास पात्र ठरल्याचे जाहीर केलेले आहे. माझी अशी सूचना आहे की, ही यादी जाहीर केल्यानंतर चार महिन्यांनी, सहा महिन्यांनी किंवा येणाऱ्या अधिवेशनामध्ये पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून किंवा रेग्युलर बजेटच्या माध्यमातून या तुकडयांना अनुदान मिळावयास पाहिजे. म्हणून आतापर्यंत आदिवासी क्षेत्रातील किंवा बिगर आदिवासी क्षेत्रातील ज्या-ज्या तुकडया अनुदानास पात्र ठरलेल्या आहेत, त्यातील तुकडयां वगळण्यात येऊ नयेत. या सर्व तुकडयांना अनुदान देण्यात यावे.

. . . .4 एफ-3



APR/ MMP/ KGS/ 17:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते . . ..

ज्या तुकडयांसाठी अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे, त्यांना ते मिळेलच. परंतु ज्यांच्यासाठी तरतूद झालेली नाही, त्यांनाही अनुदान देण्याच्या बाबतीत शासनाने विचार करावा अशी विनंती करतो. धन्यवाद.

----

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जामा (विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, वर्ष 2008-09 की पूरक मांगों पर चर्चा करते समय मैं सब से पहले गृह विभाग के बारे में बात करना चाहता हूँ. बाब क्रमांक 11 से 34 तक गृह विभाग की मांगें हैं. गृह मंत्रालय के अन्तर्गत पुलिस विभाग अच्छा काम कर रहा है. पुलिस में नई भर्ती हो रही है. मेरा कहना यह है कि पुलिस में भर्ती करते समय अल्पसंख्यकों को प्रधानता मिलनी चाहिए और रिक्रूटमेंट के लिए जो कमेटी बनती है, उसमें अल्पसंख्यकों का प्रतिनिधि होना चाहिए. दूसरी बात यह है कि भारत सरकार ने नेशनल डिजास्टर मेनेजमेंट एक्ट बनाया है. इसके अन्तर्गत राज्य सरकार को राज्य के स्तर पर डिजास्टर मेनेजमेंट अथॉरिटी का गठन करना है, लेकिन हमारा गृह विभाग इस बारे में बहुत सीरियस नहीं है. सरकार को राज्य स्तर पर और जिला स्तर पर अथॉरिटी का गठन करना है, लेकिन इस बजट में इसके लिए कोई प्रावधान नहीं है. हमारा शासन से अनुरोध है कि इस बारे में विशेष ध्यान दिया जाए. भारत सरकार इसके बारे में बहुत गंभीर है. नागपुर में नेशनल डिफेंस कॉलेज है, इसकी मदद से एक अच्छी संस्था, एक अच्छा ऑर्गनाइजेशन डिवलप हो सकता है.

सभापति महोदय, बाब क्रमांक 35 से लेकर 43 तक रेवेन्यू विभाग की मांगें हैं. कार्बोहब के लिए पिछले साल से जमीन ली जा रही है, लेकिन लँड एक्वीजीशन के बारे में पूरा डिसीजन नहीं हुआ है, उनके पुनर्वसन की बात नहीं हुई है. इसके बारे में कुछ प्रावधान होना चाहिए. केन्द्र शासन के आदेश के मुताबिक यह चर्चा हुई थी कि एस.ई.जेड. के लिए खेती की जमीन नहीं ली जाएगी, लेकिन महाराष्ट्र शासन ने ऐसा निर्णय नहीं लिया है. अभी जमीन लेने की प्रक्रिया चल रही है और उसके अन्तर्गत खेती की अच्छी जमीन ली जा रही है. इस बात को रोकना चाहिए. यह अच्छी बात है कि रेवेन्यू विभाग में 2373 कोतवालों की भर्ती करने की कोशिश हो रही है, लेकिन उनका मानधन 2 हजार रुपए बहुत कम है. मेरा कहना है कि कोतवालों की संख्या बढ़नी चाहिए और उनका मानधन भी बढ़ना चाहिए.

सभापति महोदय, बाब क्रमांक 53 से लेकर 67 तक शिक्षण विभाग की मांगें है. मैं एक ही अनुरोध करना चाहता हूँ कि शासन के पास बहुत सारे स्कूल के नए प्रस्ताव आ रहे हैं, उसमें अल्पसंख्यकों के इन्सिटिट्यूशन और उर्दू मीडियम के बहुत सारे स्कूलों के आवेदन आए हैं, इनके ऊपर शासन को विशेष ध्यान देना चाहिए. इसके साथ साथ आपने अल्पसंख्यकों के उर्दू

. . . 4G 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सय्यद जामा

मीडियम के स्कूल नो ग्रान्ट बेसिस पर दिए हैं, इसमें आपको सुधारणा करनी चाहिए. अल्पसंख्यकों के लिए बिना आर्थिक सहायता के स्कूल चलाना संभव नहीं है, इसलिए इन सभी स्कूलों को ग्रान्ट देनी चाहिए.

सभापति महोदय, कामगार विभाग की मागणी क्रमांक 124 के बारे में माननीय सदस्य श्री. छाजेड़ जी ने जालना के बीड़ी मजदूरों के लिए मकान बनाने के बारे में बात कही है. यह केन्द्रीय सरकार की योजना है और महाराष्ट्र शासन 25 प्रतिशत अनुदान देता है. विदर्भ के नागपुर, भंडारा, तिरोडा एवं अन्य स्थानों पर बीड़ी मजदूर बहुत बड़ी संख्या में रहते हैं. उनके लिए नए मकान बनाने और पुराने मकानों को रिपेयर करने के बारे में प्रावधान होना चाहिए. अभी आपने यह प्रावधान केवल सोलापुर जिले के लिए किया है.

सभापति महोदय, राष्ट्रीय स्वास्थ्य बीमा योजना महाराष्ट्र के केवल 7 जिलों में लागू है. हमारा शासन से अनुरोध है कि इस योजना में और जिले भी शामिल करने चाहिए. महाराष्ट्र में ऐसे बहुत से जिले हैं, जहां पर बी.पी.एल. के लोग बड़ी संख्या में हैं. इसलिए इस योजना के अन्तर्गत जिलों की संख्या बढ़नी चाहिए.

सभापति महोदय, अन्त में मैं ऊर्जा विभाग की बाब क्रमांक 126 के बारे में शासन का ध्यान आकर्ष्ज्ञित करना चाहता हूँ. आपने एम.एस.ई.बी. का विभाजन करके 3 कारपोरेशन बनाए हैं और इन तीनों कारपोरेशन के कर्मचारियों की डिमांड है कि उनको पेंशन दी जाए. सरकार ने सभागृह के बाहर इस बारे में कमिटमेंट किया है. इन कर्मचारियों के लिए पेंशन योजना लागू करने के लिए आपने न तो नियमित बजट में कोई प्रावधान किया है और न ही इस पूरक मांगों में प्रावधान किया है. इन कर्मचारियों के लिए अनुकंपा तत्व पर नौकरी देनी चाहिए. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूँ.

...............

भाषण पूर्ण. नंतर खंदारे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन 2008-09 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

बाब क्रमांक 18, पृष्ठ क्रमांक 27, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा या अंतर्गत नाशिक विभागीय न्यायसहाय्यक विज्ञान प्रयोगशाळा मेरी, नाशिक यांच्याकडे हस्तांतरित करण्यासाठी जलसंपदा विभागाला रक्कम देण्यासाठी ही मागणी प्रस्तावित केली आहे. न्यायसहाय्यक प्रयोगशाळा ही अतिशय महत्वाची बाब आहे. मुंबईतील फॉरेन्सिक लॅब आहे. या प्रयोगशाळेमध्ये अनेक नमुने प्रलंबित आहेत. व्हीसेरा किंवा अन्य नमुने प्रलंबित आहेत. त्यामुळे कोर्टाच्या कामामध्ये अडचणी येत आहेत. मोबाईल न्यायसहाय्यक प्रयोगशाळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला, परंतु ती देखील कार्यरत नाही. गुन्हेगारांची नार्को टेस्ट करण्याचे प्रकार मुंबईत आणि महाराष्ट्रामध्ये सर्रास सुरु आहेत. या नार्को टेस्टचे वेगळे महत्व आहे. या टेस्टसाठी कोर्टाची परवानगी घ्यावी लागते. कोर्टाने परवानगी दिल्यानंतर ही टेस्ट केली जाते. परंतु पोलीस दल या टेस्टमुळे अपंग होऊ लागल्याची भीती वाटत आहे. जे.जे.रुग्णालयामध्ये किंवा नागपाडयाच्या रुग्णालयामध्ये एक आठवडयामध्ये साधारणपणे एकच नार्को टेस्ट केली जाते. ही माहिती चुकीची असेल तर मंत्रिमहोदयांनी स्पष्ट करावे. या टेस्टवर पोलीस अधिकारी अवलंबून राहतात. गुन्हयाचा तपास इ ााला पाहिजे, परंतु नार्को टेस्ट हे एक तपास करण्याचे आयुध आहे. परंतु तपास करण्यासाठी पोलीस दलाने या टेस्टवर अवलंबून राहता कामा नये. या टेस्टची सॅंक्टीटी शास्त्रज्ञांनी ठरविलेली नाही. सध्या नार्को टेस्टचा वापर चण्या फुटाण्यासारखा होत आहे. कोर्टामध्ये केस दाखल केल्यानंतर ती केस नार्को टेस्टमध्ये कशी जाईल अशाप्रकारे प्लीड केले जाते. म्हणून माननीय उपमुख्यमंत्र्यांनी या टेस्टसाठी निकष ठरविण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्र.98, पृष्ठ क्रमांक 88, मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत भोकर व जिंतूर येथे ट्रॉमा केअर युनिटचे बांधकाम करण्यासाठी निधीची तरतूद करण्याचे प्रस्तावित केले आहे. सिन्नर-शिर्डी या रस्त्यावर मोठया प्रमाणात अपघात होतात. त्याचप्रमाणे नाशिक-सिन्नर या रस्त्यावर सुध्दा खूप अपघात होतात. ज्याप्रमाणे भोकर व जिंतूर येथे ट्रॉमा केअर युनिट सुरु केले जाणार आहे त्याप्रमाणे सिन्नर येथेही या युनिटची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

डॉ.दीपक सावंत....

बाब क्रमांक 99, पृष्ठ क्रमांक 89, राज्यातील विविध शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांचे बांधकाम व दुरुस्ती कामांसाठी ही मागणी केलेली आहे. एखाद्या वॉर्डचे किंवा एखाद्या हॉलचे बांधकाम करावयाचे असते जसे मिरज, पुणे येथील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांसाठी काही कामे प्रस्तावित केलेली आहेत. परंतु त्याठिकाणी बायो-मेडिकल इंजिनिअरची गरज आहे. याचे कारण असे की, कॅथलॅबचे मशिन येऊन अनेक दिवस पडून राहिले होते. त्याचा सर्व्हे करण्यात आला नव्हता. त्यासाठी किती क्षमतेच्या एअर कंडिशनची आवश्यकता आहे, किती डक्टींगची आवश्यकता आहे, एक्झार्टस् कसे असावे या सर्व बाबींची पूर्तता केलेली नव्हती. त्याठिकाणी शासनाने कंत्राट पध्दतीवर बायो-मेडिकल इंजिनिअरची नेमणूक केली आहे. शासनाने इलेक्ट्रीकल इक्वीपमेंटच्या देखभाल व दुरुस्तीसाठी बायो-मेडिकल इंजिनिअरची कायम स्वरुपी नेमणूक करावी अशी विनंती करतो.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत...)

वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाच्या पृ.क्र. 233 वरील बाब क्रमांक 236 अंतर्गत राज्यातील विविध शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात व रुग्णालयात रुग्णालय व्यवस्थापन व माहिती यंत्रणा (संगणकीकरण प्रकल्प) कार्यान्वित करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. या संगणकीकरण प्रकल्पाद्वारे सर्व शासकीय रुग्णालये एकमेकांना जोडण्यात येणार आहेत काय की केवळ रुग्णांची माहिती संकलित करण्यात येणार आहे याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. मी यानुषंगाने अशी सूचना करु इच्छितो की, अनेक शासकीय रुग्णालयामध्ये रेडियॉलॉजिस्ट किंवा एमआरआय रीड करणारे टेक्नॉलॉजिस्ट अथवा चांगले डॉक्टर्स् नसतात. संगणकीकरणाच्या माध्यमातून हे रिपोर्टस् जेथे तज्ज्ञ डॉक्टर्स आहेत तेथे तातडीने पाठविता येतील आणि एका मिनिटाच्या आत रुग्णांवर उपचार सुरु करता येईल. तीन वर्षापासून हा पायलट प्रोजेक्ट सुरु होत आहे. तो अद्याप पूर्ण होत नाही. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, तुम्ही तुमच्या कन्सल्टण्टवर अवलंबून राहू नका. आपले कन्सल्टण्ट कॉम्पिटण्ट नसतात. यासाठी एखादी एजन्सी नेमा. तेव्हा संगणकीकरण करणार म्हणजे नेमके काय करणार याबाबत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा अशी माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे.

जे.जे. रुग्णालयामधील इमारतीमध्ये अनेक ठिकाणी गळती होत आहे. ही हेरिटेज इमारत असल्यामुळे या इमारतीची दुरुस्ती करता येत नाही काय की, दुरुस्ती न करण्याचे आणखी काही दुसरे कारण आहे, हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. जे.जे.रुग्णालयाच्या प्रांगणात विनावापर खूप जागा पडून आहे. आपल्याकडे टाटा हॉस्पिटल हे एकच कॅन्सरचे युनिट आहे. तेथे गरीब रुग्णांवर देखील उपचार केले जातात. कॅन्सरचे सर्व रुग्ण हे टाटा हॉस्पिटलमध्ये पाठविले जातात. जे.जे. रुग्णालयाच्या प्रांगणामध्ये 43 इमारती आणि 46 एकर जागा आहे. तेथे कॅन्सर रिसर्च युनिट सुरु करावे अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2008-09च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

महसूल व वन विभागाच्या पृ.क्र. 27 वरील बाब क्रमांक 39मध्ये मुसळधार पाऊस, वादळे व पूर यामुळे कोकण प्रदेशातील पीक उत्पन्नाचे व हापूस आंब्याच्या पिकाचे नुकसान झाल्याने शेतक-यांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु मुसळधार पाऊस किंवा चक्रीवादळामध्ये संपूर्ण घर पडले तर शेतक-याला फक्त 4800 रुपये मदत मिळते आणि अर्धे घर पडले तर 2400 रुपये मदत मिळते. ही मदत अतिशय अल्प असून पूर्ण घर पडले तर 15 हजार रुपये आणि अर्धे घर पडले तर साडेसात किंवा 8 हजार रुपये मदत शेतक-याला द्यावी अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो. चक्रीवादळामध्ये वणवा लागला तर शेतीच्या नुकसानीबाबत शेतक-याला 1 रुपया देखील नुकसान भरपाई मिळत नाही. तेव्हा वणवा लागला तर शेतीच्या होणा-या नुकसानीबाबत शेतक-याला नुकसान भरपाई द्यावी अशीही मी शासनाला विनंती करतो.

पृ.क्र. 28 वरील बाब क्रमांक 40 मध्ये पूर संरक्षण प्रतिबंधक कामांसाठी 50 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. राज्यामध्ये हे पूर येऊ नयेत असे वाटत असेल तर नद्या आणि खाडयांतील गाळ काढण्याचे काम शासनाने प्राधान्याने केले पाहिजे. नद्या आणि खाडयांतील गाळ काढण्याचा विषय या सभागृहामध्ये सातत्याने मांडून देखील शासनाचे त्याकडे दुर्लक्ष झालेले आहे . तेव्हा कोकणातील नद्या आणि खाड्यातील गाळ काढण्यासाठी शासनाने भरीव तरतूद करावी अशी मी शासनाला विनंती करीत आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ SBT/ MMP प्रथम श्री. शिगम 17:55 श्री. राजन तेली....

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 49, बाब क्रमांक 60, माध्यमिक शिक्षण विभागाशी संबंधित आहे. या मागणीच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण आपले विचार या ठिकाणी व्यक्त केलेले आहेत. कोकणासाठी स्वतंत्र एस.एस.बोर्ड निर्माण करावे अशा प्रकारची या सभागृहात सातत्याने मागणी अनेक सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे. या मागणीच्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्र्यांनी मागे उत्तर दिले आहे की, एस.एस.सी.बोर्ड सुरु करण्यासाठी रत्नागिरी येथे जागा बघण्याचे काम सुरु आहे. कोकणासाठी स्वतंत्र एस.एस.सी.बोर्ड कार्यान्वित करण्यात यावे अशी माझ ी या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 71, बाब क्रमांक 78, रस्ते व पूल दुरुस्ती संबंधीची आहे. कोकणातील सागरी महामार्गाच्या संदर्भात सभागृहात चर्चा झाली होती. त्या चर्चेस उत्तर देताना माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, कोकणातील रस्ते व पूल दुरुस्तीसाठी दोन वर्षे जेवढा खर्च लागेल तेवढा खर्च शासन करील. परंतु कोकणातील रस्ते व पूल दुरुस्तीसाठी अर्थसंकल्पात एकही रुपयांची शासनाने तरतूद केलेली नाही. कोकणात जवळपास 90 टक्के रस्त्यांची कामे झ ालेली आहेत, फक्त 10 टक्के कामे शिल्लक राहिलेली आहेत. उर्वरित कामांसाठी शासनाने तातडीने निधी उपलब्ध करुन द्यावा तसेच सागरी महामार्गाच्या कामासाठी देखील शासनाने मोठया प्रमाणात तरतूद उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारची मी या निमित्ताने मागणी करतो. सिंधुदूर्ग जिल्हयात सार्वजनिक बांधकाम विभागाची अनेक शासकीय विश्रामगृहे बांधून पूर्ण झाली आहेत. सभापती महोदय, आपणही उल्लेख केला की, ओरस येथे विश्रामगृह बांधून तयार आहे, विजयदूर्ग येथे सुध्दा विश्रामगृह बांधून पूर्ण झाले आहे. परंतु कर्मचारी नसल्यामुळे विश्रामगृहे सुरु होऊ शकलेली नाहीत. सिंधुदूर्ग जिल्हयातील नव्याने बांधण्यात आलेल्या विश्रामगृहासाठी कर्मचारीवर्ग उपलब्ध करुन द्यावा अशी माझी नम्र विनंती आहे. आमच्या जिल्हयातील 26 गावांचा संपर्क तुटलेला आहे. त्या गावात जाण्यासाठी छोटे छोटे काजवे होते ते पुरात वाहून गेले आहेत. विशेष गरजा कार्यक्रमांतर्गत काजव्यांचा कार्यक्रम हाती घेऊन सदरची 26 गावे जोडण्यात यावीत अशी माझी शासनास विनंती आहे. कोकणातील ग्रामीण भागात साकवांचा प्रश्न महत्वाचा आहे. कोकणात 782 साकवांची मागणी आहे आणि त्यासाठी 54 कोटी रुपये लागतील. परंतु साकवांच्या कामासाठी फक्त 3 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. गेल्या वर्षी शासनाने 92 लाख

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

रुपये या कामासाठी उपलब्ध करुन दिले होते. 2006-07 या वर्षात 395 साकव बांधून झालेले आहेत. ते साकव पुरामुळे नादुरुस्त झाले आहेत. साकव दुरुस्तीचे हेड काढून टाकलेले आहे. या साकवांच्या दुरुस्तीसाठी तरतूद उपलब्ध करुन दिली नाही तर पूर्वीच्या साकवांचा काहीही उपयोग होऊ शकत नाही. साकव नादुरुस्त असल्यामुळे मोठया प्रमाणात मनुष्यहानी होण्याची शक्यता आहे. 60 साकव असे आहेत ते दीड कोटी रुपयात दुरुस्त होऊ शकतात. त्यामुळे साकव दुरुस्तीसाठी हेड निर्माण करुन साकवांच्या दुरुस्तीच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 110, बाब क्रमांक 106, छोटे व मोठे पाटबंधारे विभागाशी संबंधीत आहे. छोटे आणि मोठे पाटबंधारे यासाठी 1 हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. कोकणातील मागच्या कालावधीत 50 ठेकेदारांनी छोटे व मोठे पाटबंधा-यांची कामे केली आहेत. त्या 50 ठेकेदारांचे 300 कोटी रुपये शासनास द्यावयाचे आहे. आता 450 कोटी रुपयांची मागणी केली आहे. माझ्या माहितीप्रमाणे 227 कोटी रुपये मिळणार आहेत. 45 कोटी रुपये आपल्याकडे जमा आहेत. आपण 227 कोटी रुपयांची रक्कम ठेकेदारांना जुन्या देण्यातच जाणार आहे. कोकणातील महत्वाचे बंधा-यांची कामे बंद झाली आहेत. नरवडे प्रकल्प, महमंदवाडी प्रकल्प, टाळंबा प्रकल्प, यांची कामे बंद आहेत. 1982 पासून जे प्रकल्प मंजूर झालेले आहेत, परंतु त्या प्रकल्पाच्या कामांना अद्याप सुरुवात केली गेलेली नाही. त्यांना निधी देऊ नका. परंतु जे प्रकल्प अपूर्ण आहेत, ते प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने तातडीने निधी उपलब्ध करुन द्यावा अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 286, तंत्र शिक्षण विभागा संबंधी आहे. आमच्या विभागातील आय.टी.आय.मध्ये पुरेश शिक्षक नाहीत. या ठिकाणच्या आय.टी.आय.मध्ये पर्यटनासंबंधी कोर्सेस सुरु केले, परंतु पर्यटन विषय शिकविण्यासाठी शिक्षक नसल्यामुळे आय.टी.आय.मध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देणेच बंद करण्यात आले आहे. आय.टी.आय.मध्ये शिक्षकांच्या नेमणूका करण्यात याव्यात अशा प्रकारची आम्ही या सभागृहात वारंवार मागणी करीत आहोत. परंतु त्या मागणीची दखल घेतली जात नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. तसेच आय.टी.आय.च्या इमारती आहेत, त्यांच्या दुरुस्तीची कामे देखील सत्वर हाती घेण्यात यावी अशी माझी या निमित्ताने मागणी आहे. त्याचप्रमाणे माझ्या जिल्हयातील आय.टी.आय.मध्ये नवीन नवीन ट्रेड सुरु करण्यात यावेत अशा प्रकारची मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो. 3....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय,गृह विभाग, बाब क्रमांक 13 च्या अनुषंगाने मी माझे विचार व्यक्त करीत आहे. पोलीस अधिका-यांना भ्रमणध्वनी देण्यासंबंधीचा अतिशय चांगला निर्णय शासनाने घेतलेला आहे. 15 वर्षापूर्वी भ्रमणध्वनी सुरु झाले आहेत. त्यावेळीच हा निर्णय शासनाने घेतलेला आहे. परंतु उशिरा का होईना अतिशय चांगला निर्णय शासनाने घेतलेला आहे. परंतु पोलीस अधिका-यांना जे भ्रमणध्वनी देण्यात येणार आहेत, ते भ्रमणध्वनी नॉट रिचेबल येणार नाहीत अथवा स्वीच बंद राहणार नाही यासंबंधीची मात्र शासनाने दक्षता घ्यावी.

सभापती महोदय, बाब क्रमांक 14 ही गृह विभागाशी संबंधीत आहे. भिवंडी शहरात पोलीस स्टेशन झाले पाहिजे अशा प्रकारची मागणी या सदनातील अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी केली आहे. भिवंडी शहरात पोलीस स्टेशनची निर्मिती करण्यास आता कोणतीही अडचण नाही. तेथील जमिनीचा वाद देखील संपुष्टात आलेला आहे. त्यामुळे तेथे पोलीस स्टेशनची निर्मिती केली तर मृत झालेल्या पोलिसांना ती खरी श्रध्दांजली ठरणार आहे. या ठिकाणच्या पोलीस स्टेशनच्या कामासाठी माननीय उपसभापती, स्थानिक आमदार यांनी स्थानिक विकास निधीतून रक्कम उपलब्ध करुन दिलेली आहे...

**तालिका सभापती ( श्री. अरविंद सावंत )** : सभागृहाची कामकाजाची वेळ 6.00 वाजेपर्यंत होती. ती वेळ पुरवणी मागण्यांवरील चर्चा आणि उत्तराचे भाषण पूर्ण होईपर्यंत वाढविण्यात येत आहे.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, बाब क्रमांक 28, पृष्ठ क्रमांक 19 नागरी संरक्षण दल हे अत्यंत महत्वाचे असे दल आहे. आपत्तीच्या परिस्थितीमध्ये या दलातील जवानांचा फार उपयोग होतो. नागरी संरक्षण दलासाठी 20 वाहनांची खरेदी करण्यात येणार आहे त्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. परंतु याठिकाणी नागरी संरक्षण संघटना असा उल्लेख करण्यात आला आहे त्यामुळे नागरी संरक्षण दल की नागरी संरक्षण संघटना याचा खुलासा करावा. नागरी संरक्षण दलासाठी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम आणि निरनिराळया सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी निधीची तरतूद करावी अशी मी यानिमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 51, पृष्ठ क्रमांक 36 बेपत्ता आदिवासी मच्छिमार लोकांच्या कुटुंबियासाठी आर्थिक मदत दिली पाहिजे. तलासरी आणि डहाणू परिसरातील हे मच्छिमार लोक आहेत. मदत देताना शासनाकडून सांगितले जाते की ते गुजरातमध्ये गेले होते. परंतु गुजरातमध्ये गेले असले तरी ते महाराष्ट्रातील आहेत त्यामुळे त्यांच्या कुटुंबियांना मदत करणे आवश्यक आहे. केंद शासनाने पाकिस्तानमध्ये अटक झालेल्या भारतीय कैद्यांच्या कुटुंबियांना मदत केलेली आहे. म्हणून बेपत्ता झालेल्या मच्छिमार बांधवांच्या कुटुंबियांना राज्य शासनाने मदत द्यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 83, पृष्ठ क्रमांक 269 यामध्ये रागयड जिल्हयातील लोणेरे येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यालयास निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. विधिमंडळाच्या गेल्या अधिवेशनात मी हाप्रश्न विषय मांडला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या आदल्यादिवशी मी हा विषय उपस्थित केला होता. आता सहावा वेतन आयोग येणार आहे. तरीसुध्दा या तंत्रनिकेतनमधील कर्मचाऱ्यांना अद्याप पाचव्या वेतन आयोगाची भरपाई मिळालेली नाही. यासाठी कर्मचाऱ्यांनी दोन दिवस आंदोलन देखील केले होते. परंतु अजूनही त्यांना न्याय मिळालेला नाही. सदनामध्ये यासंदर्भात शासनाने आश्वासन दिलेले आहे परंतु त्याची पूर्तता झालेली नाही. आश्वासनाप्रमाणे या तंत्रनिकेतनमधील कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाची भरपाई द्यावी अशी मी विनंती करतो.

.....2

SSK/ MMP/ KGS/ 18:00

श्री. संजय केळकर....

सभापती महोदय, बाब क्रमांक 79, पृष्ठ क्रमांक 71 जिल्हा व इतर मार्ग यासाठी निधीचे वाटप करण्यात आले आहे. मुंबई-कसारा-नाशिक या मार्गापैकी एक मार्ग कसारा फाटा हा आहे. परंतु या रस्त्याच्या विकासकाने म्हणजे सद्‌भाव कंपनीने कुठल्याही प्रकारची रॉयल्टी न भरता डोंगर सपाट करण्याचे काम सुरु केले आहे. यामध्ये शासनाने नुकसान होत आहे. या विकासकाकडून रॉयल्टी घेण्यात यावी त्याचप्रमाणे दंड आकारुन तो वसूल करावा आणि मगच कामाची सुरुवात करण्यात यावी अशी मी यानिमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 86, पृष्ठ क्रमांक 78 यामध्ये माणगांव येथे न्यायालयाची इमारत बांधून तयार आहे परंतु न्यायाधिशाचे निवासस्थान न बांधल्यामुळे हे न्यायालय सुरु होऊ शकत नाही. न्यायाधिशाच्या निवासस्थानासाठी आर्थिक तरतूद न केल्यामुळे न्यायालयाचे कामकाज सुरु झालेले नाही. त्यामुळे ही तरतूद तातडीने करण्यात यावी अशी मी यानिमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 97 सार्वजनिक आरोग्य खात्याशी संबंधित आहे. कोकणासारख्या मागास भागामध्ये अद्ययावत सोडाच परंतु साधी शवविच्छेनगृहे देखील उपलब्ध करुन दिलेली नाहीत. म्हणून कोकणामध्ये शवविच्छेदनगृहे उपलब्ध करुन देण्यासाठी तरतूद करण्यात यावी अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 114 यांत्रिकी विभागाशी संबंधित आहे. चिपळूणमध्ये भरपूर पाऊस झाल्यावर वसिष्ठी नदीला पूर येतो आणि त्याचे पाणी चिपळूण शहरामध्ये शिरते. म्हणून वसिष्ठी नदीमधील गाळ काढण्यासाठी 1 मे रोजी जलआंदोलन करण्यात आले होते. मी सुध्दा त्याठिकाणी गेलो होतो. नदीमधील गाळ काढण्याचा निर्णय झालेला आहे परंतु त्यासाठी लागणाऱ्या वाहनांमध्ये इंधन कोणी भरायचे आणि वाहनखर्च कोणी करावयाचा याबद्दल वाद निर्माण झाला आहे. याचा खर्च कोणी करावयाचा यावर वाद न होता गाळ काढण्यासाठी शासनाने निधीची तरतूद करावी आणि नदीमधील गाळा काढावा जेणेकरुन त्याचा निश्चितपणाने जनतेला उपयोग होईल.

नंतर श्री. भोगले

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.......

सभापती महोदय, बाब क्र.301, पृ.क्र.281 वर ग्रामीण पाणीपुरवठा योजनेसाठी पुरवणी मागणी सादर केली आहे. ठाणे जिल्हयात अनेक ठिकाणी पाणीपुरवठा योजना आहेत. कसारा येथील गावकऱ्यांनी 5 टक्के वर्गणीची भरलेली रक्कम प्लॅन आणि एस्टीमेटसाठी वापरली. परंतु सद्यस्थितीत कसाऱ्यातील जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे, याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. यासाठी जलसंपदा विभागाने तातडीने तरतूद करावी.

सभापती महोदय, कोकणामध्ये धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्याबाबत आज सकाळी चर्चा झाली. बाब क्र.166 अन्वये अनेक ठिकाणी धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांच्या कामाला प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. परंतु निधी उपलब्ध नाही हे दुर्गुण किती वर्षे ऐकायचे. धूप प्रतिबंधक बंधाऱ्याची कामे मंजूर झाली, परंतु प्रत्यक्ष निधी उपलब्ध नाही. त्यामुळे संपूर्ण कोकणामध्ये धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांच्या कामासाठी तरतूद करण्यात यावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्र.160, आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम या अंतर्गत विकास कामासाठी जिल्हा नियोजन समितीकडे आमदार वेळेवर विकास कामांची यादी देतात. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयाबाबत माझा स्वत:चा अनुभव असा आहे की, आठ-आठ महिने अगोदर यादी दिल्यानंतर देखील वेळेवर प्लॅन आणि एस्टीमेट येत नाहीत आणि निधी व्यपगत होतो. त्यादृष्टीने नियोजन मंडळाचे लक्ष वेधू इच्छितो. आपण मला बोलण्यासाठी पुरेसा वेळ दिल्याबद्दल धन्यवाद मानून माझे भाषण पूर्ण करतो.

----

(यानंतर हिंदी भाषण भारविकडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (नामनियुक्त): सभापति महोदय, सदन में प्रस्तुत पूरक मांगों पर मैं अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ी हूं. बाब क्रमांक 25-26 के संबंध में मैं यह बताना चाहूंगी कि " महात्मा गांधी तंटा मुक्त गांव मोहिम " हेतु 1 करोड़ 50 लाख रुपये और पुरस्कार हेतु 48 करोड़ 70 लाख 25 हजार रुपये इतनी बड़ी धनराशि की तरतूद की गई है. लेकिन वास्तव में यह मुहिम कामयाब हो रही है या नहीं, इसका रिव्यू होना चाहिए, ऐसा मुझे लगता है. क्योंकि तंटा मुक्त गांव मुहिम के प्रचलित निकषों में कुछ खामियां हैं. उदाहरण के तौर पर जिस गांव में पूरे साल कोई झगड़ा नहीं हुआ उसे पुरस्कार नहीं मिल सकता है. इसका मतलब यह है कि पुरस्कार पाने के लिए पहले झगड़ा करो और बाद में उस झगड़े को उसी गांव में सुलझाओ ताकि पुरस्कार मिल सके. यह बात उचित नहीं लगती है इसलिए मैं यह कहना चाहती हूं कि इस संबंध में जो निकष बनाए गए हैं, उन का रिव्यू करना आवश्यक है. वह रिव्यू किया जाए, यह मेरा अनुरोध है.

बाब क्रमांक 87 के अन्तर्गत मैं यह जानना चाहूंगी कि परभणी से होकर जाने वाला नेशनल हाईवे क्रमांक 222 की निर्माण प्रक्रिया आज किस स्टेज पर है ? यह नेशनल हाईवे शहर में से जाएगा या शहर के बाहर से जाएगा, यह हमें पता नहीं है. मैं इस संबंध में यह बताना चाहूंगी और अनुरोध करना चाहूंगी कि अगर यह रास्ता शहर में से जाएगा तो जल्दी तैयार नहीं होगा और दुर्घटना भी बढ़ने की संभावना है, इसलिए यह रास्ता रिंग रोड बायपास से ही किया जाए.

बाब क्रमांक 270 के अन्तर्गत गन्ना उत्पादक किसानों को आर्थिक सहायता देने के लिए प्रावधान किया गया है. जिस गांव में गन्ने का गाळप नहीं हुआ है, वहां के गन्ना उत्पादक किसानों को इस योजना के तहत सहायता दी जाएगी. लेकिन मैं यह बताना चाहूंगी कि इस योजना को अमल में लाने के रास्ते में बहुत सारी कठिनाइयां और खामियां है. उदाहरण के तौर पर परभणी में एक उत्पादक किसानों का गन्ना जल गया था, उस समय महसूल विभाग द्वारा उस के खेत का पंचनामा किया गया. लेकिन शासन ने फिर से पंचनामा करने के बारे में आदेश दिया. लेकिन उस बीच उस किसान ने दूसरी फसल ले ली थी. अब महसूस विभाग कह रहा है कि दूसरा पंचनामा करने के बाद ही मदद मिलेगी वरना मदद नहीं मिलेगी. नतीजतन एक बार पंचनामा होने के बावजूद वह किसान आज भी आर्थिक सहायता से वंचित है. इस संबंध में उस किसान पर अन्याय

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

न हो इसलिए उन्हें जल्द से जल्द आर्थिक सहायता प्रदान की जाए, ऐसा मेरा अनुरोध है.

सभापति महोदय, पुलिस विभाग के अन्तर्गत सिपाही के पदों के लिए पात्र खिलाड़ियों के लिए 5 प्रतिशत पद आरक्षित रखने संबंधी दिनांक 16.05.2006 का शासन आदेश होने के बावजूद क्रीड़ा संचालनालय ने पात्र खिलाड़ी को अपात्र घोषित किया है और उसका कोई ठोस कारण भी नहीं दिया है. ताज्जूब की बात यह है कि एक ही स्पर्धा में जो खिलाड़ी प्रथम आया था उसको अपात्र घोषित किया गया और जो द्वितीय स्थान पर था उसे पात्र घोषित किया गया है. मैं इस संबंध में यह कहना चाहूंगी कि राज्य में 29.07.2008 को पुलिस सिपाही के पदों के लिए भरती होने वाली है, उसके पहले इस मामले की छानबीन करके सभी पात्र खिलाड़ी उम्मीदवारों को 5 प्रतिशत आरक्षण का लाभ मिलें, इस ओर सरकार विशेष ध्यान दें. क्योंकि यह शासन की जिम्मेदारी है, ऐसा मैं समझती हूं.

बाब क्रमांक 236 के संबंध में मैं यह बताना चाहूंगी कि औरंगाबाद मेडिकल कॉलेज अस्पताल का जो हाल है वह बहुत सोचनीय है. इस मेडिकल कॉलेज में भ्रष्टाचार और अंधकार ही नज़र आ रहा है. कुछ दिन पहले परभणी के एक व्यक्ति जल गया था, उसको व्हीआयपी ट्रीटमेंट देते हुए इलाज किया गया था. साफ सुथरी मच्छरदानी, बेड दिया गया था. क्योंकि ऐसे मामलों में जले हुए व्यक्ति को इन्फेक्शन न होने पाए, इसलिए सावधानी बरतनी पड़ती है. बाद में उस जले हुए व्यक्ति की केस हायर सेंटर को रिफर कर दी गई. वहां उस व्यक्ति को एडमिट करने के बाद आधा दिन तक बाहर ही बैठना पड़ा और उसके बाद वार्ड में बेड मिला. लेकिन उस वार्ड के सामने ही टायलेट था और वहां पर बहुत सारा कचरा पड़ा हुआ था. इतनी गंदगी का साम्राज्य था कि उससे वहां एडमिट रोगी मर ही जाए. मैंने अपनी आँखों से यह सब कुछ देखा है. अस्पताल का वातावरण बहुत ही साफ-सुथरा होना जरुरी है. इसलिए मेरा यह अनुरोध है कि औरंगाबाद मेडिकल कॉलेज की जांच की जाए . दूसरी बात यह है कि इस अस्पताल में कई मशीने बंद पड़ी हैं, जिसके कारण गरीब मरीजों का ठीक से इलाज नहीं हो रहा है. इसलिए रोगियों को अच्छी सुविधा प्रदान करने के लिए आवश्यक कदम उठाए जाए, ऐसा मेरा अनुरोध है.

...3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बाब क्रमांक 320, पर्यटन विभाग के तहत मैं यह कहना चाहूंगी कि इतिहास के कुछ अच्छे नमूने/धरोहर बरकरार रह सके इसलिए उन चीज़ों की समय समय पर दुरुस्ती करना आवश्यक है. उदाहरण के तौर पर धरुड किला, चंपावती नगरी, चांदबीबी महल, देवगिरी किला, बीबी का मकबरा इत्यादि ऐतिहासिक स्थलों की दुरुस्ती की जाए, ऐसा मेरा अनुरोध है. मराठवाड़ा में पर्यटन के विकास के लिए हम सभी लोकप्रतिनिधियों के माध्यम से, बीड के लोकप्रतिनिधियों के माध्यम से इस संबंध में मांग की जा रही है. इन सभी ऐतिहासिक स्थलों की दुरुस्ती की जाए, ऐसा मैं अनुरोध करती हूं और इन शब्दों के साथ मैं अपना भाषण समाप्त करती हूं.

.............

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, आज सकाळी पुरवणी मागण्यांवर बोलत असताना मी वेळेअभावी 5-6 विभागाच्या संदर्भातील एक-दोन उदाहरणे दिली होती. त्यामुळे मी येथे काही महत्त्वाच्या मुद्यांवरच बोलणार आहे.

सभापती महोदय, मी गृह विभागाच्या बाब क्रमांक 21 साधनसामुगी वर बोलणार आहे. यामध्ये बूट गणवेष खरेदी करण्यासाठी तरतूद केलेली आहे. मला आपले लक्ष शासनाच्या अहवालाकडे वेधावयाचे आहे. माझ्याकडे शासनाचाच अहवाल आहे. गेल्या वर्षीच्या पुरवणी मागण्यांचे शासनाने काय केले आहे ? शासनातर्फे दर अधिवेशनामध्ये पुरवणी मागण्या सभागृहाला सादर होतात. महत्त्वाची बाब म्हणून आम्ही पुरवण्या मागण्या मान्य करीत असतो. मी आपले लक्ष गेल्या दोन वर्षातील पुरवणी मागण्यांकडे वेधणार आहे. तुरूंगातून व्हीडिओ कॉन्फरन्सिंग करावयाचे होते. त्यासाठी पुरवणी मागण्यांद्वारे तरतूद करण्यात आली होती. त्याप्रमाणे तुरूंगात तशी सोय करण्यात आली असेल असे आम्ही गृहीत धरले. परंतु, सन 2007 चा अहवाल काय सांगतो ? गृह विभागाने तुरूंगात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगची यंत्रणाच बसविली नव्हती. त्यामुळे माननीय न्यायालयाला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बंद्यांचा जबाब नोंदविता आला नाही. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगसाठी रूपये 93.00 लाखाची तरतूद करण्यात आली होती. ती निष्फळ ठरली. जनतेच्या सोयी-सुविधेसाठी पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करण्यात येते हे सगळ्यांना मान्य आहे. पण खर्चाचे नियोजन नीट केले नाही तर त्याचा काहीही उपयोग होणार नाही. जनतेच्या हिताच्या मागण्या आम्ही येथे मांडत असतो, तसे केले नाही तर आमच्या कार्यक्षमतेवर परिणाम होईल, असे आम्ही मानत असतो. सभागृहाने केलेली तरतूद निष्फळ ठरत असेल, कोट्यवधी रूपये वाया जात असेल तर ही बाब निश्चितच गंभीर आहे. मी सकाळी देखील पुरवणी मागण्यांवर बोलताना मंत्रिमहोदयांना विनंती केली होती. त्यामुळे आता पुन्हा विनंती करणार आहे की, ज्या बाबीवर तरतूद केली जाते त्यावरच निधी खर्च झाला पाहिजे. तो न झाल्यामुळे गेल्या वर्षीच्या अहवालामध्ये ए.जीं.नी ताशेरे ओढले आहेत.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाने मुलींसाठी योजना आखली होती. ती देखील कशी निष्फळ ठरलेली आहे, हे देखील एक उदाहरण आहे. खरे म्हणजे याचा आढावा वित्त व नियोजन विभागाने घेतला पाहिजे असे जरी असले तरी संबंधित विभागाने देखील त्यावर लक्ष देणे आवश्यक आहे. त्यामुळे येथे जी तरतूद करण्यात येते ती त्या बाबीवर खर्च होते किंवा नाही हे

....5



डॉ.नीलम गोऱ्हे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पाहणे आवश्यक आहे. तसे केले नाही तर ती तरतूद कुठल्या वाटेने गेली हे आपल्याला कळणार नाही. त्याकडे देखील मी आपले लक्ष वेधित आहे.

यानंतर मी सांस्कृतिक कार्य विभागाच्या बाब क्र.310 वर बोलणार आहे. शाहीरी व कीर्तन करणाऱ्या नवीन कलाकारांकरिता प्रशिक्षण कार्यक्रमाच्या आयोजनासाठी तरतूद करण्यात आली आहे.

यानंतर श्री.पी.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .......

या ठिकाणी मी उल्लेख करु इच्छिते की, यासंदर्भात मी माननीय मंत्री महोदयांचे यापूर्वी देखील लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला की, अखिल भारतीय मराठी शाहीर परिषदेची बैठक गेल्या 12 जुलै, 2008 रोजी मुंबईत पार पडली आणि त्या बैठकीत निर्णय घेऊन शाहीर लोक कलावंतांच्या समस्या निवारणासाठी त्यांनी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्र्यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. आतापर्यंत कदाचित त्यांची भेट माननीय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी घेतली असेल आणि नसल्यास मी असे निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, या कलावंतांनी सांगितले होते की, ते आपल्या मागण्यांसाठी रस्त्यावर येणार आणि आझाद मैदानावर धरणे धरणार. माननीय मंत्री श्री. अशोक चव्हाण यांनाही मी स्वत: भेटून विनंती केली होती की, शाहीर लोक कलावंत हे आझाद मैदानावर आहेत, त्यांची आपण जाऊन भेट घ्यावी. आपणही या शाहिरांची गाणी ऐकली असेल आणि मला वाटत नाही की, माननीय उपमुख्यमंत्र्यांवर कोणी गाणे रचले नसेल. एवढे असूनही त्यांच्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे अयोग्य आहे. म्हणून या शाहिरांना आपण आझाद मैदानावर जाऊन भेटावे अथवा त्यांना बोलावून न्याय देण्याचा प्रयत्न करावा. उलट पक्षी लोक कलावंतांसाठी शासनाने जी तरतूद केली आहे त्यासंदर्भात माझी अशी सूचना आहे की, वयोवृध्द कलावंतांसाठी जी अत्यंत तुटपुंजी म्हणजे फक्त 1 लाखाची तरतूद आपण केलेली आहे त्यात वाढ करणे आवश्यक आहे. कारण दर तीन चार दिवसांनी टी.व्ही.चॅनेल्सच्या माध्यमातून अथवा पेपरमधील बातम्यातून देखील आपण ऐकत व वाचत असतो की, कोणता ना कोणता कलावंत अतिशय दुर्धर अवस्थेत आपले आयुष्य काढीत आहे. म्हणून ही तरतूद वाढवून मिळाली पाहिजे. महोदय, नुकतेच आपणही वर्तमानपत्रात वाचले असेल की, अमेरिकेतील सॅन फ्रॅन्सिस्को येथे मराठी साहित्य संमेलन घेण्यात येत आहे. तसेच एक संमेलन रत्नागिरीलाही घेण्यात येत असल्याचे समजले. या अमेरिकेतील संमेलनाला प्रकाशक परिषदेने विरोध केला आहे. कारण एवढी सर्व पुस्तके तिकडे विकली जाणार नाहीत आणि अमेरिकेतील आपले मराठी बांधव म्हणतात की, आम्हाला ही पुस्ताके भारतात येऊनच खरेदी करणे बरे पडते त्यामुळे काहीशी गडबड या साहित्य क्षेत्रात उडाली आहे. त्याचप्रमाणे माझी अशीही माहिती आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी अमेरिकेतील साहित्य संमेलनासाठी 25 लाखाचा निधी जाहीर केला. पण यासंदर्भात साहित्य



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

रसिकांचे काय म्हणणे आहे हे समजून घेऊन अशी मदत जाहीर करणे आवश्यक होते, असे मला वाटते. आता ही 25 लाखाची रक्कम अमेरिकेतील मराठी साहित्य संमेलनाला देणार की, रत्नागिरीतील साहित्य संमेलनाला देणार अथवा दोघांना 25-25 लाख देणार की दोघांमध्ये ही रक्कम वाटून देणार याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. यासंदर्भात आमची अशी भूमिका आहे की, याबाबतचा निर्णय साहित्यिकांनी घ्यावा, यात कुठलेही राजकारण आणत नाही परंतु ज्या तऱ्हेने साहित्य रसिकांचा कौल असेल त्याचा विचार करुनच निर्णय व्हावा. शिवसेना कार्याध्यक्ष माननीय श्री. उध्दवजी ठाकरे यांनाही हे प्रकाशक येऊन भेटले त्यावेळेस त्यांनी सांगितले की, यासंबंधी फक्त साहित्य रसिकांचीच भूमिका असली पाहिजे आणि ही रक्कम दोघांनाही देणार असाल तर जरुर द्यावी, त्यांचा तो हक्कच आहे. तसेच अखिल भारतीय साहित्य संमेलनाला किती लोक येणार असा विचार करुन ही रक्कम दोघांनाही द्यावी. अन्यथा श्रावणाच्या गोष्टीमध्ये पंक्तीला बसलेल्या महिलांमध्ये दागिने असलेल्या आणि दागिने नसलेल्या महिलेच्या बाबतीत जसा पंक्तिप्रपंच होतो तसे होऊ नये याची काळजी घ्यावी.

त्याचप्रमाणे सांस्कृतिक कार्य विभागाच्या अनुषंगाने मला असे सूचित करावयाचे आहे की, राजगुरुनगर येथे राजगुरुंचे स्मारक अनेक वर्षे चालले आहे परंतु ते अद्यापही पूर्ण झालेले नाही असे मी निदर्शनास आणून देऊ इच्छिते. तसेच राजगुरुंच्या वाड्याची दुरुस्ती जी चालली आहे ती दुरुस्ती सुरु झाली आणि त्यासाठी तरतूद देखील करण्यात आली व शहीद शिवराम हरी राजगुरु याच्या जन्मदिवशी म्हणजेच 24 ऑगस्ट, 2008 ह्या दिवशी हे स्मारक पूर्ण व्हावे अशी अपेक्षा आहे. परंतु पुरातत्व विभागाने हे काम बंद ठेवलेले आहे, ते काम ताबडतोब सुरु व्हावे आणि त्यासंबंधीचे बिल कुठे अडकले आहे याची माहिती घेऊन त्याकडे लक्ष द्यावी, अशीही माझी विनंती आहे.

महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या बाब क्र. 294, पृ.क्र.93 या मागणीनुसार ग्रंथालयांना अनुदान देण्याची व्यवस्था आपण केलेली आहे. मध्यंतरी वाचनालयांमध्ये पुस्तकांची खरेदी कशा प्रकारे केली जाते हे सांगतांना त्यावेळी मी निदर्शनास आणून देताना सांगितले होते की, शासन पुस्तकांची खरेदी करण्यासाठी लायब्ररीच्या दर्जाप्रमाणे 10 हजार, 25 हजार एवढा निधी देते परंतु हे संचालक पुण्यातील आप्पा बळवंत चौकात येऊन तेथे गोण्यांमध्ये भरुन ठेवलेली 25 हजाराची गोणी, 35 हजाराची गोणी, 15 हजाराची गोणी अशी पुस्तके असतात ती गोणी

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

उचलून लायब्ररीत नेली जाते. माझी अशी विनंती आहे की, 15 हजारात कोणकोणती पुस्तके घेतली म्हणजे ती लोकांना वाचनीय असतील अशा प्रकारची लिस्टच या संचालकांकडे देण्यात यावी, मी सेन्सॉर म्हणून सुचवित नाही परंतु ती पुस्तके वाचनीय असतील याचा विचार करणे आवश्यक आहे. तरच यासंबंधी केलेल्या पुरवणी मागणीचा फायदा होईल.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

शेवटचा मुद्दा हा जलसंपदा विभागाशी संबंधित आहे. पुणे जिल्हयातील चासकमान हा महत्वाकांक्षी प्रकल्प असून या प्रकल्पासाठी मोठया प्रमाणात निधीची तरतूद करणे आवश्यक आहे. या पंधरा दिवसात माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली नियोजन समितीची बैठक झाली व या बैठकीत 1000 कोटी रुपयांचा नियतव्यय जलसंपदा विभागासाठी वर्ग करण्यात आला असून त्यातील 250 ते 300 कोटी रुपये महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास देण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे, अशी माहिती आम्हाला समजलेली आहे. त्यामुळे पुणे जिल्हयातील चासकमान प्रकल्पाच्या विनियोगासाठी उपसभापतींनी सातत्याने पाठपुरावा केलेला आहे त्यामुळे या मागणीच्या संदर्भात शासनाने विचार करावा, अशी विनंती आहे.

सभापती महोदय, मांढरादेवी येथील दुर्घटना घडल्यानंतर पर्यटन विभागासाठी वेगळा मंत्री नेमण्यात येईल, असे शासनाने सांगितले होते. पर्यटन विषय हा वेगळा विषय आहे. पर्यटन मंत्र्यांकडून तीर्थक्षेत्राचा विकास केला जात असेल तर तसे आम्हाला कळविण्यात यावे. पर्यटनाच्या संदर्भात सातत्याने मोठमोठे प्रश्न निर्माण होत आहेत त्यामुळे पर्यटन विषयाकडे शासनाने लक्ष घालावे, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

जय महाराष्ट्र.

----------------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, बाब क्रमांक 14, पृष्ठ क्रमांक 14 मध्ये मंत्रालयात येणा-या अभ्यागतांना संगणकीकृत प्रवेशपत्रिका देण्याकरिता सुरक्षाकक्ष बांधण्याकरिता तरतूद केल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. संगणकीकृत प्रवेशपत्रिका लवकर मिळण्याच्या संदर्भात संगणकांची व सुरक्षा कक्षांची संख्या वाढवली पाहिजे जेणे करुन मंत्रालयात येणा-या अभ्यांगतांना जास्त वेळ लागणार नाही.

सभापती महोदय, बाब क्रमांक 31, पृष्ठ क्रमांक 19 वर मी माझे विचार मांडणार आहे. लातूर येथे नवीन प्रादेशिक कार्यालयाची निर्मिती करण्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे, त्याबद्दल मी अभिनंदन करतो. अनेक आरटीओ कार्यालयात जी एजंटगिरी चालते ती थांबली पाहिजे. गेल्या तीन दिवसापूर्वी औरंगाबाद येथील आरटीओ कार्यालयातील एजंटांना संप करण्याचा कुठलाही अधिकार नसतांना त्यांनी संप करुन आम जनतेला वेठीस धरले. अधिका-याकडे लायसन्स काढण्यासाठी गेलो तरी ते सांगतात एजंटांना घेऊन या, त्यामुळे पहिल्या प्रथम आरटीओ कार्यालयातील एजंटगिरी त्वरीत थांबली पाहिजे, अशी सूचना मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 54, पृष्ठ क्रमांक 47 मध्ये मध्यान्ह भोजन योजना ही आतापर्यंत पहिले ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी होती आता ती सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी करण्यात आलेली आहे व यासाठी तरतूद सुध्दा करण्यात आलेली आहे. जिल्हा परिषदेच्या ज्या शाळा आहेत त्यांना अन्न शिजवण्यासाठी किचनशेड बांधून दिलेले असून त्यासाठी आर्थिक तरतूद देखील केलेली आहे. परंतु ज्या खाजगी शाळा आहेत त्यांना किचनशेड बांधून देण्याच्या संदर्भात कोणतीही तरतूद केलेली नाही. खाजगी शाळांना वेगळा न्याय शासनकडून का दिला जात आहे असा माझा सवाल आहे. खाजगी शाळांना सुध्दा किचनशेड बांधून दिले पाहिजे जेणेकरुन विद्यार्थ्यांना चांगले अन्न मिळू शकेल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 58, पृष्ठ क्रमांक 49 वरील अंतर्वासिता विद्यार्थ्यांना 1500 रुपये विद्यावेतनाची रक्कम देण्यासाठी तरतूद केलेली आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. 30 तारखेला अंतर्वासिता पूर्ण होत आहे त्यामुळे 1500 रुपयांसाठी या विद्यार्थ्यांना खेटे मारण्याची पाळी येऊ नये यासाठी अंतर्वासिता विद्यावेतनाची रक्कम लवकरात लवकर मिळावी अशी विनंती आहे.

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे ......

सभापती महोदय, बाब क्रमांक 59, पृष्ठ क्रमांक 49, वस्तीशाळेचे प्राथमिक शाळांत रुपांतर करण्यासाठी आणि या प्राथमिक शाळांत शिक्षकांची पदे निर्माण करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे त्याबद्दल मी शिक्षण मंत्र्यांचे अभिनंदन करतो. तसेच जे अप्रशिक्षीत शिक्षक यामध्ये राहिलेले आहेत, ज्या शिक्षकांनी आपल्याकडे दोन-दोन वर्षे काम केलेले आहे अशा शिक्षकांना पोस्टल डी.एड. ची संधी उपलब्ध करुन द्यावी, व या शिक्षकांना शाळेत सामावून घ्यावे अशी सूचना या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 55, 56 आणि 57 मध्ये प्राथमिक शाळेच्या 63, उच्च माध्यमिक शाळेच्या 68, माध्यमिक शाळेच्या 1034 तुकडया आणि 203 माध्यमिक शाळांना अनुदानाची तरतूद आपण केलेली आहे त्याबद्दल अभिनंदन करतो. या ठिकाणी आदरणीय शिक्षणमंत्री उपस्थित आहेत त्यांना मी विनंती करतो की, डिसेंबर 2001 पासून आपण कायम विनाअनुदानित धोरण आपल्या राज्याने स्वीकारलेले आहे. तेव्हापासून ते आजपर्यंत आपण जर अनुदानाचे सूत्र लक्षात घेतले तर शाळा सुरु झाल्यापासून पाचव्या वर्षापर्यंतचे अनुदान सर्व तुकडयांना आले पाहिजे. त्याप्रमाणे जर आजपर्यंत विचार केला तर या राज्यातील एकही तुकडी, एकही शाळा विनाअनुदानावर न राहता ती अनुदानावर आली पाहिजे. यासंदर्भात जर आपण अजून तपासणी केली तर अजून ब-याच शाळा आणि ब-याच तुकडयांना अनुदान मिळावयाचे बाकी आहे. मी डिसेंबर 2001 पूर्वीच्या संदर्भात बोलत आहे. मी या ठिकाणी कायम विनाअनुदान धोरणाच्या संदर्भात बोलत नाही. कायम विनाअनुदान धोरण स्वीकारणून 7 वर्षे होऊन गेले तरी अद्यापपावेतो अनुदान मिळालेले नाही.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 18.25

श्री.विक्रम काळे...

सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्री प्रा.वसंत पुरके हे चांगले निर्णय घेतात त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. तेव्हा मी आता जो मुद्दा मांडलेला आहे त्याही बाबतील मंत्र्यांनी बाणेदारपणा दाखवून अधिका-यांना लवकर निर्णय घेण्याच्या बाबतीत आदेश द्यावेत आणि या संबंधीचा निर्णय घेण्यासाठी इतका विलंब का लागला आहे याची चौकशी करावी. या बाबतीत शिक्षणाधिकारी कार्यालय, उपसंचालक कार्यालय इत्यादी ठिकाणी आम्ही सातत्याने पाठपुरावा करुन सर्व प्रस्ताव एकत्रित करुन मंत्रालयात पाठविले होते त्यामुळेच ही यादी मोठी झालेली आहे. 2001 पूर्वीच्या जेवढया शाळा आणि तुकडया अनुदानावर आणावयाच्या राहित्या आहेत त्या सर्व तुकडया आणि शाळा एक महिन्यात अनुदानावर आणाव्यात अशा प्रकारची माननीय मंत्रिमहोदयांनी भूमिका घ्यावी आणि त्यासाठी पुढील पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करावी अशी माझी त्यांना विनंती आहे.कायम विना अनुदानाच्या शाळांच्या संदर्भात सकाळी सभागृहात चर्चा झाली होती आणि हा प्रश्न राखून ठेवण्यात आला असून एक आठवडयात "कायम" हा शब्द काढून टाकला जाईल अशा प्रकारचे उत्तर मिळेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, यानंतर बाब क्रमांक 64 पान नंबर 51 संबंधी मला बोलावयाचे आहे. विशेष कार्य अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय रायफल नेमबाज कुमारी तेजस्विनी सावंत यांच्या वेतनासाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे.शासकीय आणि निम शासकीय आस्थपनेवर क्रीडापटूसाठी 5 टक्के जागा राखीव ठेवण्याच्या संदर्भात शासनाने चांगला निर्णग्य घेतला आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो तसेच या चर्चेच्या निमित्ताने माझी शासनाला अशी विनंती आहे की, अशा प्रकारचे जे जे क्रीडा पटू आहेत त्यांना या निर्णयाचा लाभ देण्यात आला पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर मला जल संपदा विभागाची बाब क्रमांक 111, पान नबर 114 सबंधी बोलावयाचे आहे. सर्वेक्षण आणि अन्वेषणाची कामे करण्यासाठी 13 लाख 50 हजार रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे.अजूनही या राज्यात अनेक साईटस शिल्लक आहेत त्या साईटचे सर्वेक्षण करण्यात आले पाहिजे त्याचबरोबर गोदावरी आणि मांजरा या मोठया नद्यावर बॅरेजेसची कामे मोठया प्रमाणावर हाती घेतली असून या कामाचा दर्जा देखील चांगला आहे त्याचा मला आनंद आहे. अजूनही काही शेतक-यांची अशी मागणी आहे की, त्यांच्या क्षेत्रात काही

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

बॅरेजेसची कामे हाती घेतली तर बरे होईल त्याप्रमाणे या बॅरेजेसच्या सर्वेक्षणाचे काम जर हाती घेण्यात आले तर ते शेतक-याच्या दृष्टीने फायद्याचे ठरेल असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला शेवटचा एक मुद्दा येथे मांडावयाचा आहे. नांदेड येथे ऑक्टोबर महिन्यात गुरु-ता-गद्दीचा सोहळा होणार असून त्या निमित्ताने केन्द्र सरकारकडून मोठया प्रमाणावर निधी मिळाला असून माननीय उद्योग मंत्री श्री.अशोक चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड येथे चांगले काम सुरु आहे. माननीय उप मुख्यमंत्री सुध्दा गेल्या आठवडयात त्या ठिकाणी आले होते हा सोहळा तीन महिन्यावर आला असून अजूनही तेथे अनेक कामे प्रलंबित आहेत तेव्हा ही सर्व कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावीत अशी मी या चर्चेच्या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, यानंतर शेवटचा एक मुद्दा मला मांडावयाचा आहे. अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती देण्यासाठी केन्द्र सरकारने योजना जाहीर केली असून त्याचे फॉर्म एक वर्षापूर्वी भरुन घेण्यात आले होते परंतु अजूनही या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळालेली नाही तेव्हा अल्पसंख्याक मॅट्रिकोत्तर शिष्यपवृत्ती द्यावी अशी मी सूचना करतो आणि माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, 2008-2009 सालच्या पूरक मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय,गृह विभागाची बाब क्रमांक 21, पान नंबर 17 संबंधी मला प्रथम बोलावयाचे आहे. पोलीस विभागासाठी बूट खरेदी करण्यासाठी 28 कोटी 63 लाख पूरक मागणी करण्यात आलेली आहे. मी शासनाच्या एक गोष्ट निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, चर्मोद्योग विकास महामंडळ हा शासनाचाच एक उपक्रम असून पोलिसांना लागणारे बूट या चर्मोद्योग विकास महामंडळाकडूनच विकत घेतले पाहिजेत असा निर्णय असतांनासुध्दा खाजगी पुरवठादाराकडून हे बूट घेण्यात आलेले आहेत. त्यामध्ये भ्रष्टाचार झाल्याचे मी ऐकले आहे. तेव्हा यासंदर्भात चौकशी करण्यात यावी तसेच खाजगी खरेदीदाराकडून बूट खरेदी न करता चर्मोद्योग विकास महाहमंडळाकडूनच बूटांची खरेदी करावी.त्याचबरोबर शासनाला काही ब्लॅन्केटस लागतात आपल्या राज्यात शेळी मेंढी विकास महामंडळ असून लोकरीपासून तेथे ब्लॅन्केटस तयार केली जातात तेव्हा त्यांच्याकडूनच ब्लॅन्केटस खरेदी केली जावीत अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर मला शालेय शिक्षण विभागाची बाब क्रमांक 59, पान नंबर 49 सबंधी बोलावयाचे आहे.वस्ती शाळांचे रुपांतर प्राथमिक शाळांमध्ये करण्यासाठी तसेच या प्राथमिक शाळात शिक्षकांची पदे निर्माण करण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे.त्या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की,या शिक्षकांचा अनेक वर्षापासून प्रश्न प्रलबित आहे.वस्ती शाळामध्ये कोणाची मुले शाळेत जात आहेत ? सर्वश्री देशपांडे,कुलकर्णी, चव्हाण, देशमुख यांची मुले या वस्ती शाळांमध्ये जात नाहीत तर धनगर आणि भटके विमुक्त लोक जे वाडया वस्त्यावर राहतात त्यांची मुले वस्ती शाळेमध्ये जातात. या मुलांना शिकविण्यासाठी दीड ते दोन हजार रुपये पगारावर शिक्षकांची नेमणूक केली जाते. या तुटपुंज्या पगारामध्ये हे शिक्षक आपला संसार चालवू शकत नाहीत. अशा प्रकारचे शिक्षक या मुलांना शिकविण्यासाठी पाठविले जात असल्यामुळे हे शिक्षक या मुलांना काय शिक्षण देणार ? मागच्या अधिवेशनामध्ये देखील मी या शिक्षकांचा प्रश्न मांडला होता व आज पुन्हा मांडत आहे. तेव्हा हा प्रश्न एकदा सोडविण्यात यावा. या शिक्षकांना पूर्ण पगार देण्यात यावा आणि पोट भरेलेले शिक्षक या वस्ती शाळेतील मुलांना शिकविण्याकरिता द्यावेत.

नतर श्री.सुंबरे ..

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ श्री. गायकवाड नंतर --- 18:30

श्री. प्रकाश शेंडगे ....

त्यांना आपण पूर्ण पगार द्या अशी या निमित्ताने मी मागणी करतो. तसेच जे भटक्या समाजाचे लोक आहेत, मेंढपाळ, धनगर आहेत, जे मेंढ्यांचे तांडे घेऊन उदरनिर्वाहासाठी गावोगावी फिरत असतात त्यांच्या मुलांसाठी देखील आपण फिरत्या शाळा सुरू कराव्यात. ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी आपण वस्तीशाळा सुरू केल्या तशा या लोकांच्यासाठी वस्तीशाळा करून चालणार नाही. कारण या मेंढपाळांची मुले त्यांच्या आई-वडिलांबरोबर ते जसे फिरत जाती त्याप्रमाणे त्यांच्याबरोबर, त्यांच्या तांड्यांबरोबर जात असतात. अशा मुलांसाठी शाळा सुरू करताना किमान 20-25 मुले तरी असली पाहिजेत अशी आपली अट असेल तर आम्ही ती अट देखील पूर्ण करून देतो. इतकेच नाही तर त्यांच्यासाठी म्हणून आम्ही एक बस देखील देऊ. त्या बसमधून ही मुले तेथून जवळच्या शाळेत जाऊ शकतील अशी सोय करता येऊ शकेल. तेव्हा या मेंढपाळ-धनगर यासारख्या फिरस्त्यांच्या मुलांसाठी देखील आपण शिक्षण देण्याची सोय करावी. त्या मुलांना देखील शिक्षण घेण्याचा अधिकार आहे, घटनेने दिलेला हा अधिकार आहे. तो अधिकार आपण त्यांना द्यावा अशी मी या ठिकाणी मागणी करतो.

सभापती महोदय, मॅफ्को महामंडळ आपण बंद करण्याचा निर्णय घेतला आहे आणि त्या महामंडळातील कामगारांना स्वेच्छानिवृत्ती देण्यासाठी म्हणून 45 लाखाची तरतूद या ठिकाणी आपण केली आहे. माझी येथे आपल्याला विनंती आहे की, महाराष्ट्र शासनाची जी इतर महामंडळे आहेत, जी नफ्यामध्ये आहेत त्या महामंडळांमध्ये या कामगारांची सोय आपण लावली तर ते अधिक उचित होईल. तेव्हा इतर शासकीय उपक्रमांमध्ये आपण या कामगारांनाही सामावून घ्यावे अशी मी मागणी करतो तिचा आपण अवश्य विचार करावा.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्र.78 या संबंधात मी बोलणार आहे. या पुरवणी मागणीद्वारा रस्ते व पूल यासाठी 145 कोटीची मागणी केलेली आहे. महाराष्ट्रातील डोंगर कपारीमध्ये, दुर्गम भागामध्ये वाड्या-वस्त्यांमध्ये धनगर वगैरे सारखे लोक राहात आहेत. ते आजही रस्त्यांपासून तसेच अन्य आवश्यक सुविधांपासून वंचित आहेत. त्यांना आज देखील शाळा, पाणी, वीज इतकेच काय पण ग्रामपंचायत देखील नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे झाल्यानंतर देखील आपण या मुलभूत सुविधा त्यांना दिलेल्या नाहीत. तेव्हा आपण यासाठी एक धडक कार्यक्रम राबवावा आणि त्याद्वारा या दुर्गम भागातील लोकांच्या वाड्या-वस्त्यांना

..... 4क्यू 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शेंडगे .....

वीज, पाणी, शाळा यासारख्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी मी करतो.

( सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री.उल्हास पवार )

सभापती महोदय., बाब क्रमांक 126 - 400 कोटीची तरतूद वीज वितरणासाठी यात केलेली आहे. आज या राज्यातील अनेक वाड्या-वस्त्या अजूनही अंधारात आहेत. त्यांच्या घरांमध्ये आपण अजूनही दिवा लावलेला नाही. त्यांच्या गावापर्यंत देखील आपला विजेचा खांब गेलेला नाही. तेव्हा या वाड्या-वस्त्यांना आपण कधी वीज देणार आहात ? अशा जवळपास साडेतीन हजार वाड्या वस्त्या आहेत की तेथे वीजच काय पण मतदानाचा अधिकार देखील मिळालेला नाही. तेव्हा आपण खास अधिकारी नेमून, सर्व्हे करून अशा वाड्या-वस्त्यांना मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. विशेषतः वीज, पाणी, रस्ते इत्यादी सुविधा तरी आपण त्यांना दिल्या पाहिजेत, त्याबाबत आपण अवश्य कारवाई करावी अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय बाब क्रमांक 122 - यामध्ये विडी कामगारांसाठी 12 लाखाची तरतूद आपण केलेली आहे. ही पुरवणी मागणी त्यांना झोपड्या बांधून देण्यासाठी केली आहे की, घरे बांधून देण्यासाठी केली आहे ? असे एकंदर किती विडी कामगार आहेत ? तेव्हा या विडी कामगारांना खरोखरी आपणास घर द्यायचे असेल तर अगोदर असे किती कामगार आहेत आणि त्यापैकी किती लोकांना घरे द्यायची आहेत याची माहिती आपण घेतली पाहिजे. तेव्हा त्याचा अगोदर ताळमेळ घालावा अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, तसेच मुंबई बंदरामध्ये 50 हजार गोदी कामगार आज वर्षानुवर्षे काम करीत आहेत. मुंबईतील कामगारांसाठी आपण घरे देता, मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये हे कामगार हलाखीचे जीवन आजही जगत आहेत आणि काम करीत आहेत. महाराष्ट्र सरकारने गिरणी कामगारांसाठी जागा दिलेली आहे. मुंबईच्या विकासामध्ये गिरणी कामगारांबरोबरच माथाडी कामगारांनी आणि या गोदी कामगारांनीदेखील हातभार लावलेला आहे. यातील गिरणी कामगार तसेच माथाडी कामगारांना घरे देण्याची योजना सरकारने केली आहे पण गोदी कामगारांसाठी मात्र अजून काहीही केलेले नाही, या कामगारांना आपण काहीच दिलेले नाही. तेव्हा निदान आता त्यांच्या राहण्यासाठी घर असावे म्हणून त्यांना एक भूखंड मुंबईमध्ये वा नवी मुंबईमध्ये द्यावा अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

( यानंतर श्री. सरफरे ....4आर 1 ...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे...

याठिकाणी माननीय अपारंपारिक ऊर्जामंत्री उपस्थित आहेत.म्हणून मी बाब क्रमांक 126 च्या निमित्ताने माझे विचार याठिकाणी मांडत आहे. पवन चक्क्या उभारण्याकरिता शेतकऱ्यांच्या घेतलेल्या जमिनींना योग्य भाव देण्यात यावा अशी आपण वारंवार मागणी करीत असतो. त्यांच्या मुलांना त्याठिकाणी नोकरी देण्यात यावी म्हणून देखील आम्ही मागणी करीत असतो. गेल्या दोन वर्षापासून आम्ही सातत्याने मागणी करीत आलो आहोत. एकीकडे शेतकरी उद्ध्वस्त होत आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या मतदार संघातील शेतकरी सुध्दा उद्ध्वस्त झाले आहेत. प्रत्येक वेळी शासन सांगते की, आम्ही धोरण जाहीर करतो. परंतु तिकडे शेतकऱ्याची वाट लागली आहे. तरीसुध्दा अजूनपर्यंत शासन धोरण जाहीर करीत नाही. या विषयावर हे शासन गप्प कां आहे? हे मला समजत नाही. याबाबत शासन केव्हा धोरण जाहीर करणार आहे? आणि या प्रश्नाविषयी हे शासन किती लोकांचा बळी घेणार आहे? अजून किती शेतकरी उद्ध्वस्त व्हावयास पाहिजेत? तेव्हा हे अधिवेशन संपण्यापूर्वी हे शासन पवन चक्क्यांच्या जमिनींसाठी भाडेपट्टयांचे धोरण जाहीर करणार काय?

सभापती महोदय, सहकार विभागाच्या बाब क्र. 270 मध्ये गाळप न झालेल्या ऊसाकरिता 50 कोटींच्या अनुदानाची मागणी केली आहे. आपण राज्यात दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर केली आहे. माझी आपणाकडे अशी मागणी आहे की, जेवढा ऊस शिल्लक राहिला आहे, तो येथून पुढे जनावरांच्या चाऱ्याकरिता शिल्लक ठेवून तो जनावरांच्या चाऱ्यासाठीच वापरावा अशी मागणी करतो.

त्यानंतर बाब क्रमांक 277 मध्ये सहकारी सूत गिरण्यांच्या पुनर्वसनाकरिता 30 कोटी 38 लाख रुपयांची मागणी केली आहे.....

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : माननीय सदस्यांनी आपले भाषण आटोपते घ्यावे.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा सांगून माझे भाषण संपवितो. धनगर समाजाची काही कलापथके आहेत त्याला गजनृत्य म्हणतात, कैफत म्हणतात. ज्यावेळी युरोपमध्ये आंतरराष्ट्रीय कलासंमेलन भरले होते त्यावेळी धनगरी गजनृत्याचा पहिला नंबर आला. त्याबद्दल त्यांना पुरस्कार मिळाला आहे. या नृत्याला आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाला असतांना महाराष्ट्र शासनाकडून त्याची दखल सुध्दा घेण्यात आली नाही. शासनाकडून या कलाकारांना कसलेही अनुदान मिळत नाही. तेव्हा ग्रामीण महाराष्ट्रामध्ये जेवढी गजनृत्ये मंडळे आहेत त्यांची नोंदणी करुन त्यांना आपण अनुदान द्यावे अशी मागणी करीत आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे....

सभापती महोदय, आळंदीच्या किर्तनकारांबाबत अजून कुणीही मागणी केली नाही. ज्याप्रमाणे आपण मदरशाला अनुदान देतो, त्याप्रमाणे आळंदी-पंढरपूरसारख्या ठिकाणी काही किर्तनकार मुलांना किर्तन शिकवीत असतात. सभापती महोदय, एकवेळचे जेवण घेऊन अतिशय हलाखीच्या अवस्थेत किर्तन शिकत आहेत. कुणी दिले तर जेवायचे अन्यथा उपाशी झोपायचे अशा अवस्थेत ही मुले किर्तन शिकत आहेत. माझी आपणास विनंती आहे की, आपण एकवेळ आळंदीला यावे. नाहीतर जे किर्तनकार मुलांना किर्तनाचे शिक्षण देत आहेत त्यांना आपण अनुदान द्यावे. त्याचप्रमाणे किर्तनाचे शिक्षण घेणाऱ्या मुलांना सुध्दा अनुदान द्यावे. अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री. आर. आर. पाटील (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, गृह विभागाशी संबंधित एकूण 29 मागण्या आहेत, त्यातील 8 मागण्या बांधकाम विभागाशी संबंधित आहेत. साधारणपणे 194.79 कोटी रुपयांच्या मागण्या या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

कोणत्याही व्यवस्थेमध्ये जनतेच्या जीविताचे व मालमत्तेचे रक्षण करणे ही शासनाची सर्वात प्राथमिक जबाबदारी आहे. या जबाबदाऱ्या पार पाडीत असतांना पोलीस दलावर होणारा खर्च डेव्हलपमेंटवर होणारा खर्च मानून आणि एक अत्यावश्यक बाब म्हणून हा खर्च करण्याची तितकीच आवश्यकता आहे. शासनाची धोरणे, शासनाचे कायदे हे सर्व इंम्प्लिमेंट करण्याचे फोर्सफुली काम राज्याचे पोलीस दल करीत असते. सभापती महोदय, मी या सदनाच्या इतकेच लक्षात आणून देतो की, महाराष्ट्राचे पोलीस दल हे देशातील एक अव्वल दर्जाचे पोलीस दल म्हणून ओळखले जाते. वेंगवेगळया प्रसंगामध्ये आपले सर्व कौशल्य पणाला लावीत आपले महत्व या पोलीस दलाने नेहमीच सिध्द केले आहे. या पोलीस दलासाठी आधुनिक सुविधा व आधुनिक तंत्रज्ञान, आधुनिक वाहने उपलब्ध करुन देणे सरकारची जबाबदारी आहे. सभापती महोदय, आपण बघतो की, चोर-पोलीस हा खेळ नेहमीच सुरु असतो. आज मार्केटमध्ये चोरांना व गुन्हेगारांना ज्या साधन-सुविधा उपलब्ध आहेत, त्या पोलिसांना करुन देण्याच्या बाबतीत अनेक वेळा उशीर होतो. त्यांच्याकडे आधुनिक गाडया आहेत. तितक्याच क्षमतेच्या पळणाऱ्या आधुनिक गाडया आपण पोलिसांना दिल्या पाहिजेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 18:40

श्री.आर.आर.पाटील . . . .

कारण त्यांच्याकडे अधुनिक तंत्रज्ञान आहे. आपणही तसेच तंत्रज्ञान पोलिसांना उपलब्ध करुन दिले नाही तर चोर पुढे आणि पोलीस फारच पाठिमागे रहातील. अशातच दिवसेंदिवस गुन्ह्यांचे प्रमाण आणि प्रकार बदलत आहेत. गेल्या वर्षभरातील आकडेवारी पाहिली तर ज्या दरोडयांची खूप मोठया प्रमाणात चर्चा होते, अशा दरोडयांमध्ये राज्यामध्ये एकूण लुटलेली मालमत्ता ही फक्त 21 कोटी रुपये आहेत. पण विश्वासघाताने, त्याचबरोबर वेगवेगळया कायद्याच्या आधारे वेगवेगळया संस्था काढून लोकांची केलेली लुबाडणूक आणि त्यामध्ये सर्वसामान्य माणसांचे बुडालेले पैसे पाहिले तर गेल्या वर्षभरातील ही रक्कम 2200 कोटी रुपयांची आहे. प्रत्यक्ष दरोडयामध्ये 21 कोटी रुपये लुटले जातात आणि व्हाईट कॉलर क्राईमकडून जनतेचे 2200 कोटी रुपयांचे नुकसान होत आहे. या सर्व गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी अकाऊंटस् मधील, सायबर क्राईम्स्मधील सगळी कौशल्य आपल्या पोलीस दलाला प्राप्त होण्याची गरज आहे. ही गरज लक्षात घेऊनच पोलीस दलाचे जास्तीतजास्त मॉडनर्नायझेशन करण्याचा राज्य शासनाने प्रयत्न केलेला आहे. त्यामध्ये पोलिसांना संगणकाचे शिक्षण देणे, इंटरनेटची सुविधा उपलब्ध करुन देणे, पोलिसांवर असलेला अनावश्यक कामाचा ताण कमी करण्यासाठी व्हिडिओ कॉन्फरसींग सारख्या अधुनिक सिस्टीमचा वापर करता येईल अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देणे इ.सर्व कामांसाठी माननीय अर्थमंत्री महोदयांनी फार चांगली तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे. मी एक गोष्ट लक्षात आणून देऊ इच्छितो की, यातील काही तरतुदी मंजूर करुन घेण्यासाठी आम्हाला पुन्हा आपल्यासमोर यावे लागले आहे. याचे महत्वाचे कारण असे आहे की, यातील काही खरेदी 31 मार्च पर्यंत होऊ शकली नाही. जर आपण सरकारमार्फत केली जाणारी खरेदी पाहिली तर असे दिसून येईल की, 31 मार्चलाच मॅक्झीमम खरेदी होत असतात. एकाच तारखेला एवढया प्रमाणात खरेदी कशी केली जाते ? टेंडरची प्रक्रिया वेळेवर पूर्ण का केली जात नाही ? म्हणून मी धोरण स्विकारलेले आहे की, एकवेळ शासनाचे पैसे परत गेले तरी चालतील, आपल्याला पुन्हा नव्याने ते मिळविता येतील. पण 31 तारखेला खरेदीच्या एकाही फाईलवर सही करावयाची नाही अशा प्रकारची मी भूमिका घेतली आहे आणि यातील काही मटेरिअल केंद्र शासनाने निश्चित केलेले आहे. उदाहरण द्यावयाचे तर रिव्हॉल्व्हर्स् आहेत, पिस्तुल्स् आहेत, पोलिसांची शस्त्रे आहेत, जी आपल्याला ठराविक युनिटस् कडूनच घ्यावी लागतात. केंद्र शासन त्याचा कोटा ॲलॉट करीत असते. जर त्या उत्पादक कंपन्यांनी हा माल ...

. . . . 4 एस-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

वेळेमध्ये दिला नाही तर पैसे असून सुध्दा आपण ते खरेदी करु शकत नाही. यातील अनेक वस्तू अशा आहेत की, ज्या आपल्याला मार्केटमध्ये उपलब्ध होत नाहीत. या वस्तू विशिष्ट कंपन्यांकडूनच घ्याव्या लागतात. काही बाबतीत काही नवीन सूत्रे स्विकारली आणि त्याचा परिणाम असा झाला की, 31 मार्चला रकमा अखर्चित राहिल्या. त्यामुळे गृह विभागाला एवढी मोठी पुरवणी मागणी घेऊन सदनासमोर यावे लागले. यातील काही कामांना गेल्या वर्षीच मंजुरी मिळाली होती. पण वेळेमध्ये खर्च न झाल्यामुळे, आता या मागण्या मान्य करुन, त्यासाठी सर्व टेंडर प्रक्रिया पूर्ण करुन या साधन-सुविधा पोलीस दलाला उपलब्ध करुन देण्यासाठी या मागण्यांना मान्यता द्यावी अशी मी यानिमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटीलसाहेब याठिकाणी उपस्थित नाहीत. वास्तविक पाहता सदनामध्ये भाषण केल्यानंतर मंत्र्यांचे उत्तर होईपर्यंत थांबावयास पाहिजे. पण त्यांनी काही मुद्दे मांडले आहेत. त्यांनी असे सांगितले की, शासनाने मोठया प्रमाणात टोप्यांसाठी कापड खरेदी केली आणि ऑडीटर जनरल यांनी देखील आपल्या अहवालामध्ये हा मुद्दा घेतला आहे. तेव्हा हा निधी का खर्च झाला नाही ? असा मुद्दा उपस्थित केला. सभापती महोदय, मी देखील याबाबतीत माहिती घेतली होती आणि त्यानंतर खरेदी बंद केली होती. 1995-96 मध्ये 2.41 लाख मीटर कापड खरेदी केले होते. 2003-2004 मध्ये 1.73 लाख मीटर कापड खरेदी केले होते. त्यातील 1.61 लाख मीटर कापड शिल्लक होते. ज्यावेळी आम्ही आढावा घेतला की, एवढे कापड शिल्लक का राहिले आहे? कारण एकीकडे पोलिसांना टोप्यांची गरज आहे. पोलीस दलाला टोप्या दिल्या पाहिजेत. पण दुसरीकडे मात्र कापड पडून आहे. मला याचे जे कारण कळले, ते असे होते की, पोलिसांना ज्या टोप्या शिवून दिल्या जातात, तर जे पोलीस ड्युटी करीत असताना मृत्यूमुखी पडलेले आहेत अशा पोलिसांच्या विधवा बायकांना या टोप्या बनविण्याचे काम दिले जाते. मग या बायका टोप्या का तयार करीत नाहीत ? तर आम्ही जेव्हा या विषयाच्या खोला मध्ये गेलो, तेव्हा असे दिसून आले की, एका टोपीची शिलाई 1 रुपया 80 पैसे दिली जात होती आणि एक महिला, जिच्यामध्ये पूर्ण कौशल्य आहे, ती एका दिवसामध्ये जास्तीतजास्त चार टोप्या तयार करु शकत होती.

यानंतर श्री.बरवड . . ..

अस्सुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ......

8 तास काम करुन आम्ही पाच आणि सहा रुपये पोलिसांच्या विधवेला देणार असू तर तिला जगताही येणार नव्हते आणि त्यातून ते कामही होणार नव्हते. हे दर वाढवून न दिल्यामुळे कापड तसेच पडून राहिले आणि आवश्यक असलेल्या टोप्या बनल्या नाहीत. परंतु या महिलांना परवडावे म्हणून निर्णय घेतला. टोपीच्या शिलाईचा 1 रुपये 80 पैसे दर हा कधी तरी 1988 मध्ये ठरवला होता. त्यानंतर 1991 साली त्यामध्ये नाममात्र वाढ करण्यात आली. जो जुना दर होता तो तसाच राहिला. परंतु या गरीब महिला केवळ पोलिसांच्या टोप्या शिवून देणे ही पोलीस सेवा आहे असे मानून त्यांचे भावनात्मक नाते असल्यामुळे त्या हे काम करीत होत्या. त्यांनी 8 तास काम केल्यावर त्यांना किमान 50-60 रुपये मिळावयास पाहिजेत म्हणून टोपीच्या शिलाईचा दर 15 रुपये केला आणि कटींगचा दर 3 रुपये वाढविला. हे दर वाढविल्यानंतर त्या महिलांनी 1 लाख 23 हजार टोप्या बनवल्या आहेत. या वर्षाअखेर शिल्लक असलेले सर्व कापड संपेल. तसेच ऑडिटर जनरल यांनी काढलेला शेरा सुध्दा कमी होईल. या टोप्या बनवल्या जातील. हे फार जुने खरेदी केलेले कापड होते. यामध्ये उशीर लागला हे मी कबूल करतो. परंतु आता ते दुरुस्त करण्यात आले आहे. या टोप्या बनवल्या जातील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी एक मुद्दा उपस्थित केला. नाशिक येथील श्री. बुधवंत नावाच्या इन्स्पेक्टरने चोरीची तक्रार आल्यानंतर ती तक्रार न नोंदवता आपण बाहेरच्या बाहेर तपास करु असे थातूरमातूर सांगितले. जे लोक करप्ट असतात त्यांचा ज्यावेळी बारकाईने करतो त्यावेळी असे दिसते की, त्यांच्यामध्ये दोष खूप असतात परंतु हे लोक हुशार आणि कर्तृत्ववान असतात. तक्रार न नोंदवता त्याने शिताफीने चोरांना पकडले. केवळ चोरांनाच पकडले नाही तर मुद्देमालही पकडला. परंतु 25 लाख रुपये हातामध्ये आल्यानंतर त्यांना मोह सुटला. ज्यांच्यासाठी ते पैसे रिकव्हर करावयाचे होते त्यांना पैसे दिले नाहीत पण चोरांकडून वसूल केले. हे पैसे हडप करण्याची भावना होती. ज्यावेळी ही गोष्ट पोलीस आयुक्तांच्या लक्षात आली तेव्हा पोलीस आयुक्तांनी त्यांना निलंबित केले. अशा प्रवृत्तीचे अधिकारी केवळ सस्पेंड करुन काही कालावधीनंतर पुन्हा पोलीस दलामध्ये येतील त्यामुळे या अधिकाऱ्याचे निलंबन मागे घेण्याचा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. आर. आर. पाटील .....

तर प्रश्नच नाही परंतु त्यांच्यावर फौजदारी गुन्हा सुध्दा दाखल करण्यात येईल. आपण त्याच ठिकाणी थांबणार नाही. भ्रष्टाचारी लोकांना धडा शिकवावयाचा असेल तर त्यांना घटनेच्या कलम 311 नुसार नोकरीतून कायम बडतर्फ करण्याचा प्रस्ताव पोलीस आयुक्तांकडून मागितलेला आहे. जाणीवपूर्वक अशा लोकांना धडा शिकवण्यासाठी अशा पध्दतीची भूमिका घेतली जाईल. मी सदनाच्या नम्रपणे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, गृह खात्याच्या अंतर्गत ॲन्टी करप्शन विभाग आहे. मी जर डी.जीं.ना अशी सूचना केली की, पोलिसांवर धाडी टाकू नका तर कदाचित सगळ्या धाडी थांबण्याची शक्यता आहे. माझा असा निर्धार आहे की, अन्य विभाग सुधारावयाचे असतील तर पहिल्यांदा हा विभाग सुधारला पाहिजे. गेल्या वर्षभरात सर्वाधिक 168 अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ट्रॅप करुन रंगेहात पकडले. त्यातील काहींना अपवाद न करता सगळ्यांना निलंबित केले. यामध्ये वर्ग एक चे 13 अधिकारी आहेत. विभाग जास्त भ्रष्टाचारी आहे असे दिसू नये असे पोकळ चित्र तयार करावे अशी भूमिका न स्वीकारता जे दोषी आहेत, जे गुन्हेगार आहेत त्यांना शिक्षा दिलीच पाहिजे या भूमिकेने ॲन्टी करप्शन ब्युरोने काम केले आहे. माझी निश्चित खात्री आहे की भविष्यामध्ये भ्रष्टाचारावर आणखी वचक बसू शकेल. हे सांगण्याचे कारण असे की, आजच्या पुरवणी मागण्यांमध्ये ॲन्टी करप्शन ब्युरोकरिता ट्रॅपींगसाठी लागणारे 30 लाख रुपये राज्याच्या इतिहासामध्ये पहिल्यांदा आपण उपलब्ध करुन दिलेले आहेत. मला असा एक अनुभव आला की, माझाच एक कार्यकर्ता माझ्याच कार्यालयात मला येऊन भेटला. त्यांनी सांगितले की, माझी फाईल अमुक ठिकाणी आहे आणि ती क्लिअर करण्यासाठी 50 हजार रुपये मागत आहेत. माझ्या मतदारसंघातील सरपंच होते. त्यांची अपेक्षा एवढीच होती की, आपण फोन करुन काही पैसे कमी करावयास सांगावे. हे मी स्वत: अनुभवले. त्या कार्यकर्त्याला असे वाटत होते की, काही तरी दिल्याशिवाय फाईल हलत नाही. पण त्यातील काही तरी पैसे कमी करावयास सांगा अशी त्यांची अपेक्षा होती. हा फोन आल्यानंतर मी सांगितले की, आपल्या कामाचे काय करावयाचे ते बघू. ॲन्टी करप्शनच्या लोकांना बोलवून काय करता येईल ते पाहू.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

ॲण्टीकरप्शनच्या लोकांना बोलावून काय करता येईल का ते पाहू असे सांगितले. त्यानंतर मी माझ्याच खाजगी सचिवांना असे सांगितले की, या सरपंचाचे काम होण्यासाठी त्यांच्याकडे 50 हजार रुपयांची मागणी केली जात आहे, त्यामुळे आपण कोणाकडून तरी 50 हजार रुपये घेऊन द्यावेत. त्या सरपंचांनी मागणी करणा-याला 50 हजार रुपये दिले. हे पैसे घेताना त्या अधिका-याला रंगेहात पकडण्यात आले. ज्यांच्याकडून उसने पैसे घेतले होते ते 4 महिने तगादा करीत होते. ते पैसे एक आठवडयामध्ये देतो असे सांगून घेतले होते, परंतु मला ते पैसे परत मिळत नाहीत असे त्यांचे म्हणणे होते. हे पैसे परत का मिळत नाहीत याची मी माहिती घेतली असता ॲण्टीकरप्शन विभागाने असे सांगितले की, हे जप्त केलेले पैसे असल्यामुळे कोर्टाच्या परवानगीशिवाय परत करता येत नाहीत. त्यामुळे ते पैसे परत करता येत नाहीत. अशा कामासाठी पैसे देण्यासाठी खात्याकडे निधी नसतो ही अडचण आहे. म्हणून 30 लाखाची तरतूद केली आहे आणि गरजेप्रमाणे आणखी वाढ करण्यात येईल. विभागांतर्गत या कामासाठी बजेट उपलब्ध करुन दिला जाईल. पुढील काळामध्ये पोलिसांना ट्रॅपमध्ये मदत करण्यासाठी जे लोक पुढे येत आहेत आणि त्यांचे पैसे अडकून पडत आहेत. भविष्यामध्ये अशाप्रकारे पैसे गुंतून पडणार नाहीत. जप्त झालेले पैसे सरकारजवळ असतील, पण ज्यांचे पैसे ट्रॅपमध्ये सापडले त्यांचे पैसे तातडीने देण्याची भूमिका राज्य सरकारने घेतलेली आहे आणि त्यासाठी एक पुरवणी मागणी सभागृहाला सादर केलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अलिकडच्या काळामध्ये आरोपींची सरसकट नार्को टेस्ट केली जात आहे असा मुद्दा उपस्थित केला आहे. कोणाची ही टेस्ट करावी कोणाची नाही ही बाब सरकारच्या अखत्यारीतीमध्ये नाही. कोणाचीही टेस्ट करण्यासाठी कोर्टाची परवानगी लागते. कोर्टामध्ये ज्या केसला परवानगी दिली जाते त्या केसमध्ये नार्को टेस्ट घेतली जाते. हे खरे आहे की, नार्को टेस्टमध्ये दिलेली जबानी ही ग्राहय मानली जात नाही. त्याचबरोबर हेही खरे आहे की, नार्को टेस्टमध्ये तपासाची दिशा मिळत असते. नार्को टेस्टमुळे घटनेतील धागेदोरे, बारकावे समजून तपासाला दिशा देता येते. नार्को टेस्टमध्ये अनेक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

गोष्टी उघड झालेल्या आहेत. ही टेस्ट फार व्यवहार्य नसली तरी तपासासाठी उपयुक्त अशा काही गोष्टी मिळतात. मला मुद्दाम ही गोष्ट सभागृहाच्या लक्षात आणून दिली पाहिजे. राज्याची फॉरेन्सिक लॅब महाराष्ट्राला साजेशी असली पाहिजे अशी माझी धारणा होती. आपल्या सारख्या प्रगत राज्याने डी.एन.ए.च्या टेस्टकरिता लोकांना, आरोपींना कलकत्त्याला पाठवयाचे, साऊंड ॲनलाईज करण्यासाठी चंदीगढला पाठवावयाचे, नार्को टेस्टसाठी आपले लोक बेंगलोरला जायचे, छोटया छोटया राज्यांनी या सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत त्या गोष्टींसाठी महाराष्ट्रासारख्या त्यांच्याकडे जायचे हे योग्य नसल्यामुळे विभागाने असे ठरविले होते की, आपली फॉनेन्सिक लॅब संपूर्ण देशामध्ये चांगली असावयास पाहिजे. आज माझा विन्रम दावा आहे की, सर्व सुविधा असणारी, सर्व तांत्रिक पदे भरलेली देशातील सर्वात्कृष्ट लॅब आपल्या राज्याच्या पोलीस दलाजवळ आहे. देशात अलिकडच्या काळामध्ये नोएडातील आरुषीचा महत्वाचा खून खटला गाजला. त्या प्रकरणातील काही आरोपींना आपल्या फॉरेन्सिक लॅबमध्ये पाठविले होते. एवढे व्यावसायिक काम आपल्या लोकांनी केले आहे. या प्रकरणातील आरोपी आले कधी, गेले कधी याचा कोणास ताकास तूर न लागू देता, कोणालाही कल्पना येऊ न देता, व्यवस्थितपणे त्यांनी त्यांचे काम केले होते. पण बेंगलोरमध्ये निर्माण परिस्थिती सगळया माध्यमांनी जगासमोर आली आहे. अशा परिस्थितीत आपल्या लॅबने व्यावसायिकपणे काम करुन दाखविले आहे.

सन्माननीय सदस्या डॉ.गो-हे यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिगचा मुद्दा याठिकाणी उपस्थित केला आहे. परंतु माझ्याकडील आकडेवारी खूप वेगळी आहे. व्हिडिओ कॉन्फरन्सिगचा उपयोग आणि वापर राज्याच्या तुरुंग विभागाला चांगल्या पध्दतीने होत आहे. अनेक कैद्यांवर न्यायालयाच्या आवारामध्ये हल्ले झालेले आहेत. त्यामुळे त्यांना न्यायालयात नेणे आणि पुन्हा तुरुंगामध्ये आणणे यामध्ये खूप मोठी रिस्क असते, त्यामुळे या बंद्यांना त्यांच्या सुरक्षिततेसाठी त्यांना तुरुंगाच्या बाहेर न काढणे, त्यांना नेण्यासाठी, आणण्यासाठी जे मनुष्यबळ वाया जाते ते वाचविण्यासाठी या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. गेल्या वर्षभरात 72,955 बंद्यांना व्हिडिओ कॉन्फरन्सिगद्वारे कोर्टासमोर हजर करण्यात आले. राज्यामध्ये 31 साईटस् तयार केल्या आहेत त्यापैकी 17 साईटस् एकटया मुंबईमध्ये आहेत. राज्यातील उर्वरित भागासाठी ही सुविधा टप्प्याटप्प्याने निर्माण करावयाची आहे.

नंतर श्री.शिगम

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील...)

आणखी 28 साईटस्‌ना आम्ही मान्यता दिलेली आहे. 6 जून 2008 रोजी त्याचे ओपन टेंडर देखील काढलेले आहे. तेव्हा या 28 साईटस् ओपन होतील आणि त्यामुळे डिझेल, पेट्रोलवर होणार खर्च आणि वाया जाणारे मनुष्यबळ वाचेल, त्यामुळे आर्थिक फायदा होईल आणि पोलिसांवरचा ताण देखील थोडासा कमी होईल.

सभापती महोदय, मागील वर्षी देखील बुटासाठी तरतूद करण्यात आलेली होती. परंतु खर्च वेळेत न झाल्यामुळे पुन्हा बुटाची खरेदी करावी लागली. लिडकॉमकडून बूट खरेदी करण्याच्या सूचना केल्या. शासनाच्या विविध उपक्रमांमध्ये पोलीस खात्याला लागणा-या जितक्या वस्तू तयार होतात त्या सर्व खरेदी करण्याचे गृह विभागाचे धोरण आहे. परंतु ते उपक्रम जर पूर्ण क्षमतेने त्या वस्तूंचा पुरवठा करणार नसेल तर उत्पादन पूर्ण होईपर्यन्त थांबता येणार नाही. तेव्हा ही सर्व महामंडळे किती बूट पुरवू शकतील हे त्यांना विचारले गेले. त्यांनी त्यांची मर्यादा सांगितली आणि त्यानंतर सर्व मोठ्या वर्तमानपत्रातून जाहिरात देऊन हे कॉण्ट्रक्ट देण्याचा प्रयत्न केलेला आहे. याबाबतीत भ्रष्टाचार झालेला नाही.याबाबतीत सन्माननीय सदस्यांच्या कानावर काय आले हे मला माहीत नाही. परंतु बूट खरेदीचे ओपन टेंडर दिलेले आहे. मार्केटमधील दरापेक्षा टेंडरचे दर कमी आलेले आहेत. हे सर्व करीत असताना लिडकॉमला डावललेले नाही. त्यांना याबाबतीत लेखी विचारणा केली की आम्हाला इतके इतके बूट पाहिजेत, तुम्ही किती पुरवू शकता ? त्यांनी क्षमतेप्रमाणे इतके उत्पादन आणि इतका पुरवठा करु शकू असे सांगितले. त्यानंतर आपण ओपन टेंडर काढून बूट खरेदी केलेले आहेत. त्यामध्ये सर्व वरिष्ठ अधिका-यांचा समावेश होता.

सन्माननीय सदस्या श्रीमती फौजीया खान यांनी तंटामुक्त गावांच्या संदर्भात सूचना केली. खरे म्हणजे सन्माननीय सदस्या श्रीमती फौजीया खान यांनी सांगितली तशी स्थिती नाही. याबाबतीत जी.आर. काढलेला आहे. जी गावे तंट्याची नोंद करुन ते मिटवितात ती गावे बक्षिसास पात्र आहेत आणि जी गावे तंटा करीत नाही ती बक्षिसास पात्र नाहीत अशी स्थिती नाही. ज्या गावात तंटे असतील ते तंटे मिटविल्याबद्दल गुण आहेत. ज्या गावामध्ये तंटे नाहीत त्यांना पैकीच्या पैकी गुण आहेत. तंटे करुन ते मिटविण्या पेक्षा तंटे होऊच न देणा-या गावांना आपण बक्षिस दिलेले आहे. परंतु याबाबतीत आपला अंदाज थोडासा चुकलेला आहे. पहिल्या वर्षी 500 गावे तंटामुक्त होतील असे गृहीत धरुन बजेटमध्ये आम्ही मागणी केली होती. परंतु आमचा अंदाज





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

चुकला. संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानापेक्षा किती तरी चांगले यश या तंटामुक्त योजनेला मिळालेले आहे. गावागावामध्ये तंटामुक्त समित्या नेमलेल्या असून त्यामध्ये सर्वपक्षीय आणि सर्व जाती-धर्माचे प्रतिनिधी आहेत. या समित्या नेमत असताना ॲट्रासिटीसारखे गुन्हे किंवा ज्या संवेदनशील बाबी आहेत त्यासंदर्भातील गुन्हे मिटविण्याचे अधिकार या तंटामुक्त समित्यांना दिलेले नाहीत. गावागावातील ज्या काही तक्रारी असतील तेवढयाच त्या समित्या मिटवू शकतील. पहिल्या वर्षी आम्ही तंटामुक्तीची 500 गावे गृहीत धरली होती. परंतु पहिल्याच वर्षी महाराष्ट्रातील 2850 गावे तंटामुक्त झालेली आहेत. या गावांना बक्षिस घोषित केले जाते. 1 हजारापर्यन्त लोकसंख्या असलेल्या गावाला 1 लाख रु., 2 हजारापर्यन्त लोकसंख्या असलेल्या गावाला 2 लाख रुपये, 10 हजारापर्यन्त लोकसंख्या असलेल्या गावाला 10 लाख रुपये या प्रमाणे त्या त्या गावच्या ग्रामपंचायतीला बक्षिस दिले जाते. हे बक्षिस कोणाला व्यक्तिगत दिले जात नाही. या बक्षिसातून ग्रामपंचायतीने सामुदायिक स्वरुपाची कामे करावयाची आहेत. गावामध्ये शाळा बांधणे, शौचालये बांधणे, रस्त्यांची कामे करणे अशी कामे ग्रामपंचायतीने करावयाची आहेत. जी कामे सरकारी योजनेतून केली जातात अशीच कामे या बक्षिसाच्या रकमेतून करता येतील. एखादे गाव सरकारी योजनेच्या पलिकडचे काम करणार असेल तर त्या कामावर ते पैसे खर्च करता येणार नाहीत. सरकारच्या ज्या योजना आहेत त्याच योजनांच्या कामासाठी हे पैस खर्च करावयाचे आहेत. 2850 गबावांना तंटामुक्तीच्या माध्यमातून प्रोत्साहनात्मक अनुदान मिळणार आहे. या 2850 गावांना एकत्रित करुन कार्यक्रम घेण्यासंबंधी जी.आर. नाही. तरी देखील काही तरी व्यवस्था करुन एखादा जाहीर कार्यक्रम घ्यावा लागेल. तशी व्यवस्था करुन लवकरच हा कार्यक्रम महाराष्ट्रामध्ये होईल.

...नंतर श्री. गिते.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MMP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 19:00

श्री. आर.आर.पाटील....

परंतु ही योजना सुरु केल्यानंतर आज तक्रारी दाखल होण्याचे प्रमाण हे जाणवण्या इतपत घटावयास लागले आहेत. काही तालुकेच्या तालुके तंटामुक्त होत आहेत. एक तालुका असा येण्याची शक्यता आहे की, कोर्टात एकही दावा प्रलंबित नाही, तहसिलदार यांच्यापुढे एकही तक्रार अर्ज नाही, त्या तालुक्यातील एकाही तलाठयाकडे तक्रार अर्ज प्रलंबित नाही, या तालुक्यातील कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये एकही तक्रार नोंद होत नाही. हा रायगड जिल्हयातील तालुका आहे. यासंबंधीचे परीक्षण करण्सासाठी कमिटया त्या ठिकाणी गेल्या आहेत. राज्यातील अनेक जिल्हयातील तालुके या स्पर्धेमध्ये उतरले आहेत. गावागावांमध्ये सामंजस्याचे, बंधु-भावाचे, एकीचे वातावरण निर्माण होत आहे. चांगल्या कामासाठी गावातील लोक एकत्र येत आहेत. गावा गावात चांगले वातावरण या निमित्ताने निर्माण होत आहे. मी सगळयाच लोकप्रतिनिधींना आवाहन करीन की, या योजनेला आपण सर्वांनी पाठिंबा दिला पाहिजे. आपली कोणत्याही विषयावर सभा असली, ती कोणत्याही कारणासाठी असली, ते विषय बाजूला ठेवा आणि गावातील तंटे मिटवा. आपण जर या योजनेच्या कामी चांगला सहभाग घेतला प्रत्येक गावाला ही योजना राबविण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. सभापती महोदय, या सभागृहात कधी मागणी झाली नाही अशी न घडलेली गोष्ट म्हणजे भिवंडीचे पोलीस स्टेशन आहे. भिवंडीच्या पोलीस स्टेशनची गरज आजच निर्माण झाली काय ? या ठिकाणी पोलीस स्टेशनची गरज फार पूर्वीपासूनची होती. तेथे कोणीही पोलीस स्टेशन बांधले नव्हते. या सभागृहाचे उपसभापती आणि भिवंडीचे स्थानिक आमदार आणि महानगपालिकेने पोलीस स्टेशन बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. हे काम आमदार फंडातून आणि महानगरपालिकेच्या फंडातून केले जाणारे काम होते. भिवंडीच्या पोलीस स्टेशनचे काम हाती घेतल्यानंतर तेथे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. त्यानंतर पोलीस स्टेशनच्या जागेच्या संदर्भात कोर्टबाजी झाली. हे प्रकरण उच्च न्यायालयापर्यंत गेले. स्थानिक आमदारांनी पैसे उपलब्ध करुन देऊन सुध्दा पोलीस स्टेशन बांधण्याचे काम थोडेसे रेंगाळले आहे. सदर पोलीस स्टेशनचे बांधकाम करण्यास कायदेशीर कोणतीही अडचण राहिलेली नाही. सरकारला असे वाटते की, यासंदर्भात सगळयांनी एकत्र बसावे, या कामाला कोणी विरोध करु नये, कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होऊ नयेत, या गोष्टी कायद्याचा बडगा दाखवून जेवढया गतीने करता येतात, त्याही पेक्षा सगळयांच्या मनातील गैरसमज दूर करुन अधिक लवकर करता येतात. ज्यांनी या गोष्टीस

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

थोडासा विरोध केला होता, त्यांच्या बरोबर माझी चर्चा झालेली आहे. कायदेशीर गोष्टीला तुम्ही पाठिंबा द्यावा असे सांगितल्या नंतर त्यांनीही या गोष्टीस पाठिंबा देण्याची भूमिका घेतलेली आहे. विरोध करणा-यांची आणि समर्थन देणा-यांची एक बैठक आयोजित करीन आणि एका शांततेच्या वातावरणामध्ये राज्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण न होऊ देता पोलीस स्टेशनचे बांधकाम केले तर पोलिसांवर ताण येणार नाही. या ठिकाणी पोलीस स्टेशनचे बांधकाम झाले पाहिजे. कोणाचे काय गैरसमज आहेत हे तपासून घेऊन मागे ज्या गोष्टी घडल्या त्या पुन्हा घडणार नाहीत याची दक्षता घेऊन अतिशय संयमाने आणि योग्य दिशेने सरकार विचार करीत आहे एवढेच मी या निमित्ताने सांगेन. मला विश्वास आहे की, यासंबंधी लवकरच तडजोडीने मार्ग निघेल. पोलीस स्टेशनच्या जागेच्या संदर्भातील वाद होता. त्यांना वाटत होते की, ही जागा आमच्या समाजाची आहे. वक्फ बोर्डाचे देखील तेच मत आहे. कोर्टाने निकाल मात्र पोलिसांच्या बाजूने दिला आहे. सर्व एकत्र बसून यासंबंधीचा वाद लवकरच मिटेल अशी आशा आहे. हा प्रश्न या सभागृहात सन्माननीय सदस्यांना विचारावा लागणार नाही, त्यादृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना निश्चितपणे करण्यात येतील. योग्य कामासाठी योग्य मागण्या गृह विभागातर्फे सभागृहापुढे मांडण्यात आल्या आहेत. त्या मागण्यांना सभागृहातील सर्व सदस्यांनी एकमताने पाठिंबा द्यावा आणि मान्यता द्यावी अशी विनंती करतो आणि माझे बोलणे थांबवितो.

-------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ SBT/ MMP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 19:00

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी प्रतिवाद करण्यासाठी उभा आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या सभागृहात भिवंडी पोलीस स्टेशनच्या बांधकामाच्या संदर्भात भूमिका मांडली आहे. पोलीस स्टेशनच्या जागेचा वाद होता, एका समाजाचा त्या जागेवर क्लेम होता, त्यांना वाटत होते की, ही जागा आमची आहे. परंतु ही जागा कोणाची आहे ही बाब कोटाकडून सिध्द झाल्यानंतर बैठक घेण्याची काहीही आवश्यकता नाही. देशात एखाद्या प्रकारणाच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर समजवण्याची भूमिका घेण्याचे कारणच नाही. जर कोणी तुमचा कायदा झिडकारीत असेल तर तुम्हाला कायद्याचा दंडुका दाखवावयास लागणार आहे. आपण याबाबतीत त्यांना सवलत दिली. दोन, तीन वर्षाचा कालावधी देखील त्यांना जागा सिध्द करण्यास दिला होता. ती वक्फ बोर्डाची जागा होती असे त्यांचे म्हणणे होते, ते आपण आपल्या चेंबरमध्ये ऐकून घेतले.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.गिते 19:05

श्री. दिवाकर रावते ....

आपल्या चेंबरमध्ये बैठक घेतली. सुनावणी घेतली. न्यायालयामध्ये वाद गेल्यानंतर तेथे आपली बाजू मांडण्याची संधी मिळाली. लोकसभा आणि विधानसभानंतर न्यायालये ही घटनेने निर्माण केलेली व्यवस्था आहे. परंतु न्यायालयाने दिलेला निर्णय मान्य करण्यासाठी देखील मनधरणी करावी लागत असेल तर ही अत्यंत गंभीर बाब आहे. असे जर व्हावयाला लागले तर तुमचा न्याय काहीही असो आम्हांला जो हवा आहे तो न्याय अशा प्रकारची वेगळी भूमिका एखादा समाज घेत असेल तर राज्यकारभार करणे कठीण जाईल. संभाजीनगरमध्ये एका रस्त्याच्या बांधकामाबाबत औरंगाबादच्या हायकोर्ट खंडपीठाने आदेश दिले. Deploy the military and see that it is removed. आमच्या शासनाने कुणाला दुखवायला नको म्हणून 80 फूटाचा रस्ता 40 फूटाचा चालेल असे सांगितले. त्यासाठी हिंदूंची दुकाने मोडून-तोडून टाकली. ओव्हरब्रिज बांधावयाचा होता. रस्ता कोणाला दिलेला नाही. परंतु न्यायालयाचा निर्णय न मानता कोणी तुम्हांला झुकवायला लावत असेल तर ते थांबले पाहिजे आणि तेवढा कणखरपणा शासनाने दाखवावा एवढेच यानिमित्ताने मला सरकारच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हयातील धान्य घोटाळा प्रकरणी अधिकाऱ्यांवर चार्जशीट दाखल करण्यासाठी तेथील पोलीस अधीक्षक परवानगी मागत आहेत परंतु अजूनही सरकार चार्जशीट दाखल करण्यासाठी परवानगी का देत नाही याचा खुलासा गृहमंत्र्यांनी करावा.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, कोणत्याही विभागाच्या अधिकाऱ्यांवर मग सीआयडीचे असोत, असीबीचे असोत किंवा पोलीस खात्यातील असोत शासकीय कामाच्या बाबतीत चार्जशीट दाखल करावयाचे असेल तर संबंधित विभागाची परवानगी घ्यावी लागते. वर्ग-1 आणि वर्ग-2 च्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत संबंधित विभागाच्या संमतीनंतरच या गोष्टी केल्या जातात. माननीय सदस्यांनी जी बाब निदर्शनास आणून दिलेली आहे त्याबाबतीत मी स्वत: लक्ष घालीन. बऱ्याच वेळेला असे होते की आपापल्या विभागातील लोकांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला जातो. वेळोवेळी चार्जशीट दाखल करण्याच्या बाबतीत फॉलोअप केला जातो. माननीय सदस्यांनी सांगितलेल्या केसमध्ये मी व्यक्तिगत लक्ष घालीन आणि ही बाब तपासून घेऊन कोणत्या विभागाची मान्यता घेण्याची गरज आहे आणि चार्जशीट का दाखल केले गेले नाही याचा आढावा घेईन.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे या विषयासंदर्भात मी लवकरच बैठक घेईन. परंतु दुसरी एक अडचण निर्माण झालेली आहे ती अशी की, या पोलीस स्टेशनच्या बांधकामाचे एस्टीमेट चार वर्षापूर्वी तयार करण्यात आले होते. आता सिमेंट आणि लोखंडाचे दर वाढलेल असल्यामुळे जुन्या एस्टीमेटप्रमाणे़ा काम करण्यासाठी कोणी तयार होत नाही. या कामासाठी लागणारा सगळा पैसा आमदार फंडातून दिलेला असल्यामुळे निधीची कमतरता आहे. एस्टीमेट रिव्हाईज करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. राहिलेले पैसे कुठून उपलब्ध करावयाचे ही सरकारची अडचण आहे. ती अडचण कशी दूर करावयाची याबाबत मार्ग काढला जाईल. यासंबंधातील बैठक लवकरात लवकर घेऊ.

-----

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, महसूल विभागाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा होत असताना महसूल व वन विभागासाठी एकूण पूरक मागणी 210 कोटी 29 लाख 29 हजार रुपयांची आहे. महसूल विभागासाठी 157 कोटी 81 लाख 29 हजार आणि पुनर्वसन विभागासाठभ 50 कोटी रुपयांची पुरवणी मागणी सादर केलेली आहे. या पूरक मागण्यांना मान्यता द्यावी अशी मी सदनाला विनंती करतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी उल्लेख केल्याप्रमाणे कोकणातील बेदखल कुळांना न्याय मिळण्यासाठी कूळ कायद्यात सुधारणा केली होती. यासंदर्भातील काही प्रकरणे प्रलंबित आहेत. याबाबत मी सांगू इच्छितो की, सिंधुदूर्ग जिल्हयात 1.7.06 पासून जवळपास 37 दावे दाखल करण्यात आले असून त्यापैकी 27 दावे निकाली काढण्यात आलेले आहेत.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ KGS/ 19:10

डॉ.राजेंद्र शिंगणे.........

आणि उर्वरित 10 दाव्यांमध्ये सुध्दा सुनावणीची कारवाई सुरु असून अशा प्रकारचे दावे निकाली काढण्याच्या संदर्भात कॅंप घेतले असून यापुढील काळात अशाच पध्दतीचे कॅंप घेण्याची सूचना तहसीलदार किंवा महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात येतील. त्याचबरोबर सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये विमानतळासाठी 271 हेक्टर जमीन संपादित केलेली असून त्या जमिनीचा मोबदला मे, 2006 मध्ये शेतकऱ्यांना सर्वे नंबरप्रमाणे अदा करण्यात आला आहे. संपादित केलेली जमीन एमआयडीसी, वेंगुर्ला यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आली आहे आणि विमानतळाचा प्रश्न लवकरात लवकर निकाली निघेल, हे पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवर चर्चा करीत असताना सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी भूसंपादन अधिका-यांची रिक्त पदे भरण्यात यावीत अशी सूचना केली आहे. औरंगाबाद विभागात 37 उपजिल्हाधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्यासाठी एमपीएससी कार्यालयास प्रस्ताव पाठविला आहे. तदर्थ पदोन्नतीच्या प्रस्तावावर विचार चालू आहे. सुकळी गावामध्ये भूमी संपादन झाले, परंतु पुनर्वसन झाले नाही याची ताबडतोब चौकशी करुन त्वरित पुनर्वसन व्हावे या संदर्भात शासनाकडून प्रयत्न करण्यात येतील. तलाठ्यांची सरळसेवेने नियुक्ती करीत असताना महिलांसाठी 30 टक्के आरक्षण ठेवलेले आहे व त्याप्रमाणे शासन नियुक्त्या देत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जामा यांनी कार्गो हबसाठी जमीन संपादित करण्यात येत आहे परंतु संपादित जमिनीला मार्केट रेटप्रमाणे जास्तीत जास्त मोबदला देण्याची मागणी केली आहे. याबाबत 30 टक्के सोलेशीयम आणि 12 टक्के भुईभाडे यानुसार जास्तीत जास्त किंमत मिळते. एसईझेडबाबत जमिनी संपादित करीत असताना चांगली जमीन संपादित करु नये असे धोरण असताना राष्ट्रीय पुनर्वसन धोरण, 2007 मधील परिच्छेद 14 नुसार पडीक व नापिकी जमीन संपादित करावयाची आहे. दुबार, तिबार पिके घेतल्या जाणाऱ्या जमिनी संपादित करु नयेत. हे शक्य झाले नाही तरच कमीत कमी जमीन संपादित करण्याचे केंद्र शासनाचे धोरण आहे. त्याप्रमाणे एसईझेडबाबत शासनाकडून कारवाई केली जाते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी पूर्ण घर पडल्यास 4800 रुपये व अर्धे घर पडल्यास 2400 रुपये आर्थिक मदत दिली जाते, त्याऐवजी 15000 रुपये इतकी मदत

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे.........

दिली जावी अशी विनंती केली आहे. निश्चितपणे मंत्रिमंडळ उपसमितीसमोर प्रस्ताव नेण्यात येईल. कारण या संदर्भात संपूर्ण राज्यामधून अशा पध्दतीची मदत वाढविण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे. त्यामुळे मंत्रिमंडळ उपसमितीसमोर हा प्रस्ताव ठेवण्यात येईल.

सभापती महोदय, कोतवाल पदाच्या भरती प्रक्रियेला सुरुवात केली आहे. सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जामा यांनी सांगितले की, कोतवाल पदाची भरती करताना त्या पदाला चतुर्थश्रेणीचा दर्जा द्यावा व जास्तीत जागा भरण्यात याव्यात. जी रिक्त पदे असतील ती पदे भरण्यासाठी 1 ऑगस्टपासून भरती सुरु करीत आहोत. राज्यामध्ये महसूल विभागातील जी जी रिक्त पदे आहेत ती ताबडतोबीने भरण्याचाशासनाच्या वतीने प्रयत्न केला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी महत्वाचा मुद्दा मांडला आहे. 7/12 उताऱ्यामध्ये पुरुषांच्या बरोबरीने महिलांचे नाव सुध्दा समाविष्ट करण्यात यावे अशी त्यांनी सूचना केली आहे. शासनाने 15 सप्टेंबर, 1992 रोजी लक्ष्मीमुक्ती मालमत्तेमध्ये महिलांचा हिस्सा, 7/12 उताऱ्यामध्ये पुरुषांबरोबर स्त्रियांचा हक्क नोंद होण्याबाबत जी.आर.काढला आहे. स्त्रियांचे हक्क सुरक्षित रहावेत यादृष्टीने काही सामाजिक संघटनांनी सुचविल्याप्रमाणे सर्व संबंधितांना आदेश देण्यात येतील. एखाद्या व्यक्तिने आपल्या स्वत:च्या जमिनीबाबत कायदेशीर पत्नीचे नाव 7/12 उताऱ्यात स्वत:बरोबर सहहिस्सेदार म्हणून नोंदविण्यात यावे अशी स्वेच्छेने इच्छा व्यक्त केल्यास महाराष्ट्र महसूल अधिनियम, 1966 मधील तरतुदीनुसार फेरफार नोंदीची सर्व प्रक्रिया पूर्ण करुन घेण्यास हरकत नाही असा जी.आर. काढला आहे. परंतु 'स्वेच्छेने' अशा प्रकारचा शब्द अंतर्भूत केला आहे.

(नंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे...

अलीकडच्या काळामध्ये स्त्रियांना समानता देण्याचा प्रयत्न अनेक क्षेत्रामध्ये सुरू आहे. त्यामुळे 7/12 उताऱ्यावर पत्नीचे नाव नोंदविण्यासंबंधीच्या सूचनेसंबंधी निश्चितपणे विचार केला जाईल. यासंबंधीचा निर्णय हा मंत्रिमंडळापुढे जाऊन घ्यावा लागेल. असा निर्णय शासनाने घेतला तर देशामध्ये एक चांगला आदर्श घालणारे राज्य म्हणून महाराष्ट्राकडे पाहिले जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पती मेल्यानंतर पत्नीचे नाव आपोआप सातबारावर नोंदविले जाणार आहे. लग्न झाल्यानंतर लगेच त्या विवाहितेचे नाव आपण 7/12 उताऱ्यावर नोंदविणार आहात काय ? त्यामुळे येथे क्रांतिच्या गप्पा मंत्रिमहोदयांनी मारू नये. उगाचच ढोंगबाजी करू नये.

श्री.जितेंद्र आव्हाड : माननीय सभापती महोदय, 'ढोंगबाजी करू नये' हे शब्द रेकॉर्डवरून काढून टाकावेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, 'ढोंगबाजी' हा शब्द असंसदीय आहे काय ? असल्यास, आपण त्यासाठी मला पर्यायी शब्द सुचवावा.

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे की, ते शब्द मी रेकॉर्डवरून काढत आहे.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, यासंबंधी कॅबिनेट समोर जाऊन निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जाईल. शेवटी, येथे मांडलेल्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सदनाला विनंती करतो.

......

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री) : सभापती महोदय, सभागृहासमोर सादर केलेल्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या बाब क्र.301, 302, 303, 304, 305 या मागण्यांना सदनाने मंजुरी द्यावी अशी मी विनंती करतो.

......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाबा सिद्धीकी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, कामगार विभागाच्या सन 2008-2009 च्या पुरवणी मागण्यांवर तीन सन्माननीय सदस्य बोलले आहेत. मैं माननीय सदस्यों को बताना चाहता हूँ कि बीड़ी कामगारों के लिए जो घर बना रहे हैं, वह केन्द्र सरकार की स्कीम है और यह स्कीम केवल सोलापुर जिले के लिए नहीं है. यह स्कीम अलग अलग जिलों में, उदाहरण के तौर पर गोंदिया, अहमदनगर और सिन्धदुर्ग में यह स्कीम लागू हो चुकी है. कोई भी कामगार संगठन सोसायटी बनाए और 5 हजार रुपए जमा करके बीड़ी कमिश्नर के पास अपना प्रस्ताव भेजे, यह प्रस्ताव केन्द्र सरकार की मंजूरी के लिए भेजा जाएगा.

सभापति महोदय, राष्ट्रीय स्वास्थ्य बीमा योजना के बारे में मै बताना चाहता हूँ कि यह केन्द्र शासन की स्कीम है और इस साल इसमें 7 जिलों का समावेश किया गया है. इस योजना के अन्तर्गत सात सात जिलों का टप्पे टप्पे से समावेश करेंगे. मैं सभागृह से विनंती करता हूँ कि कामगार विभाग से संबंधित बाब क्रमांक 124 व 125 पारित करें.

. . . . . .. . .

. . . 4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख (जलसंपदा व वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, वित्त विभागाच्या बाब क्रमांक 69 ते 76 आणि जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 106 ते 115 तसेच नियोजन विभागाच्या बाब क्रमांक 155 ते 230 च्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी आपल्या मार्फत सदनाला विनंती करीत आहे. तत्पूर्वी सन्मानीय सदस्य सर्वश्री.परशुराम उपरकर, राजन तेली यांनी कोकण विभागाला अत्यंत कमी प्रमाणात निधी उपलब्ध करून दिल्यामुळे प्रकल्प मार्गी लागले नाहीत, त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये प्रकल्प मार्गी लावण्यासाठी, कामे पूर्णत्त्वास नेण्यासाठी जास्तीत जास्त निधी देण्याचा प्रयत्न करावा अशी सूचना केली आहे. सन 2008-2009 या वर्षामध्ये कोकणातील प्रकल्पासाठी 273 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. संविधानाच्या अनुच्छेद 371 (2) अन्वये जलसंपदा विभागाच्या कामासाठी लागणाऱ्या निधीचे वाटप करण्याचे अधिकार महामहिम माननीय राज्यपाल महोदयांना आहेत.

यानंतर श्री.पी.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख .......

आणि यासाठी निधीचे वाटप केले जाते. त्यामध्ये ही गोष्ट खरी आहे की, कोकणचा समावेश उर्वरित महाराष्ट्रात होत असल्यामुळे या प्रदेशाला अत्यंत कमी प्रमाणात पैसा मिळतो त्यामुळे ही सर्व कामे गेल्या कित्येक वर्षांपासून प्रलंबित आहेत. तरी सुध्दा यावर्षी आपण पूरक विवरणपत्राच्या माध्यमातून 1000 कोटी एवढी रक्कम वाढीव पाण्यासाठी निर्माण व्हावी म्हणून दाखविलेली आहे आणि या रकमेतून जवळपास 100 ते 125 कोटी रुपये कोकणाला मिळणार आहेत. त्यातून कोकणातील राहिलेले प्रकल्प पूर्णत्वास येण्यासाठी प्राथमिकता तयार करुन ते प्रकल्प पूर्ण होतील यासाठी हा विभाग प्रयत्न करील. त्याचप्रमाणे चासकमान प्रकल्पासाठी वाढीव निधीची तरतूद करण्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार, श्रीमती मंदाताई म्हात्रे, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी विनंती केली आहे. मी जसे सांगतले की, 1000 कोटीची उपलब्धता आणि त्याला माननीय राज्यपालांची मान्यता मिळाल्यानंतर कृष्णा खोरे विकास महामंडळाला त्यातून जी तरतूद होणार आहे त्यातून चासकमान प्रकल्पाला जास्तीत जास्त पैसे मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी बीड येथील वॉटरबॉडीज किंवा जे लहान प्रकल्प आहेत त्यांना 20 कोटी एवढा निधी दिला त्या योजनेमध्ये इतर प्रकल्पांचाही समावेश करावा, अशी विनंती केली आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, ही योजना रिस्टोरेशन ऑफ वॉटर बॉडीज अशा प्रकारची असून हा केंद्रशासनाचा पथदर्शी असा प्रकल्प आहे आणि त्या प्रकल्पाअंतर्गत महाराष्ट्रामध्ये फक्त बीड जिल्ह्यालाच 20 कोटी रुपये मिळाले आहेत आणि त्याची व्याप्ती निश्चित केलेली असून ती केंद्रशासनाने ठरविलेली असल्यामुळे नवीन जिल्ह्यांचा अंतर्भाव त्यात करणे शक्य नाही. पण फेज-2 मध्ये महाराष्ट्रातील इतर जिल्हे, ज्या जिल्ह्यांमध्ये वॉटर बॉडीज रिस्टोरेशन करावयाचे आहे त्यांनाही घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल. तसेच सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी मॅफको कंपनीच्या बाबतीत जो मुद्दा उपस्थित केला आणि सांगितले की, प्रत्येक वेळेस पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून हा प्रश्न सभागृहासमोर येत असतो. मी याबाबत सभागृहाला असे सांगू इच्छितो की, मॅफको मध्ये एकंदर 490 कर्मचारी होते, त्यापैकी 422 कर्मचाऱ्यांनी 31.10.2007 पर्यंत स्वेच्छा निवृत्ती घेतल्यानंतर 68 कर्मचारी शिल्लक राहिले होते. त्यापैकी 1 कर्मचारी मृत



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख .....

झाला आणि 65 कर्मचाऱ्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली आणि 2 कर्मचाऱ्यांची सेवा सक्तीने समाप्त करण्यात आली. शेवटचे जे 68 कर्मचारी शिल्लक होते त्यांच्या व्ही.आर.एस. साठी ही तरतूद केली आहे. अशा प्रकारे शेवटचे 65 कर्मचारी ज्यावेळेस सेवानिवृत्त होतील त्यानंतर हा प्रश्न सभागृहात उपस्थित होणार नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी सुध्दा बीड जिल्ह्यात साठवण तलाव होऊ शकतात असे मत व्यक्त केले. आपल्याला माहितच आहे की, बीडमध्ये पाण्याची टंचाई असल्यामुळे लहान बंधारे, साठवणे तलावांचा सर्व्हे करुन जास्तीत जास्त तलाव त्या जिल्ह्यात कसे घेता येतील यासंदर्भात अवश्यक विचार करण्यात येईल. तसेच त्यांनी बीडच्या ऐतिहासिक विहिरीची दुरुस्ती व्हावी अशीही सूचनायेथे केलेली आहे. यासंदर्भात मी असे सांगू इच्छितो की, हा विषय जलसंधारण विभागाच्या अखत्यारित येत असल्यामुळे त्यांची सूचना त्या विभागाकडे पाठवून त्यांना विनंती करण्यात येईल व ही दुरुस्ती करण्याबाबत त्यांना कळविले जाईल. त्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. सय्यद जामा, राजन तेली, विक्रम काळे, श्रीमती फौजिया खान या सर्व सदस्यांनी आपली मते व्यक्त केली आहेत. मी आपल्यामार्फत सभागृहाला अशी विनंती करतो की, नियोजन विभाग, वित्त विभाग आणि जलसंपदा विभागाच्या मागण्या मान्य कराव्या........

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, विधानसभा सदस्यांना 5 कोटी रुपयांची कामे सूचविता येतात त्याप्रमाणे विधान परिषद सदस्यांना देखील 5 कोटी रुपये किमतीची कामे सूचविता यावीत.

डॉ. सुनील देशमुख : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांचे म्हणणे अपु-या माहितीवर आधारित आहे. मी महाराष्ट्राचा अर्थमंत्री असतांना सुध्दा मला आतापर्यंत 5 कोटी रुपयांची कामे मिळालेली नाहीत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, विधानसभा सदस्यांना 5 कोटी रुपयांची कामे आपल्या क्षेत्रात सूचविता येतात त्याप्रमाणे विधान परिषद सदस्यांना देखील 5 कोटी रुपये किमतीची कामे त्या परिसरात सूचविता यावीत अशा प्रकारची आम्ही मागणी केली होती त्यासंदर्भात माहिती द्यावी.

डॉ. सुनील देशमुख : ज्या सदस्यांनी अशा प्रकारची कामे सूचवली असेल त्यातील काही सन्माननीय सदस्यांची कामे आली असतील परंतु 5 कोटी रुपयांची कामे पास करण्यात आलेली नाही.

**तालिका सभापती** ( श्री. उल्हास पवार ) : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत हे स्थानिक विकास निधीच्या कामासंदर्भात बोलत असावे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, स्थानिक विकास निधीचा आणि या विषयाचा काही संबंध नाही असे मला वाटते. स्थानिक विकास निधी आपल्याला 1 कोटी रुपये मिळतो. स्थानिक विकासाचा याच्याशी काही संबंध नाही. सन्माननीय सदस्यांनी जी कामे सूचवली आहेत त्यातील जास्तीत जास्त कामे अर्थसंकल्पात समाविष्ट होऊन बजेटेड व्हावी असा आपला प्रयत्न असतो. ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी कामे सूचवली असतील ती कामे अर्थसंकल्पात समाविष्ट झाली असतील.

डॉ. नीलम गो-हे : आमदार निधी आणि संबंधित निधी वेगळा आहे. विधानसभा सदस्यांनी विधान परिषदेच्या सदस्यांचा देखील विचार केला पाहिजे. विधानसभा सदस्यांना 5 कोटी रुपयांची कामे सूचविता येतात, विधानसभेमध्ये यावर चर्चा देखील झालेली आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : विधानसभा सदस्यांना 5 कोटी रुपये किंमतीची कामे त्यांच्या क्षेत्रात सुचविता येतात.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, अशा प्रकारचा कोणताही निर्णय विधानसभेत झाला नाही. मी विनम्र पूर्वक सांगू इच्छितो की, ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी आपल्या क्षेत्रातील कामे सूचवून माननीय अर्थमंत्र्यांना दिली असेल, ती कामे मंत्रीमहोदयांनी आपल्या विभागाकडे पाठवली असेल व काही कामे अर्थसंकल्पीत झाली असतील, काही कामे अर्थसंकल्पीत झाली नसतील.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, जशी कामे विधानसभेच्या सदस्यांनी सूचवली असतील व तशीच कामे विधान परिषदेच्या सदस्यांनी सूचवली असतील तर ती पास होतील का? कारण मी स्वत: सुध्दा अशा प्रकारची कामे सूचवली आहेत.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, जी कामे अर्थसंकल्पीत होऊ शकतात ती कामे अर्थसंकल्पीत होतील परंतु 5 कोटी रुपये किमतीची कामे विधानसभा सदस्यांना मिळालेली आहेत यामध्ये काहीही तथ्य नाही. मी महाराष्ट्राचा अर्थराज्य मंत्री असतांना माझी स्वत:ची 5 कोटी रुपयांची कामे झाली नाही. त्यामुळे मी माननीय सभापती महोदयांच्या मार्फत विनंती करतो की, वित्त विभाग, जलसंपदा विभाग तसेच नियोजन विभागाच्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

----------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविशेठ पाटील (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपकर यांनी साकवांच्या निधीच्या संदर्भात मागणी केलेली आहे. साकवांचा निधी ही जिल्हा स्तरीय निधी आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी साकवांच्या निधीच्या संदर्भात जिल्हाधिका-यांकडे मागणी करावी. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी ओरस येथील विश्रामगृहात कर्मचा-यांची नियुक्ती करण्याच्या संदर्भात मागणी केलेली आहे. यासंदर्भात आमच्या विभागाने प्रस्ताव तयार केला असून उच्चाधिकार समितीकडे हा प्रस्ताव मंजूरीसाठी पाठविला असून या प्रस्तावाला लवकरात लवकर मंजूरी मिळेल. सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी परळी येथील आरओबी आणि बीड येथील बायपासच्या संदर्भात मागणी केलेली आहे. त्यामुळे परळी येथील आरओबी आणि बीड बायपासच्या संदर्भातील पाहणीचा अहवाल तयार करुन तो डीपीडीसीला सादर करण्यात येईल व यासंदर्भातील सूचना अधिक्षक अभियंत्यांना देण्यात येतील.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रवीशेठ पाटील ...

आणि ते काम पूर्ण करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सिन्नर - शिर्डी रस्त्यावर सतत अपघात होत असल्यामुळे तेथे ट्रामा केअर युनिटची मागणी केलेली आहे.यासाठी जर सार्वजनिक आरोग्य विभागाने आम्हाला निधी उपलब्ध करुन दिला तर हे काम निश्चितपणे मार्गी लावण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी सागरी महामार्गाचे काम लवकर पूर्ण व्हावे अशी मागणी केली असून त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, सागरी महामार्ग एकूण 750 किलोमिटर्स असून त्यापैकी 695 किलोमिटर्सचे काम पूर्ण झालेले आहे 54 किलोमिटर्सचे बांधकाम अजून व्हावयाचे आहे. त्यामध्ये 45 मोठे पूल असून त्यापैकी 36 पुलाची कामे पूर्ण झालेली आहेत ,9 पुलांची कामे प्रगतीपथावर आहे. या कामासाठी एकूण 178 कोटी रुपयांची कामे मंजूर करण्यात आलेली आहेत. त्याचबरोबर राजापूर - बाणकोट-दाभोळ-जयगड या खाडीवर अनेक ठिकाणी मोठे पूल आहेत त्या पुलासाठी 600 कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असून बी.ओ.टी. तत्वावर देखील या पुलाची कामे होणार नाहीत . सागरी महामार्ग मोठा व चांगल्या दर्जाचा झाला पाहिजे तसा तो झाला तरच कोकणातील अनेक प्रश्न मार्गी लागतील याची शासनाला जाणीव असल्यामुळे त्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी कसारा घाटातील खनिजाची रॉयल्टी भरण्यात येत नसल्याबद्दलचा मुद्दा मांडलेला आहे त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की हा मुद्दा महसूल खात्याशी संबंधित असून सार्वजनिक बांधकाम खात्याचा त्याच्याशी काहीही सबंध नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान यांनी राष्ट्रीय महामार्गाच्या अलाईनच्या बाबतीत एक मुद्दा मांडला होता त्यांचा हा मुद्दा राज्य सरकारच्या अखत्यारित नसून तो केन्द्र सरकारच्या अखत्यारित आहे.या सबंधी आम्ही केन्द्र शासनाकडे प्रस्ताव पाठवून योग्य ती कार्यवाही करु एवढेच मी त्यांना सांगू इच्छितो.

. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी 100 पेक्षा अधिक लोकवस्ती असलेल्या सर्व गावे बारमाही रस्त्यानी जोडण्यात यावीत यासंबंधीचा मुद्दा मांडलेला आहे मी त्यांना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रवीशेठ पाटील ...

सांगू इच्छितो की, 100 पेक्षा अधिक लोकवस्ती असलेली गावे बारमाही रस्त्यानी जोडण्याचे शासनाचे धोरण असून किमान गरजा कार्यक्रम, आदिवासी गावाना जोड रस्ते, जिल्हा स्तरीय योजना, पतप्रधान ग्राम सडक योजना या कार्यक्रमातून बारमाही रस्त्याना ही गावे जोडण्यात येतील

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना एवढी विनंती करतो की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 77 ते 105 अशा एकूण 29 पूरक मागण्या 789 कोटी 72 लाख रुपयांच्या आहेत त्याचबरोबर पर्यावरण विभागाच्या पूरक मागण्या मांडण्यात आल्या आहेत त्या सर्व मागण्या मान्य कराव्यात एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण ( उद्योग व सांस्कृतिक कार्य मंत्री ) सभापती महोदय, सांस्कृतिक विभागाच्या बाब क्रमांक 308 ते 321 मध्ये एकूण 8 कोटी 72 लाख 66 हजार रुपयांच्या पूरक मागण्या सादर करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर उद्योग विभागाची बाब क्रमांक 128 मध्ये 1 कोटी रुपयांची एक पूरक मागणी सादर असून या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात ही विनंती करण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, पूरक मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे मांडलेले आहेत त्या संबंधी विभागाची भूमिका स्पष्ट करण्यासाठी मी येथे उभा आहे. सन्माननीय सदस्यानी अत्यंत महत्वाच्या प्रश्नावर चांगली मते येथे व्यक्त केली आहेत. विशेषता राज्यातील जे जुने किल्ले आणि स्मारक आहेत त्याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाचे विचार व्यक्त केलेले आहेत. राज्यातील किल्ले आणि स्मारके ढासळू नयेत यासाठी त्याचे योग्य पध्दतीने जतन केले पाहिजे असेच राज्य शासनाचे धोरण आहे. त्यासाठी राज्य शासनाने 2 फेब्रुवारी 2007 मध्ये एक नवीन योजना जाहीर केली असून त्या योजनेचे नाव "महाराष्ट्र वैभव राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजना " असे आहे. त्या योजनेतून एक ॲडाप्शनची कल्पना मांडण्यात आलेली आहे जे जुने किल्ले आणि स्मारके आहेत त्यांना ऐतिहासिक महत्व असून त्याचे जनत करण्यासाठी मोठया प्रमाणावर निधी लागणार आहे परंतु जेवढा निधी लागतो तेवढा निधी विभागाला उपलब्ध होत नाही म्हणूनच ॲडॉप्शनच्या माध्यामतून किंवा लोकाच्या सहभागातून देखभालीची कामे व्हावीत अशी राज्य शासनाची भूमिका असून पुराणवास्तू शास्त्र अवशेष अधिनियम 1960 मध्ये यासंबंधी जी तरतूद करण्यात आली आहे त्या तरतुदीनुसार खाजगी करणाच्या माध्यमातून या स्मारकाचे जतन करण्यासाठी खाजगी लोकांचा सहभाग घेता येणार आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/MMP/KGS. श्री. गायकवाड नंतर --- 19:35

श्री. अशोक चव्हाण .....

बऱ्याचशा प्रमाणात कार्पोरेट हाऊसेस आहेत जी यात सहभागी होऊ इच्छितात आणि त्यांच्याकडून शासनाकडे सूचना, मागण्या देखील येत आहेत. त्यामध्ये खऱ्या अर्थाने बोलायचे तर पर्यटनाचे मोठे आकर्षण राज्यात अधिक प्रमाणात आहे यात शंकानाही. आता येथे विजयदुर्ग किल्ल्याचा उल्लेख केला गेला. हा किल्ला केंद्र सरकारच्या पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारित आहे. तरीही त्यांना याबाबत आम्ही जरूर विनंती करू. या किल्ल्याचे बुरूज ढासळले असल्याच्या बातम्या आलेल्या आहेत आणि ती वस्तुस्थिती आहे. केंद्र सरकारच्या पुरतत्त्व खात्याने ज्या वास्तू संरक्षित स्मारके म्हणून घोषित केलेली आहेत आणि जी त्यांच्या अखत्यारीत घेतली आहेत त्यांच्या देखभाल-दुरूस्ती ही त्या विभागाकडूनच केली जाते. तेव्हा विजयदुर्ग किल्ल्याच्या देखभाल-दुरूस्तीच्या दृष्टीने आपण जरूर त्यांच्याकडे पाठपुरावा करून विनंती करणार आहोत. सभापती महोदय, शिवनेरी, पन्हाळा या किल्ल्यांचाही येथे या संदर्भात उल्लेख केलेला आहे. हे किल्ले राज्याच्या पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारितील आहेत आणि त्यांच्याबाबतीतदेखील 2007 मध्ये आपण योजना जाहीर केलेली आहे. राज्यात जेवढी म्हणून अशी राज्य संरक्षित स्मारके, किल्ले वा वास्तू आहेत, जी राज्य सरकारच्या पुरातत्त्व खात्याच्या अखत्यारित आहेत त्यांच्याबाबतीत आपण निर्णय घेऊन शासनाडून किंवा खाजगी संस्था त्यासाठी पुढे येत असतील त्यांच्या माध्यमातून त्यांचे जतन करणे, दुरूस्ती करण्याची व्यवस्था केली जाईल आणि त्याबाबत पर्यटनाच्या दृष्टीनेही सोय व्हावी असा आपला विचार आहे. तेव्हा जेवढी जेवढी म्हणून स्मारके, वास्तू, किल्ले राज्य सरकारच्या पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारित आहेत त्यासाठी ही योजना आपण लागू केलेली आहे. त्यासाठी जी कार्य पद्धती आहे, जी शासनाने ठरवून दिलेली आहे, त्याप्रमाणे त्यांचे जतन आणि देखभाल दुरूस्तीचे काम होईल. विशेष करून पर्यटनासाठी एक आकर्षित करणारी योजना ती आहे, त्या योजनेच्या माध्यमातून हे सारे काम केले जावे असा आपला प्रयत्न आहे. तेव्हा त्याबाबतीत निश्चितपणे लवकरच निर्णय घेतला जाईल. या संबंधात लोकांचा सहभाग देखील आपल्याला मिळणार आहे.

सभापती महोदय, कोल्हापूर येथील चित्रनगरीच्या बाबतीत या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी चांगले विचार व्यक्त केले आहेत. मराठी चित्रपटांना राज्य शासना कडून अनुदान दिले जाते आर्णा मुंबईमध्ये जी दादासाहेब फाळके चित्रनगरी आहे तेथे मराठी चित्रपटांचे चित्रीकरण व्हावे असाही आपला प्रयत्न आहे. आपण मराठी चित्रपटांच्या चित्रिकरणासाठी 75 टक्के

...... 5 डी 2 ...

श्री. अशोक चव्हाण .....

रिबेट देऊन मराठी चित्रपटांना मदत करता यावी यासाठी असा निर्णय घेतला आहे. कोल्हापूरला जरा वेळी परिस्थिती आहे. तेथे मराठी चित्रपट चित्रित करणे निर्मात्यांना सोयीचे आणि कमी खर्चाचे होते. तेथे मुंबईला जेवढा खर्च लागतो त्यापेक्षा खूप कमी किमतीमध्ये काम होऊ शकते. म्हणून शासनाने याबाबत निर्णय घेतला आहे, राज्याच्या मंत्रिमंडळाने महिन्याभरामध्येच हा निर्णय घेतला आहे की, खाजगीकरणाच्या माध्यमातून आपण हे काम करणार आहोत आणि त्यात मिटकॉनला आपण सल्लागार म्हणून नियुक्त केले आहे. त्यांच्या माध्यमातून टेंडर्स काढण्याची प्रक्रिया सुरू केली आहे आणि त्यास ज्याप्रमाणे प्रतिसाद मिळेल त्यावरच हे सारे अवलंबून राहणार आहे. परंतु त्याचे पुनरूज्जीवर करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सभापती महोदय, हुतात्मा राजगुरू यांच्यावर काढण्यात आलेल्या चित्रपटाबद्दल देखील या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी आपली मते येथे प्रदर्शित केलेली आहेत. विशेषत: हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष असताना त्यांच्यावर काढण्यात येणारा चित्रपट तातडीने पूर्ण व्हावा अशी सर्वांचीची इच्छा आहे. शासनाने या बाबत निर्णय घेऊन भवानी चित्र कंबाईन च्या श्री.कांबळे हे प्रोप्रायटर आहेत त्यांना दोन तीन वर्षापूर्वी अनुदान दिलेले होते. नंतर आता श्री.मोहाडीकर यांनी देखील हुतात्मा राजगुरू यांच्यावर एक चित्रपट पूर्ण केला आहे अशी माहिती पुढे आली आहे. वर्तमानपत्रातून या संदर्भात शासनावर टीकादेखील आली आहे. हा चित्रपट पूर्ण झाला असताही शासन त्यास अनुदान देत नाही अशी टीका केली गेली. एकीकडे शासनाने अनुदान दिलेला चित्रपट अर्धवट आहे आणि दुसरीकडे श्री.मोहाडीकर यांनी निर्माण केलेला चित्रपट पूर्ण झाला असताही त्यास शासन अनुदान देत नाही अशी बाजू मांडण्यात आली होती. म्हणून मग आम्ही हे दोन्ही चित्रपट पाहून त्याबाबत निर्णय घेण्याचे ठरविले. त्यासाठी एक स्क्रिनिंग समिती नेमली आहे. या समितीने हे दोन्ही चित्रपट पाहिले आणि या चित्रपटांची नेमकी परिस्थिती काय आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न केला. ...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे ..... 5इ 1 ...

श्री. अशोक चव्हाण...

सभापती महोदय, श्री. मोहाडीकर यांनी काढलेल्या चित्रपटाचा दर्जा योग्य नाही. या चित्रपटाच्या निर्मितीकरिता शासनाकडून अनुदान दिले जात असल्यामुळे हा चित्रपट राज्य सरकारच्या मालकीचा होणार आहे. त्यामुळे त्याचा दर्जा योग्य असला पाहिजे. राजगुरुंच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने त्यांच्या जीवनावर आधारीत काढण्यात येत असलेला चित्रपट हा चांगल्या दर्जाचा व चांगल्या प्रतीचा असला पाहिजे. परंतु शासनाने हे दोन्ही चित्रपट पाहिल्यानंतर शासनाच्या लक्षात आले आहे की, श्री. मोहाडीकर यांनी काढलेल्या चित्रपटाचा दर्जा चांगला नाही. त्यामुळे राज्य सरकारने त्या चित्रपटाला अर्थसहाय्य न करण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे श्री. कांबळे यांनी काढलेला चित्रपट अर्धवट अवस्थेत आहे. जवळपास 25 ते 30 टक्के त्याचे काम झ ाले आहे. त्या चित्रपटाबाबत तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे, तो निश्चितपणे घेण्यात येईल. तो चित्रपट देखील मी पाहिला असून त्याचा दर्जा 100 टक्के चांगला नाही. परंतु त्यांनी चित्रपट काढण्यासाठी प्रयत्न केले असले तरी तो चित्रपट काढण्यासाठी बराच विलंब झाला आहे. त्यामुळे तो चित्रपट राज्य शासनाने पूर्ण करावा की, दुसऱ्या निर्मात्यामार्फत पूर्ण करावा यासंबंधी राज्य सरकारच्या पातळीवर निश्चितपणे निर्णय घेतला जाईल हे मी यानिमित्ताने स्पष्ट करतो. माननीय सदस्यांनी त्याबाबत व्यक्त केलेल्या भावनांशी हे शासन सहमत आहे. हा चित्रपट तातडीने पूर्ण व्हावा अशी शासनाची देखील इच्छा असल्यामुळे तो पूर्ण करण्यासाठी शासन निश्चितपणे प्रयत्न करील. त्यानंतर तमाशा, लावणी या लोककलांच्या बाबतीत,...

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, हुतात्मा राजगुरु यांच्या वाडयाचे बांधकाम थांबले आहे, त्याबाबत देखील शासनाने दखल घेण्याची आवश्यकता आहे.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, वाडयाचे काम कशामुळे प्रलंबित राहिले आहे याबाबत मी माहिती घेतो. ते काम कशामुळे मागे पडले आहे हे तपासले जाईल. आणि त्याबाबतीत अजून काही करणे आवश्यक असेल तर ते करण्यासाठी तातडीने पावले उचलली जातील. सभापती महोदय, विठाबाई नारायणगावकर यांच्या नावाने दरवर्षी पुरस्कार देण्यात येतो. परंतु त्यांच्या स्मारकाच्या बाबतीत नेमकी काय अडचण आहे? हे पहाणे आवश्यक आहे. या राज्यामध्ये तमाशा कलावंत, लावण्या कलावंतांची जी काही पथके आहेत त्या सर्वांच्या बाबतीत विचार करुन विठाबाई नारायणगावकर यांच्या नावाने सातत्याने दरवर्षी पुरस्कार दिले जातात.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण...

परंतु स्मारकाच्या बाबतीत निश्चितपणे काय अडचण आहे? त्याबाबतची माहिती घेतली जाईल. त्याबाबत शासनाने घेतलेल्या भूमिकेमध्ये बदल होणार नाही. ते स्मारक पूर्ण करण्याच्या दृष्टीने पावले उचलली जातील.

सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी साहित्य संमेलनाबाबत विचार व्यक्त केले. साहित्य संमेलन कुठे घेण्यात यावे हा साहित्य महामंडळाचा प्रश्न आहे. त्यामुळे साहित्य संमेलन रत्नागिरी येथे घेण्यात यावे की सॅनफ्रॅन्सिस्को येथे घेण्यात यावे याबाबतच्या साहित्य महामंडळाच्या निर्णयामध्ये हे शासन हस्तक्षेप करणार नाही. परंतु यानिमित्ताने एक बाब आपल्या निदर्शनास आणली पाहिजे की, गेल्या तीन-चार वर्षामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत अमेरिकेत जाण्याचा मला योग आला. त्याठिकाणी बृहन्महाराष्ट्र मंडळ अस्तित्वात असून त्यांच्यामार्फत दर दोन वर्षांनी संमेलन भरविण्यात येते. मग ते अमेरिकेमध्ये असेल किंवा सियाटेलमध्ये असेल. यामध्ये एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की, अमेरिकेत स्थायिक झालेले जे भारतीय नागरीक आहेत ते दर दोन वर्षांनी संमेलनाच्या निमित्ताने एकत्र येतात. माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांची देखील त्यानिमित्ताने माझ्याशी त्याठिकाणी भेट झाली होती. माननीय श्री. मनोहर जोशी हे मुख्यमंत्री असतांना देखील दर दोन वर्षांनी संमेलन होत होते. त्याठिकाणी असलेल्या मराठी भाषिक मंडळींचा आग्रह आहे की, संमेलनाच्या निमित्ताने मराठी साहित्य, मराठी नाटके, मराठी वाड्‌मयाशी संबंधित असलेल्या लोकांनी एकत्र येऊन मराठी भाषेचा प्रचार व्हावा, मराठी नाटय कलेचा प्रचार व्हावा. आणि त्यासाठी शासनामार्फत मदत व्हावी, त्याठिकाणी ही कला सादर केली जावी अशी त्यांची अपेक्षा असते सभापती महोदय, त्यामुळे त्याठिकाणी साहित्य संमेलन भरविण्याबाबत नवीन विचार पुढे आला. आणि पुढील साहित्य संमेलन हे सॅनफ्रॅन्सिस्को येथे व्हावे अशी त्यांच्याकडून अपेक्षा व्यक्त करण्यात आली. सभापती महोदय, दरवर्षी महाराष्ट्रामध्ये मराठी नाटय संमेलन भरविण्यात येते, त्याचप्रमाणे साहित्य संमेलन भरविण्यात येते. या दोन्ही कार्यक्रमांचे चांगल्या प्रकारे संयोजन व्हावे याकरिता शासनातर्फे दरवर्षी या संमेलनाकरिता प्रत्येकी 25 लाख रुपयांचे अनुदान दिले जाते. त्याचप्रमाणे अमेरिकेमध्ये दर दोन वर्षांनी होणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाला 50 लाख रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केला होता.

(यानंतर सौ. रणदिवे)0

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण . . . .

मला असे वाटते की, साहित्य संमेलनाच्या बाबतीत काही अपेक्षा असेल किंवा काही अडचण असेल किंवा दोन्हीकडे म्हणजे महाराष्ट्रामध्ये आणि परदेशामध्ये संमेलन घेण्याच्या बाबतीत कल्पना असेल तर त्याच्या वादामध्ये न जाता, शेवटी हेतू चांगला आहे आणि त्यामुळे हे संमेलन कुठे घ्यावयाचे ते संयोजकांनी ठरवावे. त्याबाबतीत शासन निश्चितपणे मदत करण्याची भूमिका घेईल हेच मला मुद्दाम सांगावयाचे आहे. दोन्हीमध्ये काही नुकसान नाही आणि शासनाची देखील काही तक्रार नाही. त्यामुळे याबाबतीत जी मदत करणे आवश्यक आहे, ती करण्याच्या बाबतीत शासनाची निश्चित भूमिका आहे.

सभापती महोदय, याठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी कलाकारांच्या मानधनाच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला. विशेषत: शाहिरांच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला की, त्यांनी मोर्चा देखील काढलेला होता वगैरे. तर मी सांगू इच्छितो की, शाहिरांना मदत करण्याच्या बाबतीत शासनाची भूमिका नक्की आहे. आपल्याला माहिती आहे की, शाहिरांच्या ज्या मागण्या आहेत, त्या बाबतीत मी 2007 मध्ये एक बैठकही घेतली होती आणि त्यामधून बऱ्याचसे प्रश्न देखील मार्गी लागलेले आहेत. पण अजूनही काही प्रश्न प्रलंबित आहेत हे देखील नाकारता येणार नाही. कारण या सगळया प्रश्नांशी निश्चितपणे आर्थिक संबंध आहे. त्यामुळे एखाद्या बाबतीत निर्णय घेत असताना त्यासाठी आर्थिक तरतूद उपलब्ध असावयास पाहिजे. आपण नेहमी पाहतो की, जेव्हा रेग्युलर बजेटमधील निधी कमी पडतो, तेव्हा पूरक मागण्यांच्या वेळी याबाबतीत विचार करावा लागतो. मला खेदाने असे म्हणावे लागते की, बऱ्याच वेळेला कमी तरतूद उपलब्ध होते ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे प्रत्येक वेळेला वित्त विभागाकडे यासाठी मागणीच्या माध्यमातून पाठपुरावा करावा लागतो. परंतु सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी शाहिरांच्या बाबतीत सांगितल्याप्रमाणे त्यांचे प्रमुख जे पदाधिकारी आहेत, त्यांना बोलावून मी त्यांच्याशी निश्चितपणे चर्चा करीन आणि त्यांच्या ज्या उर्वरित मागण्या प्रलंबित आहेत, त्या मार्गी लावण्याच्या बाबतीत शासन स्तरावर जो निर्णय घेणे आवश्यक आहे, तो घेतला जाईल हे मला मुद्दाम येथे नमूद केले पाहिजे.

सभापती महोदय, याठिकाणी मला या व्यतिरिक्त आणखी काही गोष्टींचा उल्लेख करावयास पाहिजे.यावर्षी संत तुकाराम महाराज यांच्या जन्माला 400 वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने मध्यंतरी माननीय मुख्यमंत्र्यांनी एक बैठक घेतली आणि त्या माध्यमातून साधारणपणे 650 कोटी ...

. . . .5 एफ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण . . . .

रुपयांचा कार्यक्रमाचा आराखडा तयार करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. या माध्यमातून आळंदी, देहू आणि पंढरपूर येथे काही गोष्टी करणे आवश्यक आहे. कारण तेथे मोठया प्रमाणावर भाविक लोक जात असतात. अशा वेळी तेथील परिस्थिती लक्षात घेता, त्याठिकाणी काही पायाभूत सुविधा निर्माण करण्याची गरज आहे. त्याबाबतीत मघाशी सांगितल्याप्रमाणे 650 कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. ही कामे तातडीने मार्गी लावण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देऊन या कामांना चालना देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. सांस्कृतिक कार्य विभाग नोडल एजन्सी म्हणून त्या विभागाच्या माध्यमातून व संबंधित जिल्हयाचे पालकमंत्री यांच्या समन्वयातून हा सर्व कार्यक्रम मार्गी लावण्याचा प्रयत्न आहे. म्हणून याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी मते व्यक्त केलेली आहेत, त्याचे खुलासेवार उत्तर देण्याचा मी प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, कलाकारांच्या मानधनाच्या बाबतीत एक विषय आहे.

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सध्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जन्मशताब्दी वर्ष सुरु आहे आणि ते 2009 मध्ये पूर्ण होत आहे. आपण याबाबतीत अर्थसंकल्पामध्ये उल्लेख देखील केलेला आहे. त्या कार्यक्रमाच्या बाबतीत आखणी करण्याची आवश्यकता आहे.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, संत तुकडोजी महाराजांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने माननीय सभापती महोदयांच्या ज्या कल्पना असतील, त्यालाही गती देण्याच्या बाबतीत शासन निश्चितपणे प्रयत्नशील राहील हे मला मुद्दाम सांगितले पाहिजे. म्हणून या सगळया मागण्यांच्या बाबतीत सदनामध्ये चांगल्या प्रकारच्या सूचना मांडण्यात आल्या आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगेसाहेबांनी एक चिठ्ठी पाठविली होती. त्यांनी देखील त्यांच्या भाषणामध्ये काही बाबींचा उल्लेख केलेला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, आपण याबाबतीत एक तातडीने बैठक घेऊ. सन्माननीय सदस्यांनी भाषणामध्ये गजनृत्य आणि कैपत या दोन गोष्टींचा उल्लेख केला आहे. याबाबतीत एक बैठक घेऊन यासाठी काय करावे लागणार आहे याचा विचार करु आणि माझी यासंदर्भात निश्चितपणे सहकार्य करण्याची भूमिका राहील. सन्माननीय सदस्य सांगतील त्याप्रमाणे बैठक घेऊन याबाबतीत निर्णय घेण्यात येईल.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मी भाषणामध्ये किर्तन शिकविणाऱ्यांच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला होता. त्याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, किर्तनकार आहेत, गजनृत्य आहे, ओवीकार आहेत या सगळयांच्या बाबतीत मुद्दा मांडलेला आहे. तर याबाबतीत केवळ बोलून उपयोग नाही. आपण मागणी केली आणि ती मान्य करण्याच्या बाबतीत नुसती घोषणा करुन उपयोग नाही. तर यामध्ये प्रत्यक्षात काय करण्याची आवश्यकता आहे याचा विचार केला पाहिजे. कारण एखाद्या गोष्टीबाबत सभागृहामध्ये केवळ आश्वासन देऊन त्याची पूर्तता होत नसेल तर त्याचा काही उपयोग नाही. म्हणून मी सांगतो की, याबाबतीत चर्चा करुन जे काही करणे आवश्यक आहे, ते निश्चितपणे केले जाईल. त्यामुळे सभागृहाने या विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात अशी मी विनंती करतो.धन्यवाद.

-----

. . . .5 एफ-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी शाहिरांच्या संदर्भात मागणी मान्य केली आहे, त्याबद्दल मी आभारी आहे. तसेच दोन्ही साहित्य संमेलनांना मदत करण्याचे जाहीर केले आहे, त्याबद्दलही आभारी आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

साहित्य रसिकांनी तशी मागणी केलेली नाही. शासन स्वत: ही भूमिका घेत आहे. याबाबतीत सुस्पष्टता राहावी. नंतर याबाबतीत समज, गैरसमज राहू नये. आपल्या लक्षात असेल की, माननीय श्री. फरांदे साहेब सभापतीपदी असताना त्यांनी नेवासे येथील संत ज्ञानेश्वर महाराष्ट्राच्या स्मारकाबाबत अनेक निधी अपुरे राहिले याबाबत तक्रार केली होती. त्याबाबतीत काय प्रगती झाली याबाबत स्मरण करुन द्यावे असे वाटते. याबाबतीत लक्ष घालावे अशी विनंती करते.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे ( अपारंपारिक ऊर्जा व फलोत्पादन मंत्री ) : सभापती महोदय, ऊर्जा आणि अपारंपारिक ऊर्जा या दोन्ही विभागाच्या मागण्यांना सभागृहाने मंजुरी द्यावी अशी विनंती करण्यासाठी मी उभा आहे. प्रामुख्याने बाब क्रमांक 126 ही ऊर्जा विभागाची 400 कोटी रुपयांची पुरवणी मागणी आज सभागृहासमोर आलेली आहे आणि बाब क्रमांक 127 ही अपारंपारिक ऊर्जा विभागाची 11 लाख 22 हजार रुपयांची पुरवणी मागणी आज सभागृहासमोर आणलेली आहे. प्रामुख्याने ऊर्जा विभागाची जी 400 कोटी रुपयांची मागणी आहे ती राज्य सरकारच्यावतीने शेतकऱ्यांना आणि वस्त्रोद्योगात असलेल्या उद्योगांना सवलतीच्या दरात जो वीज पुरवठा केला जातो त्याचे जे अनुदान महाराष्ट्राच्या डिस्ट्रिब्युशन कंपनीला देणे आवश्यक आहे त्यासाठी ही मागणी सभागृहासमोर आणलेली आहे. आज ऊर्जा विभागाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी चर्चेमध्ये फारसा भाग घेतला नाही परंतु ज्या काही प्रमुख सूचना या ठिकाणी करण्यात आल्या त्याबाबतीत एक-दोन गोष्टींचा उल्लेख करतो. एन्रॉन प्रकल्प कधी सुरु होणार याबाबत काही सन्माननीय सदस्यांनी विचारणा केली. खरे तर एन्रॉन प्रकल्प सुरु झालेला आहे. तो प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालू करण्याचे काम सुरु आहे. आजही 600 ते 900 मेगावॅट वीज या प्रकल्पातून महाराष्ट्राला मिळत आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात भारनियम बंद होणार काय अशी भावना काही सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली. आपणा सगळ्यांना या गोष्टीची कल्पना आहे की, पावसाने या वर्षी संपूर्ण महाराष्ट्रासमोर एक मोठे संकट उभे केले आहे. ज्या काळात विजेची मागणी नैसर्गिकरित्या कमी होणे आवश्यक असते त्या काळात विजेची मागणी सगळीकडे वाढत आहे. आपला लोडशेडींगचा कालावधी सुध्दा वाढवावा लागणार आहे. अशी अवस्था आपणा सगळ्यांसमोर ऊर्जेच्या क्षेत्रात निर्माण झालेली आहे. विद्युत कर्मचाऱ्यांच्या पेन्शनच्या अनुषंगाने काही विचार करणार काय अशी भावना काही सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी व्यक्त केली. सदर विषय हा रथो समितीसमोर असून त्या समितीचा अहवाल प्रलंबित आहे. तो अहवाल लवकरात लवकर यावा आणि या कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा अशा प्रकारचा प्रयत्न हा विभाग करील. अपारंपारिक ऊर्जेच्या संदर्भात जे धोरण आणणार होतो त्याचे नेमके काय झाले असा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी उपस्थित केला. खऱ्या अर्थाने अशा प्रकारचे धोरण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे .....

आणण्यामध्ये थोडासा विलंब झाला आहे, ही वस्तुस्थिती मी सभागृहापुढे मान्य करतो. पण आज मला आनंदाने असे सांगावे लागेल की, ज्या काळात फार मोठे भारनियमन आपल्याला करावे लागते, ज्या काळात ऊर्जेचे संकट आहे त्या काळात पवन ऊर्जेच्या निमित्ताने गेल्या आठ दिवसात 750 ते 800 मेगावॅट वीज महाराष्ट्राला देण्यामध्ये आपण यशस्वी ठरलो. एमआयडीसी टॅक्टखाली जमिनी घ्याव्यात आणि त्या जमिनीवर पवन ऊर्जेचा विकास झाल्यावर जमीन मालकांना सुध्दा त्या विकासाचा वाटा त्या जमिनीच्या भाड्यापोटी मिळावा अशा प्रकारचे नवीन धोरण आपण सुचविलेले आहे. सध्या या अनुषंगाने एमआयडीसीचा अहवाल उद्योग विभागाच्या सचिवांनी मागितलेला आहे. आताच माननीय मंत्रिमहोदय श्री. अशोक चव्हाण यांच्याबरोबर चर्चा झाली. आम्ही दोघेही एकत्र बसून जो विलंब होतो तो थांबवून लवकरात लवकर ते धोरण महाराष्ट्रासाठी आणू. प्रामुख्याने वाड्यांच्या ठिकाणी वीज नाही अशी अवस्था असल्याची भावना सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली. ज्या ठिकाणी वीज जाऊ शकत नाही अशा महाराष्ट्रातील सर्व वाड्यात आणि पाड्यात येत्या दोन वर्षात अपारंपारिक ऊर्जेच्या माध्यमातून विद्युतीकरण करण्याचा कार्यक्रम आपण हाती घेतला आहे. ज्या गावात वीज जाऊ शकते परंतु ठराविकच घरे असल्यामुळे त्या विजेचा खर्च वाढत असल्यामुळे काही धनगर बांधव आणि वाड्यांमध्ये राहणाऱ्या गरजू लोकांनी मागणी केलेली नाही अशा ठिकाणी राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त सोयी उभ्या करुन त्यांना वीज पुरवठा करण्याचे काम हाती घेतलेले आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे....

त्यामुळे हे सर्व विषय मार्गी लागतील असा मी विश्वास व्यक्त करतो. अपारंपारिक ऊर्जा विभागाच्या या दोन्ही मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करतो आणि माझे उत्तर संपवितो.

-----

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर ( सहकार व पणन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सहकार व पणन विभागाच्या पुरवणी मागण्यांना मंजुरी द्यावी अशी विनंती करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सहकार आणि पणन विभागाच्या काही प्रमुख मागण्या सभागृहासमोर मांडलेल्या आहेत. मध्यंतरी कांद्याचे भाव कोसळले होते, त्यामुळे कांदा उत्पादकांना अनुदान देण्यासाठी 80 कोटी रुपयाच्या मागणीचा समावेश केला आहे. सहकार विभागाने साखर निर्यातीसाठी 150 कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केली आहे. त्याचबरोबर 2007-08 च्या हंगामामधील जो ऊस शिल्लक राहिला त्यासाठी 50 कोटी रुपये प्रस्तावित केले आहेत. केंद्र सरकारच्या कर्जमाफीमध्ये जे 7 जिल्हे आले नाहीत त्या जिल्हयांसाठी 141 कोटी रुपयांची कर्जमाफी प्रस्तावित केलेली आहे. सहकार विभागासंबंधी चर्चा करताना सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी 2006-07 आणि 2007-08 मधील हंगामातील ऊसाचे पंचनामे झाले परंतु त्यानंतर तो ऊस ॲक्सीडेन्टली जळाला ऊस आहे. त्या ऊसासाठी अनुदान मिळाले नसल्याचा प्रश्न यापूर्वी उपस्थित केला होता आणि आजही उपस्थित करण्यात आला आहे. यावर्षी त्यासाठी 50 कोटी रुपये प्रस्तावित केले आहेत. यासंदर्भात आपापल्या भागातील जिल्हाधिका-यांकडे शिल्लक राहिलेला परंतु नंतर जळालेल्या ऊसाला अनुदान मिळण्याची मागणी करावी. त्यासाठी हेक्टरी 25 हजार रुपये देण्याच्या सुस्पष्ट सूचना देण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी अशी सूचना केली की, शिल्लक राहिलेल्या ऊसाची चारा म्हणून खरेदी करावी. जर अशीच दुष्काळग्रस्त परिस्थिती राहिली तर निश्चितपणे जिल्हाधिका-यांना जुना उभ्या ऊसाची चा-यासाठी खरेदी करण्याच्या सूचना देण्यात येतील. सहकार व पणन विभागाच्या पुरवणी मागण्या संमत कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

-------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या पुरवणी मागण्यांवर बोलताना अनेक सन्माननीय सदस्यांनी अतिशय मौलिक सूचना केल्या आहेत. कोकण शिक्षण मंडळाच्या संदर्भात मी सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देईन. केवळ सन्माननीय सदस्यांनी मनापासून पाठपुरावा केल्यामुळे हा प्रश्न मार्गी लागलेला आहे. या मंडळासाठी जागा उपलब्ध झालेली आहे, फक्त पदांना मान्यता मिळविण्यासाठी आणि वेतनासाठी 8.25 कोटीची मागणी मंजूर करुन घेण्यासाठी मी कॅबिनेटसमोर निश्चितपणे जाणार आहे.

श्री.मधुकर चव्हाण : यासाठी जी.आर.काढलेला आहे काय ?

प्रा.वसंत पुरके : त्यासंदर्भातील शासन निर्णय निगर्मित करीत आहोत. त्यानंतर यासाठी लागणा-या निधीसाठी मी कॅबिनेटसमोर जाणार आहे. वेतनेतर अनुदानासाठी याठिकाणी सूचना करण्यात आली आहे. मागील आठवडयाच्या शेवटी मंत्रिमंडळाच्या उपसमितीची बैठक झाली. या समितीमध्ये मी, माननीय वित्त मंत्री श्री.जयंत पाटील, माननीय उच्च शिक्षण मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांचा समावेश आहे. या समितीच्या सदस्यांनी बसून वेतनेतर अनुदानासाठी एक प्रारुप आराखडा तयार केलेला आहे. गाव तेथे व्यायामशाळा ही योजना अगोदरपासूनच अस्तित्वात आहे.

सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी नवीन वेतन पथकाचे संगणकीकरण करावे अशी मौलिक सूचना केली आहे. हा कार्यक्रमही टप्प्याटप्प्याने हातामध्ये घेतला आहे. कारण कर्मचा-यांची संख्या खूप वाढली आहे आणि हे काम करणा-या कर्मचा-यांची संख्या खूप कमी आहे. त्यामुळे संगणकीकरणाशिवाय पर्याय नाही. आंतरवासिताच्या संदर्भात पैशाची तरतूद केलेली आहे. सगळयाच आंतरवासितांच्या विद्यार्थ्यांना चेकनेच पैसे मिळतील, यापूर्वीच तशा पध्दतीने पैसे देण्याची सुरुवात झालेली आहे, त्यामध्ये कोणताही संभ्रम असू नये. निकषपात्र शाळांबाबत 208 शाळा आणि 1034 तुकडयांना देखील अनुदानाच्या टप्प्यात आणलेले आहे आणि त्यासाठी 1450 कोटींची तरतूद देखील केलेली आहे.

वस्तीशाळांबाबतचा मुद्दा मांडण्यात आला होता. शासन केवळ 600 वस्तीशाळांना शासन नियमित करु शकलेले नाही. उर्वरित सर्व वस्तीशाळा नियमित केल्या आहेत. त्या शाळांवर निमशिक्षकांची भरती सुध्दा केलेली आहे. सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार त्यांची मागील दाराने नेमणूक करता येत नाही म्हणून निमशिक्षक हा सांकेतिक नाव स्वीकारलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके.....

तालुका क्रीडा अधिका-यांच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, मुलांना प्रशिक्षण देण्यासाठी हे नवीन पद निर्माण केले आहे. तूर्त त्यांना अधिक मानधन देण्याचा कोणीही आग्रह धरु नये अशी मी सर्वांना विनंती करतो.

बाब क्रमांक 61, 62, 63 अन्वये शाळांच्या तुकडयांना सहाय्यक अनुदान उपलब्ध करुन दिलेले आहे. मूल्यांकनाचे प्रस्ताव शासन स्तरावर घ्यावयाचे की नाही ही बाब तपासून पाहणे गरजेचे आहे. कारण यासाठी खूप वेळ लागला तर पुन्हा शाळा अनुदानापासून वंचित राहतील. त्यामुळे ही बाब तपासून घेण्यात येईल.

तसेच अल्पसंख्यांकांकडे लक्ष देण्याचा मुद्दा मांडण्यात आला आहे. त्याबाबत मी सांगेन की, यावर्षी प्रत्येक मुलाला 7,400 रुपये शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. ही सर्व मुले मुख्य प्रवाहात आली पाहिजेत अशी शासनाची भूमिका आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. वसंत पुरके...

सन्माननीय सदस्या प्रा. फौजिया खान यांनी 5 टक्के आरक्षणाचा मुद्दा उपस्थित केला. त्या बाबतीत डेप्युटी डायरेक्टर ऑफ स्पोर्टस हे लक्ष देत आहेत. येत्या 29 तारखेला अपॉईण्टमेंट होईल. सर्व मुलांना त्याचा फायदा होईल. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी खाजगी शाळांना किचन देण्यासंबंधीची सूचना केली. ती बाब देखील विचाराधीन आहे. या बाबतीत खोटे आश्वासन देण्यापेक्षा त्यासाठी किती खर्च येईल याची तपासणी करण्यात येईल. 2001 पूर्वीच्या सर्व कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्याचा प्रश्न आहे. त्याबाबतीत सकारात्मक भूमिका घेऊ. वस्ती शाळेतील शिक्षकांना पूर्ण पगार देण्याचा प्रश्न आहे. त्याचाही विचार करण्यात येतील. मेंढपाळासाठी मोबाईल स्कूल असावे अशी सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी सूचना केली. याबाबतीत मी हे सांगू इच्छितो की, हे लोक दुर्गम भागामध्ये भटकत असतात त्यामुळे त्यांच्यासाठी मोबाईल स्कूल ही संकल्पना शक्य होणार नाही. परंतु त्यांच्यासाठी निवारा वसतिगृहे आणि कायमस्वरुपी शाळा केल्या तर त्यांचा प्रश्न सुटू शकेल.

श्री. प्रकाश शेंडगे :मेंढपाळ हे घोड्यावरुन सतत भटकत असतात. ते एका जागेवरुन गेल्यानंतर पुन्हा त्या जागी येत नाहीत. म्हणून त्यांच्यासाठी मोबाईल स्कूल असावे अशी माझी मागणी आहे.

प्रा. वसंत पुरके : आता पारधी समाजाची भटकंती बंद झालेली आहे. त्यांना सांगितले गेले की, ते जर असेच भटकत राहिले तर कोणीही त्यांची दखल घेणार नाही. त्यांनी जमिनी, स्थावर मालमत्ता घेतली तरच ते एका ठिकाणी राहातील आणि त्यांचे कायमस्वरुपी कल्याण होऊ शकेल. तेव्हा शिक्षण आणि क्रीडा विभागाच्या 790.06 कोटीच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या मागण्यावरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली, सन्माननीय सदस्य प्रा. फौजिया खान, सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे आणि सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी भाग घेऊन काही सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी कोकणातील आयटीआयचा प्रश्न मांडला. गेल्या अधिवेशनामध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या मागण्यावरील चर्चेच्या वेळी कोकणातील सर्व आमदारांची बैठक घेण्यात येईल असे सांगितले होते. मी सांगू इच्छितो की, या बाबतीत कोकण विभागाच्या पालकमंत्र्यांसमवेत माननीय मंत्री महोदयांनी बैठक घेऊन कोकण विभागातील सर्व आयटीआयचा आढावा घेतला. आयटीआयमधील 1043 जागा रिक्त असून त्या भरण्याच्या संदर्भात जाहिरात देण्याचा निर्णय घेतलेला आहे. 3 ऑगस्ट पर्यन्त ह्या सर्व जागावरील भरती प्रक्रिया आम्ही पूर्ण करु. ओरस, फोंडाघाट आणि मालवण येथील आयटीआयसाठी अडीच कोटी रुपये देऊन ते डेव्हलप करण्यात येणार आहेत.

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी कॉम्प्युटर प्रोजेक्टसंबंधीचा मुद्दा मांडला. हॉस्पिटल मॅनेजमेंट आणि इन्फॉर्मेशन सिस्टिम संबंधीचा हा प्रोजेक्ट आहे. हा पायलट प्रोजेक्ट 1 वर्षापूर्वी सुरु केलेला आहे. हॉस्पिटलमधील सर्व रुग्णांची केस हिस्टरी, इन्व्हेन्शन, हॉस्पिटलमधील संपूर्ण सामान, संपूर्ण स्टाफ, विद्यार्थी यांची माहिती असेल. ही माहिती संकलित करण्याचे सॉफ्टवेअर एक महिन्यापूर्वीच तयार झालेले असून एकदा ही सिस्टीम येथे यशस्वीरित्या कार्यान्वि झाली की ती संपूर्ण महाराष्ट्रमध्ये कार्यान्वित करुन सर्व कॉम्प्युटर एकमेकांशी जोडले जाणार आहेत. या सिस्टिममुळे एखाद्या रुग्णाने मुंबईमध्ये ट्रीटमेंट घेऊन 6 महिन्यानंतर तो नागपूरला गेला तर तेथे देखील संपूर्ण केसपेपर्स त्याला उपलब्ध होतील. यामुळे कागदाचा वापर कमी होईल, रेकॉर्ड चांगल्या प्रकारे ठेवले जाईल. ही जी सर्व माहिती आपण संकलित करणात आहोत त्यामुळे I think, this will be one of the biggest assets of the medical education department in the days to come.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी...

सन्माननीय सदस्यांनी असाही प्रश्न उपस्थित केला आहे की, क्रियेशन ऑफ बायो मेडिकल इंजिनिअर यांचा मुंबई, पुणे, नागपूर संबंधी विचार करीत आहोत आणि यासंबंधात लवकरात लवकर निर्णय घेऊन नवीन एक्युपमेंट आपण घेत आहोत. त्या एक्युपमेंटच्या दुरुस्तीसाठी एक नवीन पद निर्माण करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. जे.जे.रुग्णालयात कॅन्सरच्या रुग्णांसाठी एक युनीट निर्माण केले पाहिजे अशीही सन्माननीय सदस्यांनी मागणी केली. जे.जे.रुग्णालयाचे अपग्रेडेशन करण्यासाठी केंद्र शासनाने 100 कोटी रुपये मंजूर केले आहेत. 20 कोटी रुपयांचा चेक महाराष्ट्र शासनाने जे.जे.रुग्णालयास या कामासाठी उपलब्ध करुन दिला आहे. कामा रुग्णालयाचे अपग्रेडेशनचे काम प्रत्यक्षात शासनाने सुरु केलेले आहे. केंद्रीय मंत्री श्री. मुरली देवरा यांनी आपल्या विभागाकडून आपल्याला लिनियर एक्सीलेटर, कोबाल्ट युनिट तसेच इतर थेरेपींचे मशीन उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिले आहे. त्याचे काम सुरु आहे. त्याचे इन्फ्रास्ट्रक्चर ट्रंकी बेसीसवर कंत्राट देऊन लवकरात लवकर सदर मशीन्स इन्स्टॉल होणार आहेत. त्यामुळे टाटा रुग्णालयाचा लोड आपोआप कमी होणार आहे. कामा रुग्णालय हे विशेष करुन महिलांसाठी आहे. कॅन्सल झालेल्या माहिलांसाठी कामा रुग्णालयात सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती फौजया खान यांनी औरंगाबाद मेडिकल कॉलेजमधील स्वच्छेते संदर्भात मुद्दा उपस्थित केला आहे. यासंदर्भात मी आजच चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत. येत्या सात दिवसात चौकशीचा अहवाल आल्यानंतर त्याबाबतची माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवीन.

सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी ग्रंथालयासंबंधीचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला. महाराष्ट्र शासन संपूर्ण राज्यातील 8500 ग्रंथालयांना अनुदान देत आहे. ग्रंथालयातील पुस्तकांच्या निवडीच्या संदर्भात एक समिती स्थापन करण्यात आली आहे. पुस्तके खरेदीसाठी आदरणीय श्री. मनोहर साहेबांच्या अध्यक्षतेखाली समिती निर्माण केली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या ग्रंथालयासाठी पुणे येथील बळवंत चौकात जाऊन पुस्तके खरेदी करतात. शासनाच्या ग्रंथालयातील कोणीही प्रतिनिधी त्या ठिकाणी जाऊन पुस्तके खरेदी करीत नाहीत. ग्रंथालयांना आपण जे अनुदान देतो, त्यात 50 टक्के अनुदान पुस्तके खरेदी करण्यासाठी देण्यात

...2..

येते व 50 टक्के अनुदान हे ग्रंथालयातील कर्मचा-यांच्या पगार व इतर खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात येते. बळवंत चौक पुस्तकांसाठी प्रसिध्द आहे. आमच्या संचालनालयाचे पुस्तक खरेदीसंबंधीचे नियमांची अंमलबजावणी करतो आणि त्या नियमाप्रमाणेच पुस्तकांची खरेदी करीत असतो ही बाब मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

डॉ. नीलम गोऱ्हे : पुस्तक खरेदीत कमिशन मिळते म्हणून त्या ठिकाणाहून मोठया प्रमाणात पुस्तके खरेदी केली जातात. मी माझ्या भाषणात असे सुचविले होते की, ग्रंथालय पुस्तके खरेदी करतात पण समितीने निवड केलेली पुस्तके खरेदी केली जातात किंवा नाही या गोष्टीची पाहणी झ ााली पाहिजे. कमिशन या एकमेव बेसीसवर 15 हजार, 25 हजार रुपयांची पुस्तके खरेदी करण्यात येतात आणि योग्य ती पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध होत नाहीत असा माझा खरा मुद्दा होता.

श्री. सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, पुस्तक खरेदी नियम समिती ज्या पुस्तकांची निवड करते, तीच पुस्तके खरेदी केली जातात. अनुदानित ग्रंथालये आहेत त्यांना देखील समितीने निवड केलेलीच पुस्तके खरेदी करावी लागतात. दुसरी पुस्तके ते खरेदी करु शकत नाही. असा प्रकार कुठे आढळून आला तर त्याबाबतीत निश्चितपणे चौकशी करण्यात येईल.

सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी प्रत्येक विद्यापीठांमधून संस्कृत विषय शिकविला गेला पाहिजे अशी या ठिकाणी मागणी केली. सन्माननीय सदस्यांचे संस्कृत विषयावर खूप प्रेम आहे. नागपूरला आपण प्रत्यक्षात एक विद्यापीठ स्थापन केले आहे. प्रत्येक वेळेस तेथे आपण कोर्सेस वाढवितो आहोत. आता आपण चायना विद्यापीठाबरोबर आपण कोलॅब्रेशन केले आहे. या वर्षी त्या विद्यापीठात अनेक नवीन कोर्सेस सुरु करीत आहोत. मुंबई तसेच इतर विद्यापीठ आहेत त्या ठिकाणी संस्कृत विषय शिकविला जातो. परंतु प्रथम वर्षात संस्कृत विषय शिकणारे विद्यार्थी विद्यापीठास मिळाले पाहिजेत. विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आणि त्यांनी सांगितले की, आम्हाला संस्कृत शिकवा तर ती गोष्ट विद्यापीठास शक्य होणार नाही. कारण विद्यापीठे ॲटॉनॉमस बॉडीज् आहेत. त्यामुळे ती विद्यापीठे आपल्या स्तरावर यासंबंधीचा निर्णय घेत असतात. ज्या विद्यार्थ्यांना संस्कृत शिकण्याची इच्छा आहे त्यांना मदत करा एवढी सूचना शासनाच्या वतीने आपण

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देऊ शकतो. सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या मागण्या या चर्चेच्या निमित्ताने केल्या आहेत, त्यांच्या मागणीचा निश्चितपणे विचार केला जाईल. वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या मागण्या सन्माननीय सदस्यांनी मान्य कराव्यात अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

---

यानंतर श्री. कानडे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( श्री.उल्हास पवार )** : सन 2008-09 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. उद्या गुरुवार, दिनांक 24 जुलै,2008 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल. सकाळी 10.00 ते 12.00 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. या बैठकीत आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या प्रा.सुरेश नवले व इतर वि.प.स.यांनी नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर चर्चा घेण्यात येईल. त्यानंतर दुपारी 12.15 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

( सभागृहाची बैठक 8 वाजून 11 मिनिटांनी गुरुवार, दिनांक 24 जुलै, 2008 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही